म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.

RFEBK-0005875

[illegible]

# माझे आवडते लेखक.

गजानन त्र्यंबक माडखोलकर

नागपूर

डिसेंबर १९३९

REFBK-0005875

महाराष्ट्र ग्रंथभांडार—कोल्हापूर.

मूल्य १ रु.

मुद्रकः—व्ही. व्ही. पटवर्धन
कॅलेंडर प्रेस दादर, मुंबई.

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, अनुवादाचे, त्यांतील उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क सौ. शांता माडखोलकर, जी. ए., शांतानिवास, मॉडेल मिल्स रोड, नागपूर-शहर, यांच्या स्वाधीन आहेत.

प्रकाशकः—व्ही. व्ही. पटवर्धन
ज्योत्स्ना कार्यालय, मुंबई

Maruthi Grantha Sangrahalay

र. नि. ६४८

' महाराष्ट्र'कार

श्री. दादासाहेब ओगले

यांस विनयादरपूर्वक

समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | दोन तात्या.... .... ... | १ |
| २ | युगप्रवर्तक कोल्हटकर... .... ... | ११ |
| ३ | रावसाहेब मोरमकर.... ... .... | १९ |
| ४ | कै. वासुदेवशास्त्री खरे.... ... .... | २५ |
| ५ | नारायण वामन टिळक.... ... .... | ३१ |
| ६ | बापूजी मार्तंड आंबेकर.... .... ... | ३७ |
| ७ | कै. अच्युतराव कोल्हटकर.... ... | ४७ |
| ८ | विष्णु सखाराम खांडेकर.... .... | ५१ |
| ९ | श्री. वरेरकर.... .... .... .... | ५९ |
| १० | नाट्यछटाकार दिवाकर ... .... | ६६ |
| ११ | कवि यशवंत... ... ... .... | ७४ |
| १२ | बॅ. सावरकर... ... ... .... | ८३ |
| १३ | जॉन मोर्ले... .... ... ... | ८७ |
| १४ | लॉर्ड बायरन.... .... .... .... | १०० |
| १५ | अनाटोल फ्रान्स... ... ... | १०९ |
| १६ | नाट्याचार्य खाडिलकर... .... .... | ११३ |
| १७ | कविवर्य बोबडे... ... ... ... | ११६ |
| १८ | श्रीधर-मनोरमा... ... .... ... | ११८ |
| १९ | हरिभाऊ आपटे... .... ... ... | १२५ |
| २० | प्रो. वामन मल्हार जोशी... ... ... | १३५ |
| २१ | प्रो. फडके आणि श्री. खांडेकर... ... | १४५ |
| २२ | कवि माधवानुज... ... ... | १५५ |

# दोन तात्या

--१--

१९२० सालच्या मे महिन्यांत श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्याशीं माझी ओळख झाली. तो दिवस मी कधींहि विसरणार नाहीं. त्या दिवशीं दुपारीं अकस्मात् ' विविधज्ञानविस्तारा'चे संपादक रावसाहेब मोरमकर यांच्याकडून एक मनुष्य मला बोलवावयाला आला; व त्यानें मला असें सांगितलें कीं, " कोल्हटकर मोरमकरांकडे बसलेले असून, त्यांनीं तुम्हांला तिथें बोलावलें आहे. "

रावसाहेबांच्या दिवाणखान्यांत त्या दिवशीं पाहिलेली त्यांची ती भव्य मूर्ति आजहि माझ्या डोळ्यांपुढें उभी आहे. वार्धक्याची विदारक छाया अद्याप त्यांच्या शरीरावर पडावयाची होती. आणि रंगेल चेहऱ्यावर सदैव खेळणारें उपरोधमिश्र हास्य, कोटि स्फुरूं लागतांच डोळ्यांत झळाळणारी प्रतिभेची दीप्ति, संभाषणांत क्षणोक्षणीं उधळले जाणारे नर्मतुषार, सौंदर्यचिंतनाच्या नादामुळें वृत्तींत विलसणारी अनवधानता, कधींहि न कोमेजणारें मनाचें वासंतिक यौवन इत्यादि कारणांमुळें ते त्या वेळीं अतिशयच आकर्षक वाटत असत. माझे तेव्हां फार तर तीनचारच लेख प्रसिद्ध झालेले असतील. पण, ओळखीच्या त्या पहिल्याच दिवशीं ते माझ्याशीं इतक्या आत्मीयतेनें बोलले कीं, माझी तत्काळ त्यांच्यावर भक्ति जडली.

आणि, मला वाटतें, त्यांच्याविषयीं जें इतकें आकर्षण नवीन पिढींतील लेखकांना वाटतें, त्याला त्यांचा हा दिलदार स्वभावच कारण असावा. त्यांच्यापेक्षां थोर किंवा लोकप्रिय ग्रंथकार महाराष्ट्रांत झाले नाहींत असें नाहीं. थोरवीच्या दृष्टीनें श्री. चिं. वि. वैद्य आणि लोकप्रियतेच्या दृष्टीनें कै. रा. ग. गडकरी हे त्यांच्यापेक्षां निस्संशय सरस ठरतील. पण, सूर्य अधिक तेजस्वी असला किंवा शुक्र अधिक सुंदर दिसला, म्हणून काय झालें ? चंद्राच्या मोहकतेची सर त्यांना कधीं तरी येणें शक्य आहे काय ? तसाच प्रकार याहि बाबतींत आहे. संनिध आलेल्या नवीन लेखकाला त्यांनीं आत्मसात् केला नाहीं, असें क्वचितच घडतें. तो त्यांना आवडला मात्र पाहिजे. आपल्याला आवडलेल्या लेखकाला ते इतक्या आत्मीयतेनें

वागवतात कीं, मग तो त्यांच्या अगदीं भजनीं लागतो. माझाच अनुभव असा आहे, असें नव्हे. खांडेकरांचा अनुभव असाच आहे आणि गडकऱ्यांचाहि पण असाच होता, म्हणतात. म्हणूनच त्यांच्या शिष्यांची आणि मित्रांची परंपरा इतकी उज्ज्वल आणि इतकी विस्तृत आहे. श्री. तात्यासाहेब केळकर हे नेहमीच त्यांच्याविषयीं इतक्या आपुलकीनें आणि आदरानें बोलतात कीं, त्यांचें त्या उद्गारांतून व्यक्त होणारें सौहार्द पाहून अंगावर रोमांच उभे रहावे; व गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यासा.' ची उत्कटतापूर्ण अर्पणपत्रिका तर प्रसिद्धच आहे. पण हे दोघे किती झालें तरी समानशील आणि सहानुभवी. हुशंगाबादचे सेशन्स जज्ज रा. ब. हरि शिवराम मुंजे यांचा साहित्याशीं अगदीं बादरायणसुद्धां संबंध नाहीं. परंतु तात्यासाहेबांविषयींचा त्यांचा स्नेहभाव हा केळकरांच्या स्नेहभावापेक्षांहि कदाचित् अधिक सांद्र ठरेल.

त्यांच्या स्वभावाइतकेंच त्यांचें संभाषणहि आकर्षक असतें. प्रथमदर्शनीं, विशेषतः स्तब्ध असले म्हणजे, ते गंभीर किंबहुना किंचित् उग्र वाटतात. पण, त्यांनीं बोलावयाला आरंभ केला कीं, कोट्या आणि कल्पना यांचें विलोल नर्तन सुरू होऊन, मनुष्य अगदीं मोहित होऊन जातो. त्यांच्या वृत्तींत काय किंवा भाषणांत काय, गांभीर्य आणि विनोद यांचें मोठें चमत्कृतिजनक मिश्रण झालेलें असतें. आजाच्या बोटाला धरून नातू जसा दुडुदुडू धांवत असावा, तसा त्यांच्या संभाषणांत विनोद हा नेहमी गांभीर्याच्या भोंवतीं बागडत असतो; व त्यांच्या गंभीर वाक्याचें पर्यवसान विनोदी कोटींत इतक्या न कळत आणि इतक्या लवकर होतें कीं, नवख्या माणसाच्या तें पुष्कळदां अजीबात लक्षांतहि येत नाहीं. ाच्या जोडीला सौंदर्यचिंतनाच्या बेसुमार आसक्तीमुळें येणारी विमनस्कता आणि स्मरणशक्तीचा लहरीपणा बसविला, म्हणजे तात्यासाहेबांच्या वैचित्र्यपूर्ण स्वभावाची घडण पुरी होते. सभोंवतीं बसलेली मंडळी कोणत्या तरी महत्त्वाच्या विषयावर चर्चा करीत असावयाची, आणि हे 'तुजविण रामे वृथा संसार' यासारखें एकादें सुंदर पद तोंडानें गुणगुणत किंवा एकाद्या रम्य दृश्याचें चिंतन करीत असावयाचे, असा प्रकार नेहमीं दृष्टीस पडतो. अर्थात् तोंडानें हुंकार मात्र अविरत चालू असतात. अशा वेळीं जर त्यांना आपण हटकलें कीं, "तात्या, आमच्या बोलण्याकडे आपलें लक्ष नाही," तर ते लगेच हंसून उद्गारतात, 'तुमच्या बोलण्यापेक्षां अधिक महत्वाच्या गोष्टीकडे माझें लक्ष गेलें

होतें !'' या त्यांच्या उत्तरानें स्वतःच्या अनवधानतेचें तर समर्थन होतेंच, पण विनोदाचाहि अभास उत्पन्न होतो. एकदां तर त्यांनी असें स्पष्टच उत्तर गंमतीनें दिलें होतें कीं, ''सुंदर वस्तूंच्या मागून माझें चित्त भटकत असल्यामुळें इतरांच्या बोलण्याकडे केव्हां केव्हां माझें दुर्लक्ष होतें !''

त्यांची स्मरणशक्तीहि अशीच मोठी छांदिष्ट आहे. शंभर वस्तू लक्षांत ठेवण्याचा त्यांचा प्रयोग ज्यांनीं पाहिला आहे, त्यांना तिच्या सामर्थ्याचें कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नसेल. पण त्यांची स्मरणशक्ति जरी तीव्र आणि संग्राहक असली, तरी निवडानिवडीच्या बाबतींत ती मोठी चोखंदळ आहे. त्यांना आवडलेली एखादी गोष्ट, जणु कांहीं पूर्वीं कधीं सांगितलेलीच नाहीं अशा आविर्भावानें, केव्हां केव्हां ते दिवसांतून तीन वेळां सुद्धां सांगतात. आवडत्या गोष्टींच्या पुनरुक्तीच्या बाबतींत जसें विस्मरण त्यांना सोईचें पडतें, तसेंच नावडत्या व्यक्तींची ओळख विसरण्याच्या बाबतींतहि ते त्यांच्या पथ्यावर पडत असल्याचा अनुभव पुष्कळदां येतो. या कारणामुळें, अनेकदां भेट होऊनहि, पुन्हा प्रत्येक वेळीं स्वतःची नव्यानें ओळख करून देण्याचा प्रसंग आल्याबद्दल पुण्याच्या एका वड्या कवीचा त्यांच्या-वर फार राग झाला होता. तसेंच ते नादीहि पण अतिशय आहेत. एखादी गोष्ट एकदां त्यांच्या मनांत भरली, म्हणजे पुरतें समाधान होईपर्यंत ते तिचा छंद सोडीत नाहींत. ज्योतिषःशास्त्राचा अभ्यास करित असतांना, आकाशांतील ताऱ्यांचें निरी-क्षण करण्याच्या नादामुळें, त्यांना कांहीं दिवस निद्रानाशाचा दुर्धर विकार जडला होता. या विकारावरून बोलतांना त्यांनीं एकदां असे मार्मिक उद्गार काढले होते कीं, '' तारका आणि तारकाक्षी यांच्या अवलोकनाइतकें जगांत दुसरें आनंददायक काय आहे ? '' त्यांच्या स्वभावांतील या विचित्र विशेषांमुळें तिऱ्हाइतांची, आणि केव्हां केव्हां तर खुद्द त्यांची स्वतःचीहि, फार धांदल उडते; व अंतेवासी स्नेही-मंडळीला पुष्कळ गंमतीदार प्रसंग पहावयाला मिळतात. परंतु, स्वभाववैचित्र्यामुळें एखाद्याची न कळत अवज्ञा जरी त्यांच्या हातून क्वचित् घडत असली, तरी ते बुध्दिपुरःसर मात्र कधींच कोणाचें मन दुखवित नाहींत. इतकेंच नव्हे, तर आपल्या सुहृन्मंडळींत बोलतांनाहि एखादा ग्रंथ किंवा ग्रंथकार त्यांचा कितीहि नावडता असला, तरी ते तसें स्पष्ट कधींहि बोलून दाखवावयाचे नाहींत. फार तर, एखाद दुसरें सूचक विधान करतील, एवढेंच. अप्रिय बोलणें हें मुळीं त्यांच्या स्वभावांतच नाहीं.

गुरु या नात्यानें त्यांची योग्यता केवळ अनन्य आहे. ज्याला त्यांनीं एकदां आपला ह्मटला, त्या शिष्याच्या लेखनांत सुधारणा व्हावी म्हणून ते जे श्रम घेतात त्यांचें मोल करणें शक्य नाहीं. त्यांच्या तोडीचा कल्पक लेखक महाराष्ट्रांत आज एकही सांपडणार नाहीं; व त्यांची बुद्धी जितकी कल्पक तितकीच कुशाग्रहि आहे. 'साहित्यबत्तिशीं' तील विनोद हा जसा त्यांच्या नवनवोन्मेषशाली कल्पकतेची, तसेंच ' तोतयाच्या बंडा ' वरील टीकेंतील नाट्य—घटकांचे पृथक्करण हे त्यांच्या बुद्धीच्या मूलगामी कुशाग्रतेची उत्कृष्ट साक्ष देतें. विनोदी लेखनाप्रमाणेंच कल्प-कताप्रधान निबंधलेखनाचाहि प्रघात प्रथम त्यांनीच पाडला; व त्यांच्यानंतर केळकरांपासून तों खांडेकरांपर्यंत त्यांच्या अनेक ऋणानुबंधी लेखकांनी गेल्या पंच-वीस वर्षांत तो पूर्णतेला नेला आहे. पण त्यांच्या इतक्या निर्दोष आणि सुंदर उपमा प्रायः कोणीच देऊं शकत नाहीं. केळकरांच्या उपमा अत्यंत विविध असतात; व खांडेकरांनी तर उपमांच्या बाबतींत आतां अगदीं अतिरेक केला आहे. कमलांच्या दाट रांगांतून जसा राजहंसानें कष्टानें संचार करावा, तशी उपमांच्या अप्रस्तुत गर्दींतून त्यांची तरल प्रतिभा मोठ्या मुष्किलीने मार्ग काढतांना दिसते. तथापि, उपमांच्या क्षेत्रांतील तात्यासाहेब केळकरांचें प्रभुत्व मान्य करूनहि असें म्हणाव-वयाला हरकत वाटत नाहीं कीं, त्यांच्यापेक्षां कोल्हटकरांच्या उपमा अधिक समर्पक आणि उच्च दर्जाच्या असतात. मला वाटतें, तात्यासाहेब सुद्धां ही गोष्ट कबूल कर-तील. याचें कारण एकच. तें हें कीं, आपलें एकंदर लेखन प्रमाणशुद्ध असावें, ह्मणून कोल्हटकर विलक्षण काळजी घेतात. किंबहुना, ते जितके कल्पक तितकेच कष्टाळूहि असल्यामुळेंच, त्यांना साहित्याच्या क्षेत्रांत इतकें लोकोत्तर यश मिळालें. आणि आपल्या शिष्यांनींहि लिहिण्याच्या बाबतींत शक्य तितके परिश्रम घ्यावे, असा त्यांचा फार कटाक्ष असतो.

मला त्यांच्या या स्वभावाचा अनुभव चिपळूणकरांवरील निबंध लिहितांना फार आला. त्या निबंधांतील बऱ्याच उपमा त्यांनी अप्रस्तुत, सांप्रदायिक किंवा सदोष म्हणून काढून टाकल्या; व तो इतक्या बारकाईने तपासला कीं, त्यांत जर कांहीं गुणांश असेल तर त्याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. आपल्या एका विनोदी लेखाविषयीं लिहितांना त्यांनीं एकदा एका खाजगी पत्रांत असे उद्गार काढले होते कीं, 'लोकांना हंसविण्यासाठीं मला माझ्या डोळ्यांतून प्रथम टिपें काढावीं लागतात.' यावरून त्यांच्या परिश्रमांची कल्पना येईल. ते लिहावयाला बसले म्हणजे फार जलद लिहितात; व त्यांनीं

आपलीं बहुतेक नाटकें आठपासून पंधरा दिवसांच्या आंत लिहिलेलीं आहेत. पण, त्यांचें त्या त्या विषयाचें चिंतन मात्र महिनोगणती चालू असतें; व विषयाचें स्वरूप मनांत निश्चित झाल्यावर, मगच ते लेखणी हातांत घेतात. कोणत्याहि विषयाच्या अंतरंगांत खोलवर शिरून त्याचा पद्धतशीर विचार आणि व्यासंग कसा करावा, या गोष्टीचें त्यांच्या सहवासांत मोठें मार्मिक ज्ञान होतें. इतरांच्या दोषांसंबंधीं ते सामान्यतः मुग्ध असतात. पण, आपल्या शिष्यांचे दोष दाखविण्याच्या बाबतींत मात्र ते यत्किंचितहि चालढकल करीत नाहींत. या बाबतींत ते इतके स्पष्ट असतात कीं, आपल्या कविता त्यांना आवडत नाहींत असें आढळून आल्यामुळें, त्यांच्या एका शिष्यानें कविता लिहिण्याचें अजीबात सोडून दिलें. पण, स्वतःच्य शिष्यांविषयींचा त्यांचा प्रेमा इतका उत्कट असतो कीं, खाजगी रीतीनें जरी ते त्यांचे दोष स्पष्ट दाखवित असले, तरी तिऱ्हाइतांशीं त्यांच्याविषयीं बोलण्याचा प्रसंग आला असतां मात्र तात्यासाहेबांच्या तोंडून नेहमीं प्रशंसेचेच शब्द बाहेर पडतात.

शिष्यांविषयींची ही त्यांची आत्मीयता केवळ त्यांच्या वाङ्मय जीवनापुरतीच मर्यादित असते, असें नाहीं. ज्या व्यक्तिवर त्यांचा लोभ जडतो, तिच्या भोंवतालच्या सर्वच माणसांना ते अतिशय आपुलकीनें वागवितात, किंबहुना, त्यांची ही आत्मीयता असीम आणि सर्वस्पर्शी असते, असें म्हटलें तरी शोभेल. गेल्या वर्षी याच दिवसांत घडलेला एक प्रसंग आठवला, म्हणजे माझें अंतःकरण भरून येतें. गेल्या आक्टोबरांत मी नागपूरच्या तुरुंगांत असतांना, मे. जटार यांची मुद्दाम परवानगी काढून, माझ्या पत्नीबरोबर ते मला भेटावयाला आले होते. त्या वेळीं त्यांची ती व्यथित मुद्रा पहातांच, मला क्षणभर कांहीं सुचेना; व तेहि कांहीं वेळ स्तब्धच होते. तुरुंगांतून परत जातांना मुद्दाम मेजरसाहेबांना भेटून मला चांगल्या रीतीनें वागविण्याबद्दल त्यांनीं परोपरीनें त्यांना आग्रह केला.

परमेश्वरानें मला अनेक स्पृहणीय देणग्या दिल्या आहेत. पण त्या सर्वांत तात्यासाहेबांचा मजवरील लोभ ही मी परमोच्च देणगी समजतों.

—२—

श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याशीं माझी ओळख होण्याचा योग १९२१ च्या जानेवारीमध्यें आला. त्या सुमारास मी माझें आयर्लंडांतील सिनफेन चळवळी-

वरील लेख 'केसरी' कडे पाठविले होते. त्या लेखांबद्दल प्रशंसापर पत्र लिहून त्यांनीं मला सरदारगृहांत भेटावयाला बोलाविलें. येथून आमच्या ऋणानुबंधाला प्रारंभ झाला.

त्यांच्या या पत्रानुसार त्यांना भेटण्यासाठीं ज्या वेळीं मी सरदारगृहांत गेलों, त्या वेळची माझी बावरलेली मनःस्थिति मला अजूनहि आठवते. कोल्हटकरांची कीर्ति ही नाहीं म्हटलें तरी एकविध. शिवाय वाङ्मयाच्या क्षेत्रांतील कीर्ति ही अशा स्वरूपाची असते कीं, तिचा कैफ डोळ्यांवर चढून मनुष्य कितीहि उन्मत्त झाला, तरी त्याचा तो उन्माद एका विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊं शकत नाहीं. कारण बोलून चालून सत्ताहीन कीर्ति ती. पण पुढारीपणाच्या कीर्तीचें स्वरूप आगळें असतें. कर्तृत्वाचा दर्प हा तिच्या रोमरोमीं भरलेला असतो; व सत्तेच्या जाणीवेनें तिचें भान हरपलेलें असतें. अशा स्थितींत, केळकरांच्या भेटीला जातांना जर मला थोडा धाक वाटला असला, तर त्यांत काय आश्चर्य? पण आश्चर्य हें कीं, ती भीति अनाठायीं ठरली. कोल्हटकरांच्या मानानें मला ते प्रथमदर्शनीं किंचित् उग्र आणि तुटक वाटले, हें खरें. परंतु, क्षितिजावर गडगडत आलेल्या मेघाची सांवली पडून शेत जरी क्षणभर काळवंडल्यासारखें दिसलें, तरी त्यांतून अमृतधारा वरसूं लागतांच जशी त्याची हरित्कांति द्विगुणित व्हावी, तसाच प्रकार याहि बाबतींत घडला. संभाषणाच्या शेवटीं माझी खाजगी चौकशी करून, जे उत्तेजनपर शब्द त्यांनीं एक प्रकारच्या जिव्हाळ्यानें एकदम उच्चारले, ते मी कधींहि विसरणार नाहीं. त्या शब्दांतच मला त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या उत्कट प्रेमादराचें बीज आहे.

कोल्हटकरांच्या इतकाच तात्यासाहेबांच्याहि सहवासाचा परिणाम माझ्या वाङ्मय जीवनावर झाला आहे; व त्या दृष्टीनें तेसुद्धां मला गुरुस्थानींच आहेत म्हटलें तरी चालेल. त्यांच्याजवळ मी पांच महिने होतों. या अवधींत जन्मभर पुरेल इतकें लेखनकलेचें शिक्षण त्यांनीं मला कळत न कळत दिलें आहे. किंबहुना त्यांचा सहवास हेंच मुळीं एक प्रकारचें शिक्षण असतें. बकुळीच्या वृक्षाखालीं बसणाऱ्या मनुष्याला जसा छायेबरोबर परिमळाचाहि लाभ घडतो, तसा त्यांच्या सहवासांत रहाणाऱ्या मनुष्याला ज्ञानाबरोबर वाङ्मयाच्याहि उपभोगाचा आनंद लाभतो. त्यांच्या बुद्धीला अविषय नाही, सहानुभूतीला मर्यादा नाहींत आणि

उद्योगाला खंड नाहीं. त्यांच्या एका मित्रानें त्यांना एकदां गंमतीनें असें म्हटलें होतें कीं, ' दिवसाच्या प्रत्येक बदलत्या तासागणिक आपण निरनिराळ्या व्यक्तींशीं निरनिराळ्या विषयांवर बोलत असतां; जणूं कांहीं विषय, व्यक्ति आणि तास यांचा आपला वेळ केव्हां, कोणी, किती घ्यावयाचा याबद्दल आगाऊ संकेत ठरूनच सारे व्यवहार चाललेले असतात ! " दुपारची वामकुक्षी आणि रात्रीची झोप यांना वांटून दिलेला मोजका वेळ सोडला, तर बाकीच्या त्यांच्या वेळाचा प्रत्येक क्षण बोलण्यांत, लिहिण्यांत, वाचण्यांत किंवा मनन करण्यांत जात असतो. कोल्हटकर हे आयुष्याकडे उपभोगाच्या दृष्टीने पहातात, तर केळकर हे आयुष्याकडे उपयोगाच्या दृष्टीने पहातात. आणि या दोघां साहित्याचार्यांच्या या विशिष्ट दृष्टिकोनाचा परिणाम त्यांच्या वाङ्मयावर झालेला स्पष्ट बघावयाला मिळतो. कोल्हटकरांचें वाङ्मय मुख्यत: रंजनप्रधान, तर केळकरांचें वाङ्मय मुख्यत: ज्ञानप्रधान आहे; व कोल्हटकरांकडे गेलें असतां मनुष्य जसा आनंदित होऊन परत येतो, तसा केळकरांकडे गेलें असतां तो उद्बोधित होऊन परत येतो. कोल्हटकरांच्या साध्याहि बोलण्यांत जशी कल्पकता व्यक्त झालेली असते, तसा केळकरांच्या साध्याहि बोलण्यांत त्यांचा बहुश्रुतपणा प्रतिबिंबित झालेला असतो; व त्यामुळें त्यांचे अगदीं स्वैर कथालापसुद्धां उपदेश होऊन बसतात.

पण, या दोघां मित्रांच्या आयुष्याकडे पहाण्याच्या दृष्टींत जरी फरक असला, तरी त्यांच्या स्वभावांत मात्र पुष्कळच साम्य आढळतें. सौंदर्यासक्ति आणि मनाचा हळवेपणा हे विशेष दोघांच्याहि स्वभावाला सामान्य आहेत. मनाचा हळवेपणा हा आपल्या प्रेमांतल्या माणसांच्या बाबतींत जरी गुण असला, तरी एकंदर व्यवहारांत तो अवगुणच ठरतो. त्यांतून समाजाच्या नेतृत्वाची जबाबदारी ज्या मनुष्याच्या शिरावर असते, त्याच्या बाबतींत तर या हळवेपणाला मनोदौर्बल्याचें स्वरूप येतें. पुढाऱ्याचा स्वभाव हा हिऱ्याप्रमाणें जसा तेजस्वी आणि पैलूदार तसाच कठोरहि असला पाहिजे. थोरल्या तात्यासाहेबांच्या हळवेपणाचें मला फारसें नवल वाटत नाहीं. त्यांचें सर्व आयुष्य सौंदर्याच्या उपासनेंत आणि आविष्कारात गेलेलें आहे. त्यांच्यावर टीका झालेली नाहीं, असें नव्हे. पण, मधुपानासाठीं फुलावर झेंप घालणाऱ्या भ्रमराच्या नाजूक पंखांना जसा त्याच्या देठाचा दाठर स्पर्श क्वचित् जाणावा, तशा तऱ्हेचे ते टोंकेच आघात. तसें

धाकट्या तात्यासाहेबांचें नाहीं. त्यांचें आयुष्य हें तोफांच्या मारगिरीच्या टप्प्यांत बुद्धिपुर:सर वीरासन घालून बसणाऱ्या सेनानीसारखें गेलेलें आहे. तरीसुद्धां त्यांनीं इतकें हळवें रहावें, हें चमत्कारिक नव्हे काय ? पण त्यांच्या या हळवेपणाचें पृथक्करण केलें म्हणजे त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित होतो. हा हळवेपणा त्यांच्या-ठिकाणीं वसत असलेल्या उत्कट आत्मौपम्यबुद्धींतून उद्भवलेला आहे. त्याला दौर्बल्य मानणें किंवा म्हणणें चुकीचें होईल. शत्रूविषयीं सुद्धां त्याच्या भूमिकेशीं समरस होऊन विचार करावयाचा, ही जी त्यांची प्रवृत्ति, त्या प्रवृत्तिमुळेंच त्यांच्या-वर अविचारी स्वकीयांच्या उपहासाचा विषय होऊन बसण्याचा प्रसंग अनेकदां आलेला आहे. त्यांच्या या प्रवृत्तीचें प्रत्यंतर टिळकचरित्रांत पुष्कळ ठिकाणीं पहावयाला मिळतें. राजकारणी मनुष्याच्या ठिकाणीं ही प्रवृत्ति केव्हांहि वाईटच. पण या प्रवृत्तीमुळेंच त्यांच्या व्यक्तित्वाला आणि वाङ्मयाला इतकी आकर्षकता आणि इतकें उद्बोधक स्वरूप प्राप्त झालें आहे, हें विसरून चालणार नाहीं. सहृदयता हा त्यांच्या सर्व जीवनाचा आत्मा आहे. आणि आत्मौपम्यबुद्धि म्हणजे तरी सहृदयतेचेंच अधिक परिणत स्वरूप नव्हे काय ?

त्यांच्या या सहृदयतेला मर्यादा नाहींत. घरटयांत चिंवचिंवणाऱ्या चिमणीच्या अपंग पिलापासून तो येरवडयाच्या तुरुंगांत आयुष्याचे क्षण मोजीत बसलेल्या सोलापूरच्या असहाय हुतात्म्यांपर्यंत सर्वांविषयीं तिला उत्कट सहानुभूति वाटते. किंबहुना सृष्टीच्या व्यापारांतील काय किंवा मानवी व्यवहारांतील काय, हर एक घटनेकडे सहृदयतेनें पहाणारा इतका समदर्शी निरीक्षक महाराष्ट्रांत आज दुसरा आढळणार नाहीं. त्यांच्या उपमांची विविधता ही त्यांच्या या सहृदयतेच्या व्यापकतेचीच द्योतक आहे. कोल्हटकरांची उपमानें ही बव्हंशीं त्यांच्या कल्पकतेचीं अपत्यें असतात; उलट केळकरांच्या बहुतेक साऱ्या उपमानांचा उगम त्यांच्या निरीक्षणांत सांपडतो. सौंदर्याकडे त्यांचा ओढा कोल्हटकरांपेक्षां कमी आहे असें नाहीं. पण, असुंदर किंवा असमशील वस्तूंविषयीं कोल्हटकरांना जो एक प्रकारचा तीव्र उबग वाटतो, तो तितक्या प्रमाणांत केळकरांना खास वाटत नाहीं. कदाचित् त्यांच्या जीवनक्रमाला लागलेल्या अत्यंत भिन्न वळणाचाहि हा परिणाम असेल. वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे साऱ्या सार्वजनिक चळवळींचा चवाठा. त्या चवाठ्यावर फड घालून बसलेल्या त्यांच्यासारख्या पुढाऱ्याला कोल्हटकरां-इतकें चोखंदळ होऊन कसें चालेल ? त्यांच्या उपमानांच्या

या वैशिष्ट्यामुळेंच त्यांचें वाङ्मय हें कोल्हटकरांच्या वाङ्मयापेक्षां एकंदर वाचकवर्गाला अधिक जवळचें वाटतें. तथापि त्यांत सैलपणा मात्र पुष्कळच दृष्टीस पडतो. याचें कारण अगदीं उघड आहे. त्यांचा व्याप फार मोठा; त्यांच्या मागें विवंचनाहि पुष्कळ आणि त्यांच्या वेळेला व्यवधानें अति. त्या साऱ्या व्यवधानांचा उपद्रव आनंदानें सोसून, ते इतकें प्रसादसुंदर वाङ्मय निर्माण करतात, हेंच नवल. कोल्हटकरांप्रमाणें तेहि लेखनाच्या बाबतींत अतिशय परिश्रम घेतात. 'केसरी' तील अग्रलेख तर राहोच; पण, एकाद्या ग्रंथाला प्रस्तावना जरी लिहावयाची झाली, तरी त्यांतील प्रतिपाद्य विषयाची माहिती स्वतंत्र रीतीनें मिळवून व त्या माहितीचा स्वतंत्र दृष्टीनें विचार करून, नंतरच ते लेखणी हातांत घेतात. या त्यांच्या दुर्दम व्यासंगप्रियतेमुळेंच त्यांचा बहुधा प्रत्येक लेख हा त्या त्या विषयाची तपशीलवार माहिती आणि तिच्यावरून सुचलेले मार्मिक विचार यांचें भांडार होऊन बसला आहे. उत्कृष्ट शिल्प निर्माण करण्याच्या आकांक्षेनें प्रेरित झालेला कलावंत हा जसा प्रत्येक पाषाणावर सुंदर नकसकाम करतो, तशी केळकरांनीं आपल्या अगदीं साध्याही विषयावरील लेखांतून स्वतःची लेखनकुसर व्यक्त केली आहे. वर्तमानपत्राच्या रकान्यांत पैदा झालेल्या त्यांच्या हंगामी लेखांनाहि जें इतकें निरुपम सौष्ठव आणि चिरंतन महत्व प्राप्त झालें आहे, ते याच कारणामुळें. व्यक्ति, समाज, वाङ्मय, इतिहास आणि राजकारण यांचा इतका सहृदय पण चिकित्सक टीकाकार महाराष्ट्रांत अद्याप एकहि झालेला नाहीं.

व्यक्तिशः मला ते जवळ जवळ कोल्हटकरांइतकेच प्रिय आणि आदरणीय वाटतात. त्यांच्याजवळ असतांना त्यांनीं मला स्वतःच्या मुलांसारखा वागविला; व नंतर कांहीं दिवस मी जरी राजकीय दृष्टीनें त्यांच्या प्रतिपक्षी असलेल्या संस्थेंत जाऊन राहिलों होतों, तरीहि त्यांच्या मजवरील लोभांत अंतर पडलें नाहीं. किंबहुना, मी जेव्हां त्यांना माझा हा विचार कळविला, तेव्हां मला घातलेल्या पत्रांत त्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, "वाङ्मयाची भूमिका ही इतकी उच्च आणि पक्षातीत आहे कीं, तिच्यावर जडलेले संबंध इतर कारणामुळें तुटण्याचें कारण नाहीं." हें आश्वासन अक्षरशः खरें झाल्याचा माझा अनुभव आहे. त्यांना मतभेदाचा किंवा प्रामाणिक टीकेचा राग नाहीं. त्यांच्या टिळकचरित्रांतील शुद्धलेखनावर मी जेव्हां 'महाराष्ट्रां' तून टीका केली, तेव्हां इतरांच्या कल्पनेप्रमाणें, ते

मजवर रागावले तर नाहींतच, पण उलट त्यांनीं माझें कौतुकच केलें. इतरांच्या गुणांची योग्य बूज करावयाला ते नेहमींच उत्सुक असतात. कै. अच्युतराव कोल्हटकर यांनीं त्यांच्यावर जितकी अभद्र टीका केली आहे, तितकी प्रायः कोणीच केलेली आढळणार नाहीं. पण आपल्या साहित्यसंमेलनांतील भाषणांत त्यांनीं अच्युतरावांचा स्मरणपूर्वक सादर उल्लेख केला आहे. आदर्श साहित्यसेवक कसा असावा, असें जर मला कोणी विचारलें, तर मी केळकरांकडे बोट दाखवीन.

कोल्हटकरांनीं मला सुसंगत व्यासंग आणि विचार करण्याची संवय लावली. पण, लेखनकलेच्या इतर सर्व अंगोपांगांचें शिक्षण मी केळकरांपासूनच प्रत्यक्षा-प्रत्यक्ष रीतीनें घेतलेलें आहे; आणि, त्यांच्या सहवासांत गेलेले माझ्या आयुष्याचे क्षण हे मी नेहमींच सुवर्णकणांसमान समजेन.

—वसुंधरा, दिवाळी अंक १९३१

# युगप्रवर्तक कोल्हटकर

इतिहासांत काय किंवा वाङ्मयांत काय, युगप्रवर्तनाचें यश हें कांहीं केवळ पराक्रमानेंच मिळत नसतें. इतिहासामध्यें आपण अनेक राजांच्या शौर्याचीं वर्णनें वाचतों. पण त्यांपैकीं किती जणांचीं नांवें नव्या युगाच्या ललकारणीशीं संलग्न झालेलीं सांपडतात ? नदीला तीर्थाची योग्यता मिळावयाला तिच्या जलौघाचा नुसता विस्तार जसा उपयोगी पडत नाहीं, तसाच मनुष्याला युगप्रवर्तकाची पदवी प्राप्त व्हावयाला नुसता पराक्रम पुरेसा होत नाहीं. त्या पराक्रमांत जर स्फूर्ति देण्याचें, म्हणजे आपण सुरू केलेल्या कार्याची परंपरा अव्याहत पुढें चालू ठेवण्याचें सामर्थ्य असेल, तरच तो पराक्रम, समाजांत काय किंवा साहित्यांत काय, मन्वंतर घडवून आणूं शकतो. वीरपुरुषांच्या जीवनांत हें सामर्थ्य उदात्त ध्येयांनीं व वाङ्मय-सेवकांच्या लेखनांत उदात्त कल्पनांनीं उत्पन्न होत असतें. कल्पकता, ध्येयवाद आणि विद्वत्ता यांचा त्रिवेणीसंगम ज्या ग्रंथकाराच्या वाङ्मयांत झालेला असतो, त्याचेच ग्रंथ भावी पिढ्यांना स्फूर्ति देऊं शकतात; व त्यामुळें त्याच्या नांवाची द्वाही साहित्याच्या क्षेत्रांत सदैव दुमदुमत रहाते.

या दृष्टीनें विचार केला, तर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यानंतर कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या तोडीचा ग्रंथकार महाराष्ट्रांत एकहि निर्माण झाला नाहीं, असेंच म्हणावें लागेल. कै. चिपळूणकर यांच्या हातून निबंधाव्यतिरिक्त दुसरें कोणतेंच वाङ्मय उत्पन्न झालें नाहीं, ही गोष्ट खरी. पण, त्यांच्या त्या एकाच लेखनप्रकारांत कल्पकता, ध्येयवाद आणि विद्वत्ता हीं तिन्हीहि इतक्या ओजस्वितेनें प्रकट झालेलीं होतीं कीं, त्यांच्या निबंधमालेनें महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांतील नव्या मनूला जन्म दिला; व त्यांच्या नंतरच्या पिढींतून जे लेखक उदयाला आले, त्यांपैकीं बहुतेकांच्या स्फूर्तीची ज्योत त्यांच्या प्रतिभेनें प्रवर्तित केलेली होती, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यांच्यापासून मातृभाषेच्या सेवेची दीक्षा घेतलेल्या या लेखकांत कै. ह. ना. आपटे, कै. शि. म. परांजपे, कै. वि. का. राजवाडे, कै. श्री. कृ. कोल्हटकर व श्री. न. चिं. केळकर यांची गणना प्रामुख्यानें होते. या ग्रंथ-

कारांपैकीं कै. राजवाडे यांचें आयुष्य इतिहाससंशोधनाच्या एकमात्र व्यवसायांत गेलें. त्यांची कल्पनाशक्ति जवळ जवळ अतिमानुष होती. पण, मयसभेसारखी ललित वाङ्मयाची मोहक सृष्टि उभारण्याऐवजीं तुटपुंज्या माहितीच्या कच्च्या पायावर ऐतिहासिक सिद्धांतांचे ठिसूळ मनोरे रचण्यांत तिचें कर्तृत्व खर्ची पडलें. आपटे, परांजपे व केळकर यांनी लेखनाचे जवळजवळ सर्वच प्रकार मनसोक्त हाताळलेले आहेत. वाङ्मयाचा प्रायः असा एकहि प्रदेश आढळणार नाहीं कीं, ज्यांत त्यांच्या हौशी प्रतिभेचीं हलुवार पदचिन्हें उमटलेलीं नसतील. पण, त्यांची प्रतिभा सर्वगामी असली, तरी त्यांना मिळालेली कीर्ति मात्र सर्वव्यापी नाहीं. कै. आपटे हे सुधारणावादी कादंबरीकार म्हणून आणि कै. परांजपे हे वक्रोक्तिकुशल वृत्तपत्रकार म्हणून आज मुख्यतः ओळखले जातात; व श्री. केळकर यांची साहित्याच्या निरनिराळ्या विभागांतील कामगिरी जरी त्यांच्या मानानें जास्त भरीव असली, तरी तेहि मानवी जीवनाचे टीकाकार या नात्यानेंच बहुधा पुढें लोकांच्या स्मरणांत रहातील.

पण कै. कोल्हटकर यांची गोष्ट तशी नाहीं. नाट्य, विनोद आणि टीका या वाङ्मयाच्या तीन क्षेत्रांवर त्यांच्या कामरूपिणी प्रतिभेनें गाजविलेलें प्रभुत्व केवळ लोकोत्तर आहे. आपटे आणि परांजपे यांनीं नाटकें बरींच लिहिलेलीं असलीं, तरी त्यांपैकीं बहुतेक रूपांतरित असून, शिवाय त्यांना रंगभूमीहि फारशी कधीं लाभली नाहीं; व श्री. केळकर यांच्या नाटकांना त्या मानानें रंगदेवतेचा कृपाप्रसाद जरी अधिक मिळालेला असला, तरी त्यांनीं रंगभूमीवर वर्चस्व, अत्यल्प काळ देखील, गाजविलें आहे, असें म्हणतां येणार नाहीं. उलट कै. कोल्हटकर यांनीं रंगभूमीवर एक तप अबाधित सार्वभौम सत्ता गाजविली. आणि, त्या अवधींत तिचें स्वरूप इतकें बदलून टाकलें कीं, श्री. खाडिलकर यांच्यासारख्या स्वतंत्र बुद्धीच्या समकालीन नाटककारालाहि, रंगभूमीच्या संगीत विभागाचें आक्रमण करतांना त्यांचें थोडें बहुत अनुकरण करण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. खाडिलकरांच्या गद्य नाटकांमध्यें अगदीं कमी प्रमाणांत दृष्टीस पडणारा शृंगार आणि विनोद त्यांच्या संगीत नाटकांत जो इतक्या अतिरिक्त स्वरूपांत दिसून येतो, त्याला कोल्हटकरांच्या प्रभावाशिवाय दुसरें कोणतें कारण सांगतां येईल ? त्यांचें पहिलें संगीत नाटक जें 'मानापमान' त्यावर कोल्हटकरांच्या रचनापद्धतीची छाप इतक्या जोरकसपणानें उमटलेली आहे कीं, श्रीपाद कृष्णांचें नाट्यक्षेत्रांतील श्रेष्ठत्व

अनुकृतीनें विनयपूर्वक मान्य करीतच जणुं कांहीं कविकृष्णानें त्यांचें अग्रासन अखेर बळकावलें, असें म्हणण्याचा मोह पडतो. आज क्वचित् असे उद्गार ऐकूं येतात कीं, कोल्हटकरांचीं नाटकें रंगभूमीवरून आधींच अस्त पावलेलीं असून, कालांतरानें लोकांच्या स्मृतींतूनहि तीं लुप्त होऊन जातील. पण हें भाकित यदाकदाचित् खरें ठरलें, तरी त्यांत त्या नाटकांना कमीपणा येण्यासारखें काय आहे ? सर्व मानव-जातीचा कवि म्हणून नावाजलेल्या शेक्सपिअरच्या नाटकांची स्मृति जिवंत ठेवण्यासाठीं जॉन्सनसारख्या पंडितांपासून तों आयर्व्हिंगसारख्या नटांपर्यंत अनेक थोर व्यक्तींचे भगीरथ प्रयत्न आजपर्यंत खर्ची पडलेले नाहींत काय ? शिवाय, कोल्हटकरांच्या नाटकांचें स्मरण जरी कदाचित् लोपून गेलें, तरी त्यामुळें त्या नाटकांनीं रंगभूमीवर घडवून आणलेल्या परिवर्तनाचें महत्व कसें कमी होतें ? नेपोलियनचें राज्यपद गेलें आणि त्याचा वंशहि बुडाला. पण त्यानें इतिहासांत केलेल्या क्रांतीचें स्मरण आजहि लोकांत तीव्रतेनें जागृत नाहीं काय ? पाश्चात्य धर्तीचीं विनोदसुंदर, हेतुप्रधान नाटकें लिहून कोल्हटकरांनीं मराठी रंगभूमीला लावलेलें नवीन वळण इतिहासांत संस्मरणीय होऊन बसेल.

कोल्हटकरांच्या नाट्यक्षेत्रांतील कामगिरीपेक्षांहि त्यांची विनोदाच्या क्षेत्रांतील कामगिरी अधिक महत्वाची ठरेल. त्यांचे ‘ सुदाम्याचे पोहे ’ प्रसिद्ध होण्यापूर्वी स्वतंत्र असें विनोदी वाङ्मय मराठींत मुळींच निर्माण झालेलें नव्हतें. कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर, कै. गोपाळराव आग-रकर किंवा कै. शि. म. परांजपे यांच्या निबंधांतून विनोदाच्या छटा पुष्कळच आढळतात. किंबहुना कै. चिपळुणकर यांच्या निबंधमालेंतील सुधारकांवरील उप-हासात्मक टीका वाचूनच आपली विनोदबुद्धि जागृत झाली, असें कोल्हटकर नेहमीं सांगत असत. पण, दैत्यगुरूपासून संजीवनी विद्या शिकून तिच्या जोरावर दैत्यांना हतबल करणाऱ्या कचाप्रमाणें, कोल्हटकरांनीं पुराणमतवाद्यांचे अध्वर्यु मानल्या गेलेल्या चिपळूणकरांपासून विनोदाची स्फूर्ति घेऊन त्याचा उपयोग जुन्या रूढींच्या निर्मूलनार्थ केला. कै. चिपळुणकर किंवा कै. आगरकर यांच्या लेखांतून मधूनमधून विनोदाच्या छटा असल्या, तरी त्या त्यांच्या वाङ्मयाच्या एकंदर गंभीर स्वरूपाला गालबोटाप्रमाणें शोभा देतात, एवढेंच. परंतु, धोतराच्या काठांत जरीची किनार असली म्हणून कांहीं त्याला कोणी पीतांबर म्हणत नाहीं. तसेंच त्यांच्या विनोदाचेंहि

आहे. शिवाय चिपळूणकरांच्या विनोदाचें पर्यवसान पुष्कळदां कुचाळींत होतें; व आगरकरांचा विनोद बहुधा ग्राम्यतेच्या थरावर जातो, हेंहि विसरून चालणार नाहीं. परांजपे यांचे 'काळांतील' लेख मात्र विनोदाच्या दृष्टीनें स्वतंत्र आणि श्रेष्ठ दर्जाचे आहेत. परंतु त्यांच्या विनोदांत विविधता नाहीं, हें एक; व दुसरें असें कीं, त्यांच्या विनोदाचा जन्म हा विद्वेषाच्या पोटीं झालेला असल्यामुळें, तो मनाला आल्हाद न देतां उलट उद्विग्न किंवा संतप्त मात्र करितो. त्यांचा उपरोधिक विनोद हा सूडाच्या इच्छेनें तळमळत असलेल्या माणसाच्या अंधारांतील आत्मगत विकट हास्यासारखा वाटतो. उलट कोल्हटकरांचा विनोद म्हणजे प्रसन्न मनाचें निर्भर हास्य! त्या हास्यांत क्वचित् उपरोधाचा, तुच्छतेचा किंवा विडंबनाचाहि ध्वनि उमटलेला असला, तरी त्यामुळें मन फार काळ पिचत रहावयाचें नाहीं. 'साहित्य-बत्तिशीं'तल्या 'निर्जळी एकादशी' या लेखातील उपोषणाच्या दिवशीं आकंठ-फराळ झोडण्याच्या प्रवृत्तीचें केलेलें उपरोधिक वर्णन वाचून भाविकांच्याहि हंसून मुरकुंड्या वळल्याचें मी पाहिलें आहे. शिवाय त्यांचा विनोद जितका विशुद्ध तितकाच विविधहि आहे. परांजपे यांची विनोदबुद्धि मानहानीच्या दुःखानें डिव-चून काय फुसफुसत उठेल, तेवढीच. उलट अस्पृश्यतेच्या अमानुष रूढीपासून तों गवयांच्या आचरट संवईपर्यंत मानवी जीवनांतील हर एक वैगुण्यांत आणि विसं-गतींत मन घालून, कोल्हटकरांच्या सूक्ष्मदर्शी प्रतिभेनें त्यांची हास्यास्पदता चव्हाट्यावर आणली; व रंगभूमीपासून तों वृत्तपत्रापर्यंत सार्वजनिक विचारविनि-मयाचीं सारीं केंद्रें विनोदाच्या संचाराला खुलीं करून देऊन, लोकशिक्षणाचें अत्यंत प्रभावी साधन निर्माण केलें. विनोदी वाङ्मयाच्या प्रवर्तनाचा अग्रमान जो कोल्हटकरांना दिला जातो, तो त्यांच्या त्या क्षेत्रांतील कर्तबगारीचें हें अनन्य महत्व लक्षांत घेऊनच.

साहित्याच्या ज्या विभागांवर कोल्हटकरांनीं अधिराज्य गाजविलें, त्यांपैकीं तिसरा विभाग टीका हा होय. मराठींत वृत्तपत्रांबरोबरच टीकेचाहि जन्म झाला. कारण वर्तमानपत्रें हीं बव्हंशीं टीकेवरच जगत असतात. मग ती टीका मतांवरील असो, व्यक्तीवरील असो वा ग्रंथावरील असो. पण वर्तमानपत्रांतील टीका ही स्वभावतःच अगदी उथळ असते. पक्ष्यानें ज्याप्रमाणें उडतां उडतां वाटेंत दिसलेल्या जलाशयाचें पाणी पंखानें स्पर्श करून चाळवावें, त्याप्रमाणें वृत्तपत्रें ही आपल्या रोजच्या धांवपळींत रस्त्यांत गांठणाऱ्या ग्रंथाला कोंपरखळी

देऊन पुढें सटकतात. नियतकालिकांतील टीका ही त्यापेक्षां अधिक भारदस्त आणि भरीवहि असते. किंबहुना, गेल्या पाऊणशें वर्षांत मराठी टीकात्मक वाङ्मयाची जी काय थोडी बहुत प्रगति झाली असेल, तिचें श्रेय ग्रंथकारांचा अगत्यपूर्वक परामर्श घेणाऱ्या नियतकालिकांनाच खरोखरी दिलें पाहिजे. परंतु, टीकालेखनाला सुरवात आरंभीं वर्तमानपत्रांतून झाल्यामुळें, वृत्तपत्रांप्रमाणेंच टीकेचेंहि दोषाविष्करण हें वैशिष्ट्य किंबहुना उद्दिष्ट होऊन बसलें; व टीका हा टवाळीचा केवळ एक संभावित प्रकार गणण्यांत येऊं लागला. नियतकालिकांतल्या टीका या त्यांतल्या त्यांत अधिक संभावित असत. म्हणजे असें कीं, दोषांची मनसोक्त कुचाळी केल्यानंतर ग्रंथांतील एकादा दुसऱ्या गुणाकडे जातां जातां बोट दाखवून नियतकालिकांतील टीकाकार आपल्या निःपक्षपातीपणाचें प्रदर्शन करीत. 'विविधज्ञानविस्तारा' चे गेल्या साठ वर्षांचे अंक जर कोणी जिज्ञासेनें चाळून पाहिले, तर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून तों कै. रा. ग. गडकरी यांच्यापर्यंत आज श्रेष्ठ समजल्या जात असलेल्या बहुतेक साऱ्या ग्रंथकारांपुढें टीकाकारांनीं मिरच्यांची धुरी घातली असल्याचें दृष्टीस पडेल. या प्रवृत्तीमुळें केवळ गुणदोषांची चिकित्सा असेंच मराठींत टीकेला स्वरूप आलें. टीकाकार फारच सहृदय असेल, तर तो दोषांपेक्षां गुणांवर थोडा अधिक भर देईल, एवढेंच. या टीकापद्धतीचे उत्कृष्ट प्रतिनिधि म्हणून कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांचा निर्देश करितां येईल. त्यांचे टीकालेख निव्वळ गुणदोषदिग्दर्शक खरेच, पण अत्यंत मार्मिक आहेत. कै. कोल्हटकर यांची टीकापद्धति या टीकाप्रकारापासून अगदीं भिन्न आणि व्यापक आहे. समोर असलेल्या ग्रंथांतील फक्त गुणदोषांची चर्चा करण्यांतच इतिकर्तव्यता न मानतां, त्यांतील प्रतिपाद्य तत्वांची चिकित्सा आणि त्याच्या घटकांचें पृथक्करण करणारा सूक्ष्मदर्शी तत्वज्ञ टीकाकार जर महाराष्ट्रांत कोणी झाला असेल, तर ते कोल्हटकर हेच होत. लेसिंग, सेंटब्यूव्ह, मूल्टन आणि ब्रॅडले याच्या टीकापद्धतींतील उत्तम गुण त्यांच्या टीकालेखनांतून एकवटलेले आढळतात; व म्हणूनच ' हिंदु धर्म आणि सुधारणा ' 'गायकवाड सरकारची ग्रंथमाला,' 'मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी' 'तोतयाचें बंड,' 'रागिणी व तिची भावंडें,' 'नक्षत्रविज्ञान,' 'ग्रहगणित' वगैरे त्यांच्या टीकालेखांचा सर रामकृष्ण भांडारकर, प्रो. राजारामशास्त्री भागवत, वेंकटेश बापूजी केतकर किंवा सर सयाजीराव गायकवाड यांच्यासारख्या मेधावींनीं स्वयंस्फूर्तीनें गौरव

केला. या टीकालेखांतून त्या त्या ग्रन्थांतील प्रतिपाद्य विषयाचें कोल्हटकरांनीं केलेलें विश्लेषण जितकें मूलगामी आहे, तितकेंच त्या ग्रंथांच्या गुणदोषांचें त्यांनीं केलेलें विवेचन मार्मिक आहे; व आपल्या या टीकालेखांतून ललित वाङ्मयाच्या निर्मितीविषयीं त्यांनीं प्रतिपादिलेल्या अभिनव उपपत्तींचा विचार साहित्यकोविदांना आदरपूर्वक करावा लागेल. १८९३ पासून १९१८ पर्यंत सतत दोन तपें मराठींतील निवडक ग्रंथांचें परीक्षण करून कोल्हटकरांनीं केलेली मराठी वाङ्मयाची सेवा गुण आणि विस्तार या दोहोंच्याहि दृष्टीनें केवळ निरुपम आहे.

कोल्हटकरांना ज्या अनेक कारणांमुळें युगप्रवर्तक ग्रंथकार म्हणावयाचें, त्यांपैकीं एक कारण त्यांचा निस्सीम सुधारणावाद हें होय. त्यांच्या वाङ्मयाकडे केवळ कलाविलासाच्या दृष्टीनें पाहून चालणार नाहीं. ते जितके कलानिष्ठ तितकेच सुधारणावादीहि आहेत. किंबहुना, मानवी बुद्धीला दास्यमुक्त करणाऱ्या ध्येयांचा पुरस्कार करण्यांतच कलाविलासाची परिणति आहे, अशी त्यांची श्रद्धा होती; व काव्यरचनेपासून तों पंचांगशोधनापर्यंत जे निरनिराळया प्रकारचे उद्योग गेल्या चाळीस वर्षांत त्यांच्या हातून घडले, त्या सर्वांच्या मुळाशीं ही समाजसुधारणेची बुद्धि होती, हें स्पष्ट दिसून येतें. त्यांच्या समकालीन लेखकवर्गांत समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीनें ललित वाङ्मय निर्माण करणारे ग्रंथकार कै. ह. ना. आपटे आणि श्री. कृ. प्र. खाडिलकर हे दोघेच झालेले आढळतात. पण त्यांच्यापैकीं कै. आपटे हेच खरोखरी सुधारणावादित्वाच्या बाबतींत कोल्हटकरांशीं तुल्यगुण म्हणतां येतील. कारण, खाडिलकरांनीं राजकीय स्वरूपाच्या ध्येयवादाचा आविष्कार जरी आपल्या नाटकांतून ओजस्वितेनें केलेला असला, तरी सामाजिक बाबतींत त्यांचा दृष्टिकोन अगदीं संकुचित होता. बहुजनसमाजाच्या बंधमोचनासाठीं चाललेल्या निरनिराळ्या सामाजिक चळवळींचा पुरस्कार तर त्यांनीं आपल्या नाटकांतून कधी केला नाहींच; उलट त्यांच्या विनोदी भागांतून त्या प्रयत्नांचा निर्दय तिरस्कार मात्र मनःपूत केलेला दृष्टीस पडतो. कै. आपटे हे सामाजिक सुधारणेचे कट्टे पुरस्कर्ते असले, तरी त्यांची दृष्टी पांढरपेशा वर्गापलिकडे सहसा गेली नाही. किंबहुना, त्यांच्या कादंबऱ्यांचा सर्व भर स्त्रीदास्यविमोचनावर आहे, असेंहि म्हटलें तरी शोभेल. जणुं कांहीं, त्यांचा एक हळव्या मनाचा नायक गणपतराव याच्याप्रमाणें, त्यांनी स्वतःहि, मिलच्या ‘ स्त्रियांची परवशता ’ या

पुस्तकावर हात ठेवून, स्त्रीवर्गाच्या उन्नतिसाठीं आपलें बुद्धिसर्वस्व वेचण्याची प्रतिज्ञा केली होती ! कोल्हटकरांचा सुधारणावाद हा असा एकांगी नाहीं. समाजाच्या आघाडीला उभ्या असलेल्या वर्णगुरु ब्राह्मणापासून तों त्याच्या तळाशी कुजत पडलेल्या पददलित अंत्यजापर्यंत सर्वांच्या उन्नतीची कळकळ मनांत बाळगून, एकंदर समाजाच्या पुनर्घटनेला पोषक होईल, असें ललित वाङ्मय त्यांनीं उत्पन्न केलें. सुधारणा—सर्वांगीण सुधारणा हें त्यांचें ध्येय होतें. म्हणूनच, अस्पृश्यता आणि निरक्षरता यांच्या दुष्परिणामांचें हृदयस्पर्शी शब्दचित्र रेखाटणारी ‘ श्याम-सुंदर ’ सारखी, हरिजनांच्या प्रश्नावरली, पहिलीच मराठी कादंबरी त्यांच्या लेखणींतून उतरली. पण, कोल्हटकर हे सुधारणावादी असले. तरी सुधारणेच्या प्रसाराला अवश्य असलेला आवेश त्यांच्या वाणींत नव्हता, असे उद्गार क्वचित् ऐकूं येतात. पण हें खरें नाही. ‘ सुदाम्याच्या पोह्यां ’ तल्या ‘ गणपति, ’ ‘ श्रावणी, ’ ‘ शिमगा ’ वगैरे आरंभींच्या लेखांतील उपरोध इतका मर्मच्छेदक होता कीं, त्यामुळें खवळून गेलेल्या आपल्या वाचकवर्गाला शांत करण्यासाठीं कोल्हटकरांचे रसिक स्नेही कै. रावसाहेब मोरमकर यांना ‘ विस्तारां ’त ती लेख-माला छापणें कांहीं काळ बंद करावें लागलें; व त्या लेखांवर ‘ इंदुप्रकाश ’सारख्या सुधारणाप्रिय वर्तमानपत्रांतून झालेला टीकेचा भडिमार पाहून, आपल्या विदारक लेखणीची धार थोडी सौम्य करण्याबद्दल, श्री. न. चिं. केळकर यांनींही कोल्हटकरांना आग्रहाचा इषारा दिला. ‘ मतिविकार ’ वाचून संतापानें देहभान नष्ट झालेल्या एका टीकाकारानें कोल्हटकरांना दिलेला मरणाचा शाप प्रसिद्धच आहे ! या दृष्टीनें श्री. केळकर यांनीं त्यांच्या विनोदाला दिलेली तरवारीची उपमा अगदीं समर्पक असून, ‘हंसणारे सिंह’ या शब्दांनीं केलेलें त्यांच्या विनोदशक्तीचें वर्णनहि अगदीं यथार्थ वाटतें. अज्ञान आणि तज्जन्य दुष्ट रूढि यांच्या संहारार्थ विनोदाचें लखलखीत खड्ग इतक्या त्वेषानें आणि कुशलतेनेंहि कोल्हटकरांशिवाय महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि लेखकानें गेल्या अर्ध शतकांत चालविलेलें नाहीं.

कोल्हटकरांची ही त्रिविध कामगिरी लक्षांत घेऊन मी म्हणतों कीं, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यानंतर युगप्रवर्तक असा ग्रन्थकार जर महाराष्ट्रांत कोणी झाला असेल, तर ते फक्त कोल्हटकर हेच होत; व निदान ललित वाङ्मयाच्या क्षेत्रांत तरी आज त्यांचेंच युग चालू आहे. महाराष्ट्रांतील आजचे

प्रमुख नाटककार, कादंबरीकार, कथालेखक, विनोदपंडित आणि टीकाकार यांच्या छातीवर त्यांच्याच शिष्यत्वाचीं बिरुदें रुळतांना दृष्टीला पडतात. कलाविलास आणि ध्येयवाद यांचा संगम जर कोणाच्या वाङ्मयांत झालेला असेल, तर तो फक्त कोल्हटकरांच्या संप्रदायाच्या: तिथें बुद्धिबरोबर भावना, विद्वत्तेबरोबर विनोद आणि विश्लेषणाबरोबर रसिकता सुखेनैव विहार करितांना दिसून येतात. कै. चिपळूणकर यांच्यापासून ज्या लेखकांनीं मातृभाषेच्या सेवेची स्फूर्ति घेतली, त्यांच्यापैकीं बहुतेकांना कालांतरानें त्यांची विचारसरणी अग्राह्य वाटली. तसा प्रकार कोल्हटकरांच्या बाबतींत होण्याची भीति नाहीं. कारण ते अत्यंत प्रगमनशील होते. ' मुक्तात्मा ' या कादंबरीवरून बोलतांना मला ते एकदां असें म्हणाले होते कीं, " जगांत सर्व बाबतींत समता स्थापन करणें एवढेंच जर सोशॅलिस्टांचें ध्येय असेल, तर त्याबद्दल सुधारणावादी लोकांना तरी कांहींच विषाद वाटण्याचें कारण नाहीं. जातिजातींतली आणि स्त्रीपुरुषांतली विषमता नष्ट व्हावी, म्हणून ज्यांचे सारखे प्रयत्न चालले आहेत, त्यांना वर्गावर्गांतली विषमता नष्ट होऊं नये, असें कां वाटेल ? " अशा ध्येयदर्शी प्रतिभेच्या ग्रंथकाराबद्दल तरुण पिढीला उत्कट आकर्षण वाटावें, यांत काय आश्चर्य ? तें आकर्षण कायम ठेऊन कोल्हटकरांचें सुधारणा व्रत पुढें चालविण्याची जबाबदारी आतां त्यांच्या शिष्यपरंपरेवर आहे. त्यांच्या वाङ्मयांतले ठळक दोष सांगावयाचे झाले, तर ते कलाविलासांत कृत्रिमता, विनोदांत अतिरंजन आणि टीकालेखांत बोजडपणा हे सांगतां येतील. पहिला दोष कल्पकतेच्या अतिरेकामुळें, दुसरा वैचित्र्याच्या लालसेमुळें आणि तिसरा विद्वत्तेच्या प्राचुर्यामुळें उद्भवलेला आहे. गुणातिशयाचें पर्यवसान पुष्कळदां वैगुण्यांत कसें होतें, याचा उत्कृष्ट नमुना म्हणून हे दोष दाखवितां येतील. कोल्हटकरांच्या शिष्यप्रशिष्यांच्या वाङ्मयांत तर हे दोष फार मोठ्या प्रमाणांत आढळतात. त्यांचे शिष्य श्री. वरेरकर हे एवढे वास्तववादी ! पण त्यांच्या नाटक—कादंबऱ्यांतूनसुद्धां असंभाव्य किंवा अतिरंजित घटनांची रेलचेल आहे. कोल्हटकरांच्या पाठीमागून त्यांच्या संप्रदायाचा विस्तार आणि यश हें जर वाढवावयाचें असेल, तर त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनीं या दोषांचें निर्मूलन केलें पाहिजे. ही जाणीव मनांत वागवून जर त्यांच्या संप्रदायांतील लेखकांनीं शारदेची उपासना निष्ठेनें केली, तर ललित वाङ्मयाच्या क्षेत्रांत गुरूनें गाजविलेल्या अनन्य प्रभुत्वाचा वारसा कायमचा त्यांच्याकडे राहील, यांत शंका नाहीं.

पारिजात, ऑगस्ट १९३४

# रावसाहेब मोरमकर

—※—

'विविधज्ञानविस्तारा'चे संपादक रावसाहेब रामकृष्ण रघुनाथ मोरमकर यांच्या आकस्मिक मृत्यूची बातमी ऐकून महाराष्ट्रांतील विचारी वाचकवर्गाला अत्यंत दुःख होईल. मरण हें कुणालाच सुटलेलें नाहीं, हा सिद्धांत व्यवहारांत जर घडोघडीं प्रत्ययास येत असला, तरी, मृत्यूची दारुण वार्ता कानांवर पडतांच, अंतःकरणाचे धागे पिळवटल्यावांचून रहात नाहींत. किंबहुना, नित्य असूनहि ज्याचा नवीनपणा व नवलाई कधींच लोपत नाहीं असा जर मानवी आयुष्यांत कोणता प्रसंग असेल, तर तो एक मरणाचाच होय. मृत्यु हा जितका आकस्मिक तितकाच त्याचा भयाणपणा अधिक व त्यापासून होणारें दुःखहि त्या मानानें भयंकर. ज्याच्या पाठलागाची चाहूल कल्पनेच्याहि कानाला लागत नाहीं त्या मृत्यु-पासून होणारें दुःखहि केवळ कल्पनातीत असतें. मानवी आयुमर्यादेची अर्ध्याहून अधिक मजल ज्यांनीं गांठली, आणि प्रपंचाच्या रहाटीची दगदग दुःसह होऊन ज्यांनीं विश्रांतीच्या निवाऱ्याचा आपण होऊन आश्रय केला, त्यांच्या मरणाबद्दल खेद होण्याचें फारसें कारण नाहीं. त्यांतहि वार्धक्याच्या शेवटच्या दिवसांत अगर पुष्कळ दिवसांचें दुखणें काढून शरीर अगदीं जर्जर झाल्यावर जीवित आणि मृत्यु यांच्या सरहद्दीवर घोटाळणाऱ्या मनुष्याला जर मृत्यु आला, तर त्यापासून दुःखा-पेक्षां समाधान होण्याचाच संभव अधिक. कारण अशा परिस्थितींत मरण हीच खरोखर नैसर्गिक अवस्था असते. पण, मनुष्य जर आपल्या पायावर खडा उभा असून, स्वतःचा किंवा समाजाचा प्रपंच उत्साहानें वहिवाटतो आहे, तर त्याच्या मरणानें होणारी हानि अतोनात जाणवते. आणि, मग त्याचा मृत्यु जरी तितका अकालिक किंवा अनपेक्षित नसला, तरी त्यानें होणाऱ्या हानीमुळें मात्र तो तसा वाटतो.

गेल्या महिन्याचा 'विविधज्ञानविस्तारा'चा अंक ज्या वेळीं हातांत पडला, त्या वेळीं, पुढील अंक रावसाहेबांच्या नजरेखालून जाणार नाहीं, असें कुणालाच वाटलें नव्हतें. आयुष्यांतील अनेक दुर्धर आपत्तींना

जिनें धैर्यानें टक्कर देऊन, महाराष्ट्राच्या वाङ्मय चळवळीचें कार्य अप्रतिहत पुढें चालविलें, ती त्यांची निकोप शरीरप्रकृति अलीकडे सहा सात महिने ढांसळली होती. तरीहि अवघ्या दोन महिन्यांपूर्वी ज्यांनीं त्यांची भव्य मूर्ती, सस्मित मुद्रा व भेदक दृष्टि पाहिली होती त्यांना, त्या शरीरानें वृद्ध पण मनानें सदैव तरुण असलेल्या थोर साहित्यसेवकावर मृत्यूचा घाला इतक्या लवकर पडेल, ही कल्पनाही शिवली नाहीं. पण दैवाची लीला किती विचित्र आहे ! ' विस्तार'च्या पन्नाशीच्या वाढदिवसानिमित्त निघणाऱ्या ज्या पहिल्या ग्रंथाला त्यांच्या हातची माहितीनें भरलेली प्रस्तावना जोडली जावयाची, त्यांतच आतां त्यांचें चरित्र लिहिण्याचा प्रसंग आला आहे. अंथरुणाला अगदीं खिळेपर्यंत त्यांचा पत्रव्यवहार व नेहमींचें वाङ्मयकार्य यांत खंड पडला नाहीं. साधारण आजारी असतांना त्यांनीं कांपऱ्या हातानें लिहिलेलें टपोऱ्या वळणदार अक्षरांचें पत्र आज माझ्या पुढें पडलें आहे; व या त्यांच्या शेवटच्या पत्रांतसुद्धां कोणत्याही नवीन वाङ्मय चळवळीला हातभार लावण्याची उत्सुकता दृष्टीस पडते. उदरनिर्वाहाचें साधन म्हणून किंवा हौसेखातर मासिकें काढणारे लोक महाराष्ट्रांत पुष्कळ झाले व आहेतही; पण वर्षानुवर्षे सात आठशें रुपयांची बूड विनतक्रार सोसून वाङ्मयांतील हा निव्वळ आंतबट्याचा व्यवहार निष्ठेनें पुढें चालविणारे स्वार्थत्यागी वाङ्मयसेवक विरळा. स्वार्थत्यागाच्या तत्वावर ज्या थोड्या संस्था महाराष्ट्रांत आज तत्त्वनिष्ठ व्यक्तींनीं चालविल्या आहेत त्यांतच ' विविधज्ञानविस्तार ' या संस्थेची गणना होते. गेल्या पंचवीस वर्षांत या संस्थेला अनेक प्रकारच्या संकटांतून निभावून हल्लींच्या स्थितीला आणण्याचें श्रेय सर्वस्वी रावसाहेबांच्या तत्त्वनिष्ठेला दिलें पाहिजे.

'विविधज्ञानविस्तारा'शीं रावसाहेब मोरमकर यांचा संबंध स. १८९८ सालीं आला. 'विस्तारा'चे उत्पादक कै. गुंजीकर यांच्या निधनानंतर त्याची सर्व व्यवस्था रावसाहेबांचे मामा पुरुषोत्तमपंत नाडकर्णी यांनीं आपल्याकडे घेतली; व तेथपासूनच त्यांचाही संबंध 'विस्तारा'शीं जडला असें म्हणावयाला हरकत नाहीं. 'विविधज्ञान-विस्तारा'चे संपादक या नात्यानें रावसाहेबांनीं किती स्पृहणीय वाङ्मयकार्य केलें आहे याची कल्पना, 'विस्तारा'चे गेल्या पंचवीस वर्षांचे वार्षिक खंड चाळल्यानें येईल. 'विस्तारा'चे हे वार्षिक खंड म्हणजे एकंदर मराठी वाङ्मयाचे संदर्भ ग्रंथ आहेत, असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. किंबहुना, स. १८९६

सालापुढील मराठी वाङ्मयाचा टीकात्मक इतिहास या खंडांतून सांठवला आहे, असेंही म्हटलें तरी चालेल. गेल्या पंचवीस वर्षांत मराठींत प्राय: असें एकहि पुस्तक निघालें नसेल कीं, ज्याची 'विस्तारां'त अभिप्रायपूर्वक नोंद आलेली नाहीं. मराठींतील प्रत्येक चांगल्या ग्रंथावर तज्ज्ञ टीकाकारांचे विस्तृत परीक्षणलेख यावे म्हणून रावसाहेब किती झटत याची कल्पना, विस्ताराच्या कोणत्याही अंकावर नजर टाकल्यास, एखाद्या तिऱ्हाईतालासुद्धां येईल. ग्रंथपरीक्षण ही महाराष्ट्रांत आज केवळ एक वशिल्याची बाब होऊन बसली आहे. खाजगी स्नेहसंबंधाच्या किंवा सार्वजनिक पक्षभेदांच्या दृष्टीनें मराठी नियतकालिकांतून ग्रंथांची बहुधा संभावना होते. आणि केव्हां केव्हां तर, नुसत्या आभारप्रदर्शनात्मक औपचारिक अभिप्रायाच्या चार अक्षता ग्रंथकाराच्या अंगावर फेंकून, शिष्ट संपादक त्याच्या ऋणांतून लेखणीच्या एका फटकाऱ्यासरसे मोकळे होतात. पण 'विस्तारां'त असा प्रकार कधींही घडला नाहीं. बऱ्या वाईट लहान मोठ्या सर्व ग्रंथांची हजेरी 'विस्तारा'च्या परीक्षण-पटावर हटकून लागत असे.

स्वत: रावसाहेबांनीं गेल्या पंचवीस वर्षांत अगणित पुस्तकांवर अभिप्राय लिहिले. आणि, एकाद्या फटकळ कलमबहाद्दरानें व्यक्तिद्वेषाच्या भरांत त्यांना ' पिवळ्या पानाचे संपादक ' म्हणून खुनशीपणानें त्यांची कुचेष्टा केली असली, अगर प्रतिकूल टीकेचे आघात ज्यांना सोसवत नाहींत अशा लवचिक मनाच्या चिरडखोर संपादकांनीं त्यांना पोष्टमनाचा हुद्दा बहाल करण्याचा आव घातला असला, तरी त्यामुळें त्यांच्या या छोट्या अभिप्रायांची किंमत आंतील मोठ्या टीकालेखांहून, मार्मिकपणाच्या बाबतींत तरी, बिलकूल कमी ठरणार नाहीं. महाराष्ट्रांचें वाङ्मयजीवन आपल्या कल्पनेनुसार विशुद्ध राखण्याचा प्रयत्न गेलीं पंचवीस वर्षें रावसाहेबांनीं निष्ठेनें केला. सूक्ष्म दृष्टि, सतत वाचन, उपजत मार्मिकपणा आणि मराठी वाङ्मयाच्या उत्कर्षाची अहर्निश तळमळ या गुणांमुळें महाराष्ट्र वाङ्मयाचा ओघ विशुद्ध राखण्याचें हें महत्कार्य त्यांच्या हातून घडलें. गेल्या अर्धशतकामध्यें, निबंधमाला सोडल्यास, 'विस्तारां'च्या तोडीचें एकही मासिक महाराष्ट्रांत निघालें नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. आणि, निबंधमालेनें जरी मराठी वाङ्मयांत अगदीं अभिनव अशी क्रांति घडवून आणली असली, तरी, 'विस्तारा'ची योग्यता कांहीं बाबतींत तिच्याहून निस्संशय अधिक आहे. मालेचें धोरण एकमुखी आणि एकतर्फी होतें; तिच्या एककल्ली आणि अपरिपक्व

विचारसरणीमुळें महाराष्ट्राच्या मतांना अंशतः अनिष्ट असें वळण लागलें. परंतु 'विस्तारां'तील वाङ्मयामुळें तशी कोणतीच हानि झाली नाहीं. अनेक विद्वान् व्यक्तींच्या विचारांचें, क्वचित् परस्परविरोधी वाटेल असें सुद्धां, प्रतिबिंब त्यांत पडलें असल्यामुळें, भिन्न मतांची चर्चा वाचावयाला मिळून वाचकांना स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्याची संवय लागली. एकाद्या पक्षाचा किंवा व्यक्तीचा वृथा अभिनिवेश धरून सत्याचा विपर्यास 'विस्तारा'नें सहसा केला नाहीं. राजकीय आणि सामाजिक चळवळींच्या व्यापांत त्याचें धोरण सदैव प्रागतिक राहिलें. त्यानें पक्षपात कधीं दाखविला असला, तर तोहि केवळ सुधारणेच्या आणि प्रगतीच्या बाजूनें.

रावसाहेबांच्या स्वतंत्र आणि प्रगमनशील विचारसरणीमुळें 'विस्तारा'चा लौकिक गेलीं पंचवीस वर्षें सतत वाढत गेला. वाङ्मयांतील कोणताहि नवीन प्रकार त्यांनीं त्याज्य मानला नाहीं; व होतकरू लेखकांना अंतःकरणपूर्वक उत्तेजन दिलें. एकंदर सृष्टीप्रमाणें शब्दसृष्टींतहि नव्याजुन्याची घडामोड सदोदित होत असते. या घडामोडीच्या बुडाशीं असलेलें विकासाचें तत्व ओळखून जुन्याचा अनादर न करितां नवीनाला उत्तेजन देणें, हें वाङ्मयभक्तांचें कर्तव्य आहे. प्रत्येक क्षणाला नवीन लाट उठून पायाखालची वाळू झपाट्यानें निसटत असतां मी इथेंच उभा राहीन असा हट्ट धरणें चुकीचें होईल. आजच्या प्रगतिप्रवण जगांत अगतिक मनाच्या मनुष्याला मुळींच स्थान नाहीं. जगताच्या प्रगतीचें हें मर्म रावसाहेबांनीं ओळखलें होतें. बरोबरींच्या पांढऱ्या केसांचा ते जितका आदर राखीत, तितकाच आदर व त्याहूनहि अधिक प्रेम यौवनश्रीची कज्जलरेखा ज्यांच्या मुखमंडलावर पुरती उमटली नव्हती अशा तरण्याबांड लेखकांबद्दलही त्यांना वाटे. त्यांच्या स्वतःच्या वयाला साठी उलटून गेली होती, तरीहि पंचविशीच्या आंतबाहेरील उदयोन्मुख वाङ्मयभक्तांशीं चर्चा करावयाला त्यांना मुळींच कमीपणा वाटत नसे. उलटपक्षीं पित्याहूनहि प्रेमळ अशा त्या थोर साहित्य-सेवकाशीं वाद घालतांना तरुण लेखकांचेंही आदराचें अवधान कधीं सुटलें नाहीं. वाढत्या वयाबरोबर त्यांच्या मनाचें तारुण्यहि वाढत गेलें. त्यांच्या तरुणपणीं कोल्हटकर आणि खाडिलकर यांचीं नवीन धर्तीचीं नाटकें त्यांनीं लोकापवाद सोसूनही जशीं 'विस्तारां'तून पुढें आणलीं, तसाच वृद्धापकाळीं रेंदाळकरांच्या

नियमक कवितेलाहि 'विस्तारा'च्या प्रतिष्ठित आणि विद्वन्मान्य परिसरांत कौतुकानें आश्रय दिला.

जुन्याचा आदर राखून नवीनाला उत्तेजन देण्याच्या त्यांच्या या प्रवृत्ती-बद्दल इथें एक दोन गोष्टी सांगतां येतील. कवि यशवंत यांनीं त्यांच्याकडे आपलें एक सुनीत प्रकाशनार्थ पाठविलें असतां, रावसाहेबांनीं त्यांना असें लिहि-ल्याचें स्मरतें कीं, " सुनीत छापावयाला माझी ना नाहीं. पण शेवटचा मोडका श्लोक छापणें कठिण वाटतें. चौदा ओळींची चालीवरची कविता पाठविल्यास आनंदानें छापीन. " तसेंच, दुसऱ्या एका प्रसंगीं प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं तयार केलेल्या नवीन मराठी लिपीसंबंधीं चर्चा चालू असतां, त्यांनीं अर्धवट विनोदानें असें उद्गार काढले कीं, "आमच्यादेखत तुम्ही ही नवीन लिपी सुरू करूं नका, आम्ही मेल्यावर ती खुशाल प्रचारांत आणा. " जुन्यानव्याच्या विरोधांत जुन्याकडे त्यांचा कल असणें अगदीं साहाजिक होतें. पण हा कल नवीनाला उत्तेजन देण्याच्या बुद्धीला सहसा नडला नाहीं. व्यक्तिशः केशवसुतांहून मोगऱ्यांचीच कविता त्यांना अधिक आवडे. पण जिथें दोन पिढयांचें अंतर पडतें, तिथें मतांत इतकी तफावत पडल्यास ती क्षम्यच म्हणावी लागेल. पण ही तफावत नवीन लेखकांच्या उत्कर्षाच्या सहसा आड आली नाहीं. रामकृष्ण नारायण ब्रम्हनाळकर, नरहर रघुनाथ फाटक, नारायण महादेव भिडे, माधव त्रिंबक पटवर्धन, यशवंत दिनकर पेंढरकर प्रभृति तरुण लेखकांना त्यांनींच प्रेमपूर्वक प्रोत्साहन देऊन पुढें आणलें. ज्या लेखकांच्या ठिकाणीं त्यांना गुण-विशेष आढळला, त्यांची हेळसांड त्यांनीं कधींच होऊं दिली नाहीं.

खुद्द हा मृत्युलेख लिहिणाऱ्या लेखकाला त्यांनीं अनेक प्रकारांनीं उपकृत करून ठेविलें आहे. आयुष्यांतील इतर क्षेत्रांप्रमाणें वाङ्मयाच्या क्षेत्रांतही पदवी किंवा वशिला यांच्याशिवाय पाऊल पुढें पडणें मुष्किलीचें होतें. व्यासंग आणि बुद्धिमत्ता हीं सामान्यत: ज्या मापानें तुळलीं जातात, त्या मापानें तुळून घेण्याचें भाग्य ज्यांना दुर्दैवानें लाभलेलें नसेल, त्यांना व्यवहाराप्रमाणें वाङ्मयांतहि तेजोभंगाचे प्रसंग पदोपदीं सहन करावे लागतात. त्यांच्या योग्यतेविषयीं संशय घेण्याचा मोह उदार मनाला सुद्धां सुटत नाहीं; लेखणीच्या जोरावर नशीब काढण्याकरितां धडपडणाऱ्या अशा लेखकाला अनधिकारी आणि उपटसुंभ

ठरविण्याची संधि क्षुद्र बुद्धीचे कुटिल टीकाकार क्वचितच जाऊं देतात. केवळ गुणवत्तेवर जिथें उत्कर्ष अवलंबून असतो, त्या शारदेच्या साम्राज्यांतहि पदवी नसल्यास होतकरू लेखकाला पुढें यावयाला किती त्रास पडतो, आणि पुढें आल्यावरही त्याच्या योग्यतेविषयीं संशय घेण्याची प्रवृत्ति किती प्रबळ असते, याचा अनुभव हरिभाऊ आपटे, कविवर्य टिळक किंवा गडकरी यांचीं चरित्रें वाचतांना पुष्कळ येतो. बर्कनें म्हटल्याप्रमाणें, उन्नतीच्या चढणीवर प्रत्येक पाऊल पुढें टाकतांना त्याला आपल्या लायकीबद्दल पुरावे दाखल करून उथळ व अनुदार मनांची खळबळ तात्पुरती तरी शमवावी लागते. आणि संशयाचें विष हें कुत्र्याच्या विषाप्रमाणें केव्हां व कसें उमटेल याचा नियम नसल्यामुळें, भावी पिढ्यांच्या रसिकतेवर भिस्त ठेवून, यशःसिद्धीचा खडतर मार्ग त्याला धिम्मे-पणानें आक्रमावा लागतो. स. १९२१ सालच्या नाताळांत गुरुवर्य कोल्हटकर यांच्या कृपेमुळें रावसाहेबांची ओळख प्रथम ज्या वेळीं झाली, त्या वेळीं प्रस्तुत लेखकाला असें मुळींच वाटलें नाहीं कीं, ‘विस्तारा’सारख्या विद्वन्मान्य मासिकाचा संपादक आपल्याशीं इतक्या सौजन्यानें वागेल. पण रावसाहेबांनीं अगदीं पहिल्या दिवसापासून अत्यंत प्रेमानें वागविलें; व वयाचा किंवा इतर कसलाहि कमीपणा बिलकूल भासूं दिला नाहीं. गेल्या दीड वर्षांत जे अनेक दुःखाचे प्रसंग ओढवले, त्या सर्व प्रसंगीं त्यांनीं ममतेनें धीर दिला; व आयुष्याची बिकट वाट सुगम व्हावी म्हणून शक्य तितके प्रयत्न केले. जन्मदाता पिता हा पूज्य तर खराच; पण विचारांची स्फूर्ति देणारा गुरु किंवा पडत्या काळांत तत्पर-तेनें हात देऊन उत्कर्षाच्या चढणीला लावणारा एकनिष्ठ हितैषी हा त्याहूनहि पूज्य होय. जन्मदात्या पित्याचें ऋण मानीव आहे; कारण तो एक केवळ योगायोगाचा प्रकार असतो. पण गुरु किंवा हितैषी यांनीं दक्षतेनें बुद्धिपुरस्सर केलेल्या उपकारांचें ऋण कधींहि फिटत नाहीं. आणि, रावसाहेब मोरमकर यांचा ऋणानुबंध आज जरी काळानें कायमचा तोडला असला, तरी त्यांनीं केलेल्या अनेक उपकारांची प्रेममय स्मृति, डोळ्यांत दाटलेले हे कृतज्ञतेचे अश्रु अखंड ताजी ठेवतील.

ज्ञानप्रकाश, ३१ आक्टोबर १९२३

# कै० वासुदेवशास्त्री खरे

कै० वासुदेवशास्त्री खरे यांचें हें सरस चरित्र त्यांचे शिष्य श्री. दामोदर मोरेश्वर भट यांनीं लिहिलें आहे. महाराष्ट्रांतील वाचकवर्गाला खरेशास्त्री हे नाटककार म्हणून प्रिय आहेत, तर विद्वद्वर्गाला ते इतिहाससंशोधक म्हणून पूज्य होऊन बसलेले आहेत; व त्यांची ही दुहेरी कीर्ति मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत आचंद्रार्क दुमदुमत राहील, यांत संशय नाहीं. त्यांचा जन्म कोकणांत गुहागर येथें १८५८ मध्यें झाला; व १९२४ सालीं घाटावर मिरज येथें त्यांचें देहावसान झालें. सागराच्या उत्संगावर वसलेलें व तरुलतांनीं गजबजलेलें निसर्गरम्य गुहागर कुठें आणि सह्याद्रीच्या पठारावर वसलेलें व पाण्याच्या दुर्भिक्षाबद्दल प्रसिद्ध असलेलें रखरखीत मिरज कुठें!—पण,

पोटासाठीं भटकत जरी दूर देशीं फिरेन
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन
नेवो नेतें जड तनुस या दूर देशास दैव

या आपल्या जन्मभूमीवरील हृदयस्पर्शी कवितेंत, त्यांनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें, ते विद्येच्या आणि पोटाच्या पाठीमागें लागून, गुहागराहून प्रथम साताऱ्याला, नंतर पुण्याला व शेवटीं मिरजला येऊन स्थायिक झाले. साताऱ्यास गजेंद्रगडकरांच्या विद्यावैभवसंपन्न घराण्याच्या आश्रयाला राहून त्यांनीं शास्त्रज्ञान संपादन केलें; पुण्याला चिपळूणकर—टिळकांशीं सहकार्य करून त्यांनीं आपल्या जीवितकार्याची भूमिका सिद्ध केली; व मिरजेस स्थायिक झाल्यानंतर या भूमिकेवरच त्यांनीं आपल्या वाङ्मय कर्तृत्वाचें भव्य मंदिर उभारलें. साताऱ्यास गजेंद्रगडकरांच्या हाताखालीं अध्ययन करीत असतांना, तेथील 'महाराष्ट्रमित्र' नांवाच्या साप्ताहिकांत लेख लिहून, त्यांनीं आपली उपजीविका केली. या लेखनकामाबद्दल त्यांना मोबदला काय मिळे?—तर एक भाकरी आणि वाटीभर आंबील! म्युनिसिपॉलिटीच्या कंदिलावर अभ्यास केल्याच्या आख्यायिका पुष्कळ महापुरुषांच्या चरित्रांत वाचावयाला मिळतात. पण, खरेशास्त्रीबुवांच्या चरित्रांतील या

वास्तविक प्रसंगापुढें त्या आख्यायिकांतील अतिशयोक्तींचा सर्व अद्‌भुतपणा फिका पडतो, असें कोण म्हणणार नाहीं ?

शास्त्रीबुवांचे हे कष्ट विद्यार्थिदशेबरोबरच संपले, असें नव्हे. सुवर्णाचें तेज हें जसें त्याच्या अग्निदिव्यावर अवलंबून असतें, तशी त्यांची कीर्ति ही त्यांच्या कष्टावर अधिष्ठित झालेली आहे. कांहीं कर्तबगार व्यक्तींच्या चारित्रांत आपण असें पहातों कीं, त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध जरी कष्टांत गेला, तरी उत्तरार्धांत त्यांच्या मस्तकावर छत्रचामरें डोलतात. किंवा, यदाकदाचित् छत्र-चामरें नच डोललीं, तरी आपल्या कष्टांचीं मधुर फळें चाखण्यांत त्यांचें उत्तरायुष्य सुखानें जातें. प्रसिद्ध इंग्रजी पंडित जॉन्सन याचें तारुण्य उपासतापास काढीत ग्रंथ लिहिण्यांत गेलें खरें. पण, पुढें वर्षासन मिळाल्यावर त्यानें आपलें वार्द्धक्य, एखाद्या रसिक उमरावाप्रमाणें, केवळ काव्यशास्त्रविनोदांत चैनीनें घालविलें. परंतु शास्त्रीबुवांचें भाग्य तितकेंहि नव्हतें. 'आधीं मेळवी, मग जेवी'—हें समर्थांचें वचन त्या महापुरुषाच्या आयुष्याच्या अगदीं सरत्याहि क्षणाला लागू पडतें. गगनाच्या अंगणांत ज्याप्रमाणें दिवसाच्या पाठोपाठ रात्र धांवत असते, त्याप्रमाणें त्यांच्या जीविताच्या क्षेत्रांत यशाच्या मागोमाग गरिबी धांवत होती. कष्ट आणि कीर्ति यांनीं पाठशिवणीचा खेळ खेळण्याची आपली हौसच जणुं कांहीं त्यांच्या आयुष्याच्या विशाल भूमिकेवर फेडून घेतली! १८८० सालीं मिरज हायस्कुलांत दरमहा ३० रुपये पगारावर ते रुजू झाले; व १९१५ सालीं जेव्हां १५ रुपयांच्या पेन्शनावर ते नोकरींतून निवृत्त झाले, त्या वेळीं बढती मिळत मिळत त्यांचा पगार ४५ वर येऊन थडकला होता! ज्या पगारावर गिरणींतील कामगार आज आपल्या नोकरीला आरंभ करितो, त्या पगारावर शास्त्रीबुवांनीं आपल्या नोकरीला आरंभ केला; व ज्या पगारावर आज पोष्टांतील कारकून आपल्या नोकरीला आरंभ करितो, त्या पगारावर त्यांनीं आपल्या नोकरीची अखेर गांठली! कॉलेजांतील वसतिगृहांत रहाणाऱ्या विद्यार्थ्यालासुद्धां आज एकट्याच्या खर्चाला ४५ रुपये पुरत नाहींत! पण, एवढयाहि थोड्या पगारावर शास्त्रीबुवांनीं केवळ कुटुंबाचा चरितार्थच चालविला असें नव्हे, तर ऐतिहासिक लेखसंग्रहाचे १२ खंड व इतरहि १५ नाट्य—काव्यादि ग्रंथ प्रकाशित केले! बापानें पोट बांधून पाठविलेल्या पैशावर चैन करणाऱ्या कॉलेजांतील ऐतखाऊ विद्यार्थ्यांना आणि फावल्यानें पगार

ओढणाऱ्या त्यांच्या निरुद्योगी प्रोफेसरांना शास्त्रीबुवांच्या या स्वार्थत्यागापासून कांहींच बोध घेतां येणार नाहीं काय ?

शास्त्रीबुवांच्या प्रापंचिक जीविताप्रमाणें त्यांचें वाङ्मय जीवितहि कष्टाचेंच किंबहुना सर्वथैव कष्टमय होतें. कवि, नाटककार किंवा कथालेखक यांचें आयुष्य जरी कदाचित् कष्टमय असलें, तरी त्यांचें वाङ्मय जीवन मात्र कष्टमय नसतें. बौद्धिक परिश्रम हे अर्थात् त्यांनाहि करावे लागतातच; पण, शारीरिक कष्ट तरी त्यांना पडत नाहींत. गारुडी हा जसा आंब्याची कोय पुरून बसल्या बैठकीला फुलांफळांनीं लहडलेलें आंब्याचें झाड निर्माण करून दाखवितो, तसा ललित लेखक हा स्फूर्तीच्या आवेशनिमिषांत रसपूर्ण वाङ्मय उत्पन्न करितो. परंतु, संशोधनावर अधिष्ठित झालेलें इतिहासलेखन म्हणजे पडित, निर्जळ जमिनीवर मोटेच्या पाण्यानें करावयाची कष्टाची शेतीच होय ! त्या शेतीवर पोट तर कधीं भरावयाचें नाहींच; पण, पुन्हा कष्ट कितीहि केले, तरी ते मात्र अपुरेच पडावयाचे. तसें पाहिलें, तर शास्त्रीबुवा हे कांहीं मूळचे इतिहाससंशोधक नव्हत. महाराष्ट्रांतील विद्वन्मंडळांत त्यांचें नांव जें प्रथम गाजलें, तें केवळ कवि आणि नाटककार या नात्यांनी; व पुढें वृद्धापकाळीं पेन्शन घेतल्यानंतरहि अवघ्या १५ रुपयांवर चरितार्थ चालविण्याचा बिकट प्रश्न जेव्हां या संशोधकाग्रणीपुढें दत्त म्हणून उभा राहिला, त्या वेळींहि त्यांनीं आपली प्रतिभा नाट्यव्यवसायाच्या सुपीक क्षेत्रांत राबवून हजारों रुपये मिळविलें. परंतु, मिरजेला आल्यावर पटवर्धन घराण्याचें दप्तर त्यांच्या हातीं पडतांच, आपल्या दारांत ऋद्धिसिद्धीप्रमाणें राबणाऱ्या नाट्य आणि काव्य या कलांना निग्रहानें पाठमोरें होऊन, त्यांनीं संशोधनाचा नांगर हातीं घेतला; व पेशवाईच्या इतिहासाचें अक्षुण्ण क्षेत्र परिश्रमपूर्वक लागवडीला आणलें. पटवर्धनांच्या या दप्तरावरील त्यांचें प्रेम इतकें अनन्य आणि एकांतिक होतें कीं, एकादा कृपण ज्याप्रमाणें आपल्या संचिताला चिकटून बसतो, त्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं आमरण त्याच्या उद्धाराच्या उद्योगालाच आपल्याला वाहून घेतलें; व पुढें इतर संस्थांकडून आणि संस्थानांकडून मातबर नोकऱ्यांचीं आमंत्रणें आलीं असतांहि, त्यांच्या मोहाला बळी न पडतां, त्यांनीं सतत पस्तीस वर्षें हा एकच एक उद्योग निष्ठेनें केला. मृत्यूची ओढ शरीराला लागल्यानंतरहि, वसईच्या तहापर्यंत म्हणजे पेशवाईच्या विनाशापर्यंत तिच्या इतिहासाचें संशोधन नेऊन

भिडविण्याचा आपला संकल्प ‘ याचि देहीं याच डोळां ’ सिद्धीस जाऊं शकत नाहीं, एवढयाच एका गोष्टीसाठीं त्यांचा आत्मा अखेरपर्यंत तळमळला !

पटवर्धनांचें दप्तर तपासण्यासाठीं मिरजेपासून बुधगांवपर्यंत ६–७ मैलांचे हेलपाटे त्यांना नेहमीं घालावे लागत. पण, त्यांची क्षिति त्यांनीं कधींच बाळगली नाहीं. पटवर्धनी दप्तराचे ३०० रुमाल त्यांनीं तपासले; व कुरुंदवाड, इचलकरंजी इत्यादि संस्थानांचींहि दप्तरें त्यांनीं नजरेखालीं घातलीं. पेशवाईच्या उत्तरेतिहासाशीं संबद्ध असलेल्या लक्षावधि पत्रांचा उद्धार त्यांच्या हातून झाला; “ मराठशाहीच्या उत्तरार्धाचा चालता बोलता इतिहास ” असें जें त्यांचें वर्णन राजवाडे नेहेमीं कौतुकानें करित, तें याच कारणामुळें. त्यांच्या या संशोधनाचें वर्णन त्यांचे शिष्य श्री. न. चिं. केळकर यांनीं असें केलें आहे कीं, “ खेदाची गोष्ट ही कीं, ज्या घराण्यांचा लौकिक वाङ्मय द्वारा चिरंतन करण्याचें श्रेय खरेशास्त्री यांनीं घेतलें, त्या घराण्यांतील संस्थानिकांनीं त्यांस भरपूर सहाय्य केलें नाहीं. ते उपास तापास करून पायानें मजला मारीत ! प्रहरानुप्रहर दप्तरें चिवडून, हातानें नकला करून, पुढच्या ग्रंथांच्या विक्रीनें मागच्या ग्रंथांचें छापखान्याचें कर्ज फेडीत ! ” इतिहाससंशोधनाची असली कष्टमय खेती करण्यांत शास्त्रीबुवांच्या आयुष्याची पस्तीस वर्षे गेलीं. त्यांचे हे अविरत कष्ट, त्यांनीं केलेलें अनन्य संशोधनकार्य आणि स्वकीय संस्कृतीला पाठमोरीं होऊन बसलेलीं विद्यापीठें व स्वाभिमानशून्य संस्थानिक यांनीं केलेली त्यांची उपेक्षा यांमुळें अंतःकरण पिळवटून जाऊन, त्यांचे समानशील सहकारी इतिहासाचार्य राजवाडे यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, “ वासुदेवशास्त्री खऱ्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धन दप्तर छापावें आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर यांनीं खुशाल झोंपा काढाव्या ! शिवाजी महाराज, दमाजी गाइकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हां संशोधकांचे आजे पणजे आहेत, आणि संस्थानिकांचे कोणी नाहींत, असेंच म्हणण्याची पाळी आली ! ” गव्हर्नरांची आणि गव्हर्नर-जनरलांची पायधूळ आपल्या संस्थानांवर झाडली जावी, म्हणून लक्षावधि रुपये उधळणाऱ्या संस्थानिकांनीं त्यांचा एकदशांश जरी खरेशास्त्रीबुवांच्या कार्यासाठीं खर्च केला असता, तर त्यांचे कष्ट तितके हलके झाले नसते काय ? व त्यांची आयुर्मर्यादा थोडी वाढून त्यांना संकल्पित कार्य पूर्ण करितां आलें नसतें काय ? विशेषतः, वाळवीचें भक्ष्य होऊन बसलेला

पटवर्धनांच्या घराण्याचा इतिहास प्रकाशित करण्यांत सर्वस्व घालविणाऱ्या शास्त्रीबुवांच्या गुणांचें, पटवर्धनी संस्थानांच्या प्रभावळींत राहूनहि, चीज होऊं शकलें नाहीं, याबद्दल मनाला अत्यंत उद्वेग वाटतो. विद्वज्जनांचें दारिद्र्य हें, भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें, हृदयाला सदैव बोंचणारें एक शल्य आहे, हें तर खरेंच. पण, ऐतखाऊ श्रीमंतांच्या अवज्ञेच्या आणि उपेक्षाशील विद्यापीठांच्या अवमाननेच्या दुहेरी विषारानें जेव्हां तें शल्य माखलेलें असतें, तेव्हां त्याच्यापासून हृदयाला होणाऱ्या वेदना या खरोखरीच मरणांतिक असतात !

श्री० भट यांनीं लिहिलेलें शास्त्रीबुवांचें हें सुंदर चरित्र वाचतांना, वीर हा कोणत्याहि क्षेत्रांत किंवा व्यवसायांत शिरला तरी तिथेंहि त्याचें शौर्य प्रकट होतें, या कार्लाइलच्या लोकप्रिय सुभाषितांचें स्मरण झाल्याविना रहात नाहीं. शौर्य हें कांहीं केवळ शत्रुसैन्यांचें निर्दालन करण्यांतच आहे, असें नव्हे. किंबहुना, रणांगणावर प्रकट होणाऱ्या काल-मर्यादित शौर्यापेक्षांहि, ध्येयसिद्धीचा मार्ग आक्रमीत असतां, पावलोपावलीं अडविणाऱ्या अडचणी ठेंचण्यांत आमरण आविर्भूत होणारें अमर्याद शौर्य अधिक श्रेष्ठ होय. आणि, हें शौर्य ज्याच्या आयुष्यांत अखंड आणि अविश्रांत व्यक्त झालेलें दृष्टीस पडतें, तोच मनुष्य खरा शूर, खरा हुतात्मा. कारण, तो क्षणोक्षणीं कणाकणानें आपल्या आत्म्याचें,—आपल्या बुद्धि-शक्तींचें हवन करित असतो. वासुदेवशास्त्री खरे किंवा इतिहासाचार्य राजवाडे यांना जें हुतात्मा म्हणावयाचें, तें याच दृष्टीनें. ‘ अहह महतां निस्सीमानश्चरित्र-विभूतयः ’ असे उद्गार शास्त्रीबुवांचें हें चरित्र वाचून सहृदय मनुष्याच्या तोंडून खचित बाहेर पडतील. परंतु, जगांतील कोणत्याहि विभूतीच्या चरित्राची स्तुति ज्यानें होऊं शकते, अशा या सामान्य सुभाषितापेक्षांहि, ‘ क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ’ या विभूतींच्याहि चरित्राला सहसा लागू न पडणाऱ्या असामान्य सुभाषितानेंच त्यांच्या चरित्राचें वर्णन अधिक यथार्थ होईल. आणि त्यांतच खरोखरी त्यांच्या अनन्य थोरवीचें बीज आहे. सोन्याचें गोकर्ण तोंडांत धरून जन्माला आलेल्या विभूतींचें कर्तृत्व प्रशंसनीय असलें, तरी तें कितीसें ? स्वतः खुद्द दैवच त्यांच्या कर्तृत्वाला यशःसिद्धीच्या सिंहासनावर हातानें धरून नेऊन बसवितें. आणि इथें पहावें, तर पाण्यावर आसन घालून शेषानें ब्रह्मांडाचा भार शिरीं वहावा, तसा सारा प्रकार ! दारिद्र्य तर पांचवीला पुजलेलें; इंग्रजी-

चीहि फक्त तोंडदेखली ओळख; आणि मनाचा उपजत ओढा पहावा, तर तो ललितकलांच्या विलासाकडे. साधनांच्या अशा अभावांतहि शास्त्रीबुवांनीं मराठशाहीच्या उत्तरार्धाच्या इतिहासाचा पाया घातला, हें त्यांचें कर्तृत्व किती अनन्य! राजवाड्यांनीं स्वतःमागें प्रपंचाचा पाश लावून घेतलेला नव्हता; सान्यांना सुखाची सरकारी नोकरी लाभलेली होती; पारसनीसांवर संस्थानिकांचें कृपाछत्र झुलत होतें; व भाव्यांच्या तर खुद्द घरांतच लक्ष्मी नांदत होती. महाराष्ट्रांतील संशोधकपंचायतनामधील इतर चौघांना आपआपल्या परीनें असलेली परिस्थितीची ही अनुकूलता लक्षांत घेतल्यावर, खरेशास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागाची आणि कर्तृत्वाची अनन्यता मनाला तीव्रतेनें जाणवून, कोणाचें हृदय आदरानें आणि कृतज्ञतेनें उचंबळून येणार नाहीं? अशा या थोर पुरुषाचें सर्वांगीण चरित्र लिहून श्री. भट यांनीं महाराष्ट्राला आणि विशेषतः तरुण पिढीला निस्संशय उपकृत केलें आहे.

महाराष्ट्र, १६ फेब्रुवारी १९३०

# नारायण वामन टिळक

इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर गेल्या पाऊणशें वर्षांत जे थोडे उच्च दर्जाचे कवि महाराष्ट्रांत होऊन गेले, त्यांत नारायण वामन टिळक यांची गणना होते. कवि या नात्यानें टिळकांनीं केलेली स्वभाषेची सेवा व मिळविलेला लौकिक इतर कवींहून थोडा निराळ्या प्रकारचा आहे. सामान्यतः कवि म्हटला म्हणजे त्याचा विहार फक्त कल्पनासृष्टींतच व्हावयाचा. वास्तविक सृष्टीशीं समरस होणारे कवि प्रायः विरळा. परंतु टिळक हे या सामान्य अनुभवाला अपवाद होते, असें म्हणावयाला हरकत नाहीं. ते विरक्त होते, पण त्यांना जगापासून दूर रहाण्याची कल्पना संमत नव्हती. वनवास किंवा विजनवास त्यांना प्रिय नव्हता असें नाहीं; पण लोकसंग्रह किंवा लोकसेवा ही त्यांना त्याहूनही प्रिय होती. ते भक्तकवि होते; पण त्यांची भक्ति मूर्तीच्या मर्यादित कल्पनेला खिळून राहिली नव्हती. अखिल मानव जातीच्या संसारांत त्यांनीं परमेश्वराचें प्रेममय स्वरूप पाहिलें. 'जनसेवा ही ईश्वरसेवा' हें ब्रीदवाक्य त्यांनीं याच भावनेनें उच्चारलें; व त्यांच्या विचारांत, वर्तनांत आणि वाङ्मयांत सर्वत्र हीच भावना प्रतिबिंबित झालेली दिसते. एखाद्या फटिंगाप्रमाणें समाजाशीं फटकून वागणें अगर कोरड्या कळकळीनें त्यावर तोंड टाकणें त्यांना आवडत नसे. उद्गाता किंवा उपदेशक या नात्यानें कवीची भूमिका एकंदर समाजाच्या भूमिकेहून फार उंच आहे यांत शंका नाहीं. पण, कवित्वाची भरजरी झूल आपल्या अंगावर आहे, एवढ्याच एका दिमाखानें जर तो सामान्य जनांना तुच्छ लेखूं लागला, तर त्याचा मोठेपणा तो काय राहिला ? ख्रिस्तानें गिरिशिखरावर उभें राहून उदात्त तत्त्वांचा उपदेश केला खरा. पण तिथून खालीं उतरतांच लोकांच्या गर्दींत मिसळून त्यानें अनाथअपंगांची विचारपूस केली, यांतच त्याचा खरा मोठेपणा आहे. आपल्या गुरूच्या उदात्तरम्य चरित्राचें हें रहस्य टिळकांनीं ओळखलें होतें. त्यांच्या कवितेंत हें रहस्य विशद केलेलें आहे.

टिळकांच्या कवितेचें स्वरूप त्यांच्या मनोवृत्तीप्रमाणें साधें व सुसंस्कृत आणि प्रसन्न व प्रेमळ आहे. बुद्धीला भोंवळ आणणारा तात्त्विक विचारांचा खोलपणा

किंवा मनाला गुंगविणाऱ्या उत्श्रृंखल कल्पनेच्या भराऱ्या त्यांच्या कवितेंत नाहींत. तत्त्वज्ञानाकडे त्यांचा ओढा पुष्कळच आहे. संसारांतील सामान्य प्रसंगाचें वर्णन करतांना देखील ते तत्त्वज्ञानाची आठवण ठेवावयाला सहसा चुकत नाहींत. व्यवहारांतील ढोबळ सत्यें शब्दसूत्रांत गुंफून त्यांना तात्त्विक विचारांची जरतार लावण्याची हौस त्यांना फार होती. लहान मुलांची समजूत काढतांना अगर त्यांचें कौतुक करतांना सुद्धां तात्विक विचारांचें गांभीर्य त्यांच्या मुद्रेवरून हलत नसे. त्यांचें उत्कृष्ट काव्य 'वनवासी फूल' हें तात्त्विक विवेचनानें ओतप्रोत भरलेलें आहे. तत्त्वज्ञानाची इतकी आवड असूनही टिळकांची कविता क्लिष्ट व कर्कश झाली नसून साधी व सोपीच राहिली आहे. कारण, त्यांचें तत्त्वज्ञान सरावांतले असल्यामुळें तें क्वचित् कंटाळवाणें झालें, तरी समजावयाला मात्र कठिण पडत नाहीं. शिवाय, अगदीं साधी कल्पनाहि विठ्ठलाच्या कूट प्रश्नाप्रमाणें गूढ करून सांगण्याची संवय टिळकांना लागली नसल्यामुळें, त्यांची तात्त्विक कविता चटकन समजते, अपरिचित व अभिनव कल्पना किंवा तात्त्विक व गहन विचार सोपा करून सांगण्याकडे त्यांची फार प्रवृत्ति आहे. त्यामुळें त्यांच्या तात्त्विक आणि मनःस्थितिदर्शक कविता समजावयाला अडचण पडत नाहीं. त्यांची कविता गंभिर असूनहि इतकी सुबोध आणि हृदयंगम झाली याला आणखीहि एक कारण आहे. प्रेमळपणाची निरागस मोहनी त्यांच्या कवितेंत सर्वत्र पसरली असल्यामुळें ती मनाला तेव्हांच भुरळ पाडते. इष्काची उन्माद आणणारी नशा किंवा राष्ट्रप्रेमाचें बेफाम थैमान त्यांच्या कवितेंत मुळींच नाहीं. व्यक्ति किंवा राष्ट्र यांवरच टिळकांचें प्रेम थबकून राहिलेलें नव्हतें. सर्व चराचर सृष्टिविषयीं त्यांच्या मनांत आत्मीयभाव वसत होता.

आकाशांत फुलें, धरेवर फुलें, वाऱ्यावरीही फुलें

ही सृष्टींत बहरलेली प्रेमाची फुलबाग त्यांच्या प्रेमळ प्रतिभेनेंच पाहिली. अशा प्रकारचा विश्वाला आकळणारा प्रेमळपणा त्यांच्या कवितेंत भरलेला असल्यामुळेंच तिला इतकें मोहक स्वरूप प्राप्त झालें आहे.

टिळकांची कविता प्रेमळ असली तरी प्रेमोत्कट नाहीं. विकाराची किंवा भावनेची उत्कटता त्यांच्या कवितेंत क्वचितच आढळते. शेवटच्या दुखण्यांत मृत्युशय्येवर लिहिलेले कांहीं तुरळक अभंग सोडले, तर त्यांची बाकीची कविता प्रेमळ पण प्रशांत आहे. त्यांच्या धर्मविषयक म्हणजे मिशनरी बाण्यानें लिहिलेल्या

कवितेंत मात्र विकारवशता दृष्टीस पडते. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार त्यांनीं बुद्धि-पुरस्सर केला; व या अंगीकृत धर्माचा अभिमान वहाण्यांत त्यांनीं बिल्कूल कसूर केली नाहीं. त्यांचा देशाभिमानहि या स्वीकृत धर्माच्या दुरभिमानानें डागळलेला होता. त्यांची धर्मविषयक कविता सोडली, तर त्यांच्या इतर कवितेला या दुरभिमानाचा शबल संसर्ग फारसा झालेला नाहीं. कवि या नात्यानें स्वधर्माची सेवा टिळकांनीं पुष्कळच केली. पण या स्वधर्मसेवेहूनहि अधिक महत्वाचें उपयुक्त राष्ट्रकार्य त्यांच्या कवितेनें केलें आहे. टिळकांच्या कवितेचा जन्म होण्यापूर्वी महाराष्ट्रांतील ख्रिस्ती समाजाला स्वत:चें असें खरेंखुरें धार्मिक वाङ्मय जवळजवळ मुळींच नव्हतें. सतराव्या शतकांत फादर स्टीफन्सनें केलेलें बायबलचें अभंगमय रूपांतर सोडलें, तर बाकीचें ख्रिस्ती मराठी वाङ्मय मिशनरी थाटाचें होतें. मराठी भाषेंतील शब्दांचा वापर करून तें तयार केलेलें असल्यामुळें त्याला मराठी म्हणावयाचें, एवढेंच ! पण महाराष्ट्राच्या वाङ्मयांत त्याला कोणीहि थारा देणार नाहीं. फादर इस्तीवाचें ‘ ख्रिस्तपुराण ’ रसाळ असलें, तरी तें ख्रिस्ती समाजांत सर्वसंमत होणें शक्य नव्हतें. एक तर, कॅथोलिक पंथाच्या कडव्या वळणांतील मिशनरीनें तो ग्रंथ लिहिला होता; व दुसरें, त्याची भाषा कोंकणी म्हणजे अशिष्ट मराठी होती. अव्वल इंग्रजी अमदानींत ख्रिस्ती झालेल्या मराठी लेखकांनीं आपल्या समाजाकरितां धार्मिक व भक्तिपर वाङ्मय निर्माण करण्याचा बराच प्रयत्न केला. या त्यांच्या वाङ्मयाला ‘ उपासनासंगीतांत ’ स्थान मिळालें आहे. या लेखकांचा उत्साह अभिनंदनीय असला, तरी उद्योग उपेक्षणीय आहे. ख्रिस्ती समाजांतील पहिल्या प्रतीचे लेखक जे बाबा पदमनजी, त्यांचें लिखाणसुद्धां मिशनरी वळणाच्या तावडींतून सुटलेलें नाहीं. मराठी भाषेचा जिव्हाळा ज्यांत उतरला आहे असें अस्सल मराठी सारस्वत आपल्या धर्मबांधवांकरितां फक्त टिळकच निर्माण करूं शकले. ख्रिस्ताच्या चरित्राला दशाकार लेणें चढविण्याचा त्यांचा प्रयत्न दुर्दैवानें अपुराच राहिला असला, तरी त्यांच्या भक्तिपर कवितेनें ती उणीव भरून काढली आहे. महाराष्ट्रांतील ख्रिस्ती समाजाला स्वभाषेविषयीं पूर्वी फारसें प्रेम नसे. टिळकांच्या कवितेनें धर्मांतरामुळें पारख्या झालेल्या या बांधवांना पुन्हा जवळ केलें, हा लाभ सामान्य नाहीं.

टिळकांना ‘ फुलांमुलांचे कवि ’ म्हणण्याचा प्रघात आहे. त्यांच्या कवितेंत वत्सलरस अनेक ठिकाणीं आढळतो. ‘ सुशीला ’ काव्याचा आरंभ व विशेषतः ‘ माझी ताई ’ ही कविता यांतील प्रेमळपणा अंतःकरणाला अगदीं चटका लावणारा आहे. पण टिळकांना मुलांपेक्षां फुलांचेंच वेड अधिक होतें; व खुद्द त्यांनाहि या वेडाची जाणीव होती. दत्त, तांबे प्रभृति कवींनीं केलेलें बाललीलांचें किंवा बालभावांचें वर्णन टिळकांच्या वर्णनापेक्षां अधिक सरस आहे. तत्व-ज्ञानाच्या आसक्तीमुळें बालभावनांशीं समरस होणें त्यांना शक्य झालें नाहीं. आपल्या मनांत घोळत असलेल्या तत्वविचारांचा आरोप फुलांवर करणें त्यांना सोपें जात असे; व त्यांनीं आपलें बहुतेक तत्वज्ञान फुलांशीं गुज-गोष्टी करितां करितांनाच सांगितलें असून, त्याचें रहस्य ‘ वनवासी फूल ’ या सुंदर काव्यांत सांठवलेलें आहे. टिळकांची स्फुट कविता सोडली, तर त्यां-च्या इतर सर्व कवितेंत हेंच काव्य उत्तम ठरेल. त्यांतील मार्मिक पण प्रेमळ युक्तिवाद व मधुर कल्पना यांमुळें हें काव्य फार मनोहर वाटतें. या काव्यानें त्यांच्या यशांत भर घातली असली, तरी त्यांचा लौकिक त्यांच्या स्फुट कवितेंवरच विशेष अवलंबून आहे. इंग्रजी अमदानींत कवितेचे जे नवीन प्रकार महाराष्ट्रांत प्रचलित झाले, त्यांतच ‘वैणिक (Lyric) म्हणजे ‘भावगीत’ याची गणना होते. संतकवींचे भक्तिरसपूर्ण अभंग किंवा लावण्या सोडल्या, तर ज्यांना ‘ वीणागीत ’ म्हणतां येईल अशी भावनात्मक कविता मराठींत मुळींच नाहीं. इंग्रजी अमदानींतहि वीणेची तार छेड-ण्याचें धैर्य प्रथम केशवसुतांनी दाखविलें; व तें रसिकांना रुचलेलें पाहून इतर समकालीन कवींनीहि वीणागुण चाळण्याचा यत्न केला. पण केशवसुतांइतकी कुश-लता या बाबतींत फारच थोड्या कवींनीं प्रकट केली. टिळकांचीं वीणागीतें केशव-सुतांच्या गीतांइतकींच चांगलीं साधलीं आहेत असें म्हणावयाला कांहीं हरकत वाटत नाहीं. ‘ कवीची विनवणी ’ हें त्यांचें वीणागीत उत्तम आहे. केशवसुतां-प्रमाणें नवीन धर्तीची राष्ट्रीय कवनें लिहून ‘ तुतारी ’ वाङ्मयांत भर घालण्या-चाहि त्यांनीं प्रयत्न केला. ‘ बोंबाबोंब, ’ ‘ ब्राह्मण किंवा महार ’ वगैरे त्यांचीं एक दोन कवनें हृदयंगम आहेत. त्यांच्या काव्यवाहिनीचें अंतरंग प्रायः स्फटिका-प्रमाणें निर्मळ आहे. धर्मविशिष्ट संकुचित विचारांचें शेवाळ पसरल्यामुळें तिचा

प्रवाह क्वचित् कलुषित झाला आहे हें खरें. पण अशीं स्थळें थोडींच असल्यामुळें तिच्या रमणीयतेला विशेष बाध आलेला नाहीं.

मोगरे व केशवसुत हे टिळकांचे समकालीन कवि. टिळकांच्या कवितेचा जन्म जुन्यानव्याच्या विरोधविप्लवांत झाला. नवीन मतांच्या भोवऱ्यांत सांपडून त्यांनीं धर्म सोडला, पण त्यांच्या कवितेचें वळण एकंदरींत जुनेंच राहिलें. त्यांचे समकालीन मोगरे जुन्याचे अभिमानी; व केशवसुत नवीन परंपरेचे प्रवर्तक. टिळक जुन्या नव्याच्या सीमारेषेवर उभे आहेत. त्यांनीं जुन्याचा अधिक्षेप न करितां नवीनाचा आदर केला. मिल्टन, कौपर, वर्डस्वर्थ, टेनिसन प्रभृति इंग्रजी कवींपासूनच त्यांना विचारस्फूर्ति झाली; पण या विचार-स्फूर्तीचा ओघ केशवसुतांप्रमाणें स्वतः निर्मिलेल्या नवीन चालींच्या खडकाळ व खडबडीत पात्रांतून वहाता न करितां जुन्या वृत्तांच्या पाटांतूनच त्यांनीं जपून खेळविला आहे. मोगरे यांच्याप्रमाणें त्यांनीं खंडकाव्यें लिहिलीं व महाकाव्यरचने-चाहि प्रपंच करून पाहिला. ' वनवासी फूल ' व ' सुशीला ' हीं त्यांचीं खंडकाव्यें वाचतांना आपण इंग्रजी काव्यें वाचीत आहों, असा भास होतो; व त्या काव्यांचें स्वरूप लक्षांत घेतां तो भास वावगा आहे असें म्हणतां येणार नाहीं. केशवसुतांप्रमाणें त्यांनीं सुनीतें लिहिलीं, पण तीं शार्दूलविक्रीडिताचीं मोडतोड न करितां. यमकाचें बंधन त्यांनीं चुकूनहि झुगारलें नाहीं. नवीन वृत्तें किंवा काव्यप्रकार प्रचलित करण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. नवीन मतांचा पुरस्कार त्यांनीं केला, पण तो सुधारक म्हणून नव्हे. ते हिंदु रहाते, तर त्यांची गणना बहुधा संतकवींत झाली असती. आजच्या स्थितींतहि त्यांना भक्तकवि म्हणणें अनुचित होणार नाहीं. केशवसुतांच्या कवितेंत त्यांच्या काळांत उपस्थित झालेल्या अज्ञेयवादाचा ध्वनि उमटला आहे. पण टिळकांची भक्ति व भक्तिपर कविता महाराष्ट्रीय संप्रदायाला इतकी धरून आहे कीं, त्यांचे अभंग व पदें महाराष्ट्रांतील कोणत्याहि संत-कवींच्या गाथ्यांत सहज शोभून जातील. त्यांचें ' ख्रिस्तायन ' वाचतांना श्रीधराच्या ' रामविजया'ची आठवण हटकून होते. जुन्या वाङ्मयाशीं तादात्म्य पावून नवीन विचारांचें स्मरण देणारी कविता लिहिणारा असा दुसरा कवि महाराष्ट्रांत बहुधा सांपडणार नाहीं. अर्थातच जुन्या अभिरुचीच्या रसिकांना मोगरे यांच्या खालोखाल टिळकांची कविता मान्य आहे. केशवसुतांच्या कवि-तेंतील उच्छृंखलपणा, धडाडी किंवा तडफ ज्यांना दुःसह होते अगर तिचें असा-

मान्य अर्थगौरव उपभोगण्याची ऐपत ज्यांच्या ठिकाणीं नाहीं त्यांना टिळकांची प्रसन्न, प्रेमळ आणि प्रशांत कविता अधिक आवडावी यांत नवल काय? जुन्या अभिरुचीची बैठक न सोडतां आधुनिक कवितेचें सौष्ठव पहाण्याची ज्यांना इच्छा आहे, त्यांची हौस टिळकांची कविता चांगल्या रीतीनें भागवील. कवीची योग्यता ठरवितांना त्यानें केवढा काव्यसंभार निष्पन्न केला आहे हें पहाण्याचा रिवाज जुन्या मताच्या रसिकांत आहे. त्या दृष्टीनेंहि टिळकांच्या कविकीर्तीला बाध येण्याचें भय नाहीं. मोगरे आणि केशवसुत यांच्या कवितेहून त्यांच्या कवितेची बूज महाराष्ट्रांत अधिक झाली आहे; व त्यांच्या कवितेचें स्वरूप आणि तिनें केलेली कामगिरी लक्षांत घेतां तिला मिळणारा हा मान अगदीं योग्य आहे, असेंच कोणीहि म्हणेल.

—ज्ञानप्रकाश, १५ मे १९२३

# बापूजी मार्तंड आंबेकर

गेल्या मे महिन्यांतली गोष्ट. त्या दिवशीं संध्याकाळीं पाऊस सपाटून पडला होता. त्यामुळें, ती वेळ जरी सहसा घरीं कोणी न भेटण्याची होती, तरीहि आम्हीं लकडी पूल ओलांडल्यावर आंबेकरांच्या बंगल्याकडे जाणाऱ्या रस्त्याला वळलों. पण बंगल्यासमोर येतांच माडींत अंधार दृष्टीस पडला. त्याबरोबर श्री. यशवंतराव पेंढरकर उद्गारले, " बापुराव बहुतेक फिरायला गेलेले दिसतात. " आणि आम्ही खरोखरीच त्याच पावलीं मागें परतावयाचे. पण, तितक्यांत श्री. खांडेकर म्हणाले, " आतां आलोंच आहों, तर हांक मारून तरी पहा. " म्हणून मी पुढें होऊन चौकशी केली. तेव्हां बापुरावांचे बंधु श्री. आबासाहेब आंबेकर हे आमचें स्वागत करून म्हणाले, " या हो, बापुराव आहेत ना घरीं;—चला माडीवर. " त्यांच्या मागोमाग आम्हीं माडीवरील बापुरावांच्या बैठकीच्या खोलींत गेलों; व ते आमचा कुशलसमाचार घेतात न घेतात, तोंच बापुरावहि तिथें येऊन ठेपले. आम्हांला पाहिल्याबरोबर ते आपल्या चिरंजीवांकडे वळून उद्गारले, " अरे अण्णा, या मंडळींना चहा देशील कीं नाहीं ? " परंतु ती वेळ चहा घेण्याची नसल्यामुळें, आम्हीं साऱ्यांनींच नकार भरला. तेव्हां बापुराव हंसून म्हणाले, " चहा घेण्याची वेळ नसेल; पण कॉफीला तर कांहीं हरकत नाहीं ना ?—शिवाय आज गारठाहि आहे हवेंत थोडा. " आणि, गांधीजींच्या उपोषणाविषयींचें त्यांचें मार्मिक संभाषण आम्हीं ऐकत असतां, स्वादिष्ट कॉफीचे पेले आमच्यापुढें आले.

वस्तुतः ती वेळ चहा किंवा कॉफी कांहींच घेण्याची नव्हती. पण, श्री. आंबेकर यांचा स्वभाव इतका सत्कारशील आहे कीं, मनुष्य कोणत्याहि वेळीं त्यांच्याकडे आला व ते स्वतः कितीहि अडचणींत असले, तरी त्याचें यथोचित स्वागत झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं. ही आतिथ्यबुद्धि औपचारिक नव्हे, तर अगदीं जातिवंत. कदाचित् ज्या थोर परंपरेंत त्यांच्या आयुष्याचीं दोन तपें गेलीं, त्या परंपरेचाहि हा प्रभाव असेल. कै. ना. गोखले यांच्या संप्रदायांतली

सर्वच माणसें थोडीबहुत सुजन. जणूं कांहीं, त्या चंदनाच्या सान्निध्यांत वाढलेल्या साऱ्या वृक्षांनीं त्याच्या परोपकारवृत्तीचा परिमळ आत्मसात् केला. श्री. वामनराव पटवर्धन यांच्यासारखा त्यांचा अगदीं तापटपणाबद्दल गाजलेला शिष्य जरी घेतला, तरी त्यांच्याहि स्वभावांत, गडगडणारा काळाभोर ढग जीवनानें ओथंबलेला असावा त्याप्रमाणें, औदार्याचा ओलावा प्रसंगीं भरपूर आढळून येतो. श्री. आंबेकर यांचें सौहार्द मनाला उत्कटतेनें जाणवतें, तें त्यांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें. गोखले यांचा अनुयायी म्हणजे दारिद्र्याचा वसा घेतलेला मनुष्य. शिवाय आंबेकरांचा प्रपंच मोठा; व त्याच्या भरीला पुन्हा सामाजिक प्रतिष्ठेबरोबर येणाऱ्या नानाविध जबाबदाऱ्या. पण, फळभारानें अगदीं वांकलेल्या अशाहि वृक्षानें आपला आसरा घेणाऱ्या पक्ष्यांचा उपद्रव आनंदानें सोसावा, तशी त्यांची वृत्ति आहे. त्यामुळें त्यांच्याभोंवतीं मित्रमंडळींचें कडें नेहमीं पडलेलें असतें. आणि त्यांच्या घरीं मिळणारा चहा व झडणाऱ्या गप्पा यांत अधिक लज्जतदार काय असतें, हें सांगणें खरोखरीच कठीण जाईल. फार कशाला, त्या दिवशीं त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडल्यावर श्री. विठ्ठलराव कुलकर्णी उद्गारले "आंबेकर फार मार्मिक बोलतात, नाहीं ?"

हा मार्मिकपणा त्यांच्या अंगीं यावयाला त्यांची परिस्थितीच बव्हंशीं कारण झाली आहे. विद्यार्जनासाठीं त्यांनी जितके खडतर कष्ट सोसले, तितके फारच थोड्यांनीं सोसले असतील. त्यांचा जन्म १८७५ सालच्या जूनमध्यें पुणें येथें झाला. वांई हें त्यांचें मूळ रहाण्याचें ठिकाण; व तिथेंच त्यांचें बाळपण गेलें. इंग्रजी पांचवीपर्यंतचा अभ्यास वांईस झाल्यावर, पुढें वडिलांकडून मदत मिळण्याची आशा तुटल्यामुळें, त्यांनीं पुण्याचा रस्ता धरला; व स्वतःच्या परिश्रमांनीं नंतर सर्व विद्या केली. या बाबतींतील त्यांच्या चिकाटीची एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याच्या पूर्वीं ते कांहीं दिवस वांईस आले होते. परीक्षेसाठीं परत पुण्यास येतांना वाहनाची नीट सोय झाली नाहीं; व वांईपासून वीस मैलांवर असलेल्या वाठार स्टेशनवर येण्यासाठीं त्यांना अखेर बैलगाडीनें निघावें लागलें! गाडी वेळेला स्टेशनवर पोंचणें अशक्य होतें. पण आंबेकरांनीं निश्चयानें गाडींत पाय टेवला. ते आगगाडीच्या ठरलेल्या वेळेपेक्षां तीन तास उशीरानें स्टेशनवर येऊन पोंचले. पण आगगाडी त्या दिवशीं बैलगाडीपेक्षांहि अर्धा तास उशिरानें आली; व अशा रीतीनें त्यांची प्रवेशपरीक्षा बुडविण्याचा दैवाचा

डाव सदर्न मराठा रेल्वेच्या कृपेमुळें हुकला ! नंतर पुढील शिक्षणासाठीं ते वडोद्यास गेले. तिथें शिकवण्या धरून त्यांनीं कॉलेजच्या अभ्यासाला सुरवात केली. अशा रीतीनें दारिद्र्याशीं झगडत आयुष्य कंठीत असतांनाहि त्यांच्या रसिकतेंत किंवा आनंदी स्वभावांत अंतर पडलें नाहीं; व कॉलेजांत असतांना 'वेणीसंहार' नाटकांत दुर्योधनाचें काम करून, आपल्या गाननैपुण्याबद्दल त्यांनीं कै. भास्करबुवा बखले यांचे गुरु फैजमहंमदखां यांच्यासारख्या वस्तादा-कडूनहि वाहवा मिळविली. पण, त्यांच्या प्रकृतीनें परीक्षेच्या ऐन वेळाच दगा दिल्यामुळें, त्यांच्या शिक्षणाची मजल मात्र इंटरच्या पलीकडे जाऊं शकली नाहीं.

परंतु, कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा करण्याची त्यांची इच्छा जरी सफळ झाली नाहीं, तरी ज्या वृत्तपत्रांच्या व्यवसायांत त्यांचें पुढें सर्व आयुष्य गेलें, त्यांत त्यांचा प्रवेश मात्र वडोद्यास असतांनाच झाला. तेथील 'सयाजीविजय' पत्राच्या संपादकवर्गांत ते कांहीं दिवस होते. परंतु वडोद्याची हवा त्यांच्या प्रकृ-तीला न मानवल्यामुळें लवकरच ते वांईस परत आले; व तेथील इंग्रजी शाळेंत त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरली. त्यांच्या समयसूचकतेमुळें एकदां या शाळेवर आलेला एक मानहानीचा प्रसंग टळला. खेडवळ शहरांतून स्वतःची कर्तबगारी दाखवावयाला फारसा वाव मिळत नसल्यामुळें तेथील लोकांचें आयुष्य एकमेकां-विरुद्ध उचापती करण्यांतच बहुधा जातें. त्यांतून वांई हें तर तीर्थक्षेत्र ! त्यामुळें वर्षाकाठीं चतुर्मास थोडाबहुत उद्योग करून बाकीचे महिने गांवकीत घालविणारे गुंडच तिथें पुष्कळ. अशा कांहीं उपद्व्यापी इसमांनीं, शाळेचे चालक पैसे खातात, अशा आरोपाचा एक अर्ज डायरेक्टराकडे पाठवून दिला. पुढें, डायरेक्टरमहाशय शाळेच्या तपासणीसाठीं आले असतांना, त्यांनीं सर्व शिक्षकांच्या तोंडावर त्या आरोपाचा उच्चार करून, त्यांची बरीच शोभा केली. बिचारे शिक्षक तो आरोप ऐकून अगदीं थिजून गेले. तेव्हां, आंबेकरांनीं मोठ्या हिंमतीनें पुढें होऊन त्यांना असें मार्मिक उत्तर दिलें कीं, "शिक्षकाचा धंदा करणारे लोक हे दरोडेखोर असतात, अशा समजुतीनें आपण आज शाळेची एकंदर तपासणी करण्याचा विचार केलेला दिसतो. तो आपला विचार योग्य कीं अयोग्य, हें सांगण्याचा माझा अधिकार नाहीं. पण, शिक्षकांचे फौजदारी गुन्हे डायरेक्टरनें निवडावयाचे नसतात,

फौजदारी कायद्यांत त्याची वेगळी व्यवस्था केलेली आहे, असें मला वाटतें." हें त्यांचें उत्तर ऐकल्यावर डायरेक्टरसाहेबांनीं, आपली चूक कबूल करून, शिक्षकवर्गाची दिलदारपणानें माफीहि मागितली. वाईस असतांना, शाळेंतील आपलें काम संभाळून श्री. आंबेकर हे उरलेल्या वेळांत तेथील 'वृत्तसार,' 'मकरंदमाला' वगैरे नियतकालिकांतून लिहित असत. 'मकरंदमाले' तून त्यांचीं बरींच पुस्तकें प्रकाशित झालेलीं असून, 'भारतवर्षीय नररत्नमाला' या त्या मालेंतल्या ग्रंथांतील बहुतेक चरित्रें श्री. आंबेकर यांनींच लिहिलेलीं आहेत; व तीं त्यांच्या नांवावर प्रसिद्ध झालेलीं नसलीं, तरी त्या ग्रंथाची मराठींतील चांगल्या चरित्रात्मक पुस्तकांत जी गणना केली जाते, ती मुख्यतः त्यांच्या लेखनकुशलतेमुळेंच होय.

श्री. आंबेकर यांच्या संपादकीय आयुष्याला खरा प्रारंभ, ते १९०७ सालीं पुणें येथें आल्यावरच, झाला. त्यांच्यासारख्या बुद्धिमान् आणि बहुश्रुत तरुणाला क्षेत्रवास रुचणें फारसें शक्य नव्हतें. ज्या ठिकाणीं मोक्षमार्गावरला अखेरचा मुक्काम म्हणून म्हातारपणीं सर्व शक्तींचा लोप झाल्यावर मुद्दाम वास करायाला जावयाचें, तिथें तारुण्यांत आयुष्य कंठण्याचा प्रसंग येणें म्हणजे उसळत्या महत्त्वाकांक्षी जीवनाचा तो केवळ कोंडमाराच! तेव्हां, आंबेकरांनीं आपल्या अभिरुचीला अनुकूल असें क्षेत्र हुडकून काढण्यासाठीं पुण्याची वाट धरली, यांत काय आश्चर्य? आणि दैवयोग असा कीं, पुण्यास आल्यावर त्यांना तेथील 'ज्ञानप्रकाश' पत्राच्या कचेरींत अगदीं मनाजोगी नोकरी मिळाली. आतां 'सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटी'ची नागपूर येथील शाखा चालवीत असलेले श्री. नटेश आप्पाजी ऊर्फ बापूसाहेब द्रविड हे त्या वेळीं 'ज्ञानप्रकाश'चे संपादक होते. त्यांनीं पहिल्याच मुलाखतींत आंबेकरांना असा प्रश्न केला कीं, "काय हो, तुम्हांला काय काय येतें?" त्यावर हजरजबाबी आंबेकरांनीं त्यांना लगेच असें उत्तर दिलें कीं, "मला सारें कांहीं येतें!" आणि, हें आपलें उत्तर त्यांनीं लवकरच इतक्या धडाडीनें खरें करून दाखविलें कीं, "तुम्ही माझें केवळ नांवच नव्हे, तर जागाहि बळकावलीत!" (You have usurped my name and position too!) असे आदरसूचक उद्गार पुढें बापूसाहेबांनीं त्यांच्यासंबंधानें बोलतांना एकदां थट्टेनें काढले, म्हणतात. याचें कारण असें कीं, वर्तमानपत्र चालवावयाला अवश्य

असलेले बहुतेक सारे गुण त्यांच्या ठिकाणीं एकवटलेले आहेत. वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे बहुजनसमाजाची चावडी. साऱ्या सार्वजनिक चळवळींचा फड तिथें पडलेला असावयाचा व साऱ्या जिल्हाळ्याच्या प्रश्नांची चर्चा तिथें चाललेली असावयाची. "राजानें बुडविलें आणि पावसानें बुडविलें, तर त्या अन्यायांची दाद कोणाजवळ मागावयाची ?" अशा अर्थाची एक म्हण मराठींत आहे. ही म्हण जर आपल्या कर्तबगारीनें आधुनिक काळांत कोणी खोटी करून दाखविली असेल, तर ती वर्तमानपत्रांनींच होय. बहुजनसमाजावरील कोणतीहि आपत्ति, मग ती अस्मानी असो वा सुल्तानी असो, निवारण करण्याचें सामर्थ्य फक्त वर्तमानपत्रांतच असतें. जगांतील कोणतेंहि न्यायपीठ ज्याची दाद घेत नाहीं, त्या अन्यायाचा निवाडा वर्तमानपत्रें देतात; व जगांतील कोणताहि पालनवाला ज्याचा परिहार करीत नाहीं, त्या दुःखाचें निरसन वर्तमानपत्रें करितात. अर्थात् अशा या चावडीवर जो मनुष्य पाटिलकी करावयाला बसावयाचा, त्याची दृष्टि चौफेर आणि बुद्धि चतुरस्र व वृत्ति खेळाडू आणि लेखणी खोंचदार असली, तरच त्याच्या हातून बहुजनसमाजाचें हितरक्षण होऊं शकेल.

श्री. आंबेकर यांच्या ठिकाणीं हे सारे गुण असल्यामुळेंच, 'ज्ञानप्रकाशा'-वर त्यांचे नांव कधीं न पडतांहि त्याच्या संपादनाचीं सूत्रें मुख्यतः त्यांच्या मुठींत राहिलेलीं आहेत. किंबहुना, गेल्या दहा वर्षांत 'ज्ञानप्रकाशा'ला जी इतकी लोकप्रियता, नेमस्त मतांच्या पुरस्काराचें कुलव्रत न सोडतांनासुद्धां, लाभली आहे, तिचें श्रेय जितकें श्री. कृ. ग. लिमये यांच्या संग्राहक धोरणाला तितकेंच आंबेकरांच्या कुशाग्र लेखणीलाहि दिलें पाहिजे. त्यांच्या लिहिण्याबोलण्यांत बहुश्रुतपणाची ऐट आणि मार्मिकपणाची खोंच इतकी भरलेली असते कीं, तात्यासाहेब कोल्हटकरांसारखा स्वतः आपल्या चतुरालापांनीं लोकांना झुलविणारा कोटिबाज संभाषकहि त्यांच्या भाषणानें मोहून जातो. वासुकाका जोशी, गोविंदराव कानिटकर, हरिभाऊ आपटे, लक्ष्मणशास्त्री लेले, रा. ब. अंजनगांवकर, प्रो. पानसे, प्रि. कानिटकर, बॅ. गाडगीळ, प्रो. जोग प्रभृति पुण्यांतील निरनिराळ्या मतांचीं आणि मनोवृत्तींचीं मातब्बर माणसें जीं त्यांच्या बैठकींत नेहमीं दृष्टीस पडतात, तीं याच कारणामुळें. हरिभाऊ आपटे यांच्याशीं तर त्यांचा

बंधुतुल्य स्नेह होता. त्यांच्या भेटीशिवाय हरिभाऊंचा एकहि दिवस सुना जात नसे; व सारें पुणें शहर ज्याच्या आप्तेष्टमित्रांत मोडूं शकलें असतें, अशा त्या लोकप्रिय कादंबरीकाराला आधार असा फक्त आंबेकरांच्या उत्कट स्नेह-भावाचा वाटे. एकदां हरिभाऊ कांहीं कामासाठीं दोन तीन दिवस मुंबईला गेले होते. परत आल्यावर त्यांनीं आपल्या पत्नीजवळ, “ बापूराव आले होते का ? ” अशी चौकशी साहजिकच केली. त्यांनीं ‘नाहीं’ असें उत्तर दिलें. पुढें, आंबेकरांची गांठ पडल्यावर, हरिभाऊंनीं त्यांना थट्टेनें विचारलें, “ कां हो, आमच्या मागें आमच्या कुटुंबाची अशीच विचारपूस करणार का ? ” त्यावर आंबेकर उद्गारले, “छे, छे, त्याची तुम्हांला मुळींच काळजी नको !” उभयतां मित्रांतलें हें थट्टेचें बोलणें हरिभाऊंच्या मृत्यूनंतर अक्षरशः खरें ठरण्याचा योग आला. हरिभाऊंचा संसार म्हणजे जमाखर्चाचा लपंडाव. आज त्यांच्या पश्चात् जें स्वास्थ्य ‘रमावहिनीं’-ना लाभलें आहे, तें सर्वस्वी आंबेकरांच्याच मित्रनिष्ठेचें फळ होय. त्यांचा आणि हरिभाऊंचा स्नेह हा त्यांच्या जीवितांतील अत्यंत उदात्त भाग म्हणता येईल. त्यांनीं लिहिलेलें हरिभाऊंचें छोटेखानी पण सर्वांगपूर्ण चरित्र हें त्यांच्या या मैत्रीचें खरोखरी एक सुंदर स्मारकच आहे. त्यांच्या हातून ग्रंथरचना अशी बहुतेक कांहीं झालीच नाहीं म्हटलें तरी चालेल. आणि त्यांत फारसें नवलहि नाहीं. दैनिक वर्तमानपत्राचें संपादन म्हणजे बिंबग्राही मानवी बुद्धि आणि विद्युद्वेगानें धांवणारा काळ यांच्यांतील चुरस. असल्या धवडग्यांत आयुष्य घालविणाऱ्या लेखकाला फुरसतीनें ग्रंथरचना करण्याइतका वेळ कोठून मिळणार ? तथापि, त्यांनीं ‘ ज्ञानप्रकाशां ’त लिहिलेले विविध विषयांवरील अग्र-लेख आणि पुस्तकांचीं परीक्षणें यांचा संग्रह छापण्यासारखा असून, आर्यभूषण छापखान्यानें असा निवडक लेखांचा ग्रंथ काढला, तर मराठी निबंधवाङ्मयांत उत्तम भर पडेल. विशेषतः एका गोष्टीचा खेद मनाला फार होतो. ती ही कीं, कै. ना. गोखले यांच्या जीवनाचा उत्तरार्ध समक्ष पाहिलेल्या व त्यांच्या सान्निध्यांत दिवस घालविलेल्या आंबेकरांसारख्या माहितगार व मार्मिक लेखकाकडून गोखले यांचें चरित्र लिहून घेण्याची बुद्धि ‘ सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ’ ला होऊं नये, हें दुर्दैव होय.

श्री. आंबेकर हे सहृदय आणि उदारमतवादी असले, तरी त्यांच्या वाणींत विषार कमी आहे, असें मात्र नाहीं. त्यांचें बोलणें लिहिणें हें जसें मित्रमंडळीला

रिझविणारें तसेंच प्रतिपक्षाला खिजविणारें असतें. किंबहुना, आपल्या लेखणीच्या कुशाग्रतेनें प्रतिपक्षाचा मर्मभेद करणारा इतका कुशल कलमबहादूर 'ज्ञानप्रकाश' च्या संपादक मंडळांत दुसरा कोणी झालाच नाहीं. ते 'ज्ञानप्रकाशा' च्या संपादकीय आसनावर येऊन बसले, ते सुरतेच्या वेबनावाच्या मुहूर्तावर; व पक्षद्वेषाच्या त्या धुमाळींत गोखले पक्षाची खिंडी त्यांनीं मोठ्या शिताफीनें सांभाळली, असें म्हणतात. जहाल--मवाळांचा लढा त्या वेळीं अगदीं हातघाईला आलेला होता. राष्ट्रीय पक्षाच्या आघाडीला परांजपे, खाडिलकर, भोपटकर, केळकर, दामले यांच्यासारखे धुरंधर लेखक तर होतेच; पण शत्रूंच्या रक्तानें एकवीस वेळां डोह भरणाऱ्या 'परशुरामाचा केवळ नवावतार' असे लोकमान्य टिळक हेहि स्वतः अग्रभागीं तळपत होते. उलट नेमस्त पक्षांत जरी हरिभाऊ आपटे, वासुदेवराव पटवर्धन, हरिभाऊ लिमये, वामनराव काळे प्रभृति विद्वान् मंडळी होती, तरी वर्तमानपत्राच्या धंद्यांत मुरलेला असा त्यांपैकीं कोणीच नसल्यामुळें, त्या पक्षाची खिंडी ही राष्ट्रीय पक्षाच्या मानानें सुनीच म्हणावी लागेल. एक तर, स्वतः गोखले हे नेहमीं कौन्सिलें, कमिट्या, कमिशनें यांच्या व्यापांत गुरफटलेले असावयाचे; व दुसरें असें कीं, त्यांच्या भोंवतालच्या प्रमुख मंडळींत असा मराठी लेखक एकहि नव्हता कीं, जो, टिळक तर राहोतच, पण परांजपे किंवा खाडिलकर यांच्यासारख्या झुंजारांशीं सामना देऊ शकेल. आणि नेमस्तांची तर लोकांतून अगदीं पुरी पत उखडलेली. अशा आणीबाणीच्या वेळीं श्री. आंबेकर यांनीं द्रविडांच्या नेतृत्वाखालीं 'केसरी' शीं हिंमतीनें सामना देऊन, गोखले पक्षाचा बोज बराच राखला, असें सांगतात. त्या वेळच्या त्यांच्या या वावदूक लिखाणाचा नमुना आज जरी लोकांपुढें नसला, तरी, केळकरांनीं लिहिलेलें लोकमान्यांचें चरित्र प्रसिद्ध झाल्यावर, आंबेकरांनीं त्याच्यावर 'ज्ञानप्रकाशां' तून केलेली विस्तृत टीका 'टिळकजीवनरहस्य' या नांवानें प्रसिद्ध झालेली असून, तें छोटें पुस्तक विषारी टीकेचा उत्कृष्ट मासला म्हणून मराठी वाङ्मयांत सदैव वाखाणलें जाईल. त्या टीकेंतील चरित्रनायक आणि चरित्रकार यांची कुत्सा कोणाला आवडेल न आवडेल. किंबहुना, असल्या शिळ्या होत चाललेल्या व्यक्तिगत वादांना ऊत आणूं नये, या भावनेनें त्या टीकेला नाकें मुरडणारे कांहीं सत्प्रवृत्त गृहस्थ खुद्द सोसायटींतच त्या वेळीं होते; व त्यांनीं त्या टीकेविषयींची आपली नापसंती अर्ध्या उण्या शब्दांनीं खाजगी संभाषणांतून व्यक्तहि केली. पण ही गोष्ट कोणालाहि कबूल

करावी लागेल कीं, त्या टीकेच्या सूक्तासूक्ततेचा मुद्दा बाजूला ठेवून, जूनियसच्या विख्यात पत्रांप्रमाणें, नुसता विषारी वाङ्मयाचा एक मासला म्हणून जर तिच्याकडे पाहिलें, तर तिची गणना उत्तमांतच केली पाहिजे. किंबहुना, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्यासारखे नेमस्त पक्षाचे अभिमानी ग्रंथकार जे त्या टीकेचें इतकें कौतुक करितात, त्याचें मर्म झालें तरी तें हेंच होय. हा त्यांच्या वाणींतील प्रखर विषार प्रो. गोगटे यांच्या 'ज्ञानसिंधु आणि इतर लघुकथा' या पुस्तकावरील वाङ्मयचौर्याच्या आरोपाच्या व गोडबोले यांच्या 'महाराष्ट्र–शाकुंतल' या भाषांतराच्या सदोषतेच्या, निव्वळ वाङमयविषयक वादांतहि तडफेनें व्यक्त झाला. विशेषत: 'ज्ञानसिंधू'तील वाङ्मयचौर्य उघडकीस आणून त्यांनीं साहित्यक्षेत्रांतील चांचेगिरीचा चांगलाच दंभस्फोट केला, यांत शंका नाहीं.

परंतु, त्यांच्या वाणींत विषार जरी भरपूर असला, तरी त्याची योजना बहुधा पात्रापात्र पाहूनच होत असल्यामुळें, समाजाला काय किंवा साहित्याला काय, त्याची बाधा सहसा होत नाहीं. टिळकांच्या चरित्रावर ते जे इतके उफाळून तुटून पडले, त्याचें कारण केवळ त्यांची गोखले यांच्यावरील अनन्य भक्ति; व, 'ज्ञानसिंधू'च्या काय किंवा 'शाकुंतला' च्या काय, वादांत त्यांना इतकें हिरीरीला यावयालाहि त्या बिचाऱ्या पुस्तकांच्या गुणावगुणांपेक्षांहि, त्यांच्या जन्मदात्यांच्या अहंकाराची चीड आणणारे हुंकारच कारण झाले. त्यांना दांभिकपणाचा मनस्वी तिटकारा आहे. किंबहुना वर्तमानपत्रांच्या धंद्यांत पडलेल्या बहुधा प्रत्येक माणसालाच दांभिकपणाचा तिटकारा असतो. कारण, सार्वजनिक चळवळींच्या चावडीवर बसलेल्या या टेहळ्याला रोज इतकें दांभिकपणाचे प्रकार पहावयाला मिळतात कीं, त्याच्या समोर जर कोणी स्वत:च्या देशाभिमानाचें, बुद्धिस्वातंत्र्याचें आणि निरपेक्षतेचें डंफण मिरवूं लागला, तर त्याचें रक्त उसळल्याशिवाय रहात नाहीं. शिवाय, व्यक्ति संस्था आणि समाज यांच्या चारित्र्याची हरघडी छाननी करावी लागत असल्यामुळें, त्याची बुद्धि इतकी चोखंदळ आणि चिकित्सक बनलेली असते कीं, बेगड कोणती आणि बावनकशी सोनें कोणतें, हें ओळखावयाला त्याला वेळ लागत नाहीं; त्यामुळें आपल्यापुढें मिरविणाऱ्या माणसांच्या उक्ति–कृतींतील हेत्वाभास आणि विसंगति तीव्रतेनें डोळ्यांत भरून, त्यांच्याविषयीं मनांत सहजच तिरस्कार उत्पन्न होतो. श्री. आंबेकर यांच्या लिहिण्यांत जो एक प्रकारचा तापटपणा, किंबहुना क्वचित् कुत्सि-

तपणाहि दिसून येतो, तो मुख्यतः याच कारणांमुळें, फार कशाला ? त्या दिवशीं आम्हीं त्यांना भेटावयाला गेलों असतां गांधीजींच्या उपोषणाच्या अवडंबराविषयीं ते जें बोलत होते, तें जरी ऐकतांना फारसें वरें वाटलें नाहीं, तरी त्या अवडंवरांतील तर्कच्युति त्यांनीं किती मार्मिकपणानें विशद केल्या ! मुंबईचा 'ॲडव्होकेट' तरी त्यापेक्षां त्या उपोषणाची अधिक विचिकित्सा काय करूं शकला असता ? मला केव्हां केव्हां नवल वाटतें तें या गोष्टीचें कीं, हर एक प्रश्नाचें कसोशीनें पृथक्करण करणाऱ्या त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीला नेमस्तपक्षाच्या तत्त्वततींतील तर्कच्युति तेवढ्या कशा दिसत नाहींत ? पण मग 'तत्तस्य किमपि द्रव्यम्' या सुभाषिताची महती ती काय उरली ?

खाजगी स्नेहसंबंधांत त्यांच्याइतका प्रेमळ, कष्टाळू आणि निःस्वार्थी मनुष्य सांपडणें कठीण. ते स्वतः दुःखानें कितीहि गांजलेले असले, तरी दुसऱ्याचा दुःखभार हलका करावयाला नेहमीं तत्पर असतात; व त्यांचे मतभेद एरवीं कितीहि तीव्र असले, तरी त्या भेदांचीं कुसें खाजगी स्नेहसंबंधांना सहसा बोंचत नाहींत. माझा त्यांच्याशीं मतैक्यापेक्षां एकंदरींत मतभेदच पुष्कळ. एक तर ते बहुश्रुत असले तरी ॲडिसन, स्टील, गोल्डस्मिथ गार्डिनर प्रभृति लेखकांच्या वाङ्मयाचे भोक्ते; अलीकडील नवीन वाङ्मयप्रकारांविषयीं त्यांना अगदींच अरुचि नसली, तरी अभिरुचीहि बेतावाताचीच. दुसरें असें कीं, गोखले यांच्याविषयीं व्यक्तिगत आदर जरी मला नितांत असला, तरी विद्यमान इतर राजकीय पक्षांप्रमाणें, त्यांच्याहि पक्षाविषयीं मला आपलेपणा असा कधीं वाटला नाहीं. माझ्या त्यांच्यामधील या मतवैषम्याची जाणीव त्यांना निस्संशय होती. पण, मी पुण्यास सोसायटीमध्यें असतांना, मला तोडून दिलेल्या खात्यांत, त्यांच्या वडिलकीचा सासुरवास असा मात्र मला कधींच झाला नाहीं. 'ज्ञानप्रकाशा'ची 'काव्यशास्त्रविनोद' ही पुरवणी काढण्याची कल्पना मूळची त्यांचीच. परंतु तिच्या संपादनाचे सर्वाधिकार श्री. लिमये यांनीं मला दिल्यामुळें, मुख्यतः मी आणि माझे पुण्यांतील स्नेही यांच्या विचारांचें आणि वाङ्मयाचें तें एक वाहन होऊन बसलें. आमचें 'रविकिरणमंडळ' त्या वेळीं नुकतेंच स्थापन झालें होतें. त्याच्या विचारांचा पुरस्कार आणि वाङ्मयाचें प्रकाशन दर शनिवारीं प्रसिद्ध होणाऱ्या या पुरवणींतून मी मनसोक्त करून घेतलें. श्री. आंबेकर यांना आमचीं मतें किंवा लिहिण्याची पद्धत फारशी पसंत नव्हती; व आपला हा मतभेद क्वचित् स्पष्ट शब्दांनीं ते

बोलूनहि दाखवित असत. पण त्याच्या पलिकडे मात्र ते कधींहि गेले नाहींत. किंबहुना, लॉर्ड मोर्ले यांच्यावरला माझा ' काव्यशास्त्रविनोदां ' तील मृत्युलेख श्री. लिमये यांना थोडा कडक वाटला असतां, श्री. आंबेकर यांनीं त्या लेखाबद्दल त्यांच्याजवळ रदबदली केल्याचें मला स्मरतें. त्यामुळें, ' ज्ञानप्रकाशां ' तून आमच्या विचारसरणीचा प्रसार प्रतिकूल टीकेच्या माऱ्यांतूनहि आम्हांला निर्वेध कारतां येऊन, ' रविकिरणमंडळा 'ची प्रभा लवकरच सर्व महाराष्ट्रभर पसरली. पुण्यास असतांना निरनिराळ्या आपत्प्रसंगीं व्यक्तिशः मला जें सहाय्य त्यांनीं केलें, तें तर त्यांच्या मतभेदातीत उदार बुद्धीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगतां येईल. आपल्या मार्मिक लेखनानें आणि उदार चारित्र्यानें महाराष्ट्रांतील वृत्त-पत्रांच्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या अशा या थोर आणि कर्तबगार संपादकाचें उतार वय आपल्या कथनकुशल चिरंजीवांच्या ललित कृतींचें कौतुक करण्यांत सुखानें जावें, यापेक्षां माझ्यासारख्या त्यांच्या एका नम्र चहात्याची दुसरी काय इच्छा असणार ?

—प्रतिभा, ९ आक्टोबर १९३३

# कै. अच्युतराव कोल्हटकर

——:०:——

कै. अच्युत बळवंत कोल्हटकर यांची दुसरी पुण्यतिथि गेल्या गुरुवारीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं साजरी करण्यांत आली; व त्यांचें वाङ्मय–स्मारक म्हणून त्यांच्या कांहीं लेखांचा एक संग्रहहि श्री. अनंत हरी गद्रे यांनीं या प्रसंगीं प्रसिद्ध केला आहे. या छोटेखानी ग्रंथावरून अच्युतरावांच्या विविध वाङ्मयगुणांची कल्पना करणें, म्हणजे दर्शनी कांचगृहांत मांडलेल्या सुंदर नमुन्यांवरून एखाद्या भव्य वस्तुभांडाराच्या समृद्धीची कल्पना करण्यासारखेंच आहे. तथापि, त्यांच्या त्रुटित वाङ्मयावर विस्मरणाचा धुरळा बसून तें कीर्तिशेष होण्यापूर्वी, श्री. अनंतराव गद्रे यांनीं वृत्तपत्रांच्या जीर्ण संभारांतून त्याचा उद्धार, अंशतः कां होईना, केला, याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. कै. अच्युतराव यांच्या वाङ्मया-इतकेंच त्यांचें चरित्रहि वैचित्र्यपूर्ण असें होऊन गेलें; व त्यांच्या लेखनांत जसा प्रतिभेचा नाचरेपणा आढळून येतो, तसाच त्यांच्या जीवनांत नियतीचा लहरी-पणा दृष्टीस पडतो. किंबहुना, नियति आणि तिच्या नियमनापासून अलिप्त मान-लेली प्रतिभा यांनीं जणुं संगनमतानें त्यांचें जीवित ही आपली नृत्यभूमि केली होती. त्यांचा जन्म कोल्हटकरांच्या विख्यात घराण्यांत झाला होता. या घराण्याचा गुणच असा दिसतो कीं, त्यांत उत्पन्न झालेल्या पुरुषानें जीवनाच्या ज्या ज्या प्रदेशांत म्हणून पाऊल ठेवावें, त्यांतील उत्कर्षाची अगदीं परिसीमा गांठावी. सरकारी नोकरींत, नाटकाच्या धंद्यांत, सामाजिक चळवळींत, साहित्याच्या क्षेत्रांत किंवा दैनिकाच्या भाऊगर्दींत--ज्या ज्या व्यवसायांत म्हणून या कुळांतील पुरुषांनीं मन घातलें, त्या त्या व्यवसायांतील यशाचें त्यांनीं शिखर गांठलेलेंच आढळून येईल. त्यांतून अच्युतरावांच्या ठिकाणीं तर त्या घराण्यांतील सारेच गुणांश एकवटलेले दिसतात. त्यामुळें महाराष्ट्रांतील अनेक विसदृश चळवळींशीं आणि व्यवसायांशीं त्यांचें नांव निगडित झालेलें आहे.

पण, महाराष्ट्राच्या इतिहासांत जर अच्युतरावांना चिरंतन स्थान कोणत्या नात्यानें मिळालें असेल, तर तें संपादक म्हणूनच होय. वृत्तपत्रांचा धंदा हा महा-

राष्ट्रांत सुरू झाल्याला आतां शंभर वर्षें होत आलीं. पण, अजूनहि तो धंदा ऊर्जित दशेला आलेला आहे, असें म्हणतां येणार नाहीं. लोकप्रियतेच्या किंवा लेखनकौशल्याच्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील धुरंधर वर्तमानपत्र म्हणजे 'केसरी.' परंतु, 'केसरी' हा कितीहि लोकप्रिय असला, तरी कलकत्त्याची 'अमृत-बझारपत्रिका' किंवा मद्रासचा 'हिंदु' यांच्यापुढें त्याची लोकप्रियता काय वानावी? अर्थात् परिस्थितीच या वैगुण्याला पुष्कळशी कारण आहे, हें विसरून चालणार नाहीं. आधीं उण्यापुऱ्या दोन कोटींचें राष्ट्र; त्याचीहि पुन्हा तीन शकलें झालेलीं; व त्यांतच आणखी दुष्काळ पांचवीला पुजलेला. अशा स्थितींत केवळ लोकाश्रयावर चालणारा वर्तमानपत्राचा धंदा यशस्वी व्हावा कसा? वर्तमानपत्राची खेती ही अशी आहे कीं, ती लोकाश्रयाच्या पर्जन्यापेक्षां जाहिरातींच्या खतामुळेंच जास्त फोफावते. पण महाराष्ट्राची तीहि बाजू पडती. महाराष्ट्रांतील व्यापार हा बव्हंशीं परप्रांतीयांच्या हातीं असल्यामुळें, 'ज्ञानप्रकाशा' सारख्या मराठी दैनिकाऐवजीं 'सांजवर्तमाना' सारख्या गुजराती दैनिकाचींच पानें जाहिरातींनीं भरगच्च भरलेलीं दिसावयाचीं! त्यामुळें महाराष्ट्रांत वृत्तपत्रांचा व्यवसाय हा अजूनहि बुडीतच चाललेला आहे. त्यांतून दैनिकांची दुर्दशा तर पुसूंच नये. कै. ना. गोखले यांच्यासारख्या थोर भारतसेवकाची पुण्याई पाठीशीं उभी असतांनासुद्धां अर्धशतकापेक्षां अधिक आयुष्य गांठीं असलेल्या व पुण्यासारख्या मराठी भाषेच्या माहेरघरीं निघणाऱ्या 'ज्ञानप्रकाशा' ला अद्याप जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें जड जातें, म्हणतात! अशा सर्वथैव बिकट परिस्थितींत मुंबई शहराला नवख्या असलेल्या अच्युतरावांनीं 'संदेश' पत्रासारखें मराठी दैनिक काढून तें त्या बकाल शहरांत लोकप्रिय करून दाखविलें, याबद्दल त्यांना कोण धन्यवाद देणार नाहीं?

विसेषतः, ज्या काळांत अच्युतरावांनीं 'संदेश' पत्र सुरू केलें, त्या काळाची प्रतिकूलता लक्षांत घेतली, म्हणजे त्यांच्या त्या धाडसाबद्दल आचंबा वाटल्याशिवाय रहात नाहीं. लो. टिळक हे जरी त्या वेळीं मंडालेहून बंधमुक्त होऊन परत आलेले होते, तरी त्यांच्या व राष्ट्रीय पक्षाच्याहि मागें सहा सालापासून लागलेलें सरकारच्या अवकृपेचें सुदर्शन अद्याप सुटलेलें नव्हतें. शिवाय मुंबई शहर म्हणजे नेमस्तांचा अगदीं बालेकिल्ला; व तिथें मराठी भाषा ही नांदती असूनहि इंग्रजी—गुजरातीच्या सासुरवासानें गुदमरून गेलेली. अशा प्रतिकूल

स्थितींत, त्या पक्षाच्या एका तरुण कार्यकर्त्यानें मुंबईला येऊन, मराठी दैनिक काढावें व राष्ट्रीय पक्षाच्या लढाऊ राजकारणाचा धडाडीनें पुरस्कार करावा, हा चमत्कारच नव्हे काय ? पण, अच्युतरावांनीं हा चमत्कार केला व तो यशस्वीहि करून दाखविला. त्यांच्या या यशाचें मुख्य कारण म्हणजे त्यांची अद्वितीय लेखनशैली. त्यांना देशसेवेची स्फूर्ति ही जरी 'केसरी'कार टिळकांपासून मिळालेली असली, तरी लेखनाची स्फूर्ति ही त्यांनीं 'काळ'कर्ते परांजपे यांच्यापासून घेतलेली दिसते; व त्यांच्या वाङ्मयावर 'केसरी'च्या तेजस्वी विचारगांभीर्यापेक्षां 'काळा'च्या कल्पकतापूर्ण भावनोत्कटतेचीच छाप जास्त पडलेली आहे. आणि त्यांत फारसें नवल नाहीं. आपला उच्च अभ्यासक्रम संपवून अच्युतराव ज्या वेळीं कॉलेजांतून बाहेर पडले, त्या वेळीं 'केसरी' च्या लोकप्रियतेवर 'काळा' नें मात केलेली होती; व 'काळां' तील निरुपम ध्वनिकाव्याचे स्फूर्तिदायक प्रतिध्वनि, प्रतिपक्षाच्या हृदयाचा थरकांप करणाऱ्या 'केसरी' च्या गर्जनेपेक्षांहि, महाराष्ट्रांत अधिक जोरानें दुमदुमत होते. तेव्हां, 'संदेश'कारांनीं जर 'काळ'कर्त्यांचें अनुकरण केलें असलें, तर त्यांत काय आश्चर्य ? परंतु, अच्युतरावांनीं लेखनाची स्फूर्ति जरी शिवरामपंतांपासून घेतलेली असली, तरी, स्वभावभेदानुसार, त्यांची लेखनशैली मात्र परांजपे यांच्या लेखनशैलीपेक्षां पुष्कळच भिन्न वाटते. शिवरामपंतांची लेखनशैली ही, किती झालें तरी, बेडर जहाजाप्रमाणें विध्वंसक पण गंभीर. त्या जहाजाच्या गतीचा डौल, आकाराचा भव्यपणा, दोहों बाजूंनीं होणारी तोफांची मारगिरी—सारेंच कांहीं विशाळ आणि प्रेक्षणीय ! उलट अच्युतरावांचें लेखनचापल्य हें विनाशिकेसारखें. तिच्या संचारानें फुटलेलें पाणी जुळण्यापूर्वी व उसळलेला फेंस विरघळण्यापूर्वी ती जशी प्रतिपक्षाचा वेगानें विध्वंस करिते, तशी अच्युतरावांच्या चापल्यपूर्ण लेखणीनें महाराष्ट्रांतील अनेक घेंडांना हां हां म्हणतां धूळ चारली आहे.

अच्युतरावांच्या या अद्वितीय लेखनचापल्यामुळेंच 'संदेश' अल्पावधींत इतका लोकप्रिय झाला. वस्तुतः ताजी बातमी म्हणजे दैनिकाचा केवळ आत्मा-पण, अच्युतरावांच्या कर्तबगारीचें लोकोत्तरत्व या गोष्टींत आहे कीं, त्यांनीं 'संदेशा' सारखें दैनिक चालवून यशस्वी केलें, तें वृत्तपत्र म्हणून नव्हे, तर सर्वस्वीं मतपत्र म्हणून. आणि, ही त्यांची मतप्रसाराची बुद्धि बातमीपासून तों

अग्रलेखापर्यंत ' संदेशां ' तील हर एक मजकुरांत दिसून येत असे. दैनिकांतील अग्रलेख हा इतका बेतशीर आणि बुळबुळीत असावा कीं, त्यांत संथपणानें केलेलें चलनी विषयांचें, चर्वण वाचून तें घेणाऱ्या कारकुनाच्या किंवा कामगाराच्या आधींच थकलेल्या मनाला अधिक थकवा येऊं नये, असा प्रघात अलीकडे पडला आहे. पण, अच्युतरावांचा अग्रलेख पांच कॉलमापासून प्रसंगीं पंधरा कॉलमहि व्यापावयाचा ! परंतु, रोमांचकारी रस–प्रसंगांनीं नटलेल्या चित्रपटांतील धांवतीं दृश्यें जशीं प्रेक्षकांनीं अनिमिष लोचनांनीं पहावीं, तसे कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्यांनीं फुललेले त्यांचे ओजस्वी अग्रलेख वाचकांनीं सोत्कंठ चित्तानें वाचावे. श्री. गद्रे यांनीं परवां प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या स्मारक ग्रंथांतील ' शेवटची वेल सुकली ' हा त्यांचा अग्रलेख या गोष्टीची उत्तम साक्ष देतो. उपरोधाचा आवेश, कल्पनेचें नर्तन, भावनांच्या ऊर्मी आणि या सर्वांना पार्श्वभूमिप्रमाणें असलेला त्यांचा उज्ज्वल देशाभिमान हे त्यांचे सारे गुण या लेखांत एकवटलेले आहेत. त्यांच्या लेखांत सुसंगतता किंवा समंजसता असतेच, असें नाहीं. एका मुद्यावरून दुसऱ्या मुद्यावर ते इतक्या तरलतेनें झेंप घेतात कीं, फुलपांखराचें या फुलावरून त्या फुलावर आंदोलणेंहि त्या मानानें मंद वाटावें ! पण या तरलतेमुळें त्यांच्या लेखांना इतकी आकर्षकता येत असे कीं, तिनें मुग्ध झालेल्या वाचकाला त्यांनीं किती वेळां आणि कुठें पुनरुक्ति केली, याचें भान सहसा राहूं नये. त्यांची कल्पकता जितकी तरल होती, तितकाच जर त्यांचा देशाभिमानहि तीव्र नसता, तर त्यांच्या लेखणीनें बुद्धिप्रधान महाराष्ट्राला क्वचित इतकें भुलविलें नसतें. त्यांच्या आणि ' काळ'कर्त्यांच्या लेखनशैलींत जर उत्कट साम्य कुठें असेल, तर तें याच बाबतींत. त्यांची वृत्ति एरवीं कितीहि चांचल्यपूर्ण असली, तरी त्यांचा देशाभिमान मात्र, त्यांनीं गुरुस्थानीं मानलेल्या टिळकांच्या देशाभिमानाप्रमाणेंच, अच्युत आणि अकुतोभय होता. त्यामुळेंच त्यांनीं आपल्या लेखनचापल्यानें महाराष्ट्राला आमरण झुलविलें ! अशा या प्रभावशाली वृत्तपत्रकाराला जर आगरकर, टिळक आणि परांजपे या महाराष्ट्रांतील मूर्धाभिषिक्त संपादकांच्या प्रणालिकेंत भावी इतिहासकारांनीं स्थान दिलें, तर त्यांत काय आश्चर्य ?

महाराष्ट्र, १८ जून १९३३

# श्री. विष्णु सखाराम खांडेकर

—— : ⁚ : ——

तो दिवस मी कधींहि विसरणार नाहीं. इतिहाससंशोधक मंडळाच्या आवारांत उभे राहून आम्हीं गप्पा मारीत होतों. इतक्यांत शारदोपासकांच्या संमेलनाची बैठक संपल्यामुळें श्री. तात्यासाहेब कोल्हटकर बाहेर आले. ते पायऱ्या उतरून खालीं येतांच मी त्यांच्याजवळ जाऊन त्यांना नमस्कार केला. त्याबरोबर ते हंसत हंसत मला म्हणाले, " ओळखलेत का यांना गजाननराव ? ' त्यांचा तो प्रश्न कानावर पडतांच, त्यांच्यामागें विनयानें उभ्या असलेल्या व्यक्तीकडे मी उत्कंठेनें पाहिलें. तुळतुळीत डोकें, मळका आंखूड कोट, चांदीच्या कड्यांचा जुना चष्मा, जेमतेम गुढग्याची खबर घेणारें तांबूस धोतर व उलट दिशेनें येणाऱ्या वाऱ्याच्या झोतामुळें जसें सुरूचें सडसडीत झाड वांकल्यासारखें दिसावें, तशी रोगानें सतत पोंखरल्यामुळें किंचित् बांक आलेली शरीरयष्टि ! मला वाटलें, कोंकणचें स्वाभिमानी दारिद्र्यच मूर्तिमंत माझ्यापुढें उभें आहे. आणि मी कांहीं विचारणार, तोंच तात्यासाहेब मला म्हणाले, " हे खांडेकर ! मला वाटलं तुम्हीं बघितल्याबरोबर ओळखाल यांना म्हणून ! " त्यांचे तें वाक्य पुरें होण्यापूर्वीच खांडेकर पुढें आले; व माझा हात धरून हंसत हंसत म्हणाले, " ओळखणार कुठून ? आजच पहिल्यांदा भेट होतेय आमची ! " त्यांच्या तोंडावर जरी या वेळीं दिलाचा मोकळेपणा दर्शविणारें निर्भर हास्य खेळत होतें, तरी चष्म्याच्या जाड भिंगांतून माझ्याकडे स्थिरतेनें पहात असलेल्या त्या अधु डोळ्यांत मात्र आर्तता ओथंबलेली होती; व त्यांच्या त्या उण्या दृष्टींतून जन्मांतरींचें सौहार्दच जणुं मला आपली ओळख देत आहे, असा भास माझ्या मनाला झाला.

आणि मला तसें वाटावें अशीच खरोखरी वस्तुस्थिति होती. हा प्रसंग १९२६ सालच्या वसंतऋतूंतला. पण आमचा पत्रव्यवहार मात्र त्या पूर्वीं सात वर्षे सुरू झालेला होता. तथापि, त्यांचें पहिलें पत्र मला ज्या कारणामुळें आलें, त्यावरून मला असें मुळींच वाटलें नव्हतें कीं, आमच्या स्नेहाला पुढें इतकी सांद्रता येईल. पण तसें घडलें खरें. त्या वेळीं अत्यंत लोकप्रिय असलेल्या

'नवयुग' मासिकाच्या १९१९ जुलैच्या अंकांत माझा 'केशवसुतांचा संप्रदाय' हा लेख प्रसिद्ध झाला होता. तो माझा पहिलाच टीकालेख. तारुण्यांतला सारा अवखळपणा त्यांत ओतप्रोत भरलेला होता. त्या लेखांत गोविंदाग्रजांच्या 'दसरा' या कवितेवर जी कडक टीका मी केली होती, तिचें मुद्देसूद खंडन करणारी प्रतिटीका श्री. खांडेकर यांनीं 'नवयुगा' कडे पाठविली; व 'नवयुगा' चे संपादक कै. गणपतराव कुळकर्णी यांनीं ती लगेच पुढच्या अंकांत छापलीहि. कर्कोटक नागाच्या दंशाचा गुण महाभारतांत असा वर्णन केलेला आहे कीं, तो डसल्यामुळें नलराजाचें शरीर जरी कांहीं काळ काळें ठिक्कर पडलें, तरी परिणामीं त्या नागाचा दंश त्याला एकंदरींत उपकारकच ठरला. खांडेकरांच्या या माझ्यावरीलच काय, पण सामान्यतः सर्वच टीकालेखांविषयीं असें म्हणतां येईल. त्यांची मर्मभेदक टीका वाचून लेखक तेवढ्यापुरता जरी विवर्ण झाला, तरी तिच्यांतील मार्मिक उपरोधापासून योग्य तो बोध जर त्यानें घेतला, तर ती टीका त्याला सहाय्यक झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण, त्यांच्या टीकेच्या मुळाशीं मत्सर किंवा व्यक्तिद्वेष नसतो; तर केवळ वाङ्मयाचा ओघ शुद्ध राखण्याची आकांक्षा असते. याचें एक प्रत्यंतर असें कीं, 'नवयुगा'कडे आपला हा टीकालेख धाडतांना, त्याबरोबरच त्यांनीं एक खाजगी पत्र व्यक्तिशः मला पाठवून, त्यांत स्नेहभावाची अपेक्षा केली होती. आणि तें पत्र कांहीं केवळ औपचारिक नव्हतें. कारण, माझ्या त्या लेखामुळें प्रतिकूल टकिचें जें वादळ त्या प्रसंगीं उठलें, त्यांत सहृदयतेची रजतरेषा जर कुठें उमटली असेल, तर ती फक्त श्री. खांडेकर यांच्या लेखांत. त्यांच्या व इतरांच्या टीकांतील हा फरक इतका उघड होता कीं, कै. गणपतराव कुळकर्णी यांनीं मुद्दाम संपादकीय टीप जोडून ही गोष्ट वाचकांच्या निदर्शनाला आणून दिली. खांडेकरांचें मला आलेलें हें पहिलें पत्र म्हणजे आमच्या मैत्रीची कोनशिलाच होय.

खांडेकरांचें आजपर्यंतचें सारें आयुष्य अशा रीतीनें गेलेलें आहे कीं, त्यांच्याविषयीं विचार करितांना 'दुःखसंवेदनायैव रामे चैतन्यमाहितम्' हे भवभूतीच्या रामचंद्रानें स्वतःविषयीं काढलेले उद्गार मला नेहमीं आठवतात. दहा वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका खाजगी पत्रांत त्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, "दुर्दैवाचे ललाटलेख विधात्याला देखील सुवाच्य लिहितां येत नाहींत." पण विधाता इतका अचतुर खास नाहीं. खांडेकरांचें तें अरुंद, खोलगट व आंख्या पडून अधिकच

आकुंचित झालेलें कपाळ पाहिलें, म्हणजे विधात्यानें दुर्दैवाचे लेख लिहिण्यासाठीं जाणून बुजून हा ललाटफलक निवडला असावा, असें मला वाटतें. आणि हें दुर्दैव त्यांच्यामागें अगदीं जन्मापासून हात धुवून लागलेलें आहे. त्यांचा जन्म १८९८ सालीं केव्हां तरी झाला असावा. स्वतःच्या जन्माचा दिवस स्वतःला माहित असूं नये, हें साहजिकच आहे. पण, आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांनाहि त्याची नीट आठवण राहूं नये, हा तरी एक दुर्दैवाचाच प्रकार नव्हे काय? त्यांचे वडील सांगली संस्थानांत मुन्सफ होते; व आईच्या मायेचा ओलावा जरी त्यांना मुळींच लाभला नाहीं, तरी वडिलांचें मात्र त्यांच्यावर अतिशय प्रेम होतें. त्यामुळें त्यांच्या आयुष्याचीं पहिलीं आठ वर्षें बरीं गेलीं. पण, त्यांचें बाळपण संपण्याच्या सुमारासच त्यांचे वडील अर्धांगवायूनें अंथरुणाला खिळून, त्यांच्या आपत्तींना प्रारंभ झाला. वस्तुतः त्यांचे सारे आप्त थोड्या बहुत प्रमाणांत धनाढ्य होते. पण, या संकटाच्या काळांत त्यांच्या कुटुंबाला जर मुख्यतः मदत कोणाची झाली असेल, तर ती, त्या वेळीं सांगली येथें चीफ मेडिकल ऑफिसर असलेले, भारतसेवक समाजाचे प्रमुख सदस्य कै. डॉ. ह. श्री. देव यांची. खांडेकर हे जात्या द्रूड; त्यांतच त्यांची दृष्टि जन्मतः अधु; शिवाय वडिलांच्या मृत्यूमुळें वयाच्या चौदाव्या वर्षींच सर्व कौटुंबिक सुख हरपलेलें; व त्यामुळें पोळलेल्या मनाला विरंगुळा म्हणून ललित वाङ्मयाच्या वाचनाची गोडी अगदीं लहानपणापासून लागलेली. या साऱ्या गोष्टी दुसऱ्या कोणत्याहि मुलाच्या आयुष्याचें मातेरें करावयाला पुरेशा झाल्या असत्या. पण, अशा स्थितींत, अभ्यासाचीं धड सारीं पुस्तकें जवळ नसतांनासुद्धां, १९१३ सालीं ते प्रवेशपरीक्षेंत यशस्वी होऊन, तींत त्यांचा आठवा नंबर आला. त्यामुळें त्यांना शिष्यवृत्ति मिळून ते पुढील शिक्षणासाठीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाले.

इथून खांडेकरांच्या नव्या आयुष्याला प्रारंभ झाला. पुण्यास ज्या वेळीं ते शिक्षणासाठीं आले, त्या वेळीं गडकरीयुगाची प्रभात नुकतीच सुरू झाली होती. तिचे रम्य किरण खांडेकरांच्या प्रतिभाविकासाला पुष्कळच पोषक झाले. आज जसें कॉलेजांतील वातावरण गोविंदाग्रजांच्या मुरलीच्या जादूनें भारलें गेलेलें आहे, तशी स्थिति त्या वेळीं नव्हती, ही गोष्ट खरी. पण, त्यांचें ‘ प्रेमसंन्यास ’ हें नाटक रंगभूमीवर आलेलें असल्यामुळें व ‘ मुरली, ’ ‘ राजहंस ’ वगैरे त्यांच्या कविताहि ‘ मनोरंजनां ’ तून प्रसिद्ध झालेल्या असल्यामुळें, गडकरी हे तेव्हां कॉलेजांतील

सहाध्यायी विद्यार्थ्यांच्या कुतूहलाचे विषय साहजिकच होऊन बसले होते. त्यांचे एक पट्टशिष्य श्री. न. ग. कमतनूरकर ऊर्फ सरस्वतीकुमार हे खांडेकरांचे सांगली-पासूनचे शाळासोबती; व पुण्यास ते दोघे एकत्र रहात असल्यामुळें, गोविंदाग्रजांचा परिचय होण्याचा लाभ खांडेकरांना लवकरच घडला. कोल्हटकरांचें वाङ्मय शाळेंत असतांनाच खांडेकरांनीं आत्मसात् केलेलें होतें. त्यामुळें गडकरी यांच्या प्रतिभा-गुणांविषयीं जरी त्यांना आदर निरतिशय वाटे, तरी त्यांना कोल्हटकरांच्या वरचें, किंब्रहुना त्यांच्या बरोबरीचेंहि, स्थान द्यावयाला मात्र ते तयार नव्हते. आणि त्यांत आश्चर्य कसलें ? तारापुष्पांच्या मधुर तेजानें उजळलेला स्वर्गंगेचा प्रवाह ज्या राजहंसानें पाहिलेला आहे, त्याला मंदाकिनीच्या हिमशुभ्र ओघाचें कौतुक वाटलें तरी कितीसें वाटणार ? त्यामुळें 'प्रेमसंन्यास' नाटक जरी खांडेकरांना फार आवडलेलें होतें, तरी त्यावर पडलेली 'मतिविकारा' ची छाप विसरून जाण्या-इतकी भुरळ मात्र त्यांना गडकरी यांच्या कलाविलासानें घातलेली नव्हती. अर्थात् कमतनूरकर आणि खांडेकर या दोघांचे याबद्दल नेहमीं वाद होत. या वादांमुळेंच एक दिवस कमतनूरकरांना त्यांना गडकरी यांच्या घरीं घेऊन जाण्याची बुद्धि झाली. त्यांच्या या पहिल्या भेटींत अनेक गोष्टींची चर्चा झाली; व खांडेकरांनीं आपलें मतस्वातंत्र्य यत्किंचितहि न गमावितां गडकरी यांचा लोभ संपादन केला. गोविंदाग्रजांचे दुसरे पट्टशिष्य श्री. केशवकुमार हे खांडेकरांचे वर्गबंधु असल्यामुळें त्यांच्याशींहि खांडेकरांची ओळख याच सुमारास झाली. तथापि, गोविंदाग्रजांच्या सहवासाचा काय किंवा लोकप्रियतेचा काय जितका फायदा त्यांच्या शिष्यशाखेंतील या दोघां 'कुमारां'ना मिळाला, तितका तो त्यांना कनिष्ठ बंधुसमान असलेल्या या तिसऱ्या 'कुमारा' ला मात्र मिळाला नाहीं.

कारण, गडकरी यांच्याशीं निकट संबंध येऊन त्यांच्या मदतीनें वाङ्मयाच्या क्षेत्रांत प्रवेश करण्याची संधि मिळण्यापूर्वीच खांडेकरांना पुणें सोडावें लागलें. वस्तुतः त्यांचें शिक्षण या वेळीं सर्वस्वीं त्यांच्या स्वतःच्या कमाईनें चाल-लेलें होतें. त्यांना शिष्यवृत्ति तर होतीच, पण तिच्या भरीला ते दोन शिकवण्याहि शिवाय करीत असत. या शिकवण्यांसाठीं त्यांना रोज फर्ग्युसन कॉलेजच्या वसाह-तींतून कसबापेठेपर्यंत चालत जावें लागत असे ! पण, इतके कष्ट करूनहि पदवी त्यांच्या पदरांत पडावी, असा योग नव्हता. त्यामुळें, १९१६ च्या जानेवारींत

त्यांच्या घरच्या मंडळींनीं त्यांना अचानक तारेनें बोलावून घेऊन, ज्यांचें मुखावलोकनहि खांडेकरांना पूर्वी कधीं घडलेलें नव्हतें, अशा सावंतवाडी येथील संपन्न चुलत्याच्या मांडीवर त्यांना दत्तक दिलें. या दत्तविधानामुळें त्यांचें केवळ नामांतरच नव्हे, तर स्थित्यंतरहि झालें. त्यांचें पूर्वीचें ' गणेश ' हें नांव बदलून ' विष्णु ' हें नांव मिळाल्यामुळें, त्यांच्या कल्पकतेला गरुडासारखें योग्य वाहन लाभल्याची कोटि जरी करितां आली, तरी जन्मतःच पाठमोरी असलेली लक्ष्मी मात्र त्यांना या पुनर्जन्मानंतरहि प्रसन्न झाली नाहीं. उलट, दत्तक वडिलांचें कृपाछत्र हें तेजोवध करणाऱ्या सांवटासारखें ठरलें; त्यांच्या शिक्षणाची पद्धतशीर कुचंबणा करण्यांत आली; व शारीरिक व्याधींचा ससेमिरा त्यांच्यामागें कायमचा लागला. वडिलांचा सावकारीचा धंदा चालविणें त्यांना स्वभावतःच शक्य नव्हतें. त्यामुळें पितापुत्रांत लवकरच तेढ उत्पन्न होऊन १९२० सालीं खांडेकर शिरोड्यास येऊन स्थायिक झाले. आगरकरांच्या वाङ्मयाच्या व्यासंगामुळें शिक्षणप्रसाराच्या कार्याला आपलें आयुष्य वाहून घेण्याची आकांक्षा लहानपणींच त्यांच्या मनांत उत्पन्न झाली होती. म्हणून, शिरोडें येथें येतांच तेथील इंग्रजी शाळा चालवावयाला घेऊन, आज त्यांनीं तिला आपल्या निःस्वार्थी प्रयत्नांनीं जवळ जवळ हायस्कूलचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. 'शिक्षक कीं वकील' या आपल्या हृदयंगम गोष्टींत शिक्षकाच्या कार्याचें जें उज्ज्वल चित्र त्यांनीं रेखाटलें आहे, तें त्यांच्या स्वतःच्या विचारांचें निदर्शक असून, ' कांचनमृग ' या कादंबरींतील नायक सुधाकर हा त्यांच्या समाजसेवेच्या कल्पनांचा आदर्श म्हणून सांगतां येईल. त्या कल्पनांवरच खांडेकरांचा सारा जीवनक्रम अधिष्ठित झालेला आहे. नाहीं तर, शिरोड्यासारख्या कोंकणांतील एका खेडेगांवांत राहून पर्यायानें आपल्या लोकोत्तर प्रतिभेचा कोंडमारा करण्याचें त्यांना काय कारण होतें ? पण, त्यांची ध्येयासक्ति इतकी उत्कट आणि प्रामाणिक आहे कीं, ते स्वतः शाळेचे चालक असतांनासुद्धां, केवळ आपल्याला पदवी नाहीं या एका जाणिवेनें, आपल्या हाताखालच्या पदवीधर शिक्षकांपेक्षां ते कमी पगारावर काम करितात. इतकेंच नव्हे, तर शाळेचा खर्च नेहमींच वाढता असल्यामुळें, जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं गेलीं दोन वर्षें त्यांनीं स्वतःचा पगार सारखा कमी करीत आणला आहे.

त्यामुळें लेखन हेंच खरोखरी आज खांडेकरांचें चरितार्थाचें साधन होऊन बसलें आहे. कोणतीहि कला ही निर्वाहाचें साधन झाली, म्हणजे तिच्या विभ्रमांतलें

नावीन्य बहुतेक नाहींसे होऊन जातें. कलेच्या हुकमी विलासांतही जें थोडेंसें रम्य नावीन्य क्वचित् दृष्टीस पडतें, त्याचें कारण केवळ आपल्या आवडत्या विषयांत रममाण झाल्यावर कलावंताला लाभणारा योगानंद: त्याच्या त्या आनंदाच्या ऊर्मि त्याच्या कलाकृतींत प्रतिबिंबित होत असल्यामुळें तिला यदृच्छेनें एक प्रकारचें नावीन्य प्राप्त होतें. मनुष्याला ज्या कलेचें ईश्वरी देणें असतें, तिच्या आराधनेंत त्याचें मन अनिच्छेनें जरी विलीन झालें, तरी त्या अवस्थेंत तिच्या सौंदर्याचा कांहीं ना कांहीं तरी साक्षात्कार त्याला घडल्याशिवाय रहात नाहीं. सध्यांच्या या औद्योगिक युगांत मुख्यतः मागणीप्रमाणेंच निर्माण होणाऱ्या कलाकृतींत नावीन्य जर कोणत्या कारणामुळें पुष्कळदां उत्पन्न होत असेल, तर तें याच. खांडेकरांच्या वाङ्मयाविषयीं विचार करितांना या गोष्टीचा प्रत्यय तीव्रतेनें येतो. त्यांच्या लेखनाला स्फूर्तिपेक्षां गरजच अधिक प्रेरक झालेली आहे. आधींच शरीर खंगलेलें; व त्यांतच पुन्हा शाळेचा रक्त आटविणारा व्याप अष्टौप्रहर मागें लागलेला. अशा स्थितींत, शाळेची कदर व प्रकृतीची लहर सांभाळून विश्रांतीचे जे थोडेसे क्षण लाभतील, त्यांत त्यांनीं ग्रंथरचना केलेली आहे. तापाशिवाय त्यांचा बहुधा एकहि आठवडा सुना जात नाहीं. फुलपांखराच्या मनोहर पंखांना परागांप्रमाणेंच मातीचेहि कण जसे चिकटलेले असावे, तशी त्यांच्या पत्रांत सुंदर कोट्यांबरोबरच आजाराचीहि कसली ना कसली तरी वातमी नेहमीं असते. या त्यांच्या आजारीपणाबद्दल बोलतांना श्री. तात्यासाहेब कोल्हटकर एकदां थट्टेनें म्हणाले होते, "खांडेकर जर नेहमीं अंथरुणाला खिळलेले असतात, तर इतकें लेखन त्यांच्या हातून होतें तरी कसें ?—हें सारें ते स्वतः लिहितात कीं त्यांचें पिशाच ?" पण, मी यावर एवढेंच म्हणेन कीं, खांडेकरांच्या अंगीं, रुग्णशय्येवरहि त्यांना लिहिण्याचें सामर्थ्य देणारा, जो हा संचार होतो, तो पिशाच्चाचा नसून, देवतेचा असतो. कारण, गेल्या एक तपांत सद्भावनांना जागृत करणारें जितकें रमणीय वाङ्मय त्यांनीं उत्पन्न केलें आहे, तितकें प्रायः कोणत्याच अलीकडील लेखकानें केलेलें नाहीं. मला आश्चर्य वाटतें, तें त्यांनीं पुष्कळ लिहिलें म्हणून नव्हे; तर मन काळजीनें व शरीर तापानें सदैव पिचत असतांनाहि त्यांनीं इतकें प्रसन्न वाङ्मय लिहिलें याबद्दल. आणि तेंहि किती टिप्परघाईंत ? आपली 'हृदयाची हांक' ही कादंबरी त्यांनीं २० दिवसांत, 'कांचनमृग' ४० दिवसांत व 'गडकरी' हा प्रबंध अवघ्या ५० दिवसांत

लिहिला आहे ! अर्थात् इतक्या घाईनें लिहिलेल्या वाङ्मयांत सैलपणाचे सारे दोष हे असावयाचेच. पण, जिथें लेखणीच्या दांडीवर कुटुंबाची जीवितयात्रा अवलंबून असते, तिथें, औचित्याची जाणीव कितीहि तीव्र असली तरी, एकदां लिहिलेलें पुन्हा घोटण्यासाठीं वेळ कोठून आणावयाचा ? त्यांच्या ग्रंथांत अनेक दोष असूनहि जें इतकें विलक्षण लालित्य त्यांत आढळतें, तें केवळ त्यांच्या कल्पकतेमुळें. अलीकडील लेखकवर्गांत त्यांच्या तोडीचा कल्पक ग्रंथकार बहुधा एकहि सांपडणार नाहीं.

कल्पकतेप्रमाणेंच उपरोध हाहि त्यांच्या लेखनाचा एक स्पृहणीय विशेष म्हणून सांगतां येईल. त्यांचे टीकालेख जे इतके विदारक वाटतात, ते याच कारणामुळें. त्यांच्या या गुणाविषयीं बोलतांना श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं काढलेले उद्गार मला नेहमीं आठवतात. १९२८ सालच्या एप्रिलमध्यें सांगली येथें असतांना नदीच्या घाटावर संध्याकाळच्या वेळीं त्यांना साप चावला. पण त्याचें विष मात्र त्यांना बाधलें नाहीं. या प्रसंगाविषयीं बोलतांना तात्यासाहेब मला हंसत हंसत म्हणाले, "खांडेकरांच्या वाणींत इतका विषार भरलेला आहे कीं, त्यांना सर्पदंशाची बाधा होणें शक्य नाहीं. उलट कदाचित् त्यांना चावणारा तो सापच बिचारा दगावला असेल !" आणि या त्यांच्या विनोदबुद्धानें केलेल्या विधानांत तथ्य बरेंच आहे, यांत शंका नाहीं. सौभाग्यलक्ष्मी, त्रिदल, सरोज छे पंकज, किर्लोस्करांचें चरित्र, मौजेचें मित्रद्रोह नाटक इत्यादि त्यांचे लेख हे मर्मच्छेद करणाऱ्या उपरोधाचे उत्कृष्ट मासले म्हणून सांगतां येतील. परंतु, त्यांच्या वाणींत जरी व्याजोक्तीचें गरळ पुष्कळच असलें, तरी त्यांची वृत्ति मात्र सौजन्याच्या सुधेनें ओथंबलेली असते; व टीकाकार या नात्यानें आपल्या जिव्हाळ्याच्याहि मित्रांना जरी ते दया दाखवित नसले, तरी त्यांच्या इतका एकनिष्ठ स्नेही मिळणें हा एक भाग्ययोग आहे, असेंच मी म्हणेन. गेल्या तेरा वर्षांत, आयुष्यांतील दु:खाच्या निरनिराळ्या प्रसंगीं, त्यांच्या निरपेक्ष बंधुभावाचा आधार मला जितका वाटला, तितका दुसरा कसलाच वाटला नाहीं. वस्तुत: स्वतः विपत्तींत आणि विवंचनेंत आयुष्य कंठणाऱ्या त्यांच्यासारख्या व्यक्तीचा दिलासा इतरांना काय म्हणून वाटावा ? पण वाटतो खरा; व तोहि अगदीं अनन्यतेनें. माझ्यासारख्या पाठच्या भाऊ मानलेल्या मित्रालाच काय, पण अगदीं तिऱ्हाईतालाहि दिलेल्या शब्दासाठीं ते प्रसंगीं

सर्वस्वावरसुद्धां लाथ मारतील. १९२२ सालीं, माझे वडील पक्षघातानें आजारी पडून, हजारों रुपयांच्या कर्जाची धोंड ज्या वेळीं अभावितपणें माझ्या शिरावर कोसळली, त्या वेळीं माझ्या गांगरलेल्या मनाला सत्त्वच्युत न होण्याचा सक्रिय सल्ला जर कोणी दिला असेल, तर तो त्यांनींच; व गेल्या मार्चमध्यें कोल्हटकर लेखसंग्रहाच्या कर्जाचा बिकट प्रश्न आमच्यापुढें उभा राहून, तसाच थोडासा प्रसंग जेव्हां पुन्हा माझ्यावर ओढवला, तेव्हां त्याचीहि जबाबदारी घ्यावयाला ते तत्परतेनें पुढें आले. गेल्या तेरा वर्षांत, गुरुविषयींच्या भक्तिबंधनामुळें किंवा अभिरुचींच्या समानतेमुळेंच केवळ नव्हे, तर परस्परांविषयीं वाटणाऱ्या उत्कट आत्मीय बुद्धिमुळेंच मुख्यतः, आम्हीं अनेक प्रसंगीं एकमेकांना हात दिला आहे; व आज तर आमच्या वाङ्मयक्षेत्रांतील जीवनाचे ओघ एकवटण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. अशा थोर आणि त्यागी मित्राचा सुहृद्भाव हा जर, शिलरनें गटेविषयीं म्हटल्याप्रमाणें, मला स्फूर्तीचें निधान वाटत असला, तर त्यांत नवल कसलें ?

प्रतिभा, २२ मे १९३३

# श्री. वरेरकर

फलज्योतिषांतील ग्रहयोगांवर माझा विश्वास नाहीं. पण, श्री. भा. वि. वरेरकर यांच्याविषयींचे माझे पूर्वग्रह आणि पश्चाद्ग्रह कसकसे बदलत गेले बघितलें, म्हणजे आमच्या दोघांच्या कुंडल्या ज्योतिष्याला एकवार दाखवून पहाव्यात, अशी कल्पना माझ्या मनांत केव्हां केव्हां येऊन जाते. त्यांच्याविषयींची माझी पहिली आठवण मोठी आल्हाददायक आहे. मी त्या वेळीं इंग्रजी तिसरी चवथींत असेन. वरेरकरांच्या 'कुंजविहारी' या नाटकाचे प्रयोग मुंबईला तेव्हां अत्यंत लोकप्रिय झालेले होते. त्या नाटकांतील 'अरे बघ गाई बुजाल्या,' 'कृष्णा तुझी रानांत गाय' वगैरे पेंद्याच्या खड्या आवाजांत म्हटल्या जाणाऱ्या बालबोध पदांनीं माझ्या मनाला अतिशय वेध लावला, व तें नाटक मी किती तरी वेळां अगदीं अतृप्त मनानें पाहिलें. नाटक आवडलें, तरी नाटककाराविषयीं जिज्ञासा वाटण्याचें कांहीं तें वय नव्हतें. तथापि 'कुंजविहारी'चें पुस्तक मुद्दाम विकत घेऊन मी पुनः पुन्हा गोडीनें वाचलें; व त्यानंतर वरेरकरांचीं रंगभूमीवर आलेलीं सारीं नाटकें मी मुंबईस असेपर्यंत उत्सुकतेनें पाहिलीं.

'कुंजविहारी' नाटक पाहिल्यानंतर जवळ जवळ पंधरा वर्षांनीं त्याच्या कर्त्याला प्रत्यक्ष पहाण्याचा योग आला. १९२८ सालच्या जूनमधील गोष्ट. श्री. वरेरकर हे त्या वेळीं 'दुनिया'पत्राचे संपादक होते. तें पत्र ज्या छापखान्यांत छापलें जात असे, त्यांत माझे मित्र श्री. वसंतराव कर्णिक यांच्या समतासंघाचें कांहीं छपाईचें काम दिलेलें होतें. त्या निमित्तानें आम्ही तिथें गेलों असतां श्री. वरेरकर यांची अचानक गांठ पडली. श्री. कर्णिक यांनीं माझें नांव सांगतांच श्री. वरेरकर यांनीं हास्यपूर्वक माझें स्वागत केलें; व नंतर अनेक वाङ्मयविषयक प्रश्नांवर आमच्या गप्पा झाल्या. गप्पा हा शब्द कदाचित् तितका समर्पक होणार नाहीं. कारण, वरेरकरांचें त्या वेळचें सारेंच बोलणें सहेतुक आणि साभिप्राय होतें, हें मागाहून माझ्या अनुभवाला आलें. आमचें संभाषण चालू असतांनाच श्री. अनंतराव गद्रे हे तिथें आले. त्यांना बसावयाला देण्यासाठीं खुर्ची रिकामी नव्हती.

म्हणून, तेथील एका स्टुलावर बसण्याची सूचना त्यांना करितांना, वरेरकरानीं 'उपस्थित' या शब्दावर जी अत्यंत ग्राम्य कोटि केली, ती अजूनहि माझ्या चांगली लक्षांत आहे.

पण, आमच्या भेटीचा तो पहिला प्रसंग माझ्या स्मरणांत जो इतका टिकून राहिला आहे, तो त्या कोटीमुळें मात्र नव्हे; तर 'विधवाकुमारी' या कादंबरी-विषयीं झालेल्या संभाषणामुळें. ती कादंबरी त्या वेळीं नुकतीच प्रसिद्ध झालेली होती; व वरेरकरांचा तिच्याशीं कांहीं संबंध असेल, अशी कल्पनाहि मला नव्हती. त्यांनीं अगदीं सहजगत्या म्हणून मला त्या कादंबरीविषयींचें माझें मत विचारलें. तें मी दिल्यावर 'ज्ञानप्रकाशां'त जाहिरात म्हणून प्रसिद्ध झालेल्या श्री. न. चिं. केळकर यांच्या त्या कादंबरीवरील पत्ररूप अभिप्रायाविषयीं बोलणें निघालें. तेव्हां वरेरकर अगदीं साळसूदपणानें मला म्हणाले, "तुम्हांला नाहीं वाटत श्री. कमलाबाई देशपांडे यांनीं ती कादंबरी लिहिली असेल म्हणून? एरवीं नरसोपंतांनीं कांहींहि जर तर न वापरतां, इतका प्रांजळ न् अनुकूल अभिप्राय तिच्यावर खास दिला नसता!" ही चर्चा झाल्यावर आठ दिवसांनीं मी पुण्यास गेलों. तिथें तात्यासाहेबांशी त्या कादंबरीविषयीं बोलण्याचा योग आला असतां, सौ. शांताबाई भिडे—नाशिककर यांनीं ती लिहिली असावी, असा आपला अंदाज त्यांनीं व्यक्त केला. त्यानंतर स्वतः वरेरकरांनींच आपण त्या कादंबरीचे लेखक असल्याचें गुपित फोडलें. तो त्यांचा सटीक गौप्यस्फोट वाचल्यावर त्यांनीं मला विचारलेल्या त्या प्रश्नांतील खोंच माझ्या लक्षांत आली. तो प्रश्न वरेरकरांच्या मनोवृत्तीचा निदर्शक आहे असें जर मी म्हटलें, तर तें गैर होईल काय?

त्यानंतर आमच्या भेटीचा योग पुन्हा पांच वर्षे आला नाहीं. पण दर-म्यान त्यांची व माझी मोठीच चकमक झडली. १९३२ सालच्या डिसेंबरमध्यें बडोदें येथें भरलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें वरेरकरांनीं जें भाषण केलें, त्यांत मराठींतील चिपळूणकर आणि आगरकर या दोन संप्रदायांची कल्पित वर्णनें देऊन कै. ह. ना. आपटे आणि कै. श्री. कृ. कोल्हटकर यांना त्यांनीं आगरकरांचे शिष्य बनविलें होतें. त्या भाषणांतील वस्तुविपर्यासाचा मला अति-शय राग आला; व कोल्हटकरांना तें भाषण मी मुद्दाम समग्र वाचून दाखविलें. त्यांचें मत बव्हंशीं माझ्यासारखेंच पडलें. विशेषतः ज्या आगरकरांची विचारसरणी

आणि लेखनशैली त्यांना फारशी पसंत नव्हती, त्यांचे वरेरकरांनीं स्वतःच्या सोईसाठीं आपल्याला शिष्य बनवल्याचें पाहून तात्यासाहेबांना मनस्वी खेद वाटला. त्यांच्याशीं चर्चा करूनच मी नंतर 'वरेरकरांचा वस्तुविपर्यास' या शीर्षकाखालीं 'महाराष्ट्रां'त त्या भाषणावर कडक टीका केली. त्या टीकेंत मी वरेरकरांनीं केलेली संप्रदायमीमांसा किती सदोष आणि चुकीची आहे, हें सप्रमाण दर्शविलें होतें. वरेरकरांना ती टीका अतिशयच झोंबली; व त्यांनीं माझ्या लेखाला उत्तर म्हणून तीन लेख 'विविधवृत्तां'तून लिहून माझा हल्ला परतविण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या त्या लेखमालेंतील टीकेविषयीं मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. पण, 'नागपुरांतील पुणेरी पीर' हा त्या लेखाला त्यांनीं दिलेला मथळा, गायकवाड वाड्यांतील आधुनिक पेशवाईचा सुभेदार म्हणून केलेलें माझें वर्णन आणि मी पुणेरी आहें या समजुतीनें केलेली माझी ग्राम्य संभावना यांची मला त्या वेळीं फार गंमत वाटली; व अजूनहि त्या लेखमालेंतील माझ्या पुण्याशी जोडलेल्या बादरायण संबंधाचें अवस्तुवर्णन आठवलें, म्हणजे मला राहून राहून गंमत वाटते. श्री. प्र. के. अत्रे यांनीं 'संजीवनीं'तून त्या लेखमालेविरुद्ध केलेल्या बुभुःकारांत असें कांहीं तरी म्हटल्याचें स्मरतें कीं, "ज्याला तुम्ही पुणेरी पीर म्हणतां तो तर तुमच्यासारखाच एक कोंकणचा पंचेवाला आहे!" आणि हें त्यांचें विधान अगदीं खरें होतें. माझ्या पस्तीस वर्षांच्या आयुष्यांतील अवघे एकवीस महिने मी पुण्यास काढलेले आहेत. जन्म, शिक्षण, घरंदाजपणा, प्रकाशनाचें क्षेत्र आणि वाङ्मयविषयक ऋणानुबंध यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें मीं शंभरनंबरी 'मुंबैकर' असून त्या शहरावर माझें प्रेमहि अगदीं अलोट असें आहे. पण, एका शहरावर उत्कट प्रेम करावयाचें, म्हणजे दुसऱ्या शहराचा द्वेष केला पाहिजे असें मात्र नाहीं; व या बाबतींत वरेरकरांसारखी माझी वृत्ति नसल्यामुळें ज्या पुण्यांत मी एकवीस महिने राहिलों तें पुणें किंवा ज्या नागपुरांत मी गेलीं अकरा वर्षें रहात आहें तें नागपूर मला मुंबईइतकेंच प्रिय वाटतें. किंबहुना, मराठशाहीचीं उध्वस्त केंद्रें म्हणून, मुंबई शहराविषयीं न वाटणारा असा, एक प्रकारचा शोकसंमिश्र अभिमान पुणें आणि नागपूर यांच्याविषयीं मला वाटतो. मात्र मराठी वाङ्मयाचेंच केवळ नव्हे, तर नवविचारांचें केंद्र म्हणूनहि मला मुंबई शहराविषयीं विलक्षण आकर्षण वाटतें. पण त्या आकर्षणाच्या धुंदींत मी पुणें किंवा नागपूर यांची अव-

मानना करणार नाहीं किंवा इतरांनीं केलेलीहि ऐकून घेणार नाहीं. उण्यापुऱ्या दोन कोट दौलतीच्या या महाराष्ट्रभूमींत एका शहराचा संकुचित अभिमान धरून दुसऱ्या शहराची अवज्ञा करणें, यापरतें मनाचें अनौदार्य तें कोणतें ?

अर्थात्, मी जसा पुणेरी पीर नाहीं तसा गायकवाड वाडयाचा सुभेदारहि पण नाहीं. लो. टिळक यांच्याविषयीं मला निरतिशय आदर आहे, ही गोष्ट खरी पण त्यांचीं सामाजिक मतें मला कधीं ग्राह्य वाटलीं नाहींत व त्यांच्या पक्षाचें आजचें राजकारणहि मला अपर्याप्त वाटतें. श्री. केळकर यांच्या लेखनावर माझी विशेष भक्ति असली, तरी तिच्या भरांत मी वरेरकरांना कधीं अन्याय केल्याचें मला स्मरत नाहीं. 'सोन्याचा कळस' 'धांवता धोटा' वगैरे त्यांच्या ग्रंथांवर 'महाराष्ट्रां'त अनुकूल असे विस्तृत अभिप्राय आलेले असून, 'स्ट्राईफ' किंवा 'ऑईल' या इंग्रजी पुस्तकांशीं असलेला त्या ग्रंथांचा संबंध मी परिस्फुटित न केल्याबद्दल मला अनेकांनीं दोष दिला आहे. तेव्हां, वरेरकरांनीं कोणत्या अर्थानें मला गायकवाड वाडयाचा सुभेदार बनविलें होतें, हें त्यांचें त्यांनाच माहित. त्यांच्या समजुतीप्रमाणें मी जर खरोखरीच 'पुणेरी पीर' असतों, तर 'केसरी'चे सहसंपादक श्री. वा. कृ. भावे यांनीं आपल्या 'खरा देशभक्त' या कादंबरींत पुण्याचा कड घेऊन केलेली मुंबईची कुचाळी मला कडू लागली नसती; व 'पुण्याचा मुंबईवर हल्ला' या मथळ्याखालीं 'महाराष्ट्रां'तून मी त्या कादंबरीवर कडक टीकाहि करतों ना. आतां एवढें मात्र खरें कीं, इतर कित्येकांप्रमाणें पुण्याविषयीं मला अकारण द्वेष वाटत नाहीं किंवा आपण ज्या शहरीं राहतों तें शहर वगळून इतरांचीं टवाळी करावी अशीहि माझी वृत्ति नाहीं. श्री. वरेरकर यांचा स्थानाभिमान किती जाज्वल्य आहे, याचें एक अगदीं प्रत्यक्ष अनुभविलेलें उदाहरण माझ्या चांगलें लक्षांत आहे. १९३४ सालच्या नोव्हेंबरमध्यें मॉरिस कॉलेजांतील शारदामंडळाच्या उत्सवासाठीं त्यांचा मुक्काम नागपुरास असतां, श्री. ओगले यांच्या भेटीसाठीं ते 'महाराष्ट्र' कचेरींत आले होते. त्या वेळीं ओगले यांच्या रहात्या घराच्या मागल्या परसांत असलेली अळवाची खांच पाहून हे हर्षानें उद्गारले, "आहे, कोकणचें वैशिष्ट्य जिवंत आहे !" स्थानवैशिष्ट्याचा अशा प्रकारचा अभिमान जर महाराष्ट्रांतील प्रत्येक लेखकानें धरला, तर एक-राष्ट्रीयत्वाचें स्वप्न कधीं सफळ होण्याची आशाच नको. विशेषतः श्री. वरेरकर यांच्यासारख्या पुरोगामी लेखकानें तो धरावा, हें केवढें आश्चर्य !

पण या साऱ्या गोष्टी लक्षांत घेऊनहि श्री. वरेरकर यांना मी केवळ पुरोगामी लेखकच नव्हे, तर महाराष्ट्रांतील पुरोगामी लेखकवर्गाचे अग्रणी म्हणतों. कांहीं लोक त्यांना वेछूट आणि बेजबाबदार समजतात. पण, मला वाटतें, त्यांच्या या वेछूटपणांतच त्यांच्या प्रगतीचें बीज, त्यांच्या प्रतिभेच्या पुरोगामित्वाचें मर्म आहे. जुन्या पिढींतील लेखकांपैकीं श्री. न. चिं. केळकर हे आतां उघड उघड स्थितिवादी झाले आहेत. डॉ. श्री. व्यं. केतकर यांची मतें म्हणजे इतिहाससंशोधनाच्या जुनाट खोडाला फुटलेले नव्या विचारांचे कोंब. त्या विचारांत प्रगति आणि परागति यांची इतकी विचित्र सरमिसळ झालेली असते कीं, त्यांचा प्रगत भासणारा विचार हा केव्हां पलटा खाऊन पिछेहाट करील, याचा नेम सांगवत नाहीं. वरेरकरांच्या बरोबरीनें ज्यांचा पुरोगामी म्हणून उल्लेख करितां येईल असे लेखक प्रो. वा. म. जोशी हेच एक जुन्या पिढींत दिसतात. पण त्यांच्या वृत्तींत, विचारांत आणि वाङ्मयांत इतका कांहीं अनिश्चय भरलेला आहे कीं, त्यांच्या लेखानें मनाला आल्हाद कितीहि दिला, तरी मतपरिवर्तनाच्या दृष्टीनें तें फारसा परिणाम करीत नाहीं. त्यांची भूमिका संशयवाद्याची आहे, प्रतिपादकाची नव्हे. उलट वरेरकरांची भूमिका सर्वथैव प्रतिपादकाची आहे. तत्त्वप्रतिपादनाच्या बाबतींत ते संयम, सौंदर्य, सत्यनिष्ठा किंवा सदभिरुची यांपैकीं कशाचीच चाड किंवा भीड बाळगीत नाहींत. त्यांच्या हातांत वीणा नाहीं, तर खड्ग आहे; व त्यांचें वाङ्मय बऱ्हंशीं लालित्यहीन असून, तें अग्निशिखेप्रमाणें जळजळीत आणि अविवेकाच्या धूमानें युक्त आहे. किंबहुना, गेल्या अर्ध शतकांत त्यांच्याइतका धडाडीचा बेदरकार प्रतिपादक, बॅ. सावरकर यांच्याशिवाय, मराठी ललित लेखांत दुसरा झालाच नाहीं.

त्यांच्या प्रतिभेचें पुरोगामित्व सर्वस्पर्शी आहे. धार्मिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय या चारी क्षेत्रांत त्यांनीं समतेचा पुरस्कार निर्भयतेनें केलेला असून 'संन्याशाच्या संसारा'पासून तों 'विकारी वात्सल्या'पर्यंत त्यांच्या साऱ्या ललित कृति त्यांच्या प्रखर पण उदार दृष्टिकोनाची साक्ष देतात. किंबहुना त्यांची नाटकें आणि कादंबऱ्या हे महाराष्ट्राच्या वैचारिक प्रगतीच्या मार्गावरील खुणेचे पाषाणच आहेत म्हटलें तरी शोभेल. त्यांचे गुरु कै. कोल्हटकर हे त्यांच्याविषयीं नेहमीं असें म्हणत असत कीं, समाजापुढें उपस्थित होणाऱ्या प्रत्येक नव्या प्रश्नावर नाटक किंवा कादंबरी लिहून वरेरकर हे सदोदित आघाडीस राहिलेले आहेत. वरेरकरांच्या लोकप्रियतेचें बीज त्यांच्या या समयज्ञतेंतच आहे. ते ध्येयवादी असले,

तरी निव्वळ गंधर्वनगरींत रमणारे नाहींत; व वास्तववादी असले, तरी निव्वळ गाळ उपसणारे नाहींत. ध्येयवाद आणि वास्तववाद यांचा सुंदर मेळ त्यांच्या ललित कृतींतून पडलेला असून, त्यांच्या मतप्रतिपादनांत जरी एक प्रकारचा बेछूटपणा असला, तरी समाजाची पुराणप्रियता लक्षांत घेतली असतां, त्यांचें निरर्गल लिहिणें एकंदरींत क्षम्य वाटतें. वास्तवतेच्या दृष्टीनें 'विधवाकुमारी,' 'गोदू गोखले' आणि 'धांवता धोटा' या त्यांच्या कादंबऱ्या उत्कृष्ट असून, त्यांच्या गोष्टींतून समाजाच्या निरनिराळ्या थरांतील लोकांच्या जीवनाच्या छटा सहृदयतेनें चित्रित केलेल्या आहेत. कै. देवल यांच्यानंतर त्यांच्याइतकीं वास्तविक, विनोदप्रचुर आणि मर्मग्राही नाटकें दुसऱ्या कोणत्याहि नाटककारानें लिहिलेलीं नाहींत.

अशा या श्रेष्ठ साहित्यिकाला अध्यक्षपद देऊन मुंबई शहरानें आपल्या एका थोर सुपुत्राचा गौरव केला आहे; व मला आशा आहे कीं, त्यांचें भाषण त्यांच्या स्वतःच्या आणि मुंबई शहराच्याहि पुरोगामित्वाच्या लौकिकाला शोभेल, असेंच होईल. श्री. वरेरकर हे स्वतः केवळ लेखनोपजीवी असल्यामुळें लेखकवर्गाच्या अडचणींची आणि आवश्यकतांची त्यांना चांगली कल्पना आहे. लेखनकलेला महाराष्ट्रांत अलिकडे धंद्याचें स्वरूप प्राप्त झालें असून, मागणी, मोबदला, चढाओढ वगैरे धंदेवाईक उपाधि आतां त्या कलेलाहि नियमित करूं पहात आहेत. मराठी लेखक जरी बहुतेक पांढरपेशे असले, तरी व्यावहारिक दृष्टीनें त्यांची गणना वस्तुतः श्रमजीवी वर्गांतच केली पाहिजे. वकिली, प्रोफेसरी किंवा सरकारी नोकरी करून फावल्या वेळांत बुद्धिविलास म्हणून वाङ्मयनिर्मिति करणारांची गोष्ट अर्थातच निराळी. कलोपासनेच्या किंवा वाङ्मयसेवेच्या गोष्टी त्यांनीं वाटल्यास बोलाव्या. संपत्ति अन्य मार्गांनीं मिळण्याची त्यांना उत्कृष्ट सोय असल्यामुळें त्यांनीं वाङ्मयाचें सौंदर्य आणि पावित्र्य यांचें स्तोम खुशाल माजवावें; व त्यांना फुरसत मुबलक असल्यामुळें त्यांनीं पांडित्याचाहि वडिवार हवा तितका मांडावा. पण, लेखणी सतत झिजण्यावरच ज्यांचा निर्वाह अवलंबून आहे, त्यांनीं कलेचें, पावित्र्याचें किंवा पांडित्याचें चोज माजविण्यांत अर्थ नाहीं. लेखनकला हा एक आतां धंदा होत चालला आहे, ही गोष्ट ते जितक्या लवकर उमजतील तितकें चांगलें. नियतकालिकें, प्रकाशक आणि मुद्रक यांच्या आश्रयानें चरितार्थ चालविणारा लेखनोपजीवी वर्ग महाराष्ट्रांत फार मोठा असून, त्यांच्या हातींच खरोखरी महाराष्ट्राच्या बौद्धिक प्रगतीचीं सूत्रें आहेत. पण हा वर्ग आज

अत्यंत असंघटित आणि अनिश्चित स्थितींत दिवस काढीत आहे. श्री. वरेरकर यांना या परिस्थितीची प्रत्यक्षानुभूति असल्यामुळें, साहित्य आणि समाजजीवन या प्रश्नाबरोबरच लेखन आणि लेखकोपजीवन या प्रश्नांचीहि निर्भयतेनें चर्चा करून त्यांनीं तरुण लेखकवर्गाला मार्ग दाखविला पाहिजे.

श्री. वरेरकर यांच्या व्यक्तिगत दोषांची चर्चा आजपर्यंत महाराष्ट्रांत पुष्कळ झाली आहे; व मलाहि त्या दोषांची जाणीव असल्याचें मी प्रारंभीं दिलेल्या आठवणींवरून दिसून येईल. पण व्यक्तिगत दोष हे त्या व्यक्तिबरोबर नष्ट होतात; व तिचें वाङ्मय मात्र शतकानुशतकें आपला प्रभाव गाजवितें. श्री. वरेरकर यांचें वाङ्मय इतकें गुणपूर्ण आणि शक्तिशाली आहे कीं, त्याच्या गुण-सन्निपातांत त्यांचे व्यक्तिगत दोष लोपून जातात; व त्या वृद्ध साहित्यिकापुढें मस्तक आदरानें नम्र होतें. १९३३ सालच्या मे महिन्यांत मी मुंबईला असतांना एका संपादकांनीं, वरेरकरांच्या बडोद्यांतील भाषणावर मी 'महाराष्ट्रां'त केलेल्या टीकेची तारीफ करून, त्यांना नेस्तनाबूद करण्याच्या कटांत सामील होण्याची विनंति मला केली. त्या वेळीं मी त्या सद्गृहस्थाला असें उत्तर दिलें कीं, "मामांच्या लेखणींत एवढें सामर्थ्य आहे कीं, आपण त्यांना धुळीला मिळविण्याचा प्रयत्न केल्यास त्या धुळीचेंहि ते सोनें करून दाखवितील!"

आणि, पदवी, पांडित्य, प्राध्यापकता किंवा किमानपक्ष एखाद्या भांडवलवाल्याचा पाठिंबा यांपैकीं कशाचीहि जोड नसतां श्री. वरेरकर यांनीं मिळविलेलें अपूर्व यश पाहून त्यांच्या लेखनसामर्थ्याबद्दल कोणाला अत्यादर वाटणार नाहीं? केवळ लेखनकमाईवर स्वतःचें नशीब काढूं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रांतील तरुण लेखकांना त्यांचें हें यश म्हणजे स्फूर्तीचें केवळ निधान आहे.

ज्योत्स्ना, डिसेंबर १९३६

# नाट्यछटाकार दिवाकर

———:०:———

काहीं माणसांच्या आठवणी या केवड्याच्या पानांसारख्या असतात. त्या पानांचा सुगंध मनाला लोभावतो, हें खरें. पण, त्याबरोबरच त्या गंधाची उग्रता आणि त्याहिपेक्षां त्या पानांच्या कांट्यांची जाणीव मनाला बोंचल्याशिवाय रहात नाहीं.

कै. दिवाकर यांच्याविषयींच्या माझ्या आठवणी थोड्याशा अशाच प्रकारच्या आहेत. त्यांच्याशीं माझी ओळख होण्याचा योग कै. अनंततनय यांच्या घरीं आला. १९१९ सालच्या नोव्हेंबरमधील तो प्रसंग असावा बहुधा. गडकरी यांच्या वर्षश्राद्धानिमित्त 'नवयुग' मासिकाचा जो विशेषांक निघावयाचा होता, त्याच्यासाठीं त्यांचीं कांहीं छायाचित्रें आणि अप्रकाशित लिखाणहि आणण्यासाठीं मी आणि श्री. श्रीपाद अमृत डांगे असे दोघे मुद्दाम पुण्याला गेलों होतों. डांगे यांचें आणखीहि एक काम होतें. तें म्हणजे गोविंदाग्रजांच्या कवितांचा इंग्रजी अनुवाद करण्याची परवानगी त्यांच्या बंधुकडून मिळवावयाची. या दोन्ही कामांच्या निमित्तानें अनंततनयांच्या घरीं आम्ही गेलों असतां अगदीं अभावितपणें कै. दिवाकर यांची तेथें गांठ पडली. अनंततनयांचें घर हा त्या वेळीं पुण्यांतील वृद्ध–तरुण लेखकांचा एक अड्डा होता. विशेषतः, दारिद्र्यामुळें म्हणा किंवा समाजांत प्रतिष्ठा नसल्यामुळें म्हणा, सहानुभूति आणि प्रोत्साहन यांच्यासाठीं आसुसलेले साहित्यिक त्या प्रेमळ कवीच्या बैठकींत फार रमावयाचे. कै. दिवाकर हे अशा व्यक्तींपैकींच एक होते, असें मी म्हटलें तर तें खचित अवास्तव होणार नाहीं.

'अमुचा पेला दुःखाचा । डोळे मिटुनी प्यायाचा'—असें आपल्या आवडत्या केशवसुतांप्रमाणें कै. दिवाकर यांनाहि स्वतःविषयीं म्हणतां आलें असतें. त्यांचा जन्म ता. १८ जानेवारी १८८९ रोजीं पुणें येथें झाला; व ता. १ आक्टोबर १९३१ रोजीं त्यांचें देहावसान झालें. या चाळीस वर्षांच्या अवधींत दुःखाचे आणि मानहानीचे प्रसंग जितके म्हणून अनुभवणें शक्य होतें,

तितके सर्व त्यांच्या वांट्याला येऊन गेले होते. सामान्य, श्रमजीवी माणसाच्या आयुष्यक्रमाचें वर्णन मॅक्झिम गॉर्कीनें 'थडग्याप्रत जाणारा मृत्यूचा मार्ग' या शब्दांनीं केलें आहे. मला वाटतें, दिवाकरांच्या जीविताला हें वर्णन निराळ्याच अर्थानें लागू पडेल. आपल्या लहानशा आयुष्यांत त्यांना प्रियजनांच्या मृत्यूचे इतके प्रसंग पहावे लागले कीं, ते प्रसंग म्हणजे मानवी आकांक्षेच्या नश्वरतेची मनाला दटावून जाणीव देणारे त्यांच्या जीवनपथावरील खुणेचे दगडच होते जणुं कांहीं. त्यांतल्या त्यांत सुदैव एवढेंच कीं, त्यांच्या एकुलत्या एका कन्येवर काळाची झडप पडण्यापूर्वीं तरी त्यांचे स्वतःचे डोळे मिटले. त्यांच्या जीवितांतील बहुतेक साऱ्या घटनांतून दैवाच्या उपरोधप्रियतेची चुणूक थोडी फार दृष्टीस पडते. मनुष्य दत्तक जातो, तो सामान्यतः निर्धनाचा सधन होण्यासाठीं. पण, दिवाकरांच्या घराण्यांतून गर्गे यांच्या घराण्यांत दत्तक जाऊनहि शंकर काशिनाथ गर्गे हे दरिद्रीच राहिले; दत्तक घराण्यापेक्षां जनक घराण्याचा आसराच त्यांच्या बाबतींत अधिक उपकारक ठरला; व त्या घराण्याच्या 'दिवाकर' या नांवानें लोकविश्रुत होऊन त्यांनींहि त्याचें हें ऋण पुरेपूर फेडलें. शेक्सपियर, वर्डस्वर्थ, ब्राउनिंग प्रभृती इंग्रजी कवींचें त्यांचें अध्ययन इतकें गाढ होतें कीं, इंग्रजी कवितेच्या प्राध्यापकांनाहि त्यांचा हेवा वाटावा. पण, मौज अशी कीं, १९१६ सालच्या मार्चमध्यें नूतन मराठी विद्यालयांत शिक्षक झाल्यापासून त्यांचें सारें आयुष्य इंग्रजी पहिली–दुसरी–तिसरींतील मुलांना आंग्ल भाषेचे प्राथमिक पाठ देण्यांत गेलें. डि. एस. पी.च्या कचेरींतून डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या प्राथमिक शाळेंत व त्या शाळेंतून अखेर नूतन मराठी विद्यालयांत १९१० पासून १९१६ पर्यंत झालेलें त्यांचें संक्रमण म्हणजे उपरोधप्रिय नियतीनें केलेली त्यांच्या आकांक्षांची पद्धतशीर कुचाळीच होती.

त्यांचें वाङ्मय म्हणजे या कुचाळीचें त्यांनीं जगापुढें ठेवलेलें कलात्मक निवेदन होय. त्यांत कांहीं ठिकाणीं उपरोध आणि आर्तता हीं इतकी एकवटलेली आहेत कीं, त्याला निवेदन म्हणण्यापेक्षां आक्रंदन म्हणणेंच खरोखरी अधिक समर्पक होईल. 'फाटलेला पतंग,' 'म्याऊं–म्याऊं म्याऊं!,' 'एका नटाची आत्महत्या,' 'ता. ७ नोव्हेंबर,' 'अरेरे! ओझ्याखालीं बैल मेला!,' 'किती रमणीय देखावा हा!,' 'देवा, मीच मंगळ जर जन्माला आलों नसतों!,'

'दिव्याभोंवती पतंग उडत आहेत,' 'आनंद! कोठें आहे येथें?' 'यांतही नाहीं निदान?' इत्यादि त्यांच्या नाट्यछटा म्हणजे त्यांच्या पिळवटलेल्या हृदयाचे हुंदकेच नव्हेत काय? त्यांचें 'कारकून' नाटक आणि विशेषतः त्यांतील दिनकरपंतांच्या डोळयांच्या तपासणीचा प्रसंग वाचतांना अशी कल्पना मनांत आल्याशिवाय रहात नाहीं कीं, डी. एस. पी. च्या कचेरींत रोज दुपारीं अकरापासून रात्रीं आठपर्यंत मरेमरेतों काम केल्यावर अखेर सरकारी तपासणींत डोळे बिघडल्याचें सिद्ध होऊन ऐन पंचविशींत नोकरीला नालायक ठरण्याची जी आपत्ति त्यांच्यावर आली, तिचेंच तर हें शब्दचित्र त्यांनीं रेखाटलें नसेल ना? 'सगळें जग मला दुष्ट नाहीं का म्हणणार?' या हृदयस्पर्शी नाटयछटेंतहि त्यांनीं पुन्हा याच आपत्तिमुळें एका कारकुनाच्या मनाची झालेली तळमळ चित्रित केली आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं, त्यांच्या नाटयछटा म्हणजे त्यांच्या दैवदलित हृदयाचे हुंदके आहेत. आणि, जेव्हां ते हुंदके नसतात, तेव्हां जगाच्या निर्घृण व्यवहारांतील उपरोधिकता पाहून केलेलें तें विकट हास्य असतें. 'बाळ या नारळाला धक्का लावूं नकोस बरें,' 'म्हातारा इतुका न' 'पंत मेले राव चढले' 'कोण मेलें म्हणजे रडूं येत नाहीं?' 'तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी,' 'शिवी कोणा देऊं नये,' 'कारण चरित्र लिहायचें आहे!,' 'तेवढेंच ज्ञानप्रकाशांत,' 'माझी डायरेक्ट मेथड ही!' 'सायकॉलॉजिकली!,' 'झूट आहे सब!' इत्यादि नाट्यछटांत जगाच्या दांभिक व्यवहारामुळें दुभंगलेल्या त्यांच्या ध्येयवादी मनाचें विकट हास्य ऐकूं येतें. त्या दृष्टीनें त्यांच्या साऱ्या वाङ्मयाचे दोनच वर्ग करतां येतीलः करुणपूर्ण आणि उपरोधिक. 'चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच' या अगदीं वात्सल्यनिर्भर नाट्यछटेंतसुद्धां उपरोधाची सूक्ष्म चमक प्रतीत होते. 'निजलेलें मूल' हा त्यांचा नाट्यलेखहि आनुवंशिकतेच्या तत्त्वाच्या दिग्दर्शनाच्या दृष्टीनें जितका मार्मिक, तितकाच त्यांच्या उपरोधिक लेखनशैलीच्या दृष्टीनें सुंदर आहे. 'कारकून' आणि 'सगळेच आपण—थुः! थुः!' या त्यांच्या दोन उत्कृष्ट नाटिकाहि त्यांच्या जगाकडे पहाण्याच्या कारुणिक आणि उपरोधिक अशा दोन दृष्टिविशेषांच्या निदर्शक आहेत. करुण आणि उपरोध हे बाह्यतः कितीहि भिन्न आणि विसदृश दिसले, तरी एकाच विदीर्ण मनःस्थितीचीं तीं दोन रूपें, दोन आविष्कार आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

'नाटयछटे' सारखा मराठीला अपरिचित असलेला नवीन लेखनप्रकार आत्माविष्कारासाठीं निवडण्यांतहि के. दिवाकर यांचें वैशिष्टय दिसून येतें. ते पराकाष्ठेचे मानी होते. आपली योग्यता विशेष प्रकारची असली, तरी समाजांत आपल्याला कोणत्याहि प्रकारचा दर्जा नाहीं, याची त्यांना तीव्र जाणीव होती; व त्यामुळं आपल्या निवडक मित्रमंडळींत मिसळतांनासुद्धां ते एका मर्यादेपलीकडे मोकळे होत नसत. ज्या मंडळींत आपण नेहमीं उठतों बसतों, त्यांना आपल्या-विषयीं खरोखरीच तितकी आपुलकी किंवा आदर आहे कीं नाहीं, याविषयीं त्यांचें मन साशंक असे. या शंकाकुलतेला अर्थातच कारणें होतीं. ते एक जेमतेम स्कूल फायनलपर्यंत शिकलेले कारकून किंवा मास्तर होते; व त्यांची बैठक मात्र नेहमीं या ना त्या प्राध्यापकाच्या घरीं असावयाची. त्यांच्यांत बोलतां वागतांना दिवाकरांना वाटलें तरी कितीसें मोकळें वाटणार ? शिवाय, जगाकडे पहाण्याची त्यांची दृष्टि उपरोधिक असल्यामुळें, मित्रांची आपल्या विषयींची सहानुभूति किंवा आदर जमेस धरतांना मानवी स्वभावाच्या मर्यादा लक्षांत घेऊन, त्यांत वजावट करण्याचीहि त्यांची प्रवृत्ति होती. या कारणांमुळें त्यांचा स्वभाव आत्मपर आणि अंतर्मुख झाला होता; व म्हणूनच त्यांनीं आपल्या मनांतील तळमळ आणि मळमळ व्यक्त करण्यासाठीं भावकवितेला ( Lyric ) सदृश असलेला नाटयछटेसारखा भावनाही लेखनप्रकार उचलला. मानी मनुष्याला आपल्या भावनांचें उघडेंवाघडें प्रदर्शन लोकांपुढें करणें रुचत नाहीं. तो आपल्या मनाच्या वेदना आणि संवेदना व्यंजनेनें आणि लक्षणेनें प्रकट करितो. दिवाकरांनीं आत्माविष्कृतिसाठीं नाटय-छटेचा अवलंब याच दृष्टीनें केला असावा. स्वतःच्या व्यक्तीचें गोपन करून तिऱ्हाईतपणाच्या आविर्भावानें आपल्या भावना-कामना व्यक्त करण्याची उत्कृष्ट संधि नाट्यछटेंत मिळते. भाव-कवितेंत मनुष्याचें व्यक्तित्व स्पष्ट आविर्भूत होतें; तर नाट्यछटेंत त्या व्यक्तित्वाच्या छटा परावर्तित होऊन प्रकट होतात; व तींत स्वतःच्या भावनांची खुलावट करण्यासाठीं मनुष्य दुसऱ्याचा अप्रत्यक्ष उपयोग करून घेतो. त्या दृष्टीनें नाटयछटा ही स्वगत आणि परगत अशी दुहेरी असते. अशा या उद्गारात्मक लेखनप्रकाराचा अवलंब करून मानधन दिवाकरांनीं आत्मगोपन आणि आत्माविष्कार या दोन्ही गोष्टी मोठया सफाईनें साधल्या.

त्यांची ही आत्मगोपनाची प्रवृत्ति पहिल्याच भेटींत माझ्या लक्षांत आली. त्यांची ठुबरी मूर्ति, टोकाशीं पीळ भरलेल्या छप्परदार मिशा, काळगेल्या ओठांवर खेळणारें उपरोधिक स्मित, चष्म्याच्या काळया फ्रेममधून रोखून पाहाणारे चोखंदळ डोळे आणि नजरेला नजर न देतां बोलण्याची तुटक पद्धति या साऱ्याच गोष्टी त्यांच्याविषयीं मनांत भीति जरी नव्हे तरी संकोच उत्पन्न करणाऱ्या होत्या. दुसऱ्याची दृष्टी टाळणारे त्यांचे ते शोधक डोळे जणू कांहीं असें सुचवीत असत कीं, मीं तुमच्याशीं वागतांना मर्यादेपलीकडे जाणार नाहीं व तुम्हींहि माझ्याशीं वागतांना मर्यादेपलिकडे जातां कामा नये. अनंततनयांनीं, माझी ओळख करून देतांना, त्या वेळीं 'नवयुगां' तून प्रसिद्ध होत असलेल्या माझ्या आधुनिक कवीं-वरील लेखांचा उल्लेख केला. तेव्हां, शिष्टाचारादाखल त्यासंबंधीं कांहींतरी बोललें पाहिजे म्हणूनच बहुधा, ते म्हणाले, 'तुम्ही चांगला आरंभ केला आहे! आधु-निक कवींवर लिहायलाच हवें होतें कुणीतरी!' माझे लेख निदान त्यांच्या दृष्टीखालून तरी गेले होते. पण डांगे यांचे 'यंग कॉलेजिएट' मधून प्रसिद्ध झालेले गोविंदाग्रजांच्या कवितांचे दोन तीन इंग्रजी अनुवाद कांहीं त्यांच्या पहाण्यांत आलेले नव्हते. त्यामुळें डांगे यांच्या वांट्याला उत्तेजनाचे माझ्याहिपेक्षां कमी उमेद शब्द आले हें काय सांगितलें पाहिजे? पण त्या थंडया स्वागतानें आम्ही कांहीं गारठलों नाहीं. आमचें दोघांचें वय त्या वेळीं विशीच्या आंत बाहेर होतें. तेव्हां आमच्यापैकीं एकाचें आधुनिक कवींवर टीकाग्रंथ लिहिण्याचें व दुसऱ्याचें त्यांच्या कवितांचे इंग्रजी अनुवाद करण्याचें धाडस दिवाकरांना पोरकटपणाचें वाटलें असलें, तर त्यांचा काय दोष? त्यांच्याशीं झालेली ही ओळख वाढीला लागण्याचा योग १९२१ सालच्या जुलैमध्यें, मीं पुण्यास श्री. न. चिं. केळकर यांच्याजवळ रहावयाला गेल्यानंतर आला. 'महाराष्ट्र शारदामंदिर' या सुमारास नुकतेंच स्थापन झालें होतें. त्याच्या रविवारच्या बैठकींना कै. दिवाकर हे बहुतेक नेमानें हजर रहात असत. ते मंदिराचे मूक सभासद होते म्हटलें तरी शोभेल. तथापि सभा आटोप-ल्यावर होणाऱ्या काव्यशास्त्रविनोदांत ते उल्हासानें भाग घेत असत; व त्यांच्या स्वभावांतील खेळकरपणा त्या गप्पांतून चांगला दिसून येत असे.

पण आमच्या परिचयाला सांद्रता येऊन थोडेंबहुत स्नेहाचें स्वरूप प्राप्त झालें, तें १९२२ च्या नोव्हेंबरमध्यें मी मुंबईहून पुण्यास येऊन स्थायिक झाल्या-नंतर. विशेषत: नारायणपेठेंत मी रहावयाला गेल्यापासून ते माझ्याकडे वारंवार

चहाला येऊं लागले; व आठवड्यांतून बहुतेक एकदां आमची बैठक नेमानें होऊं लागली. या बैठकींत देखील त्यांच्या मनाचीं कवाडें म्हणजे सताड उघडीं होत असत, असें नव्हे. पण, बोलण्याच्या भरांत किलकिल्या होणाऱ्या कवाडांतून त्यांच्या अंतरंगाचें जें ओझरतें दृश्य दिसे, तें मला मोठें मनोज्ञ वाटे. त्यांच्या शंकेखोर, हळव्या अहंभावनेला आपल्याकडून चुकूनहि ढका लागूं नये, म्हणून मी स्वतः त्यांच्याशीं फारसें न बोलतां परिप्रश्नरूपानें त्यांना बोलते करण्यांत आणि त्यांचें बोलणें ऐकण्यांत आनंद मानीत असें. त्यांच्या बोलण्यांत केशवसुत, आपटे, सीतारामपंत दामले, वासुदेवराव पटवर्धन, गडकरी, ठोमरे, भागवत, अण्णासाहेब कारखाननीस प्रभृतींविषयीं नाना प्रकारची मनोरंजक माहिती यावयाची. मात्र मनुष्यस्वभावाच्या मर्यादा त्यांनीं पुरत्या हेरलेल्या असल्यामुळें, कोणाचीहि स्तुतीं करतांना आणि दोष दाखवितांना त्यांच्या हातून अतिरेक असा कधीं घडत नसे. त्यांच्या स्वतःच्या लिखाणाविषयीं मी त्यांना पुष्कळदां छेडण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनीं मला दाद लागूं दिली नाहीं. फक्त एकदां ते एवढेंच म्हणाले होते कीं, "स्वतःच्या लिहिण्याचं रहस्य स्वतः दुसऱ्याला उकलून सांगण्याचा उद्योग माणसानं करूं नये कधीं ! दुसऱ्याला तें आवडलं एवढयावरच समाधान मानावं ! ती आवड ताणण्यांत स्वारस्य नसतं ! " या उद्गारांत विनयापेक्षां सावधपणाचाच भाग जास्त दिसून येतो. कोणाशींहि समरस होणें हें मुळीं त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. 'रविकिरण मंडळा'च्या साऱ्या सभासदांना त्यांच्याविषयीं विशेष प्रकारचें अगत्य आणि आदरहि असे. पण, झाडाचें पिकलेलें पान जसें न कळत गळून पडावें, तसे ते मंडळाचें 'किरण' हें पहिलेंच पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्यांतून अभावितपणें बाहेर पडले. पण त्यामुळें त्यांच्या आमच्यावरील लोभांत किंवा जाण्यायेण्यांतहि अंतर पडलें नाहीं.

संयम हा त्यांचा सर्वांत प्रभावी स्वभावविशेष होय. पत्नीपासून पुत्रापर्यंत अनेक प्रियजनांच्या वियोगाचे आघात सोसावे लागल्यामुळें म्हणा किंवा आकांक्षा आणि वस्तुस्थिती यांतलि विरोधाचें शल्य मनांत फार डांचल्यामुळें म्हणा त्यांच्या बोलण्याला, लिहिण्याला आणि वागण्याला एक प्रकारची धार आली होती; व त्यामुळें त्यांच्या मित्रांनाहि त्यांच्याशीं फार जपून वागावें लागे. त्यांच्या लिखाणाचा मोजकेपणा हा या संयमाचाच एक भाग होता. आपल्या लिखाणांतील शब्दच

काय, पण विरामचिन्हेंसुद्धां ते अत्यंत कसोशीनें वापरीत; व तें अगदीं लिहिल्या-बरहुकूम छापलें जावें, याबद्दल ते अतिशय दक्ष किंबहुना हळवे असत. 'ज्ञानप्रका-शा'च्या ' काव्यशास्त्रविनोदां 'त त्यांची नाट्यछटा मी पहिल्यांदा प्रसिद्ध केली, त्या वेळची मला चांगली आठवण आहे. त्या दिवशीं सायंकाळीं जेव्हां ते अचानक माझ्या घरीं आले, तेव्हां त्यांना पहातांक्षणींच मी उमजलों कीं, नाट्यछटेच्या छपाईत कांहीं तरी अक्षम्य चूक झाली असावी. प्रथम औपचारिक संभाषण आणि कॉफीपान झाल्यावर ते माझ्याकडे न बघतांच म्हणाले, " याचसाठीं मी कुठें कांहीं छापायला द्यायला तयार नसतों!" त्यावरोबर ते मुद्यावर आले असें जाणून मी त्यांना सरळच विचारलें, " कांहीं चूक राहिली आहे का आजच्या नाटयछटेंत ? " " तसं विशेष कांहीं नाहीं.- पण डॅश न् उद्गारचिन्हं भलतीकडे पडल्यामुळं सगळं स्वारस्य गेलंय त्या छटेचं ! " असें म्हणून त्यांनीं खिशांतला ' ज्ञानप्रकाशा ' चा अंक बाहेर काढला; व त्यांत झालेली ती चिन्हांची गल्लत मला काळजीपूर्वक समजावून सांगितली. खाणावळींत जेवणाराला जशी भातांत सांपडणाऱ्या खड्यांची कधीं खंत वाटत नाहीं, तसेंच वर्तमानपत्रांत काम करणाऱ्या माणसाला असल्या चिल्लर मुद्रणदोषांचें महत्त्व जाणवत नाहीं. पण त्या चुका दाखवितांना गंभीर आणि त्रस्त झालेली त्यांची ती मुद्रा पाहून मीं स्वतःला येत असलेलें हसूं आवरलें; व त्या मुद्रणदोषांबद्दल त्यांची मनःपूर्वक क्षमा मागून पुन्हा असा प्रमाद घडणार नाहीं, अशी त्यांना हमी दिली. त्यांची तक्रार एका अर्थानें बरोबर होती. कारण नाटयछटेंत शब्दांइतकेंच महत्व चिन्हांना असतें; व तिच्यांतील व्यंजना व्यक्त करावयाला चिन्हांचाच उपयोग जास्त होत असतो. म्हणून, मी पुढें त्यांच्या ज्या नाटयछटा प्रसिद्ध केल्या, त्यांत कोणत्याही प्रकारची चूक राहूं दिली नाहीं.

त्यांच्या स्वभावांतल्या हळवेपणाचा हा जसा एक अनुभव सांगितला, तसाच दुसराहि सांगितला पाहिजे. लॉर्ड मोर्ले वारल्यावर ' ज्ञानप्रकाशा ' च्या काव्य-शास्त्रविनोदांत मी पांच कॉलमांचा मृत्युलेख त्यांच्यावर लिहिला. तो लेख प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या उत्कृष्टपणाबद्दल माझें अभिनंदन करणारें कै. श्री. बा. टिळक यांचें पत्र त्याच दिवशीं दुपारच्या डांकेनें मला आलें; व सायंकाळीं मी शहरांत गेल्यावर माझे ज्येष्ठ सहकारी कै. बा. मा. आंबेकर यांनीहि त्याबद्दल माझी पाठ थोपटली. शहरांतून परत आल्यावर सोसायटीच्या बगीचांतील बांकावर मी माझ्या

बंगाली मित्राबरोबर गप्पा मारीत बसलों होतों. इतक्यांत कै. दिवाकर अचानक तेथें आले; व मला म्हणाले, " अहो गजाननराव, मुद्दाम तुमचं अभिनंदन करायला आलोंय बरं का ! आज शाळेंतून आल्यावर स्वस्थपणानं तुमचा मोर्ले साहेबांवरचा लेख वाचला न् मनाला मोठा आनंद वाटला ! हें सांगण्यासाठींच आलोंय तुम्हांला,– म्हटलं जावं न् सांगून टाकावं आपल्याला काय वाटलं तें ! " वास्तविक दुसऱ्या दिवशीं रविवार असल्यामुळें माझी आणि त्यांची भेट आमच्या चहाच्या क्लबांत नेहमीप्रमाणें झालीच असती. पण माझा लेख वाचल्यावर त्यांना रहावेना; व म्हणून त्यांनीं मुद्दाम मला भेटून आपलें मनोगत खुल्या दिलानें व्यक्त केलें. त्यांचे ते उद्गार ऐकून मला आपल्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटलें. कारण ते इंग्रजी वाङ्मयाचे दर्दी होते; व त्याहिपेक्षां महत्वाची गोष्ट ही कीं, त्यांच्या तोंडून स्तुतीचा प्रांजळ शब्द बाहेर पडणें हें कांहीं सोपें काम नव्हतें. त्या वेळीं आणि त्या नंतर अनेकांनीं माझ्या त्या लेखाची तारीफ केली आहे. पण, कै. दिवाकर यांच्या त्या स्तुतीच्या अनाहूत शब्दांनीं माझ्या मनाला जें समाधान झालें तें कांहीं और होतें.

त्यांच्या हळवेपणाची ही आठवण पुस्तकाच्या आपल्याला आवडलेल्या भागांत खुणेसाठीं घालून ठेवलेल्या केवड्याच्या पानासारखी आहे. त्या पानाचा सुगंध कायम असला, तरी त्याचे कांटे मात्र बोथटून गेलेले असतात. या सहृदय स्मृतींच्या सुवासानें मन कोंदलेलें असतांनाच त्यांच्या आठवणी लिहिण्यासाठीं हातीं घेतलेली ही लेखणी मी खालीं ठेवतों.

—ज्योत्स्ना, आक्टोबर १९३७

# कवि यशवंत

१९२१ सालच्या जुलै महिन्यांतील गोष्ट. मी त्या वेळीं पुण्यास नुकताच आलेलों होतों; व कै. अनंततनय यांच्याशिवाय इतर कोणत्याही कवीशीं माझी ओळख नव्हती. म्हणून महाराष्ट्र शारदामंदिराच्या दर रविवारीं भरणाऱ्या बैठकीला ते मला मुद्दाम त्या दिवशीं आपल्याबरोबर घेऊन गेले. सदाशिव पेठेंतील राममंदिराच्या माडीवर शारदामंदिराची कचेरी होती; व त्या माडीला लागून असलेल्या खोलींत श्री. यशवंत हे तेव्हां रहात असत. पुण्यांतील बहुतेक प्रमुख वृद्ध तरुण कवि तिथें जमलेले होते. प्रथम प्रास्ताविक चर्चा झाल्यावर अनंततनयांच्या सूचनेवरून श्री. यशवंत यांनीं खड्या सुरांत पंजाबांतील दडपशाहीवरील आपलें काव्य वाचून दाखविलें. तें काव्य कांहीं मला फारसें आवडलें नाहीं. पण मनाला हलवून सोडणारा तो सकंप आवाज, अबोध भावनांची दीप्ति प्रकट करणारे ते सतेज डोळे, वासनेच्या आवेगानें किंचित् थरथरणारे ते सतृष्ण ओठ आणि कपाळावर वारंवार येणारे केस मागें सारण्याची ती सावेश लकब !—ते वाचीत असलेल्या त्या काव्यांत जें ओज आणि असमाधान भरलेलें होतें, तेंच जणुं आपण मूर्तिमंत समोर बघत आहों, असा मला भास झाला; व माझ्या चित्तवृत्ति क्षणैक उचंबळून आल्या. काव्याचें वाचन संपल्यावर अनंततनयांनीं माझा त्यांच्याशीं परिचय करून दिला. त्याबरोबर ते एकदम माझ्याशीं इतक्या आपुलकीनें बोलले कीं, त्या अनोळखी पुणें शहरांत आपल्याला जिव्हाळ्याचा मित्र भेटला असें मला वाटलें.

आमच्या भेटीच्या त्या पहिल्या दिवशीं श्री. यशवंत यांना पाहून माझ्या मनावर जो परिणाम झाला, त्यानें आमच्या स्नेहाचें स्वरूप एका परीनें निश्चित केलें. ते असें कीं, त्यांच्याविषयीं अत्यंत प्रेम वाटावें, त्यांची कविता इतर कोणाच्याही कवितेपेक्षां अधिक आवडावी, पण त्यांच्याशीं समरस मात्र कोणत्याच बाबतींत होतां येऊं नये. मला केव्हां केव्हां असें वाटतें कीं, आम्हांला एकमेकांना प्रत्यक्ष भेटण्याची संधि मिळण्यापूर्वीच नियतीनें आमच्य मैत्रीचें हें स्वरूप

निश्चित करून टाकलें होतें. १९१९ सालच्या जुलैमध्यें मुंबईच्या ' नवयुग ' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या ' केशवसुतांचा संप्रदाय ' या माझ्या पहिल्याच लेखांत गोविंदाग्रजांवर मी केलेल्या टीकेला जें उत्तर श्री. खांडेकर यांनीं दिलें होतें, त्याचें खंडन करणारा लेख ' तारकानाथ ' या सहीनें श्री. यशवंत यांनीं त्या मासिका-कडे पाठविला होता. पण त्यांतील विचारसरणी मला न पटल्यामुळें तो त्यांचा लेख ' नवयुगांत ' येऊं शकला नाहीं. वस्तुतः, त्यांनीं अगदीं प्रथमपासून माझ्यावर जितकें उत्कट प्रेम केलें आहे, तितकें प्रेम, श्री. खांडेकर यांच्याशिवाय, बहुधा दुसऱ्या कोणत्याही लेखक--मित्रानें केलें नसेल. पण माझ्या हातून मात्र त्या प्रेमाची फेड होऊं शकली नाहीं. कदाचित् माझ्या मनाचा फाजील चिकित्सकपणा व त्यांच्या मनाची फाजील संवेदनशीलता आमच्या स्नेहाला बाधक ठरली असेल. त्यांचा स्वभाव अतिशयच हळवा आहे. इतका कीं, त्यांच्या बाबतींत पुष्कळदां संवेदनेचें पर्यवसान अखेर वेदनेंत व विचाराचें विकारांत होतें. शिवाय, संसारांत राहून त्यांची अवस्था, भरल्या घरांत उपाशीं तडफडण्याचा प्रसंग यावा, तशी झाली आहे. ज्या व्यक्तींचें मन बहिर्मुख व महत्वाकांक्ष व्यावहारिक असतात, त्यांना संसारांतील सुखाची उणीव कधींच तीव्रतेनें जाणवत नाहीं. कारण त्यांच्या आयुष्यांत भावनेपेक्षां विवेकाला आणि प्रेमापेक्षां कीर्तीला अधिक प्राधान्य मिळत असतें. त्यांचें जीवन म्हणजे जणुं कांहीं निर्जळ शेती. भावनांचा ओलावा त्यांच्या आयुष्यांत जितका कमी, तितकें त्यांच्या कर्तृत्वाला तेज जास्त. उलट धानाच्या शेतीला जसें पावसाचें शिंपण सतत लागतें, तसें कांहींचें जीवन केवळ भावनामय असतें. श्री. यशवंत यांची मनोरचना अशा प्रकारची आहे.

त्यामुळें अगदीं क्षुल्लक गोष्टीचा सुद्धां त्यांच्या मनावर फार परिणाम होतो. १९२५ सालच्या मे महिन्यांत पुण्याहून नागपूरला येण्यासाठीं आगगाडींत चढत असतांना मी त्यांना घाईघाईनें माझ्या लग्नाचें आमंत्रण दिलें; व त्याबरोबर त्यांची थोडी थट्टाही केली. पण त्या सहजगत्या उच्चारलेल्या शब्दांनीं त्यांच्या काळजाला अगदीं घरे पाडले. आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशींच्या मेलनें त्यांचे जें पत्र मला आलें, त्यांत त्यांनीं अगदीं तळतळून असें लिहिलें होतें कीं:—

'गजाननराव, माझ्या मनांतून तुमच्या लग्नाला यावयाचें फार होतें. परंतु शेवटच्या घडीपर्यंत आमंत्रण न देतां अखेरीस आगगाडींत आमंत्रणाचा जो फार्स

तुम्हीं केलात, त्यामुळें मी फारच कष्टी झालों. आणि तुम्हीं गेल्यापासून मन अतिशय बेचैन झालें आहे. गजाननरावांच्या हातून माझ्या बाबतींत असें विपरीत वर्तन हें कांहीं आज पहिल्यानेंच घडत नाहीं, म्हणून मन एकीकडून अधिकाधिक नाराज होत आहे, तर गजाननरावांनीं माझ्यावर प्रेमही अलोट केलें आहे, म्हणून एकीकडून गहिंवरून येत आहे. गजाननरावांच्या आठवणीनें माझें मन व्यापलें आहे. घरांत कुठेंही पाऊल टाकलें तरी पावलागणिक मला गजाननराव दिसूं लागतात; घरांत कुठेंही नजर टाकली तरी नजरेंत येणाऱ्या वस्तूंत मला गजाननराव दिसूं लागतात—रोज घांस घेतांना तुमची आठवण झाली नाहीं असें नाहीं. माझें आजपर्यंतचें जिणेंच मित्रमय आहे."

या उद्गारांत यत्किंचितही अतिशयोक्ति नाहीं. १९२४ सालच्या जानेवारीमध्यें माझा खोकल्याचा आजार विकोपाला जाऊन, मला क्षयाची भावना होण्याचा संभव असल्याबद्दल डॉक्टरांनीं भीति व्यक्त केल्याची बातमी त्यांच्या कानावर जातांच, ते तडक टांगा घेऊनच माझ्या घरीं आले; व मला येरवड्यास दोन महिने आपल्या घरीं ठेवून घेऊन त्यांनीं माझी परोपरीनें शुश्रूषा केली. त्यांची ती गंभीर, किंचित् उग्र मुद्रा पाहिल्यावर ते इतके प्रेमळ असतील, असें प्रथमदर्शनीं तरी वाटत नाहीं. पण त्यांचें मन मुलासारखें हळवें आणि फुलासारखें हळुवार आहे. त्यांच्या स्वभावाच्या या बेसुमार हळवेपणामुळें त्यांना स्वतःला ताप होतो व त्यांना प्रिय असलेल्या व्यक्तींनाही ताप होतो. संसारांतील सर्वांत अभिलषणीय सुखाला आंचवण्याचा प्रसंग आल्यामुळेंच, त्यांच्या प्रेमळ मनावर निराशेची दुष्ट सांवली पडून, त्यांचा स्वभाव इतका तापट आणि त्रासिक झाला आहे. त्यांच्या कवितेंतून सतत घुमणारा निराशेचा एकच एक विदारक सूर पाहून पुष्कळांना आचंबा वाटतो. पण त्यांना हें माहित नाहीं कीं, श्री. यशवंत यांचें जीवन हें वरून रजत-शुभ्र बर्फानें झांकलेल्या पण आंतून प्रखर उष्णतेनें भाजून निघणाऱ्या ज्वालामुखीसारखें आहे.

श्री. यशवंत हे खरोखरीच दऱ्याखोऱ्यांतील कवि आहेत. चाफळपासून थोड्या अंतरावर असलेल्या कृष्णेच्या खोऱ्यांतील तारळें नांवाच्या गांवीं ता. ९ मार्च १८९९ रोजीं त्यांचा जन्म झाला; व नोकरीच्या निमित्तानें पुण्यास येईपर्यंतचें त्यांचें बहुतेक आयुष्यही शिवसमर्थांची कर्मभूमि म्हणून गाजलेल्या कृष्णा-

बाईच्या परिसरांतच गेलेलें आहे. एरवीं वैयक्तिक निराशेच्या विषण्ण छायेनें झांकोळून गेलेल्या त्यांच्या कवितांतून मधून मधून देशाभिमानाची जी प्रखर दीप्ति झळाळते, ती याच कारणामुळें. चाफळ खोऱ्यांतील मांडनदीला उद्देशून गाईलेल्या आपल्या एका हृदयस्पर्शी गीतांत त्यांनीं असे उद्‌गार काढले आहेत कीं—

संचरतांना तीरावरतीं,
अर्घ्य कितीदां समर्थ हातीं,
पडले असतिल तुझिया पात्रीं
समर्थदूति तूंच होउनी फिरवियला आदेश,
खनाळांतुनि वाहे खळखळ,
पूर्वीपरि हें तव जळ झुळझुळ
मुक्या मनाची दारुण तळमळ
तुझिया गानीं मला ऐकुं दे दासांचा उपदेश.

शिव–समर्थांच्या स्पर्शानें पवित्र झालेल्या कृष्णेच्या पुण्योदकावर त्यांच्या प्रतिभेची जोपासना झाली आहे. मला पुष्कळदां असें वाटतें कीं, जन्मभूमीच्या प्रशांत वातावरणाचे संस्कार जर त्यांच्या प्रमाथी मनावर उत्कटतेनें झाले नसते, तर त्यांचें मन निराशेच्या आहारीं पुरतें जाऊन, आज जी त्यांच्या पिचलेल्या जीवनाला थोडी तरी उज्ज्वलता आलेली दिसत आहे, तीहि मुळींच दृष्टीस पडली नसती. आपल्या काळोखीनें आकाश झांकून टाकून दिशा कुंद करून सोडणाऱ्या गर्द ढगांच्या कडा सुवर्णानें रंजित होऊं शकतात. पण केव्हां ? अस्तंगत सूर्याची परावर्तित प्रभा जर क्षितिजावर शिल्लक असेल तर. महाराष्ट्राच्या पूर्ववैभवाची स्मृति श्री. यशवंत यांच्या हृदयांत तीव्रतेनें जागृत असल्यामुळेंच मांडवीच्या मुक्या मनाची तळमळ त्यांच्या कवनांतून इतक्या ओजस्वितेनें प्रकट झाली आहे. त्यांच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांच्या वडिलांची बदली झाली. त्यामुळें बारसें झाल्याबरोबर त्यांना तारळयाहून चाफळ येथें स्वतःच्या घरीं आणण्यांत आलें. या प्रसंगाविषयीं बोलतांना ते एकदां सांगत होते, कीं, "बैलगाडीच्या प्रवासांतील हादरे–हिसके सोसण्यासारखी माझी स्थिति नसल्यामुळें, मला एका मोठ्या हाऱ्यांत घालून व त्यावर हिरव्यागार पानांची सांवली करून हमालाच्या

डोक्यावरून चाफळला माझी रवानगी झाली." पण आयुष्यांतला त्यांचा हा पहिला प्रवास जरी अत्यंत सुखाचा झाला असला, तरी पुढील आयुष्य मात्र एकंदरींत कष्टांतच गेलें. चाफळ येथें शिक्षणाची कोणतीच सोय नसल्याकारणानें त्यांना लहानपणींच घर सोडून विद्यार्जनासाठीं सांगलीस यावें लागलें; व तिथें श्री. साधुदास यांच्यासारख्या प्रेमळ गुरूच्या कृपाछत्राखालीं जरी त्यांचा विद्याभ्यास चांगल्या रीतीनें झाला, तरी प्रवेशपरीक्षेंत यश मिळून सुद्धां त्यांना घरच्या गरीबीमुळें विद्यापीठांत प्रवेश करितां आला नाहीं. शिवाय आईच्या मृत्युमुळें त्यांना घरही असून नसल्यासारखें झालें. आईचें वात्सल्य आणि वडिलांचा करारीपणा यांचा जितका परिणाम त्यांच्या मनावर झाला आहे, तितका प्रायः दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा झालेला नाहीं.

श्री. यशवंत यांची प्रतिभा सर्वथैव स्वयंभू आहे. म्हणजे असें कीं ग्रंथांपेक्षां सृष्टीपासून व कलेपेक्षां जीवनापासून तिनें अधिक स्फूर्ति घेतली असून, इतरांच्या विचारांपेक्षां स्वतःच्या भावनांत रमणेंच तिला जास्त आवडतें.

The air that floated by me seemed to say
"Write ! Thou wilt never have a better day'
And so I did.

हे इंग्रजी कवि कीट्स यानें स्वतःविषयीं काढलेले उद्गार त्यांना अगदीं यथार्थतेनें लागू पडतात. त्यांच्या भोंवतालचें चाफळ खोऱ्यांतील वातावरण निसर्गाच्या दृष्टीनें काव्यमय आणि इतिहासाच्या दृष्टीनें स्फूर्तिप्रद होतें. त्या वातावरणानें त्यांची प्रतिभा बाळपणींच बोलती केली. त्यांना लहानपणीं भजन—कीर्तनाचा विलक्षण छंद होता; व त्यांतूनच अनुकरणाच्या लालसेनें त्यांची छंदोमयी वाणी प्रकट झाली. ते सांगलीला आल्यावर श्री. साधुदास यांच्या प्रोत्साहनामुळें त्यांनीं कवितालेखनाला पद्धतशीर प्रारंभ केला. तेवढ्यापुरतें श्री. साधुदास यांना त्यांचे गुरु मानतां येईल, किंबहुना तो मान श्री. यशवंत त्यांना देतातही. पण 'विहारां'तून व्यक्त झालेल्या श्री. साधुदास यांच्या संस्कृतप्रचुर रचनाशैलीचा मात्र त्यांच्या लेखनावर यत्किंचितही परिणाम झाला नाहीं. सांगलीहून पुण्यास आल्यावर त्यांच्या कवितेला नवीन आणि निश्चित वळण

लागलें. त्या वेळीं अविकसित स्थितींत असलेल्या त्यांच्या प्रतिभेचें सामर्थ्य ओळखून तिच्या उन्मेषाला परोपरीनें जर कोणी हातभार लावला असेल, तर तो श्री. गिरीश व विशेषतः प्रो. श्री. बा. रानडे यांनीं. प्रो. रानडे हे स्वतः कदाचित् मोठे कवि नसतील. पण, दुसऱ्याच्या अजाण, अबोल अगर लाजऱ्या कल्पनांना त्याच्या कलानें घेऊन फुलविण्याचें त्यांचें कौशल्य मात्र अवर्णनीय आहे. श्री. यशवंत यांच्या असंस्कृत प्रतिभेवर नव्या ज्ञानाचे संस्कार करून, त्यांच्या सौंदर्यलोलुप मनाला स्थूलाकडून सूक्ष्माकडे वळवून व त्यांच्या प्रमाथी भावनाना संयमाचें महत्त्व शिकवून प्रो. रानडे यांनीं त्यांच्या कवितेंत, त्यांना जवळ जवळ न कळत, रमणीय परिवर्तन घडवून आणलें. रानडे दंपत्याचा अभिजात सहवास हा त्यांच्या बाबतींत अभिजात वाङ्मयाच्या गाढ अध्ययनासारखाच जणुं कांहीं प्रभावी ठरला. 'यशवंती' या त्यांच्या पहिल्या पुस्तकांतील कविता नंतर प्रसिद्ध झालेल्या 'यशो–गिरीं'च्या 'वीणाझंकार' या पुस्तकांतील त्यांच्या कवितांशीं तुलून पाहिल्या असतां या परिवर्तनाची चांगली कल्पना येईल. त्यांचें वाचन अत्यंत मर्यादित आहे. शिवाय, त्यांच्या स्मृतिपटलावर वाचलेल्या विषयाचा ठसा फार काळ टिकत नसल्यामुळें, उत्कृष्ट वाङ्मयाच्या व्यासंगानें जें एक प्रकारचें, कृत्रिम कां होईना, ऐश्वर्य लेखनाला येतें, तेंही त्यांच्या कवितेला येण्याची शक्यता नव्हती. त्या दृष्टीनें मला पुष्कळदां असें वाटतें कीं, प्रो. रानडे यांच्याशीं जर त्यांचा संबंध न येता आणि रविकिरणमंडळ जर स्थापन न होतें, तर श्री. यशवंत यांच्या प्रतिभेचा विकास कदाचित् इतका झाला नसता. 'यशवंती'-पासून 'यशोधना'पर्यंतची त्यांच्या प्रतिभेची प्रगति म्हणजे रविकिरणमंडळाकडून न कळत घडलेल्या कामगिरीचें एक स्मारक आहे.

मला एक संस्मरणीय प्रसंग अजूनही तीव्रतेनें आठवतो. 'यशवंती' छापण्याचें ठरवून त्या काव्यसंग्रहाची मुद्रणासाठीं तयार केलेली प्रत ज्या वेळीं श्री. यशवंत यांनीं मला दाखविली, त्या वेळीं मी तें पुस्तक न काढण्याचा सल्ला त्यांना निक्षून दिला; व पुढें तें प्रसिद्ध झाल्यावर 'नवयुगांत' त्यावर थोडी प्रतिकूल टीकाही केली. कल्पकता आणि भावनाशालिता हे जे त्यांच्या प्रतिभेचे दोन आत्मीय विशेष, ते त्याहि संग्रहांतील कवितांतून व्यक्त झाले होते. पण, संस्कारांमुळें या त्यांच्या दोन गुणविशेषांना पुढें जी विलक्षण रम्यता आली,

तिचा आढळ मात्र त्या पुस्तकांत होत नाहीं. रविकिरणमंडळानें जर कांहीं केलें असेल, तर तें फक्त एवढेंच कीं, त्यांच्या अलौकिक पण असंस्कृत प्रतिभेला सौंदर्याचे नवे प्रांत दाखविले आणि विचारांची नवीन दृष्टि दिली. पण त्यामुळें त्यांच्या प्रतिभेच्या स्वयंभूपणाला यत्किंचितही बाध येत नाहीं. त्याची साक्ष हीच कीं, श्री. गिरीश आणि श्री. माधवजूलियन यांच्यासारखे तुल्यगुण वडिलधारे विद्वान् कवि त्यांचे सहकारी म्हणून लोकांपुढें असतांनाही 'यशोधना' च्या निर्मात्याचें यश सर्वथैव निस्तुळच राहिलें. किंबहुना त्यांच्या सहवासांत राहूनही त्यांच्या मानानें कमी शिक्षित असलेल्या या दऱ्याखोऱ्यांतल्या कवीनें आपलें वैशिष्ट्य कोणत्याच बाबतींत गमावलें नाहीं. त्यांची भाषासरणी स्वतंत्र आणि भावाविष्कारही स्वतंत्र आहे. समकालीनाचा जसा त्यांच्या कवितेवर परिणाम झालेला नाहीं, तसाच पूर्वकालीनांचाही झालेला नाहीं. श्री. गिरीश यांच्या अभिनवकाव्यमालेच्या तिसऱ्या भागांतील कविता जर वाचल्या, तर बालकवींच्या रचनेची आरंभीं तरी त्यांच्यावर केवढी छाप होती, याची कल्पना येते; व श्री. माधवजूलियन यांची कविता तर सर्वस्वी अभियुक्त आहे. आपल्या ठिकाणीं असलेलें हें विद्वत्तेच्या अभावाचें वैगुण्य श्री. यशवंत यांनीं कल्पकतेच्या जोरावर इतक्या उत्कृष्ट रीतीनें भरून काढलें आहे कीं, पूर्वसूरींच्या कल्पनांचे बहुश्रुतांच्या कानाला आकर्षक वाटणारे पडसाद त्यांच्या कवितेंतून जरी कुठेंच उमटलेले नसले, तरी त्यांच्या भावगीतांचें निरुपम नावीन्य इतरांच्या पांडित्यप्रचुर घोटीव रचनेपेक्षां मनाला अधिक भुरळ घालतें. या नावीन्याला त्यांच्या कल्पकतेइतकीच त्यांची भावनाशालिताही कारण झालेली आहे. त्यांच्या इतका आत्मपर कवि महाराष्ट्रांत दुसरा क्वचितच आढळेल. " माझी कविता हा माझ्या सुखदुःखांचा परिपाक आहे," असें ते पुष्कळदां म्हणतात. आणि तें अगदीं खरें आहे. त्यांच्या या आत्मपरतेमुळेंच ते कवि झाले. त्यांचें आयुष्य जर सुखांत गेलें असतें तर कदाचित् त्यांनीं कविता मुळींच लिहिली नसती; व ज्या नाट्यकलेकडे त्यांचा लहानपणापासून मनस्वी ओढा आहे तिचीच उपासना त्यांच्या हातून घडली असती. 'पावनगड' आणि 'रक्तांजली' हीं दोन नाटकें त्यांच्या दप्तरांत लिहून पडलेलीं आहेत, हें सांगितलें असतां कुणाला खरें वाटेल? पण निराशेनें त्यांच्या जीवनाला शोष लागल्यासारखा होऊन त्यांची प्रतिभा आत्मपर बनली. या आत्मसमाधींतून त्यांची सारी भावकविता उत्स्फूर्त झाली आहे.

कवि या नात्यानें श्री. यशवंत यांची योग्यता जितकी थोर आहे, तितकीच मनुष्य या नात्यानेंहि आहे. गेलीं पंधरा वर्षे त्यांनीं एक प्रकारच्या वनवासांत काढलीं आहेत; व तो वनवासही असा कीं, ज्याविषयीं खुल्या दिलानें कुठें चकार शब्दही बोलण्याची सोय नाहीं. त्या दारुण मनोवेदनांना कवितांतून काय वाचा फुटेल, तेवढीच.

मी स्वतःच असुनी विमल जलाचा झरा,
आमरण राहणें तृषाक्रांत घाबरा,
ही नीति दयासागरा तुझी निष्ठुरा
कां न निखंदू तुला जोंवरी नरक असा जीवनीं
गुदमरे जीवहि त्या दडपणीं

हे त्यांनीं तळतळून काढलेले उद्गार त्यांना सोसाव्या लागत असलेल्या दुर्धर मनस्तापाचे निदर्शक आहेत. दहा वर्षांपूर्वीं त्यांचें आयुष्य थोडें तरी सुखावह व्हावें, म्हणून आम्हीं आमच्याकडून प्रयत्न करून पाहिला. पण त्यामुळें उलट तें अधिक दुर्वह मात्र झालें. परंतु, नाजुक जागीं घुसून रुतून बसलेल्या गोळीचें दुःख सतत डांचत असतां चेहेऱ्यावर तें यत्किंचितही उमटूं न देतां धीरानें दिवस कंठणाऱ्या झुंजार माणसासारखी त्यांची वृत्ति आहे. आपल्या हृदयाची आग विझविण्यासाठीं त्यांनीं स्वतःच एकांतांत काय अश्रु कधीं गाळले असतील तेवढेच. इतरांपासून सहानुभूतीची अपेक्षा कधींच केली नाहीं. आणि म्हणूनच त्यांच्या प्रेमाची फेड अल्पांशानेंही आपल्या हातून न झाल्याबद्दल मला मनस्वी दुःख होतें. आपल्या वैराण जीवनांत त्यांना विरंगुळा जर कधीं कशाचा वाटला असेल, तर तो कवितेचा. पण त्यांच्या या मानसकन्येचें कोडकौतुकही माझ्या हातून फारसें झालें नाहीं. वस्तुतः, ते ज्या वेळीं नुकतेच पुढें येत होते, त्या वेळीं प्रथम 'नवयुग' आणि नंतर 'ज्ञानप्रकाश' या दोन प्रमुख नियतकालिकांशीं माझा निकट संबंध होता. पण, श्री. माधव जूलियन यांच्या कवितेच्या बाबतींत एक प्रकारचा प्रसार करण्याची आवश्यकता मला वाटल्यामुळें, त्यांना जितका माझ्या या संबंधाचा फायदा मिळाला, तितका तो, श्री. यशवंत यांच्यावर माझें नितांत प्रेम असूनही, त्यांना मिळूं शकला नाहीं.

माझ्या हातून बुद्धिपुरस्सर घडणारा हा पक्षपात जरी त्यांना फार लागत असे, तरी त्यांचें मजवरील प्रेम मात्र अढळच राहिलें. " माझा तुमच्यावरचा भाव अढळ आहे. तुमच्या अपराधांनीं तो ढळला नाहीं आणि पुढेंही तो अढळच राहील," हे त्यांचे त्या पत्रांतले उद्गार मला आठवले, म्हणजे माझें हृदय भरून येतें. येरवड्याला असतांना मी एकदां त्यांना गमतीनें म्हटलें होतें कीं, " यशवंतराव, या दुखण्यांत जर मला मरण आलें, तर मी पुढच्या खेपेस तुमचा पाठचा भाऊ म्हणून जन्माला येईन. " आणि खरोखरीच त्यांचा पाठचा भाऊ व्हावयाला मिळणें, यापरतें जगांत दुसरें श्रेष्ठ भाग्य कोणतें असूं शकेल ?

प्रतिभा, १२ आक्टोबर. १९३४

# बॅ. सावरकर

——:※:——

बॅ. विनायकराव सावरकर यांनीं गेल्या तीस वर्षांत निर्माण केलेल्या विविध वाङ्मयाचें जर समालोचन केलें, तर ओज, कल्पकता आणि ध्येयदर्शित्व हे तीन गुण त्यांत उत्कटतेनें प्रतीत होतात. त्यांची मनोवृत्ति युयुत्सु असून देशाभिमान हा त्यांच्या वाङ्मयाचा स्थायिभाव आहे; व त्याच्या आश्रयानें त्यांच्या या गुणविशेषांचा उत्कर्ष झालेला दृष्टीस पडतो. त्यांच्या मनाची युयुत्सुता इतकी विलक्षण आहे कीं, शृंगाररसांत पोहतांना सुद्धां तें फारसें मृदु होऊं शकत नाहीं. ' कमला ' आणि ' विरहोच्छ्वास ' या त्यांच्या काव्यांत शृंगाराचे संभोग आणि विप्रलंभ हे दोन्हीहि प्रकार सामान्यतः आलेले आहेत. पण, त्यांच्या परिपोषांत सावरकरांची कल्पकता जरी सुंदर रीतीनें प्रकट झालेली असली, तरी त्यांत कोमलता मात्र एकंदरींत कमीच आढळते. ' कमला ' काव्यांत मुकुंद--कमला यांच्या प्रथम संगमाचें जें वर्णन तपशीलवार केलेलें आहे, तें वाचतांना असें वाटतें कीं, कालिदासाची सदयोपभोगाची कल्पना उपमा देण्याच्या बाबतींत त्यांच्याशीं स्पर्धा करणाऱ्या या कवीला संमत नसावी. त्यांचा करुण रस हा पुष्कळदां भयानकांत व रौद्ररस पुष्कळदां बीभत्सांत जो पर्यवसित होतो, तो तरी याच कारणामुळें.

ज्या कवीची मनोवृत्ति इतकी युयुत्सु आहे, त्याच्या वाङ्मयांत ओजोगुण ओळीओळींतून रसरसत असावा, यांत काय आश्चर्य ? मात्र सावरकरांच्या वाणींतील हें ओज सामान्य दर्जाचें नाहीं. सभांतील भाषणें किंवा वृत्तपत्रांतील लेख यांतून ज्या प्रकारचा जोरकसपणा आढळतो, त्यापेक्षां त्यांच्या वाणींतिलें ओज अगदीं निराळ्या प्रकारचें आहे. त्यांच्या वाङ्मयांतील ओज जें मनाला इतकें मोहित आणि विस्मित करितें, त्याचें मुख्य कारण असें कीं, त्याचा आविष्कार हा कल्पकतेनें युक्त व ह्मणून अत्यंत भव्य असा असतो. त्यांनीं ऐन तारुण्यांत लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्रांत व कांहीं पोवाड्यांतहि जोरकसपणा भरपूर आहे; पण कल्पकता मात्र प्रायः मुळींच नाहीं. उलट त्यांच्या अंदमानांतील विजनवासांत व नंतरहि लिहिलेल्या काव्यांत आणि ' माझी जन्मठेप ' वगैरे

गद्यग्रंथांत ओज आणि कल्पकता यांचा इतका उत्कृष्ट मेळ पडलेला आहे कीं, जगाच्या अभिजात वाङ्मयांत त्या ग्रंथांची गणना साहित्यकोविदांना करावी लागेल. वर्षर्तूतील गडगडणाऱ्या काळयाकभिन्न मेघांवर किंवा शरदृतूंतील रंगाळणाऱ्या चित्रविचित्र अभ्रांवर तरलतेनें तळपणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें त्यांच्या कल्पकतेचें या ग्रंथांतील नर्तन केव्हां रम्य तर केव्हां रोमांचकारी आणि केव्हां भव्य तर केव्हां भीषण वाटतें.

त्यांच्या वाङ्मयांतील ओजोगुणाप्रमाणेंच त्यांची कल्पकताहि लोकोत्तर आहे. तिच्या विशालतेचें अभिजात स्वरूप पाहिलें, म्हणजे ' न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ' असेच उद्गार कोणाच्याहि तोंडून निघतील. गेल्या पाऊणशें वर्षांत महाराष्ट्रामध्यें कल्पकतेच्या बाबतींत उल्लेखनीय असे चिपळूणकर, शिवरामपंत परांजपे, श्रीपाद कृष्ण आणि अच्युतराव कोल्हटकर, केळकर, गडकरी अत्रे व खांडेकर हे आठ लेखक निर्माण झालेले आढळतात. यांपैकीं ज्यांच्या कल्पकतेला आपण अभिजात म्हणूं शकूं असे लेखक चिपळूणकर आणि परांजपे हे दोनच दाखवितां येतील. अभिजात कल्पकतेचें मुख्य लक्षण म्हणजे भव्यता. रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गांत कामधेनूला घेऊन परत येणाऱ्या दिलीपाला कविकुल-गुरूनें दिलेली ' दिनक्षपामध्यगतेव संध्ये ' ची उपमा ही या भव्यतेचें उदाहरण म्हणून सांगतां येईल. कोल्हटकर आणि त्यांचे शिष्य गडकरी यांच्या वाङ्मयांतून अशा विशाल उपमा क्वचित् दृष्टीस पडतात, ही गोष्ट खरी. पण त्यांच्या कल्प-कतेचें वैशिष्ट्य चापल्य किंवा तरलता हें आहे; भव्यता हें नव्हे. उलट चिपळूणकर आणि परांजपे यांच्या कल्पकतेचें वैशिष्ट्य भव्यता किंवा विशालता हें असून, त्यामुळेंच त्यांचें वाङ्मय इतकें सामर्थ्यसंपन्न आणि स्फूर्तिदायक झालें आहे. सावरकरांची कल्पकताहि याच वर्गांत मोडते. ती फुलपांखराप्रमाणें तरल आणि मोहक नाहीं, तर गरुडाप्रमाणें तेजस्वी आणि भव्य आहे; तिच्यांत झऱ्याचा अवखळपणा नाहीं, तर सागराचें गांभीर्य आहे; व फुलवेलीचें मार्दव नाहीं, तर विद्युल्लतेची प्रखरता आहे. ' जगन्नाथाचा रथोत्सव ' ही त्यांची एकच कविता जरी वाचली, तरी त्यांच्या कल्पकतेच्या या वैशिष्ट्याचा प्रत्यय येईल.

त्यांच्या ओज आणि कल्पकता या गुणांप्रमाणेंच त्यांचें ध्येयदर्शित्वहि अनन्यसामान्य वाटतें. त्या दृष्टीनें त्यांच्या वाङ्मयाचे दोन कालखंड पाडतां येतील. १९११ सालीं जन्मठेपेची शिक्षा होईपर्यंत त्यांच्या हातून जें वाङ्मय

निर्माण झालें, त्यांत विशुद्ध स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार केलेला आहे. त्यानंतरच्या, विशेषतः गेल्या बारा वर्षांतील, वाङ्मयांत स्वातंत्र्याच्या पुरस्काराला गौण स्थान मिळून, हिंदु जातीच्या पुनरुत्थानाच्या ध्येयाला प्रामुख्य मिळालें. पहिल्या म्हणजे स्वातंत्र्याच्या ध्येयाची स्फूर्ति त्यांनीं मॅझिनीप्रभृति पाश्चात्य स्वातंत्र्योपासकांचें तत्वज्ञान, कै. शि. म. परांजपे यांचें 'काळ' पत्र आणि शिवकालीन इतिहास यांच्यापासून घेतली होती. उलट दुसऱ्या म्हणजे हिंदु जातीच्या पुनरुत्थानाच्या ध्येयाची स्फूर्ति त्यांनीं अखिल भारताच्या उज्ज्वल प्राचीन इतिहासापासून घेतलेली आहे. त्यांचा मॅझिनीवरील चरित्रप्रबंध व पोवाडे हे त्यांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचे निदर्शक आहेत; तर 'सन्यस्तखड्ग' नाटक व 'गोमांतका' दि काव्यें हीं हिंदु जातीच्या पुनरुत्थानाच्या ध्येयाचीं द्योतक आहेत. त्यांच्या या दोन्ही बाबतींतील ध्येयदर्शित्वाला लोकोत्तर म्हणावयाचें तें या कारणामुळें कीं, स्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांच्या इतक्या निर्भयतेनें कोणी केला नाहीं व हिंदु जातीच्या पुनरुत्थानाचा पुरस्कार त्यांच्या इतका व्यापकतेनें कोणी केला नाहीं. शक्याशक्यतेच्या अगर युक्तायुक्ततेच्या मर्यादा पहाणें किंवा पाळणें हें मुळीं त्यांच्या युयुत्सु मनोवृत्तीला मानवतच नसावेसें दिसतें. त्यामुळें असें होतें कीं, ते ज्या ध्येयाचा पुरस्कार करितात त्याला अत्यंत प्रभावी, अत्यंत प्रखर स्वरूप प्राप्त होऊन त्यांच्या तद्विषयक वाङ्मयांत रणघोषणेचा जोष संचरतो.

त्यांच्या गेल्या बारा वर्षांत प्रकाशित झालेल्या वाङ्मयाला जी इतकी अभिजात आणि उज्ज्वल विशालता आली आहे, तिचें कारण १९११ सालानंतर त्यांच्या ध्येयदृष्टींत झालेलें परिवर्तन हेंच होय. वस्तुतः हिंदु जातीच्या पुनरुत्थानाचें ध्येय हें सकृद्दर्शनीं तरी जातिविशिष्ट व म्हणून संकुचित भासणारें असल्यामुळें, त्यांच्या वाङ्मयांत विचारांचा किंवा कल्पनांचा कोतेपणा उत्पन्न व्हावयाला हवा होता. पण तसें न घडतां उलट त्याला विलक्षण विशालता आणि भव्यता आली. याचें कारण असें कीं, हिंदु जातीच्या पुनरुत्थानाचा विचार करितांना सावरकर जसे जातीपासून भाषेपर्यंत साऱ्या गोष्टी पाहातात, तसेंच वेदकालापासून तों शीखकालापर्यंत ते साऱ्या इतिहासाचा मागोवा घेतात. हिंदु संस्कृतीचा असा एकहि विशेष नाहीं किंवा हिंदु समाजाच्या इतिहासाचा असा एकहि कालखंड नाहीं कीं, ज्यांतील स्फूर्तिकणाचा उपयोग त्यांनीं आपल्या ध्येयाच्या प्रतिपादनासाठीं केला नसेल. हिंदु जातीच्या पुनरुत्थानाला प्रोत्साहक असे स्फूर्तिकण निवडून काढण्यासाठीं

त्यांनी वेदांपासून ग्रंथसाहेबांपर्यंत साऱ्या काळांतील आणि साऱ्या भाषांतील वाङ्मय अवगाहिलें असून, त्याचा अत्यंत मार्मिक उपयोग आपल्या गद्यपद्य ग्रंथांतून केला आहे. त्यांच्या काव्यांतून, नाटकांतून आणि इतर ग्रंथांतून आर्ष, पौराणिक आणि ऐतिहासिक कल्पना आणि संदर्भ यांचा सुंदरतेनें आणि विपुलतेनें उपयोग केलेला असल्यामुळेंच त्यांच्या साऱ्या वाङ्मयाला इतकें रम्य आणि भव्य स्वरूप आलें आहे. 'कमला,' 'सप्तर्षि,' 'विरहोच्छ्वास,' आणि 'जगन्नाथाचा रथोत्सव, या त्यांच्या काव्यांतून हिंदु जीवन, संस्कृति, तत्वज्ञान आणि इतिहास यांच्याविषयींच्या इतक्या सुंदर आणि विशाल कल्पना ग्रथित केलेल्या आहेत कीं, तितक्या त्या गेल्या शंभर वर्षांतलि कोणत्याहि आधुनिक कवीच्या काव्यांत आढळणार नाहींत.

आणि म्हणूनच मी म्हणतों कीं, मराठी कवींच्या प्रणालिकेंत सावरकरांचें स्थान सर्वोच्च आहे. प्रतिभा, पांडित्य आणि पौरुष यांचा ऊर्जस्वल संगम त्यांच्या कवितेंत झालेला असून, त्यांच्या रचनेंत जरी प्रसाधनाचें सौष्ठव कमी असलें, तरी तींत दिल्लीचें तक्त फोडणाऱ्या मराठी वीरांच्या भाल्याची चमक आणि भूलोकीं वैकुंठ निर्मिणाऱ्या मराठी संतांच्या भावनांची चारुता एकवटलेली आहे. 'गोमांतक' 'कमला,' 'सप्तर्षि' 'विरहोच्छ्वास' इत्यादि त्यांचीं काव्यें विद्वत्ता, ओज आणि कल्पकता यांनीं इतकीं संपन्न आहेत कीं, महाकाव्य रचावयाला अवश्य असलेली विशाल, ध्येयदर्शी आणि अभिजात प्रतिभा ( Epic Genius )त्यांच्या ठिकाणीं वसत आहे, असें म्हणावयाला शंका वाटत नाहीं. किंबहुना, परतंत्र हिंदु राष्ट्राच्या, गतकालीन विक्रमवैभवाचे भव्य चित्रपट लोकांच्या डोळ्यांपुढें उभे करून त्यांचा अभिमान आणि स्वातंत्र्याकांक्षा उद्दीपित करण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न जर गेल्या तीस वर्षांत कोणी केला असेल, तर तो फक्त एवढयाच एका कवीनें. अशा या प्रभावशाली कवीच्या प्रतिभेची अवस्था आज पंख जळल्यामुळें लोळागोळा होऊन पडलेल्या संपातीसारखी होऊन बसावी, हें महाराष्ट्राचें दुर्दैव नव्हे काय ?

—प्रतिभा, डिसेंबर १९३५

# जॉन मोर्ले

——:*:——

गेल्या आठवड्यांत आलेली जॉन मोर्ले यांच्या मृत्यूची बातमी वाचून वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि राजकारण यांची अभिरुचि असलेल्या कोणत्याही सुशिक्षित मनुष्याला खेद झाल्यावांचून राहणार नाहीं. राजकारणाची आवड ही बहुधा सर्वच लोकांना असते. त्यांतही हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशांत जिथें राजकीय चळवळ हा अनेक व्यक्तींचा एकच व्यवसाय होऊन बसला आहे, तिथें प्रचलित घडामोडींचें मार्मिक ज्ञान असो अगर नसो, चव्हाट्यावर, बाजारांत किंवा खाणावळींमध्यें चालू राजकारणाची चटोर चर्चा हटकून व हवी तितकी ऐकूं येते. पण, असलें सामान्य लोकांच्या शिळोप्याच्या गप्पांतून बोकाळणारें अगर त्या गप्पांचाच प्रतिध्वनि प्रायः ज्यांत उमटलेला असतो तें सभांतील वक्तृत्वांतून गाजणारें राजकारण निराळें ! आणि मानवजातीचें पाऊल प्रगतीच्या मार्गावर पडावें म्हणून ज्यांची सदैव धडपड चाललेली असते त्या विशाल बुद्धीच्या तत्वज्ञांचें राजकारण निराळें ! ह्यूम, बर्क आणि मिल यांनीं उभारलेला उदारमतवादाचा ध्वज, रूढ विचारांच्या किंवा राजकीय वादांच्या संसर्गाची धूळ लागूं न देतां, उत्साहानें उचलून धरण्याचा प्रयत्न मोर्ले यांनीं आमरण केला. तत्कालीन राजकारणावर या प्रयत्नाचा कितपत परिणाम झाला, त्याला यश आलें अगर नाहीं, हा भाग वेगळा, कारण राजकीय चळवळ ही एक मानवी जीविततसागरावरील क्षणभर उठून लगेच फुटणारी लाट आहे. उदात्त तत्त्वज्ञानाचें शुभ्र आणि शीतळ चांदणें त्या लाटेवर फुटल्यासारखें दिसलें, तरी तेवढ्यामुळें त्याची योग्यता कमी आहे, असें कोण मानील ?

मोर्ले यांचा जन्म सन १८३८ सालीं ब्लॅकबर्न येथें झाला. त्यांचे वडील जोनॅथन मोर्ले हे शस्त्रवैद्य होते. त्यांचा बराच विद्याभ्यास ब्लॅकबर्न येथें झाला आणि इथेंच त्यांचे विद्यार्थिदशेंतील ऐन उमेदीचे दिवस गेले. व्यासंगी किंवा विद्वान् मनुष्याच्या प्रतिभाविकासाला जी शांततेची परिस्थिति अवश्य असते, ती प्रायः त्यांना कधींच लाभली नाहीं. त्यांचें सर्व आयुष्य, शह-

रच्या बकाली वस्तींत व कारखान्यांतील धुरानें काळवंडलेल्या कोंदट वातावरणांत, नाना प्रकारचे उद्योग आणि उलाढाली करण्यांत गेलें. सन १८५९ सालीं बी. ए. झाल्यावर, लेखणीच्या जोरावर नशीब काढण्याच्या निश्चयानें, त्यांनीं लंडन शहरांत पाऊल ठेविलें. हा निश्चय पार पाडण्याची धमक त्यांच्या अंगीं होती म्हणूनच त्यांना भाग्याचे दिवस दिसले, यांत शंका नाहीं. वर्डस्वर्थ, टेनिसन, कार्लाईल, मिल प्रभृति अनेक प्रतिभाशाली ग्रंथकार त्या वेळीं विद्यमान होते. त्यांच्या यशस्तेजानें दिपलेल्या सुबुद्ध समाजाला आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखविण्याची हिंमत मोर्ले यांनीं धरली व ती तडीस नेऊन लेखक या नात्यानें पहिल्या प्रतीचा लौकिक संपादन केला. वाङ्मय-व्यवसायांतील हे त्यांचे उमेदवारीचे दिवस कसे खडतर गेले हें पाहिलें, म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं; व “ क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ” या सुभाषिताची सार्थकता मनाला पटते. अगदीं आरंभीं रे. फ्रेडरिक अर्नोल्ड यांच्या ‘ लिटररी गॅझेट ’ या नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनीं कांहीं दिवस काम केलें. पण मोर्ले यांच्यासारखा हौशी, निरलस व बुद्धिमान् संपादक मिळूनही तें नियतकालिक फार काळ चाललें नाहीं.

तत्कालीन वाचकवर्गाला त्यांची ओळख याच नियतकालिकानें प्रथम करून दिली. हें नियतकालिक बंद झाल्यावर त्यांनीं शाळामास्तराचें काम कांहीं दिवस केलें. याच सुमारास पॅरिस येथें जाऊनही त्यांनीं हा शिकविण्याचा धंदा केला. पॅरिस येथें असतांना त्यांनीं फ्रेंच वाङ्मयाचें बारकाईनें परिशीलन केलें. तेथें संपादिलेल्या या ज्ञानाचा त्यांना पुढें फ्रेंच ग्रंथकारांवर टीकात्मक प्रबंध लिहितांना अतिशय उपयोग झाला. सन १८६५ सालीं त्यांचा पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचा परिणाम, विचारी वाचकवर्गाला या नवथर पण होतकरू लेखकाचा विशेष परिचय करून देण्यापलीकडे, फारसा झाला नाहीं. परंतु यानंतर दोनच वर्षांनीं, म्हणजे सन १८६७ सालीं, बाहेर पडलेल्या एडमंड बर्क याच्या चरित्रानें त्यांची लोकोत्तर बुद्धिमत्ता समव्यवसायी रसिकांच्या निदर्शनाला आणून दिली. यापुढें त्यांच्या वाङ्मयकीर्तीचा उत्तरोत्तर जो उत्कर्ष होत गेला, त्यानें अद्याप ओहोट पाहिलेली नाहीं. सन १८६७ पासून १९१८ पर्यंत एकंदर अर्धशतकाच्या अवधींत त्याचे, टीकात्मक विविध लेखसंग्रह

(१८७१–७७) व्हॉल्टेअर, (१८७१) रूसो, (१८७३) तडजोड, (१८७४) डिडरो व इतर ज्ञानकोशकार, (१८७८) कॉब्डेन, (१८८१) वाङ्मयचर्चात्मक लेख, (१८९१) मॅकिॲव्हेली, (१८९७) क्रॉमवेल, (१९००) ग्लॅडस्टनचें चरित्र, (१९०३) इतिहास व राजकारण यांवरील टिपणें (१९१३) आणि आठवणी (१९१८) हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. या ग्रंथांनीं केवळ इंग्रजी वाङ्मयच नव्हे तर सर्व जगाचें वाङ्मय समृद्ध केलें आहे, असें म्हटल्यास खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. वाङ्मयकीर्ति ही जितकी टिकवावयाला तितकीच मिळवावयालाही कठीण असते. लेखणीच्या एकाच घोडदौडीसरशी लोकप्रियतेचें शिखर गांठलेले फर्डे कलमबहाद्दर पुष्कळ आढळतात. पण शर्यतीच्या मैदानावर सहजासहजीं मिळा-लेल्या संपत्तीहून त्या कीर्तीचा शाश्वती अधिक नाहीं.

ग्रंथकार म्हणून संपादिलेल्या या लौकिकांत मोर्ले यांनीं राजकीय कामगिरीनें बरीच भर घातली. आयुष्याचीं चाळीस वर्षें ग्रंथलेखनाच्या बैठ्या व संथ व्यवसायांत घालविल्यावर, पक्षविषयक राजकारणाच्या धामधुमींत पडण्याची महत्वाकांक्षा त्यांनीं धरावी, याचें नवल वाटतें. लेखनाचा धंदा हा जिकीरीचा तर खराच; पण त्यांत दगदग झाली तरी मनालाच फार होते. उलट सार्वजनिक चळवळींच्या आखाड्यांत पडणाराला मन तर खंबीर लागतेंच, पण शरीरहि कमी कणखर असून चालत नाहीं. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर निंदखोर टीकाकारांच्या फूत्कारांना तोंड देणें अवघड तर खरेंच. परंतु लोकांच्या घरोघरीं जाणाऱ्या वर्तमानपत्रांच्या रकान्यांतून अगर सार्वजनिक सभांच्या चवाठ्यावर प्रतिदिवशीं होणारी नालस्ती मनावर मुळींच न घेतां, केवळ कर्तव्यबुद्धीनें राष्ट्रीय चळवळींत काम करणें, हें त्याहूनही अवघड. स्वतःच्या लिहिण्याच्या खोलींत आवडत्या ग्रंथकारांचीं पानें चाळीत, कवितांच्या ओळी गुणगुणत किंवा समानशील स्नेह्यांशीं चर्चा करीत लेखनव्यवसायांत जवळ जवळ अर्धा जन्म घालविलेल्या मनुष्यानें, रक्त थंड होऊन आयुष्याच्या उतरणीला लागल्यावर, राजकारणाच्या सदा क्षुब्ध आवर्तांत उडी घेण्यास प्रवृत्त व्हावें, हा कुणाला अविचार वाटणार नाहीं ? परंतु वाङ्मय आणि राजकारण या दोनहि व्यवसायांच्या क्षेत्रांत पराक्रम करून दाखविण्याचा हुरूप आणि यश मिळविण्याची हिंमत ज्या मनुष्याला असेल त्यानें आपल्या तेजस्वी बुद्धीला कोणत्या तरी एकाच व्यवसायाच्या धुरेला लावणें, हा निव्वळ वेडेपणा होय. शिवाय, एका व्यवसायांत बुद्धि स्थिर होऊन यशस्वी झाल्यावरही मनाला पुष्कळ वेळां अशी तळमळ लागते

कीं, कांहीं ना कांहीं तरी सार्वजनिक कार्य आपल्या हातून व्हावें; व म्हणून, लाभालाभाची पर्वा न करतां, मनुष्य केवळ त्या तळमळीनें प्रेरित होऊन सार्वजनिक चळवळीच्या व्यापांत पडतो. यामुळें खुद्द त्याची व कदाचित् ज्या व्यवसायाला त्यानें आपली बुद्धि वाहिली असेल, त्या व्यवसायाचीही हानि होत असेल. परंतु, ही तळमळ कित्येक वेळां इतकी प्रबळ असते कीं, तिला लगाम घालून मनाला कायमचें निरुत्साह करण्यापेक्षां, थोडें नुकसान सोसूनही शक्य तर दोनहि व्यवसाय सांभाळण्याचा यत्न करणें, हें अधिक चांगलें.

सन १८८३ सालीं मोर्लें पार्लमेंटांत निवडून आले. त्यापूर्वीं दोन वेळां त्यांनीं निवडून येण्याचा यत्न केला होता. पण तो फसला. स्वतंत्र विचारांचा प्रतिभावान् लेखक म्हणून या वेळीं त्यांचा लौकिक सर्व युरोपभर झाला होता. ज्या उदात्त तत्त्वांचा उपदेश त्यांनीं जन्मभर केला आणि जीं कृतींत उतरल्यामुळें मानवी जीविताला किती उज्ज्वलता आली आहे, हें दाखविण्याकरितां त्यांनीं विभूतींच्या चरित्रांचें विवेचन केलें, तीं तत्त्वें राजकारणाच्या शबल व्यवहाराला लागू करण्याचा प्रसंग आतां त्यांच्यावर आला. व्हॉल्टेअरनें म्हटल्याप्रमाणें राजकारण हा शुद्ध असत्याचा बाजार आहे. परंतु, या असत्याच्या बाजारांतही तत्त्वनिष्ठेचें तेज पडल्यावांचून रहात नाहीं, हें सिद्ध करण्याची धडपड मोर्लें यांनीं मनःपूर्वक केली; व यांतच त्यांच्या राजकीय चारित्र्याचें मोठेंपण आहे. सार्वजनिक चळवळींत पडणाऱ्या व्यक्तींना जसें खाजगी तसेंच लौकिक शीलही असतें. तत्त्वनिष्ठा, स्वार्थत्याग, सत्याचरण, प्रतिपक्षाविषयींही अनुदार मनानें विचार न करण्याची प्रवृत्ति आणि बुद्धीला जें पटेल तें बोलून दाखविण्याचें व त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य या गुणांना लौकिक शील म्हणतां येईल. राजकीय चळवळींत घडोघडीं मतपरिवर्तन होतांना दृष्टीस पडतें; पण हें मतांतर कबूल करण्याचें धैर्य किती व्यक्ति दाखवितात? उलट, शब्दांवर कसरत करून, बहुजनसमाजाची नजरबंदी करणारे कमकुवत मनाचे कोटिबाज गारुडीच फार आढळतात. स्वतःच्या मनाची वंचना करून घेणें, हें कदाचित् क्षम्य ठरेल. कारण त्या वंचनेची व्याप्ति फक्त एका व्यक्तीपुरतीच असते. पण असमंजस समाजाची बुद्धिपुरःसर फसवणूक करीत रहाणें, यासारखें दुसरें पातक नाहीं. मोर्लें यांच्या हातून भरीव व टिकाऊ अशी राजकीय कामगिरी फारशी झाली नसेल; पण बुद्धीला जें पटलें त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य त्यांनीं वेळोवेळीं दाखविलें, यांत शंका नाहीं. आणि Honest

John Morley—' प्रामाणिक जॉन मोर्ले, म्हणून जी त्यांची ख्याति झाली तीहि यामुळेंच होय.

मोर्ले निवडणुकीस उभे राहिले, त्या वेळीं त्यांच्या पुस्तकी विद्येचा प्रभाव पार्लमेंटांत पडणार नाहीं, असें भाकित अनेकांनीं वर्तवलें. जगाशीं सामान्यतः फटकून वागणारा हा व्यासंगी मनुष्य पार्लमेंटांतील वावदूक राजकारणाच्या वावटळींत टिकाव धरील, असें कुणालाच वाटलें नाहीं. आयर्लंडचा पुढारी पार्नेल याच्या सूचनेवर पार्लमेंटांत त्यांचें जें पहिलेंच भाषण झालें, तें चालू असतां टोरी पक्षाच्या सभासदांनीं पुष्कळ गडबड केली. वस्तुतः नवीन सभासद जेव्हां पहिलेंच भाषण करावयाला उठतो, तेव्हां तें कसेंही असलें तरी शांतपणानें ऐकून घेण्याचा साधारण शिष्टाचार आहे. पण आयर्लंडच्या स्वराज्यासारखा अप्रिय विषय व त्यांतही मोर्ले यांची सडेतोड भाषणपद्धति यांमुळें टोरी सभासदांच्या सहनशीलतेला ताण बसला; व शिष्टाचार पाळणेंही त्यांना शक्य झालें नाहीं. या पहिल्याच भाषणामुळें त्यांचें वादपटुत्व आणि उदार विचारसरणी सर्वांच्या निदर्शनाला आली. त्यांच्या पार्लमेंटांतील कारकीर्दीचा आरंभ या दृष्टीनें या भाषणाचें महत्त्व फार आहे. आयर्लंडची स्वराज्याची चळवळ त्या वेळीं नुकतीच सुरू झाली होती; व त्या चळवळीचा पराक्रमी सूत्रधार जो पार्नेल त्याचें नांव पार्लमेंटांत त्या वेळीं फारसें गाजलें नव्हतें. तो एक माथेफिरू चळवळ्या आहे अशीच तत्कालीन इंग्रजी मुत्सद्यांची समजूत होती, पण या वेळींच मोर्ले यांनीं त्याची योग्यता ओळखली; व आयरिश इतिहासकार जस्टिन मॅकॉर्थी यानें आपल्या आठवणींत नमूद केल्याप्रमाणें, इंग्रजी मुत्सद्यांनीं पार्नेलला विश्वासांत घेऊन आयरिश प्रश्नाची कांहीं तरी तडजोडीनें तड लाविली पाहिजे नाहीं तर पुढें कठिण प्रसंग येईल, असा तर्कही मोर्ले यांनीं त्याच वेळीं केला होता.

पार्नेल व आयर्लंडांतील स्वराज्याची चळवळ यांच्याशीं पार्लमेंटांतील पहिल्याच दिवशीं त्यांचा जो संबंध आला. तो अखेरपर्यंत तुटला नाहीं. त्यांच्या भाषणाच्या वेळीं जी गडबड उडाली तिनें गोंधळून न जातां त्यांनीं शांत चित्तानें आपलें भाषण पुरें केलें; व ज्या पार्लमेंटानें त्याची पहिल्याच दिवशीं अशी संभावना केली, त्याच पार्लमेंटांत त्यांनीं आपल्या निर्भय आणि विद्वत्तापूर्ण वक्तृत्वानें लवकरच पुढारीपण मिळविलें, पार्लमेंटांतील मोर्ले यांची महत्वाची प्रशंसनीय कामगिरी आयरिश होमरूलसंबंधाची होय. लिबरल ऊर्फ उदारमतवादी पक्षाचे

त्या वेळचे जगद्विख्यात पुढारी ग्लॅडस्टन यांच्याशीं त्यांचा निकट परिचय प्रथम पार्लमेंटांत झाला; व या परिचयाचें पर्यवसान पुढें गुरुशिष्यसंबंधांत झालें. ग्लॅड-स्टनसाहेबांनीं राजकारणांतून अंग काढून घेतल्यावर व त्यांच्या मृत्युनंतरहि त्यांची आयरिश स्वराज्याची पार्लमेंटांतील चळवळ ज्यांनीं तत्परतेनें पुढें चालविली, त्यांत मोर्ले यांची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. किंबहुना असेंहि म्हटलें असतां चालेल कीं, आयरिश स्वराज्याच्या बाबतींत ग्लॅडस्टनसाहेबांनीं जें निकराचें अनुकूल धोरण स्वीकारलें तें बव्हंशीं मोर्ले यांच्या सतत चाललेल्या तरफदारीमुळेंच होय. स. १८८५ सालीं नवीन निवडणुकीच्या वेळीं मिडलोथियनच्या मतदारांना उद्देशून ग्लॅडस्टनसाहेबांनीं जो जाहीरनामा काढला, त्यांत उदारमतवादी पक्षाचें आयरिश चळवळीसंबंधाचें अनुकूल धोरण निस्संदिग्ध शब्दांनीं नमूद केलें होतें. हा जाहीरनामा बाहेर पडतांच मोर्ले यांनीं, त्याला आपली पूर्ण संमति दर्शवून, इंग्लंड व आयर्लंड यांचें पाऊणशें वर्षें चाललेलें वैर ग्लॅडस्टनसाहे-बांच्या या धोरणानें लवकरच मिटेल, अशी इच्छा व्यक्त केली. या निवडणुकी नंतर आयर्लंडचे मुख्य सेक्रेटरी म्हणून त्यांचा ब्रिटिश प्रधानमंडळांत प्रथमच प्रवेश झाला.

आयर्लंडचे मुख्य सेक्रेटरी म्हणून एकंदर तीन वेळां त्यांनीं ग्लॅडस्टन-साहेबांच्या प्रधानमंडळांत काम केलें. सेक्रेटरी या नात्यानें आयर्लंडांत ते कधींच लोकप्रिय झाले नाहींत. पण राजकारणांतील कामगिरीची किंमत लोकप्रियतेच्या कसाला लावून करणें चुकीचें होईल. तत्वनिष्ठेला लोकप्रियतेचें अधिष्ठान लाभलेलें क्वचितच आढळून येतें. शिवाय अधिकाराची जबाबदारी शिरावर घेतल्यामुळें मनुष्याला कित्येक वेळां, राज्यकारभाराच्या दृष्टीनें इष्ट पण लोकमताला अप्रिय अशा अनेक गोष्टी कराव्या लागतात. पण, अधि-कारी नसतांना आयरिश स्वराज्याची वकिली मोर्ले यांनीं जितक्या तडफेनें केली, तितक्याच तडफेनें पुढें अधिकारारूढ झाल्यावरहि केली. आयर्लंडचे आजचे इतिहासकार त्यांच्या या तत्वनिष्ठेबद्दल त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतात. आयरिश राजकारणाच्या बाबतींत स्वीकारलेलें हें उदार धोरण त्यांनीं वसाहतीं-लाहि लागू केलें. वसाहतींना स्वराज्य देण्यांतच साम्राज्याची शाश्वती आहे;

मध्यवर्ती सरकारच्या ठिकाणीं सर्व सत्ता केंद्रीभूत केल्यानें असंतोष मात्र माजेल, असें त्यांचें मत होतें; म्हणून दक्षिण आफ्रिकेशीं तंटा होऊन, ज्या वेळीं बोअर युद्ध उपस्थित झालें, त्या वेळीं साम्राज्य सरकारच्या संकुचित धोरणाचा त्यांनी जाहीर रीतीनें धिक्कार केला. युरोपांतील विजिगीषु राष्ट्रांच्या अंतःकलहांत इंग्लंडनें सामील व्हावें, हेंहि त्यांना संमत नव्हतें; व याच कारणामुळें महायुद्ध सुरू होतांच त्यांनीं राजकारणांतून आपलें अंग अजिबात काढून घेतलें.

उदारमतवादाचा असा एकनिष्ठ अभिमानी असलेला मुत्सद्दी स. १९०५ सालीं ज्या वेळीं, हिंदुस्थानचा स्टेट सेक्रेटरी झाला, त्या वेळीं हिंदी लोकांना काय वाटलें असेल !—

He, the reverent student of Burke, the disciple of Mill, the friend and biographer of Gladstone-will he courageously apply their principles and his own to the Government of this country, or will he too succumb to the influences of the India office around him and thus cast a cruel blight on hopes which his own writings have done so much to foster ?"

या भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांनीं राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून त्या वेळीं विचारलेल्या मार्मिक प्रश्नांत तत्कालीन सुशिक्षित लोकमत उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झालें आहे. या प्रश्नांत गर्भित असलेल्या अपेक्षेला अनुरूप अशी कामगिरी मोर्ले यांच्या हातून फार थोडी झाली, असेंच मत आज कोणीही देईल. पण त्या वेळची एकंदर परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे त्याबद्दल त्यांना सर्वस्वी दोष देतां येईल, असें वाटत नाहीं. आयर्लंडच्या बाबतींत इंग्लंडचें लोकमत थोडें तरी तयार झालेलें होतें; व मोर्ले यांनाहि आयरिश राजकारणाची प्रत्यक्ष माहिती पुष्कळ होती. उलट हिंदुस्थानाच्या स्थितीचें त्यांना दुरूनसुद्धां कांहींच ज्ञान नव्हतें. त्यांतच सन १९०५ सालानंतर कर्झनशाहीपासून धुमसत असलेल्या असंतोषाला क्रांतिकारकांच्या चळवळींच्या रूपानें एकदम तोंड फुटलें.

अशा स्थितींत मोर्ले यांच्या उदारमतवादानें दडपशाहीचा उग्र अवतार धारण केला, यांत नवल नाहीं. स. १९०५ पासून १९१० सालपर्यंत अवघ्या पांच वर्षांच्या अमदानींत दडपशाहीच्या कायद्यांची जितकीं घातक अस्त्रें त्यांच्या हातून सुटलीं, तितकीं गेल्या बारा वर्षांत क्वचितच सुटलीं असतील. डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट आणि रौलट ॲक्ट हे अलीकडील काळांतील दोन कायदे सोडले, तर दडपशाहीचें असें एकही अस्त्र नाहीं कीं, जें मोर्ले यांनीं सरकारी कायद्यांच्या अक्षय्य भात्यांत गंजत पडूं दिलें ! क्रांतिकारकांच्या चळवळींचा नायनाट करण्याकरितां जें सांपडलें तें शस्त्र त्यांनीं हवें तसें हाताळलें. विधिनिषेध असा मुळीं मानलाच नाहीं. आयर्लंडांतहि त्यांची कारकीर्द थोड्या फार फरकानें अशाच प्रकारची झाली. परंतु आयर्लंडची स्वराज्याची चळवळ फलद्रूप व्हावयाला त्यांचे अविश्रांत परिश्रम कारण झाले असल्यामुळें, त्यांच्या तेथील कारकीर्दीचें कठोर स्वरूप विसरावयाला इतिहासकार आज तयार आहेत. उलट, हिंदी राजकीय चळवळीला त्यांनीं प्रोत्साहन तर दिलें नाहींच; पण साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी करणाऱ्या विचारी देशभक्तांच्या कपाळावरहि माथेफिरूपणाचा शिक्का मारला. उदारमतवादाचा अधःपात याहून अधिक तो काय व्हावयाचा ? तथापि मोर्ले यांचा दोष यांत असला तरी थोडा आहे. गोखले यांनीं आपल्या प्रश्नांत ध्वनित केल्याप्रमाणें, हिंदुस्थानाचा राज्यकारभार अनियंत्रितपणानें वहिवाटणाऱ्या नोकरशाहीच्या प्रतिगामी धोरणाची पकड त्यांच्या प्रगमनशील बुद्धीवरहि इतकी घट्ट बसली कीं, हिंदी राजकीय चळवळी-बद्दल उदार मनानें विचार करणें त्यांना अशक्य झालें.

अर्थात् या स्थितींतहि त्यांनीं ज्या सुधारणा हिंदुस्थानाच्या शासनपद्धतींत घडवून आणल्या, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. या सुधारणांची योजना अमलांत आणतांना त्यांना कुठून व कसकसा विरोध झाला, याचा इतिहास त्यांच्या आठवणींच्या उत्तरार्धांत सांपडतो. ही योजना तयार होत असतां हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीनें तिला जितकें चांगलें स्वरूप आणतां येईल तितकें आणण्याचा कै. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं कसून प्रयत्न केला. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या सर विल्यम वेडर्बर्न यांच्या चरित्रांत या त्यांच्या उद्योगाची थोडी माहिती आली आहे. गोखले यांचा प्रयत्न जास्तींत जास्त मिळविण्याचा, तर मोर्ले यांची इच्छा फक्त जरूर तितकेंच देण्याची, अशी स्थिति असल्यामुळें

या सुधारणांना यावें तसें भरदार स्वरूप आलें नाहीं. परंतु या सुधारणा कितीही तुटपुंज्या असल्या, तरी प्रातिनिधिक राज्यपद्धतीचा पाया त्यांनीं हिंदुस्थानांत घातला, हें निर्विवाद आहे. आणि, मोर्ले यांच्या कारकीर्दीतील अनिष्ट प्रकार विसरून त्यांचें अभिनंदन जें करावयाचें, तें तरी याच कारणामुळें. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळण्याच्या कल्पनेची तोंडानें हेटाळणी करीत असतां त्यांना हें क्वचितच कळलें असेल कीं, आपल्याच हातांनीं त्या स्वराज्याची पायाभरणी होत आहे. हिंदी राष्ट्रीय चळवळीचे प्रवर्तक, मोर्ले यांनीं म्हटल्याप्रमाणें, कदाचित् घायकूत असतीलहि. पण इंग्रजी मुत्सद्यांच्या कल्पनेची धांव अगदीं कोती असते, यांत मात्र मुळींच शंका नाहीं. हिंदुस्थानाच्या शासनपद्धतींत त्यांनीं घडवून आणलेल्या या सुधारणांबद्दल इंग्लंडांतील मुत्सद्दीमंडळांत त्या वेळीं किती प्रतिकूल मत होतें, याची निदर्शक म्हणून एक लहानशी गोष्ट इथें सांगतां येईल.

गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांत एक तरी हिंदी सभासद असावा असें मोर्ले यांनीं ठरविलें; व त्याला प्रधानमंडळाची अनुमतिहि मिळविली. ही त्यांची कल्पना त्या वेळच्या मुत्सद्यांना इतकी क्रांतिकारक वाटली कीं, खुद्द बादशहा एडवर्ड यांनींहि आपली नापसंती जरा तिखट शब्दांनींच त्यांच्या कानांवर घातली. हा एक मासला झाला. यावरून त्यांच्या भोंवतालच्या बिकट परिस्थितीचा अंदाज करता येतो. शिवाय कर्तबगार मुत्सद्दी या नात्यानें आपली मतें किंवा निश्चय अमलांत आणावयाला जो निग्रह किंवा धारिष्ट लागतें तें मोर्ले यांच्या ठिकाणीं थोडें कमीच होतें, असें म्हटलें तरी चालेल. विवक्षित मर्यादेपर्यंत शक्याशक्यतेचा विचार केल्यावर, निश्चयाचें निशाण त्या मर्यादेवर रोवून त्याच्या रोखानें, विरोधाची दरकार न करतां, पुढें पाऊल टाकावयाला जो बुद्धीचा कणखरपणा—करारीपणा लागतो, तो त्यांच्या ठिकाणीं फारसा नव्हता. भूतकाळाच्या अंधुक इतिहासपटावर स्वतःच्या प्रतिभेचें उज्ज्वल तेज पाडून त्यावर पराक्रमी व्यक्तींनीं केलेल्या उलाढालींची अद्भुत दृश्यें दाखविणें निराळें आणि वर्तमानकाळाच्या प्रबळ ओघांत वाहून न जातां आपल्या मतांची सत्यता व्यवहारांत प्रस्थापित करण्याच्या धडपडींत यशस्वी होणें निराळें! तत्त्वज्ञाची विचारसरणी, मुत्सद्याचा धोरणीपणा आणि वीराची धडाडी हीं एकवटल्याशिवाय अशा धडपडींत यश येणें फार कठीण. पण अशी धडपड केली, अशी धडपड करण्यांत आयुष्याचा व्यय झाला—

मग त्यांत यश येवो न येवो—इतकें जरी इतिहासांत उद्यां नमूद झालें तरी त्यांत केवढें समाधान, केवढा गौरव, केवढी कीर्ति आहे ! मोर्ले यांच्या राजकारणांतील कामगिरीला जर कांहीं महत्व असेल, तर तें हेंच होय. अति विचारी मनुष्याची व्यवहारांत जी दुर्दशा झालेली दृष्टीस पडते तीच या मननशील मुत्सद्याची राजकारणांत झाली. तथापि त्या दुर्दशेलाही इतिहासांत आदराचें स्थान आहे.

पण मोर्ले यांच्या राजकीय कामगिरीपेक्षांही त्यांच्या वाङ्मयिक कामगिरीचें महत्त्व अधिक आहे. किंबहुना उद्यां त्यांची राजकारणांतील कर्तबगारी जरी लोकांच्या स्मरणांतून कदाचित् निघून गेली, तरी त्यांच्या वाङ्मयक्षेत्रांतील यशःसौरभाचा ताजेपणा अनंत काळपर्यंत अखंड टिकेल. वर्तमानपत्राचा संपादक, टीकाकार आणि चरित्रलेखक अशा तिहेरी नात्यानें त्यांनीं वाङ्मयसेवा केली. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले त्यांचे लेख जरी चांगले असले, तरी त्यांच्या इतर ग्रंथांपुढें ते फारच फिके पडतात. वर्तमानपत्रांच्या धंद्याविषयीं त्यांना विशेष आदर असेल, असें वाटत नाहीं. स. १९०९ सालीं भरलेल्या साम्राज्यांतील वर्तमानपत्रकारांच्या परिषदेंत त्यांचें ‘ वाङ्मय व वर्तमानपत्रें ’ या विषयावर जें विनोदप्रचुर भाषण झालें, त्यांत त्यांनीं त्या धंद्याची पुष्कळच चेष्टा केली आहे. ‘ वर्तमानपत्री वाङ्मय म्हणजे गुडघाभर पाणी ’ या कार्लाईलच्या मार्मिक उक्तीचा अनुवाद करून त्यांनीं वर्तमानपत्रांच्या अंतःस्थितीचें मोठें गमतीदार वर्णन केलें आहे. या वर्णनामध्यें किंचित् अतिशयोक्ति असली आणि त्यांत भरलेला स्वानुभवाचा रंग जरी थोडा भडक असला, तरी वर्तमानपत्रांच्या धंद्याची ज्याला यत्किंचितही माहिती आहे, त्याला तें कसें पटल्यावांचून राहील ? वर्तमानपत्रांचा ज्ञानदीप हा लोकशिक्षणाच्या कार्याला अवश्य तर खराच; पण त्याच्यापासून प्रकाशापेक्षां एकंदरींत काजळीच फार पडते ही गोष्टही कांहीं खोटी नाहीं. आणि मोर्ले यांनीं केलेल्या विनोदगर्भ वर्णनाचेंही मर्म झालें तरी हेंच होय.

ग्रंथकार म्हणून मोर्ले यांची जगभर जी कीर्ति झाली, आणि विद्वन्मंडळांत त्यांना जो अग्रपूजेचा मान मिळाला, तो केवळ त्यांच्या चरित्रग्रंथांमुळें. ‘ इतिहास म्हणजे विभूतींची चरित्रपरंपरा होय, ’ हें कार्लाईलचें सुभाषित त्यांच्या या

चरित्रग्रंथांना उत्तम रीतीनें लागू पडतें. कारण तत्कालीन घडामोडींचा साद्यंत आणि सविस्तर इतिहास त्यांत सांठवलेला आहे. एकंदर समाजाच्या शीलसंवर्धनाला चरित्रांसारखें दुसरें साधन नाहीं, अशी मोर्ले यांची श्रद्धा होती. याच श्रद्धेनें प्रेरित होऊन त्यांनीं प्रथम स्वत: बर्कचें चरित्र लिहिलें; व पुढें स. १८७८ सालीं 'इंग्रजी लेखकांची चरित्रमाला' संपादन केली. लेस्ली, स्टीफन, फ्रुड, मार्क पॅटिसन, सेंट्‌स्बरी, हक्स्ले, सिडने कॉल्व्हिन, सिमॉंडस, डौडन प्रभृति कुशल लेखकांनीं मोर्ले यांच्या देखरेखीखालीं ही चरित्रमाला लिहिली असून ती आज जगन्मान्य झाली आहे. प्रत्यक्ष त्यांनीं लिहिलेलें जरी नव्हे, तरी त्यांच्या प्रेरणेनें तयार झालेलें हें वाङ्मयहि त्यांचें नांव इंग्रजी सारस्वताच्या इतिहासांत चिरंतन करावयाला पुरें झालें असतें. पण त्यांनीं स्वतः निर्माण केलेली ग्रंथसंपत्ति इतकी विपुल आणि इतकी वैभवशाली आहे कीं, तिच्यापुढें त्यांच्या स्फूर्तीनें उत्पन्न झालेल्या या वाङ्मयाचें महत्त्व मुळींच वाटत नाहीं. मानवी बुद्धीच्या आटोक्यांत आलेला ज्ञाताचा प्राय: असा एकहि प्रदेश नाहीं कीं, ज्यावर त्यांच्या सर्वगामी प्रतिभेनें पदक्षेप केला नसेल. सोळाव्या शतकांत विशाल बुद्धीच्या बेकननें ज्याप्रमाणें सर्व ज्ञात विषयांचा परामर्श आपल्या निबंधांतून घेतला, त्याचप्रमाणें अर्वाचीन काळांत मोर्ले यांनींही ज्ञाताला गवसणी घालण्याचें धाडस केलें.

सूक्ष्म दृष्टि, भेदक बुद्धि, अलौकिक कल्पनाशक्ति आणि अव्याहत व्यासंग यांचा अपूर्व मिलाफ या चरित्रग्रंथांतून झालेला दृष्टीस पडतो. चरित्रकथनाच्या सुवर्णसूत्रांत उदात्त तत्वविचारांची गुंफण मोर्ले यांनीं इतकी केली आहे कीं, या ग्रंथांहून निराळें असें त्यांचें स्वतंत्र तत्वज्ञान उरतच नाहीं, असें म्हटलें तरी शोभेल. त्यांनीं या ग्रंथांत अगदीं अपूर्व असे तत्वविचार ग्रथित केले आहेत, असें मुळींच नाहीं. ज्यांच्यापासून त्यांना तत्वचिंतनाची स्फूर्ति मिळाली, ते त्यांचे गुरु जे डेव्हिड ह्यूम बर्क, मिल व ऑगस्ट कॉंट त्यांच्या ग्रंथांतून विखुरलेल्या तत्वज्ञानाच्या गहन सूत्ररूप सिद्धांतांचेंच त्यांनीं चरित्रांच्या आधारानें विस्तृत विवेचन केलें आहे. तत्वज्ञानाच्या ग्रंथांतून दिलेले नुसते सूत्ररूप सिद्धांत सुबुद्ध वाचकालाहि बहुधा कळावयाला कठिण जातात. आणि कळले तरीहि मानवी इतिहासावर त्यांचा काय परिणाम झाला, हें समजत नाहीं. परंतु इतिहासाच्या पायावर तत्वज्ञानाची उभारणी केल्यामुळें किंवा तत्वज्ञानाच्या

अनुषंगानें इतिहासाची संगति लावल्यानें, तेच सिद्धांत समजावयाला सोपे जातात आणि हेंच कार्य विभूतींचीं चरित्रें लिहून मोर्ले यांनीं केलें. रूढ विचारांचे पाश तोडून टाकून स्वतंत्र होण्याकरितां मानवी बुद्धीनें जी धडपड केली, त्याहून वर्णनीय असा इतिहास जगांत दुसरा कसला असणार ? हाच इतिहास या चरित्रांच्या रूपानें मोर्ले यांनीं लिहिला आहे. चार्लसच्या कारकीर्दींत प्रजेच्या हक्कांकरितां इंग्लंडांत झालेली यादवी, अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध आणि फ्रेंच राज्यक्रांति यांचें सोपपत्तिक विवेचन त्यांच्या या चरित्रग्रंथांतून आढळतें.

किंबहुना पंधराव्या शतकापासून एकुणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत युरोपांत जी विचारक्रांति झाली, आणि जिचा परिणाम एकंदर जगाच्या चारित्र्यावर झाला, तिचा इतिहास या चरित्रांतून आला आहे, असेंहि म्हटलें तरी चालेल. या चरित्रांत फ्रेंच राज्यक्रांतिविषयींच्या ग्रंथांना पहिलें स्थान दिलें पाहिजे. त्यांच्या हयातींत प्रसिद्ध झालेल्या बावीस ग्रंथांपैकीं पांच या राज्यक्रांतीच्या इतिहासाला सर्वस्वी वाहिलेले असून, इतर ग्रंथांतही जिथें जिथें म्हणून या राज्यक्रांतीचे उल्लेख आले आहेत, तिथें तिथें त्यांची प्रतिभा अगदीं उचंबळून आल्यासारखी दिसते. समाजांत रूढ असलेल्या धार्मिक आणि लौकिक विचारांची कठोर चिकित्सा करणारा मोर्ले यांचा प्रखर बुद्धिवादहि याच ग्रंथांत पूर्णत्वानें प्रकट झाला आहे. त्यांच्यापूर्वीं कार्लाईलनें या राज्यक्रांतीचा इतिहास लिहिला. पण तिला कारण झालेल्या विचारप्रवर्तनाची मीमांसा करण्यापेक्षां सुंदर शद्बचित्रें रेखाटण्याकडे कार्लाईलचा कल विशेष. त्यामुळें इतिहासाला प्राणभूत असलेली सूक्ष्म चिकित्सा त्यांत कमीच आहे. त्यानंतर इतर अनेकांनीं आजपर्यंत या विषयावर आपली लेखणी चालविली आहे. परंतु, मोर्ले यांनीं भूतकालीनांना तर मागें टाकलेंच, पण पुढेंहि या राज्यक्रांतीचें इतकें सूक्ष्म आणि भव्य विवेचन कुणी करूं शकेल, असें वाटत नाहीं. एकुणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडमध्यें जे लेखक उदयास आले, त्यांत मोर्ले यांच्या तोडीचा ग्रंथकार क्वचितच सांपडेल. मेकॉले, कार्लाईल आणि रस्किन यांनीं आपल्या प्रतिभेच्या प्रभावानें एकुणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्रजी जनतेचें अंतःकरण काबीज केलें. मोर्ले हे कितीही श्रेष्ठ ग्रंथकार असले, तरी या लेखकांहून त्यांना थोडें कमीच लेखण्याचा आज प्रघात आहे. नवनवीन विचारांना किंवा उन्मादक आणि अभिनव कल्पनांना जन्म देणारी प्रतिभाशक्ति मोर्ले यांच्या ठिकाणीं कदाचित् या तीन लेखकांपेक्षां कमी असेल; पण

इतकें मात्र खरें कीं, मेकॉलेची उथळ विचारसरणी, कार्लाइलचा छांदिष्टपणा व त्याचा नाटकी आवेश आणि रस्किनचें भाबडें तत्त्वज्ञान यांमुळें त्यांचें वाङ्मय जसें सदोष वाटतें, तसें मोर्लें यांचें मुळींच वाटत नाहीं. विजांचा थिल्लर चमचमाट, धुमकेतूच्या तेजाचे अव्यवस्थित फवारे किंवा अंतराळांत घुमणारें अर्थशून्य सागरसंगीत त्यांच्या वाङ्मयांत नसेल व नाहींहि. पण मानवी मनोभूमिकेवर विशुद्ध विचारांची प्रभा पसरणारा उदात्त तत्त्वज्ञानाचा प्रशांत रत्नदीप त्यांनीं प्रज्वलित करून ठेविला आहे. आणि, त्यांच्या कार्याविषयीं आज उपस्थित झालेल्या मतभेदाचा कोलाहल ओसरल्यावर, भावी पिढ्या त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना खचित धन्यवाद देतील. कारण मानवजातीची उन्नति बुद्धिवादाच्या प्रगतीवरच अवलंबून आहे.

ज्ञानप्रकाश, ६ आक्टोबर १९२३

# लॉर्ड बायरन

लॉर्ड बायरन यानें ग्रीसच्या पुरातन भूमीवर देह ठेवल्याला आज शंभर वर्षें पूर्ण झालीं. एक शतकाचा काल हा मानवी जीविताची परमावधि दर्शवितो इतकेंच नव्हे, तर जगाच्या चरित्रांतही त्याचें महत्त्व कांहीं कमी नाहीं. एकमुखी राजसत्तेचा उच्छेद होऊन अनेकमुखी लोकसत्ता प्रस्थापित व्हावयाला अगर गहन शास्त्रीय शोधाचें पर्यवसान रोजच्या सामान्य व्यवहारांत वळून यावयाला शंभर वर्षांचा अवधि पुरेसा होतो. ज्याच्या स्वातंत्र्याकरितां शंभर वर्षांपूर्वी बायरननें आपल्या सर्वस्वाची आहुति दिली, तो ग्रीस देश त्याच्या मृत्यूनंतर स्वतंत्र झाला; व तिथें लवकरच निर्भेळ लोकसत्ता स्थापन होईल, असा संभव आज दिसत आहे. मानवी इतिहासाचें निरीक्षण करणारे विवेचक बुद्धीचे तत्त्वज्ञ एक शतक लोटतांच सिंहावलोकन करण्याकरितां गतकाळाकडे मुरडून पहावयाला चुकत नाहींत. कारण, साप ज्याप्रमाणें जुनी कात टाकून प्रतिवर्षी नवीन देह धारण करितो, त्याप्रमाणें एका शतकाच्या अवधींत सृष्टीचें एकंदर स्वरूप अगदीं पालटून जातें; व मनुष्याच्या कल्पनांत जरी निरंतर परिवर्तन होत असलें, तरी प्राचीन काळापासून चालत आलेले उदात्त तत्वविचार मात्र, भवभूतीनें वर्णन केलेल्या दंडकारण्यांतलि उत्तुंग शैलशिखरांप्रमाणें, पुढील पिढ्यांना आपण त्याच जुन्या जगांत अजूनहि उभे आहों, याची साक्ष द्यावयाला उपयोगी पडतात. काळाची विनाशक शक्ति कितीही प्रबल असली, तरी मानवी जीवितांत जें सत्य आणि शाश्वत आहे त्यावर तिचा प्रभाव बिलकुल चालत नाहीं. व्यक्तीच्या कामगिरीचें खरें महत्त्व समजावयाला कालांतरासारखें दुसरें साधन नाहीं. मनुष्याच्या कर्तृत्वाला जरी मरणाची मर्यादा असली, तरी त्याच्या कीर्तीचा सौरभ अनंत काळ टिकतो. आणि, बायरननें नश्वर देहाचा त्याग केल्याला जरी आतां एक शतक उलटून गेलें असलें, तरी त्याच्या यशःशरीराचें तेज मात्र अद्याप यत्किंचितही कमी झालेलें नाही.

बायरनचा जन्म स. १७८८ सालच्या जानेवारी महिन्यांत लंडन शहरामध्यें झाला. त्याचा जन्म जरी सरदारी पेशाच्या थोर घराण्यांत

झाला असला, तरी त्याला गर्भश्रीमंत म्हणण्याची मात्र मुळींच सोय नाहीं. त्याचा बाप कॅप्टन जॉन बायरन यानें दोन लग्नें केलीं. पण या दोन्ही लग्नांपासून त्याला तर सुख झालें नाहींच, पण त्याच्यावर भुलून त्याला माळ घालणाऱ्या त्याच्या बायकांचा जन्महि दुःखांत आणि दारिद्र्यांत गेला. बायरनची आई कॅथेराईन गॉर्डन हिनें ज्या वेळीं या शिपाई गड्याशीं लग्न करावयाचें ठरविलें, त्या वेळीं तिच्या जहागिरीच्या गांवांतील कुणा फटकळ शाहिरानें या रंगेल कलंदराशीं लग्नगांठ न बांधण्याबद्दल तिला इषारा दिला होता, असें म्हणतात. हें लग्न तिच्या व पुढें बायरनच्याहि दुर्दशेला कारण झालें. बापाचा आततायी, उच्छृंखल, उधळ्या व उल्लू स्वभाव आणि आईची मानी, हेकेखोर व पराकाष्ठेची तापट वृत्ति यांचा बायरनच्या मनोरचनेवर अतोनात परिणाम झाला. मातृप्रेम म्हणून ज्याला म्हणतात, त्याचा जिव्हाळा त्याला कधींच फारसा अनुभवतां आला नाहीं. कॅथेराईन गॉर्डन ही छांदिष्ट बायको होती; व तिला जसें प्रेमाचें भरतें आलें म्हणजे अनावर येई, तसा तिचा रागहि भडकला म्हणजे बेसुमार भडके. स्वतःचा एकुलता एक मुलगा, व तोहि अगदीं हळव्या मनाचा. पण त्याला काय बोलावें अगर काय नाहीं, याची खातर तिनें कधींच केली नाहीं. बायरनचे पाय अधु होते; व हें शारीरिक व्यंग त्याच्या मनाला अगदीं शल्यासारखें दुःख देई. इतरांच्या लक्षांत तें येऊं नये, म्हणून तो आपल्याकडून अगदीं शिकस्त करीत असे. कॅथेराईननें एकदां संतापाच्या भरांत त्याला 'लंगडें कारटें' (Lame brat) म्हणून त्याच्या दुःखावर डाग दिला. त्यावर बायरननें, 'मी जन्मालाच तसा आलों, त्यांत माझा कांहीं गुन्हा नाहीं,' असें उत्तर तिला संथपणानें दिलें. त्याचा पाय बरा व्हावा म्हणून तिनें त्याला एका अडाणी वैदूच्या हवालीं केलें. त्या वैदनें लांकडाच्या सांचांत बायरनचा पाय बांधून ठेवून खोड्यांत डांबून घातल्यासारखी त्याची स्थिति केली. पण हें दुःख त्यानें धैर्यानें सोसलें. त्याच्या शिक्षणाकडेहि तिचें फाजील लक्ष असे; व त्याला काय शिकवावें अगर काय नाहीं याबद्दल शिक्षकाचे आणि तिचे वारंवार खटके उडत. अशा रीतीनें बायरनचें बाळपण गेलें. स्त्रीजातीबद्दल सामान्यतः त्याला जो तिटकारा वाटे, त्याला आरंभ प्रथम आईबद्दल त्याचें मन विटून झाला, असें म्हटलें तरी चालेल. त्याचा चरित्रकार कवि टॉमस मूर यानें त्याच्या चरित्रांत अशी एक चमत्कारिक गोष्ट

दिली आहे कीं, एके दिवशीं संध्याकाळीं अर्ध्या तासाच्या अंतरानें हीं दोघेंहि मायलेंकरें गांवांतील औषधें विकणाऱ्या वैदूच्या दुकानीं गेलीं; व आपल्यापैकीं कुणालाहि विष मागितलें असतां तें देऊं नये असें त्यांनीं त्याला निक्षून सांगितलें. कारण भांडणाशिवाय घरांत एकहि दिवस सुना जात नसे. अशा स्थितींत वैतागाच्या भरांत आईला किंवा मुलाला जर जीव देण्याची बुद्धि झाली असती, तर त्यांत नवल काय ?

बायरन शाळेंत असतांनाच त्याचा चुलत आजा मरून तो सरदारीचा वारस झाला. ही सरदारी म्हणजे मोठी स्पृहणीय होती असें नाहीं. पण इतरांच्या मानापमानांच्या पोकळ कल्पनांची कधींही गय न करणाऱ्या लोकसत्तेच्या या कडव्या पुरस्कर्त्याला आपल्या सरदारी बाण्याचा अतोनात अभिमान वाटे, बायरनचें शिक्षण प्रथम शाळेंत आणि पुढें कॉलेजांत चांगल्या रीतीनें झालें; व तो जरी अगदीं पंडित नसला, तरी ग्रीक आणि लॅटिन वाङ्मयाचें अध्ययन त्यानें उत्तम केलें होतें. 'चाइल्ड हॅरोल्ड' या त्याच्या काव्यांत या अध्ययनाचें प्रतिबिंब फार पडलें आहे. बायरनच्या काव्यरचनेला विद्यार्थिदशा संपण्यापूर्वीच सुरवात झाली. त्यानें स्वतःच असें म्हटलें आहे कीं, 'कामविकार कसा असतो याची कल्पनाहि ज्या वयांत मनाला नसते, त्या वयांत प्रणयाच्या मादर भावना माझ्या अंतःकरणांत उद्भूत होऊन त्यांनीं कवितेचें रूप घेतलें.' इष्काचे रोज नवे नवे खेळ खेळण्यांत व ते खेळतांना आलेले कडू गोड अनुभव छंदोमय वाणीनें जगाला बोलून दाखविण्यांत त्याचें सर्व आयुष्य गेलें. स्त्रीजातीचा तिटकारा त्याच्याइतका क्वचितच केलेला आढळेल.

Though woman, thou didst not forsake,

या त्याच्या एकाच उद्गारावरून स्त्रीजातीविषयीं त्याची कल्पना किती हीन होती, हें स्पष्ट दिसतें. पण, ज्या प्रमदांविषयीं त्यांनीं वेळीं अवेळीं इतका तिटकारा व्यक्त केला आहे, त्यांच्या संगतीचा मोह त्याला कधींच आवरतां आला नाहीं. ग्रीसला गेल्यावर त्यानें एकदां असें बोलून दाखविलें होतें कीं, माझ्या हातून कांहीं होऊं नये अशी जर शत्रूंना इच्छा असली, तर त्यांनीं एखादा फटाकडीला इकडे रवाना करावी! त्याच्या चरित्रांत आणि कवितेंत स्त्रीला अत्यंत महत्वाचें स्थान आहे. विद्यार्थिदशेंत असतांना त्याची प्रणयानुनयाला जी सुरवात झाली,

ती ग्रीसच्या भूमीवर पाय ठेवीपर्यंत थांबली नाहीं. स. १८०७ सालीं 'रिकाम-पणाचे तास' ( Hours of Idleness ) या नांवानें त्यानें आपला पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. त्या वेळचें प्रख्यात नियतकालिक जें 'एडिंबरो रिव्ह्यू' त्यांत या संग्रहावर अत्यंत प्रतिकूल टीका आली. त्या टीकेंत बायरनच्या भाषेची व मतांची अगदीं रेवडी उडविलेली होती. पण बायरनहि कांहीं कमी नव्हता. प्रतिकूल टीकेच आघात निमूटपणें सोसून निरहंकार बुद्धीनें वाङ्मय निर्माण करण्याइतकी त्याची मनःस्थिति सात्विक नव्हती. ज्या टीकाकारांनीं त्याच्यावर निंदेचे कोरडे उडविले, त्यांची रग जिरविण्याकरितां त्यानेंहि उपहासाचा आसूड हातांत घेतला; व दोन वर्षांच्या आंतच 'इंग्रजी कवि आणि स्कॉच टीकाकार' हें त्याचें मर्मभेदक उपहासकाव्य बाहेर पडलें.

परंतु बायरनच्या कविकीर्तीला आरंभ या काव्यांनीं झाला, असें म्हणतां येणार नाहीं. स. १८०९ सालीं तो युरोपच्या प्रवासाला निघाला. या प्रवासांत असतांना त्यानें जें जें पाहिलें त्याचें वर्णन व त्याविषयींच विचार आपल्या 'चाइल्ड हॅरोल्डची' यात्रा ( Child Harold's Pilgrimage ) या काव्यांत ग्रथित केले. पण या काव्यानें आपल्याला अभूतपूर्व अशी कीर्ति मिळेल, असें त्याला मुळींच वाटलें नाहीं. प्रवासाहून परत आल्यावर होरेसच्या एका काव्याचें स्वतः केलेलें रूपांतर प्रसिद्ध करण्याचा त्याचा इरादा होता. पण त्याचा स्नेही आणि सल्लागार डॅलास यानें 'चाइल्ड हॅरोल्ड' वाचून पाहिल्यावर तेंच प्रथम प्रसिद्ध करण्याचें ठरविलें; व बायरनच्या कुरबुरीकडे लक्ष न देतां आपला आग्रह तडीस नेला. हें काव्य प्रसिद्ध झाल्यावर, मूरनें म्हटल्याप्रमाणें, पांडवलेणें जसें एका रात्रींत उभारलें जावें तशी अकल्पित आणि अद्भुत कीर्ति बायरनला मिळाली. आठ दहा महिन्यांच्या अवधींत त्याच्या पांच आवृत्त्या निघाल्या; व तें वाच-ल्यावर कविता लिहिण्याकरितां आतां पुन्हा लेखणी उचलूं नये, असें वॉल्टर स्कॉटच्या मनानें घेतलें. बायरनला तर हा सर्वच प्रकार इतका विलक्षण वाटला कीं, त्या आश्चर्याच्या भरांत त्यानें 'I awoke one morning and found myself famous' असे उद्गार काढले. परंतु ही कीर्ति कलंकित व्हावयाला फारसे दिवस लागले नाहींत. सुशिक्षित आणि संपन्न समाजांत बायरनची प्रतिष्ठा वाढली; व तत्कालीन शिष्ट समाजाच्या विकृत

अभिरुचींचा पगडा त्याच्या उल्लू आणि सुखलोलुप मनावर तेव्हांच बसला. संपत्तीच्या संसर्गानें फोफावणारी सुखोपभोगाची पापी प्रवृत्ति त्या वेळच्या प्रतिष्ठित समाजांत अतोनात बळावली होती. तिच्यापासून अलिप्त रहावयाला जो मनाचा निग्रह लागतो, तो त्याच्या ठिकाणीं नव्हता; अगर पापाच्या गर्तेत आकंठ रुतूनहि, पुन्हा आपण त्या गांवचेच नाहीं अशा दिमाखानें, नीतिमत्तेची प्रौढी मिरवावयाला जो ढोंगीपणा लागतो, त्याचेंहि बायरनला अगदीं वावडें होतें. शिष्टाचाराचें भरजरी महावस्त्र पांघरून पाप उजळ माथ्यानें समाजांत खुशाल वावरतें; व दांभिक समाजालाहि त्याची खंत वाटत नाहीं. पण पाप अगदीं उघडें वावरूं लागलें अगर त्यानें लक्तरें पेहरलेलीं पाहिलीं की, समाजाचें पित्त खवळतें; आणि नीतिच्या दांभिक कल्पना, आपली नाचक्की झाली असें समजून, चवताळून उठतात. लग्न होण्यापूर्वी बायरननें कांहीं थोडीं पापें केली होतीं असें नाहीं. पण, लेडी बायरननें नवऱ्याजवळ रहाण्याचें नाकारल्यावरोवर, मॅकॉलेनें म्हटल्याप्रमाणें, ढोंगी ब्रिटिश समाजाला आपल्या न्यायीपणाचें प्रदर्शन करण्याची लहर आली; व लोकक्षोभाचें हें अचानक उठलेलें वावटळ बायरनच्या नाशाला कारण झालें. त्यांत ज्यांचे त्याच्याशीं खाजगी हेवेदावे होते, त्यांनीं आपला डाव साधून घेतला; व इतरांच्या अब्रूवर तिळांजली द्यावयाला सदैव तत्पर असलेली कांहीं चटोर वर्तमानपत्रें घटस्फोटाच्या चर्चेत सामील झाल्यावर या अगदीं घरगुती तंट्याला सार्वजनिक महत्व आलें. लोक एकदां नालस्ती करूं लागले, म्हणजे त्यांना सुमार रहात नाहीं. तशीच स्थिति या वेळीं झाली; व तिला कंटाळून बायरननें स्वदेशाचा त्याग करण्याकरितां पुन्हा बोटीवर पाय ठेवला.

बायरनच्या कर्तृत्वाला खरा प्रारंभ येथूनच झाला, असें म्हणावयाला हरकत नाहीं. जगाचा जो गोड अगर कडु अनुभव यावयाचा, तो त्याला स्वदेशांतच आला होता. पण परकी देशांत, जिथें सामान्य जनता आपल्याला ओळखीत नाहीं किंवा स्वजन भेटण्याचा संभव फार कमी अशा ठिकाणीं राहून, निर्धास्त मनानें स्वतःच्या वासनांचें कोड बायरननें यथेच्छ पुरविलें; व दुनियेंतील हर एक सुखाची गोडी मनसोक्त घेतली. इटलींत त्याचे दिवस ऐषारामांत गेले; व एखाद्या नबाबाप्रमाणें, जगाची यत्किंचितहि परवा न करितां, त्यानें जे जे भोग

म्हणून भोगणें शक्य आहे ते ते सर्व भोगण्याचा प्रयत्न केला. हें सर्व त्यानें सुखाकरितांच केलें असें नाहीं; तर मनाची तळमळ, सद्सद्विवेकबुद्धीच्या टोंचण्या आणि ज्यांच्यावर अमर्याद प्रेम केलें त्यांच्या वियोगानें मनाला होणाऱ्या वेदना यांचा विसर क्षणभर पडला तर पहावा म्हणून त्यानें हे ढंग केले. पत्नीला जो त्याज्य वाटला, समाजानें ज्याला तुच्छ लेखलें, समकालीन कवींनीं ज्याला सैतान म्हणावयाला कमी केलें नाहीं, त्यानें निराश होऊन उद्वेगाच्या भरांत जर अनन्वित कृत्यें केलीं, तर त्यांत नवल काय ? कठोर मनाची बायको, पुराणमताभिमानी व्यवसायबंधु आणि अंधारांत पापें करून नीतिमत्तेचा तोरा मिरविणारा ढोंगी समाज यांनीं बायरनला अवनतीच्या गर्तेत खोल खोल ढकललें. चुकणें हा मनुष्याचा स्वभाव आहे; पण पाय घसरला तर हात देऊन सांवरण्यापेक्षां हेटाळणी करण्यांतच समाजाला आपण खरें नीतिधैर्य दाखविलें असें वाटतें. खुद्द बायरनला या उपभोगांचा-दुराचारांचा तिटकारा कांहीं कमी वाटत होता, असें नाहीं. दारूची धुंदी डोळ्यांवरून उतरली म्हणजे दारूबाजाला जशी आपल्या व्यसनाची खंत वाटते, तशीच स्थिति बायरनची होत असे. ज्या व्हेनिसला उद्देशून—

I loved her from boyhood–she to me
Was a fairy city of the heart

असे धन्योद्गार त्यानें पूर्वीं काढले होते, तेंच व्हेनिस शेवटच्या खेपेस सोडतांना—

I hate the place and all that it inherits.

असे तिरस्काराचे उद्गार त्याच्या तोंडून निघावे, याला काय कारण सांगतां येईल ? हा कांहीं मनाचा निव्वळ थिल्लरपणा अगर कल्पनेचा नुसता खेळ नव्हे. ज्या व्हेनिसच्या उज्ज्वल पूर्वैतिहासाचें स्मरण होऊन त्याच्या डोळ्यांतून एका वेळीं टिपें पडलीं, त्याच व्हेनिसचा अखेरचा निरोप घेतांना बायरनला आपलें तेथील पापाचरण मूर्तिमंत पुढें उभें राहिलेलें दिसलें; व त्या शहराची अगदीं शिसारी आली. इटलीचाहि त्याला अखेर अखेर अगदीं वीट आला; व तो त्यानें 'बेप्पो' (Beppo) या काव्यांत व्यक्तहि केला आहे. ग्रीसमध्यें आल्यावर तर त्याला परत फिरण्याची उमेद किंवा आशा मुळींच राहिली नाहीं. जग आणि जीवित

यांना आतां तो अगदीं कंटाळला होता; व धारातीर्थी देह पडून आपण सर्व पापांतून मुक्त व्हावें, असा त्याला ध्यास लागला.

अशा रीतीनें पृथ्वीच्या पाठीवर सुखाचा पाठलाग करीत भटकत असतां जे बरेवाईट अनुभव बायरनला आले, ते त्यानें आपल्या काव्यांत ग्रथित केले आहेत. अंतःकरणाची सदैव होणारी तळमळ आणि हर्षविषादांचे उद्रेक, समाजाची अगर शिष्टांची भीड न बाळगतां, त्यानें आपल्या काव्यांत ओतले आहेत. बायरनच्या समकालीन कवींत त्याच्या तोडीचा धाडसी बंडखोर शेलेशिवाय दुसरा आढळणार नाहीं. पोपचें युग संपल्यावर कौपर आणि बर्न्स यांनीं इंग्रजी कवितेला नवीन वळण देण्याचा प्रयत्न केला. पण बंडाला क्रांतीचें यशस्वी स्वरूप देण्याची धमक कौपरच्या शांत व बर्न्सच्या असंस्कृत प्रतिभेंत नव्हती. स्कॉट व मूर हे बोलून चालून दुय्यम दर्जाचे कवि. इतिहासाचें उत्तम परिशीलन करून सत्याचा विपर्यास न करितां विद्वानांना संमत होतील आणि सामान्य जनांना समजतील अशीं चटकदार काव्यें त्यांनीं लिहिलीं. स्वतःचें अंतःकरण, आपल्या आयुष्यांतील जिव्हाळा काव्यांत ओतण्याचा प्रयत्न त्यांनीं कधींच केला नाहीं. सौदे, कोलेरिज व वर्डस्वर्थ या तिघांनींही प्रथम बंडाचा पुरस्कार तडफेनें केला. फ्रेंच राज्यक्रांतीचा स्फोट होतांच वर्डस्वर्थनें ज्या ईर्ष्येनें

Great God...grant that every secptred child of clay,
Who cries presumptuous,
' Here the flood shall stay '
May in its progress see the guiding hand,
And cease the acknowledged purpose to withstand;

असे उद्गार काढले, ती त्याची ईर्ष्या लवकरच ओसरून गेली; व तो रूढ विचारांची री ओढूं लागला. शिवाय बाहेरचें जग पहाण्याचा प्रसंग वर्डस्वर्थवर कधीं फारसा आलाच नाहीं. फ्रान्सहून एकदां परत आल्यावर पर्णकुटींत राहून झाडाझुडपांशीं, आणि फुलांपांखरांशीं गुजगोष्टी करण्यांत, परमेश्वराच्या रमणीय सृष्टीचें कौतुक करण्यांत त्याचें आयुष्य गेलें. फूल, ओढा, ढग, पांखरूं,

झाड यांच्या हालचालींत अमूर्त तत्वाच्या दृश्य चेष्टा पहाण्याचा उद्योग त्यानें जन्मभर केला. रोजच्या व्यवहारांत नित्य कानांवर पडणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या ढोबळ सिद्धांतांनीं त्याची कविता गजबजलेली आहे; व टेननें म्हटल्याप्रमाणें जगांतील उलाढालींविषयींचें विचार डोक्यांतून पार काढून टाकून ढगांवर दहा बारा वर्षे सतत दृष्टि लावून बसल्याशिवाय त्याच्या एकंदर कवितेविषयीं प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं, परंतु वर्डस्वर्थनें कवितेच्या भाषेंत जी क्रांति घडवून आणली, ती मान्य केली पाहिजे. कोलेरिजची प्रतिभा अफूच्या कैफानें काळवंडून गेली. आणि सौदेच्या अंगावर राजकवित्वाची झूल पडल्यावर, पुराण मतांचा अभिमान वाहून, बायरनवर आग पाखडण्याची संधि त्यानें सहसा वायां जाऊं दिली नाहीं. बायरनच्या कवित्वाला ' कवितेचा सैतानी संप्रदाय ' म्हणून त्याचा उपहास करण्याचें ' नीतिधैर्य ' सौदेनेंच प्रकट केलें. या सर्व कवींहून शेले हा वेगळा पडतो. अर्नोल्डनें म्हटल्याप्रमाणें, इटलींत असतांना या कोमल मनाच्या आणि स्वर्गीय प्रतिभेच्या कवीचा दिव्य सहवास बायरनला घडल्यामुळें त्याच्या कवितेला निव्वळ विकृत वळण लागलें नाहीं. परंतु शेलेची कविता पुष्कळ वेळां आभासात्मक वाटते. प्रत्यक्षाशीं—पार्थिवाशीं तिचा कांहींच संबंध दिसत नाहीं. उलट बायरन हा जगाला सोडून कधींच फारसा दूर जात नाहीं; जगाच्या अनुभवांची साक्ष त्याच्या कवितेंत भरपूर सांपडते. इतकेंच नव्हे, तर भव्य विचार किंवा प्रवळ भावना यांचाहि संगम त्याच्या काव्यवाहिनींत हवा तितका दृष्टीस पडतो.

बायरनच्या प्रतिभेचे हें अनन्यसामान्य तेज लक्षांत घेऊनच गटेनें त्याला सर्व इंग्रजी कवींहून वेगळा व श्रेष्ठ ठरविला आहे. ' डॉन जुआन ' हें त्याचें शेवटचें अपुरेंच राहिलेलें काव्य त्याच्या अलौकिक प्रतिभेची साक्ष उत्कृष्ट रीतीनें देतें. ब्रँडिसनें म्हटल्याप्रमाणें, एकुणिसाव्या शतकांत गटेच्या ' फॉस्ट ' बरोबर तुलना करतां येण्याजोगें जर दुसरें कोणतें काव्य निर्माण झालें असेल, तर तें ' डॉन जुआन ' हेंच होय. मनुष्यस्वभावाचें भव्य, कोमल, विकृत आणि नीच स्वरूप बायरननें या काव्यांत अत्यंत सफाईनें रेखाटलें आहे. त्यानें जगाला नवीन असें कांहींच सांगितलें नाहीं असा प्रवाद पुष्कळ वेळां कानांवर पडतो; आणि तो कांहीं अगदींच खोटा नाहीं. परंतु, भ्रामक किंवा सरावांतलें तत्त्वज्ञान सांगण्याचा

त्याचा उद्देशच नव्हता. त्यानें कविता लिहिली, ती केवळ आपल्या मनाला विरंगुळा वाटावा म्हणून, आपलें अंतःकरण रितें करण्याकरितां. काव्यरचना हा आपला खरा व्यवसाय नव्हे; आपण कांहीं तरी अघटित असा पराक्रम करून दाखवूं असें त्याला अखेरपर्यंत वाटत होतें. कविता म्हणजे नुसता शब्दांचा पसारा, तें कांहीं खरें कर्तृत्व नव्हे, असेंच तो नेहमीं म्हणे. जगांत जो जुलूम चालला आहे त्याचें निराकरण असल्या पोकळ शद्बमुष्टीनीं होणार नाहीं अशी त्याची श्रद्धा होती; व या श्रद्धेनें प्रेरित होऊनच त्यानें ग्रीसच्या स्वातंत्र्ययुद्धांत पुढाकार घेतला, बायरननें अनेक पातकें केली असतील. परंतु स्वातंत्र्ययुद्धांत सर्वस्व वेचल्यावर ज्याचें क्षालन होत नाहीं असें कोणतें पातक या जगांत आहे? ग्रीसच्या स्वातंत्र्ययुद्धांत त्याचा देह पडला यांतच त्याच्या ऐहिक जीविताचें साथक झालें—सर्व पापांची निष्कृति झाली. माझिनीनें म्हटल्याप्रमाणें, राज्यविस्ताराची आसुरी महत्त्वाकांक्षा युरोपांत ज्या वेळीं धिंगाणा घालीत होती, त्या वेळीं या वीरकवीनें स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकून हताश झालेल्या राष्ट्रांचीं सुप्त सामर्थ्यें जागृत केलीं. ग्रीसच्या स्वातंत्र्ययज्ञांत बायरनचें पापी पार्थिव शरीर जळून भस्म झालें आणि त्याच्या अलौकिक प्रतिभेनें शाश्वत कीर्तीचा दिव्य देह धारण केला. शंभर वर्षांनंतर पतितांच्या उद्धाराला, स्वातंत्र्याच्या प्रगतीला कुणी हातभार लावला हें पाहण्याकरितां दृष्टि मागें फेंकली, म्हणजे बायरनची तेजस्वी प्रतिभा आणि त्याचा उज्ज्वल स्वार्थत्याग डोळ्यापुढें उभा राहतो; व त्याच्या इच्छेप्रमाणें जरी त्याच्या हातून अद्‌भूत पराक्रम घडला नसला, तरी त्या वैभवशाली महाकवीनें आत्मप्रत्ययाच्या अभिनिवेशांत उच्चारलेला—

But there is that within me which shall tire
Torture and Time, and breathe when I expire.

हा भविष्यवाद अखेर खरा झाला, असेंच कुणीहि म्हणल.

ज्ञानप्रकाश, ता. १५ एप्रिल १९२४

# अनाटोल फ्रान्स

—:⋯:—

जगद्विख्यात फ्रेंच कादंबरीकार अनाटोल फ्रान्स हे ता. १२ आक्टोबर १९२४ रोजीं मरण पावले. ते मृत्युशय्येवर असल्याची बातमी दोन आठवड्यांपूर्वींच आलेली होती. परंतु, मृत्यु ही जरी नित्य घडणारी सवयीची गोष्ट असली, तरी स्वत:चें जिव्हाळयाचें मनुष्य मेल्यानें त्याची अपूर्वाई जशी आपल्याला तीव्रतेनें जाणवते, तसाच मानवजातीच्या उन्नतीला ज्यांचें कर्तृत्व कारण झालेलें असतें, त्यांच्या मरणानेंहि त्याचा भयंकरपणा प्रत्ययाला येतो. वाङ्मय आणि तत्वज्ञान यांची आवड ज्यांना असेल, त्यांना अनाटोल फ्रान्स यांच्या निधनाची वार्ता ऐकून वाईट वाटल्याशिवाय राहणार नाहीं. धर्म आणि राजकारण हे विषय व्यापक म्हटले, तरी एका अर्थानें संकुचितच आहेत. पण वाङ्मय हा एकच विषय असा आहे कीं, ज्याला धर्म, राष्ट्र, जात आणि भाषा यांपैकीं कोणत्याच भेदाची मर्यादा लागू पडत नाहीं. आणि ' विद्वान् सर्वत्र पूज्यते ' या सुभाषिताचेंहि मर्म झालें तरी हेंच होय. अनाटोल फ्रान्स हे फ्रेंच ग्रंथकार असले, तरी त्यांची कीर्ति जगभर पसरली होती. किंबहुना बायरन किंवा ऑस्कर वाइल्ड यांच्याप्रमाणें स्वदेशापेक्षां परदेशांतच त्यांचे ग्रंथ अधिक आदरानें वाचले जात. कारण त्यांची प्रतिभा, मुलांच्या खेळांतील भोंवऱ्याप्रमाणें, केवळ राष्ट्राभिमानाच्या सोपाधिक क्षेत्रांतच भ्रमण करीत नसे. परिस्थितीचीं आणि परंपरेचीं बंधनें तोडून तिनें एकंदर जगाच्या विचारसृष्टींत विहार केला. म्हणून, त्यांचें वाङ्मय जरी फ्रेंच भाषेंत लिहिलेलें असलें, तरी त्यांत प्रतिबिंबित झालेले विकार–विचार हे अवघ्या मानवजातीला आनंद देतील, असे आहेत.

त्यांचा जन्म पारिस शहरांत स. १८४४ सालीं झाला. पुढें दर्यासारंग म्हणून उदयाला येणाऱ्या धाडसी वीराचा जन्म एखाद्या नावाड्याच्या पोटीं होऊन लाटांवर हेलकावणाऱ्या होडया वल्हविण्यांत ज्याप्रमाणें त्याचें बालपण जावें, त्याप्रमाणें अनाटोल फ्रान्स यांना, घरच्या पुस्तकांच्या दुकानांतील ग्रंथांचे ढीग चाळून वर खालीं करितांना, लहानपणींच वाचनाची गोडी लागली. व्यवस्थित असें शिक्षण त्यांना फारसें मिळालेंच नाहीं. परंतु जें शिक्षण शाळा–कॉलेजांतहि मिळणें शक्य

नाहीं, तें त्यांना घरबसल्या बापाच्या दुकानांत व्यासंगी आणि रसिक लोकांच्या तोंडच्या गप्पा-गोष्टी ऐकून मिळालें. खऱ्या ज्ञानार्जनाला शाळांतून मिळणाऱ्या सक्तीच्या शिक्षणापेक्षां वाचनाची सहज लागलेली अव्यवस्थित चटकच अधिक कारण होते, हें आपण नेहमीं पहातों. वयाला सतरावें वर्ष लागल्यावर, सरकारी नोकरी मिळावी म्हणून, फ्रान्स यांनीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. पण तो फसल्यामुळें बुद्धिमान् मनुष्याची निर्वाहाची थोडी फार तरतूद करून देणारी रिकामपणची कामगिरी जी लेखनकामाठी तिच्याकडे ते वळले. चरित्र लिहिणें हें लेखनकलेंतील सगळ्यांत सोपें काम. तें साधलें नाहीं, तर साधनांच्या अभावाकडे बोट दाखवून मोकळे होतां येतें. स्वतःच्या बुद्धीला फारसा शीण न देतां, चार दोन इतिहासग्रंथ चाळून, कोणत्याही महापुरुषाचें चरित्र सजवितां येतें. आणि या होतकरू कलमबहाद्दरानेंहि प्रथम चरित्रलेखनासाठींच हातांत लेखणी धरली.

यानंतर कविता, नाटक आणि कादंबरी यांना त्यांनीं क्रमाक्रमानें हात घातला. तरुणपणीं कल्पनाशक्ति फार तल्लख असते; व मनुष्य जर बुद्धिमान् असेल, तर तारुण्यांत कल्पनेचे बुडबुडे उडवून तो कवित्वाचा खेळ खेळावयाला बहुधा चुकत नाहीं. कवि हा नाटककार नाहीं, असें क्वचितच घडतें. मनोराज्यामध्यें भटकणाऱ्या या बेकार बुद्धिमानाला व्यवहारांत थपडा खाण्याचा प्रसंग पावलोपावलीं येतो; व जगाच्या रंगभूमीवरील हा अपेशी नट मानवी रंगभूमीवर नाटककार म्हणून यश मिळविण्याची धडपड केल्याशिवाय सहसा रहात नाहीं. शिवाय जी निंदा तोंडावर केली असतां कुणीहि ऐकून घेणार नाहीं, ती रंगभूमीवर पात्रांच्या तोंडून लोक आनंदानें ऐकून घेतात. आणि अशा रीतीनें फजित पावलेला कवि जगाचा सूड परस्पर उगवून घेतो. इब्सेनचें कोणतेंहि नाटक उघडून पहा; त्यांत द्वेषपूर्ण व्याजोक्तीचे जळजळीत निखारे भरलेले दृष्टीस पडतील. नाटककार वृद्ध आणि कृतकृत्य होऊन तत्वज्ञानाच्या तपोवनांत शिरला, म्हणजे तो आपलें चरित्र कादंबरीच्या रूपानें लिहून काढतो. एकच ग्रंथकार कवि, नाटककार आणि कादंबरीलेखक उत्तरोत्तर कसा होत जातो, याची संगती जर कोणी अशा रीतीनें लावली, तर ती अगदींच वावगी ठरणार नाहीं. स. १८६८ पासून १९२२ पर्यंत अनाटोल फ्रान्स यांनीं हर तऱ्हेची ग्रंथरचना केली. स. १८६२ पासून पुढें बारा वर्षांत त्यांचीं तीन चार पुस्तकें प्रसिद्ध झालीं. पण त्यांच्या कीर्तीला खरा आरंभ 'सिल्व्हेस्टर बोनार्डचा गुन्हा' ( Crime of Sylvestre Bonnard ) ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यावरच

झाला. ही कादंबरी बाहेर पडल्यावर त्यांच्या यशाला जी भरती आली, ती फ्रान्सची सरहद्द उल्लंघून सर्व युरोपभर पसरली. आणि त्यानंतर तिला ओहोट कधीं लागलीच नाहीं. या कादंबरीमुळें मिळालेल्या लौकिकाच्या जोरावरच त्यांना दुराराध्य साहित्यकोविदांच्या स्वाधीन असलेलें फ्रेंच ॲकॅडमीचें दुर्मिळ अध्यक्षपद लाभलें. पण या लाभानें हुरळून न जातां त्यांनी ॲकॅडमीच्या शिष्टपणाची निर्भीडपणानें सपाटून शोभा केली. 'जीविताचा बहर' ( The Bloom of Life ) हा त्यांचा शेवटचा ग्रंथ स. १९२२ सालीं प्रसिद्ध झाला. स. १९२१ सालीं त्याना नोबेल प्राइझ मिळालें. त्याची सर्व रकम त्यानीं रशियाच्या दुष्काळ-फंडाला देऊन टाकली.

चरित्र, कविता आणि नाटकें यांवर अनाटोल फ्रान्स यांची कीर्ति अवलंबून नाहीं. त्यांनीं लिहिलेलें जोन ऑफ आर्कचें चरित्र हें जरी त्यांत प्रकट झालेल्या संशयवादामुळें फार प्रसिद्ध असलें, तरी त्यांची खरी कीर्ति त्यांच्या कादंबऱ्यांवरच अधिष्ठित झाली आहे. मनुष्याच्या मनांत उठणाऱ्या अनंत विकारांचें काहूर व विचारांचे कल्लोळ यांनीं त्यांचें कथात्मक वाङ्मय भरलेलें असून, तें वाचतांना, मनुष्यस्वभावाचे मर्मज्ञ म्हणून त्यांनीं मिळविलेला लौकिक अगदीं यथार्थ आहे, असें वाटल्यावाचून रहात नाहीं. समाजांत पुढाकार घेऊन मिसळणें त्यांना आवडत नसे. पण, भिलप्रमाणें सामान्य लोकांत वावरलें असतां, आपल्या प्रतिभेनें पेहरलेलें तत्वविचारांचें भरजरी महावस्त्र जगाची धूळ लागून मळेल, अशीहि ऐट त्यांना शिवली नाहीं. थिएटरच्या कोपऱ्यांत कुठें तरी दूर बसून जगाच्या रंगभूमीवर चाललेलें मानवी चरित्राचें नाटक उदास मनानें पण बारीक दृष्टीनें पहाणाऱ्या प्रेक्षकासारखी त्यांची वृत्ति नव्हती. लोकांत मिसळणें, त्यांची सुखदु:खें—त्यांच्या वासना—कामना समजावून घेणें, त्यांचे गुणदोष निरखून पहाणें त्यांना फार आवडे. जग हा एक फुलांचा वेल असून, त्यावरील फुलांचे कडू—गोड रसगंध स्वेच्छेनें सेवावे पण कोणत्याच फुलावर लोभावून फार काळ बसूं नये, अशी त्यांच्या मनाची प्रवृत्ति होती. त्यांनींच आपल्या या प्रवृत्तीचें असें वर्णन केलें आहे कीं, " रविवारीं मी सगळा दिवस लोकांत भटकून घालवितों; त्यांच्या जमावांत मिसळून बाजारांत फिरतों; रस्त्यांतील गाणाऱ्यांच्या ताना ऐकतों; मानवी स्वभावाचें रूप डोळे भरून पहातों. आणि अशा रीतीनें केवळ मजेखातर मनुष्यसृष्टींत मोकाटपणें वावरत असतां मला मृत्यूचाहि विसर पडतो ! " ही भ्रमराची कलंदर वृत्ति त्यांना वाङ्मयांत यश द्यावयाला कारण झाली. आणि, मोहोळ जसें अनेक

फुलांतून काढून आणलेल्या उग्र वासाच्या रुचकर रसानें ओथंबलेलें असतें, तसें त्यांचें कथात्मक वाङ्मय विविध विकारांनीं ओतप्रोत भरलेलें आहे.

धर्म, तत्वज्ञान, शास्त्रीय शोध यांपैकीं कशावरच त्यांची श्रद्धा नव्हती. वॉल्टर पेटर आणि ऑस्कर वाइल्ड यांच्याप्रमाणें ते संशयवादी होते. जग आहे तसें घेऊन चालवें, त्याला शिव्या देऊन सुधारण्याच्या फंदांत पडूं नये, असें त्यांना वाटे. सुधारकाची उफाळून प्रकट होणारी रूढिद्वेषाची आग अगर तत्वज्ञान्याच्या ध्येयवादाचें दिशाभूल करणारें धुकें यांचा आढळ त्यांच्या ग्रंथांत कुठेंहि व्हावयाचा नाहीं. त्यांची दृष्टि भेदक होती; पण इतरांचे दोष पाहून त्यांना चीड कधींच येत नसे. तिरस्कारानें भुंवया चढून कपाळावर किंचित् आंठी पडे; व चेष्टेचें मंदस्मित चेहऱ्यावर झळके, इतकेंच. स्विफ्ट व व्हॉल्टेअर यांचा चावकाच्या फटक्याप्रमाणें मर्माला झोंबणारा चावरा विनोद त्यांच्या कादंबऱ्यांत कुठेंहि नाहीं. त्यांचा संशयवाद सौम्य होता. मूर्तिपूजा त्यांना पसंत नसली, तरी आततायीपणानें मूर्ति फोडणेंहि त्यांना संमत नव्हतें. पण लोकांच्या समजुतींची, न खुपेल अशा बेतानें, चेष्टेची चिकित्सा त्यांनीं आपल्या ग्रंथांतून हवी तितकी केली आहे. युरोपांतील अलीकडील इतर कादंबरीकार व अनाटोल फ्रान्स यांच्यांत हा महत्वाचा भेद असून वेल्स, बर्नार्ड शॉ, रोमेन रोलंड यांच्या तात्विक प्रवचनांनीं भरलेल्या नाटक-कादंबऱ्यांना कंटाळलेल्या वाचकवर्गाला त्यांचें वाङ्मय फार आवडलें. बर्नार्ड शॉचें कोणतेंहि नाटक घ्या; त्याला प्रस्तावनेची मूळ ग्रंथालाहि मागें सारणारी सव्वा हात लांब पुस्ती ही असावयाचीच. आणि वेल्सच्या कादंबरींत 'रामराज्या'चें भडक वर्णन हें आढळावयाचेंच. असले विक्षेप फ्रान्स यांच्या कादंबऱ्यांत कुठेंहि नाहींत. तरीहि त्यांचा सूक्ष्म संशयवाद मनाला घोटाळ्यांत पाडल्यावांचून रहात नाहीं. Mother Of Pearls, Penguin Island, The Gods are athirst, The Opinions of gerome Coignar, The revolt of the Angels वगैरे कादंबऱ्यांतून केसाग्राच्याहि चिरफळ्या काढणारा त्यांचा वस्तऱ्याच्या धारेसारखा तीक्ष्ण संशयवाद दृष्टीस पडतो. भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष होऊन श्रद्धेचें अधिष्ठान सुटल्यामुळें मननशील मानवी बुद्धि संशयाच्या आवर्तांत सांपडून कशी भ्रमण करूं लागली, याचें चित्र त्यांच्या कादंबऱ्यांतून पहावयाला मिळतें. आणि त्याच दृष्टीनें त्यांचें वाङ्मय उद्बोधक आहे.

—महाराष्ट्र, २२।१०।२४

# नाट्याचार्य खाडिलकर

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांना येत्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष निवडण्यांत नागपूरच्या लोकांनीं विरळ गुणज्ञता दाखविली आहे, यांत शंका नाहीं. श्री. खाडिलकर हे लोकप्रिय आहेत आणि नाहींतहि. लोकांच्या मनांत स्वतःविषयीं सतत कुतूहल उत्पन्न करणें, त्यांच्या चर्चेचा आवडता विषय होऊन बसणें, असा जर लोकप्रियता या शद्बाचा अर्थ असेल, तर खाडिलकर हे निस्संशय लोकप्रिय नाहींत. त्यांच्याइतका अत्यंत सुप्रसिद्ध असूनहि व्यक्तिशः अज्ञात राहिलेला कर्तबगार पुरुष महाराष्ट्रांत दुसरा क्वचितच सांपडेल. त्यांचे समकालीन ग्रंथकार श्री. श्री. कृ. कोल्हटकर किंवा श्री. न. चिं. केळकर यांच्याविषयीं कांहीं ना कांहीं उल्लेख नियतकालिकांतून आलेला नाहीं, असा बहुधा एक आठवडाहि सुना जात नसावा; व गेल्या पांच वर्षांत त्यांच्याविषयीं, साहित्यपर म्हणा किंवा व्यक्तिपर म्हणा, वाङ्मय विपुल निर्माण झालें आहे. उलट खाडिलकरांविषयीं व्यक्तिविषयक माहिती लोकांना प्रायः कांहींच नाहीं; व त्यांच्याविषयीं साहित्यपर अशी चर्चाहि नियतकालिकांतून क्वचितच येते. वस्तुतः ' केसरी ' सारख्या अग्रगण्य साप्ताहिकावर आणि ' नवा काळ ' सारख्या लोकप्रिय दैनिकावर ज्याचें नांव वर्षानुवर्षे संपादक म्हणून झळकत होतें व मराठी रंगभूमीवर ज्यानें दोन तपें अनन्य प्रभुत्व गाजविलें, त्या या प्रभावशाली पुरुषाच्या चरित्राविषयीं लोक जवळ जवळ अज्ञान असावेत, हें आश्चर्य नव्हे काय? याचें कारण मुख्यतः खाडिलकरांची प्रसिद्धीविषयींची पराङ्मुखता. फोटो, लेख, मुलाखती, वितंडवाद वगैरेंच्या रूपानें लोकांच्या डोळ्यांपुढें मिरवण्याची हौस किंवा हातोटी त्यांच्या ठिकाणीं मुळींच नसल्यामुळें, वर्तमानपत्राच्या प्रदर्शक धंद्यांत सारें आयुष्य पराक्रमानें घालवूनहि, ते लोकांना आज जवळ जवळ अपरिचितच राहिले आहेत.

परंतु, लोकांच्या मनांत आपल्या विषयीं नितांत आदर किंबहुना एक प्रकारचा दरारा उत्पन्न करणें असा जर लोकप्रियता या शद्बाचा अर्थ असेल, तर

खाडिलकर हे त्या अर्थानें खचित लोकप्रिय आहेत. वाङ्मयाच्या ज्या दोन क्षेत्रांत त्यांनीं छत्तीस वर्षांपूर्वी पदार्पण केलें, त्या क्षेत्रांतील त्यांची कामगिरी इतकी लोकोत्तर आहे कीं, तिच्याविषयीं आदरानें बोलल्याशिवाय आज त्यांच्या शत्रूंनाहि गत्यंतर उरलेलें नाहीं. १८९६ सालच्या अखेर सांगली येथील शिक्षकाची नोकरी सोडून ते ' केसरी ' ला येऊन मिळाले; व १८९७ सालच्या खटल्यांत लोकमान्यांना शिक्षा झाल्यावर, ' केसरी ' चें संपादन मोठ्या कुशलतेनें करून बेमालूम सांधा जुळविल्याची शाबासकी त्यांनीं टिळकांकडून मिळविली. ' नवा काळ ' दैनिक काढण्यांत प्रकट झालेली त्यांची कर्तबगारी तर याहिपेक्षां प्रशंसनीय वाटते. वयाला पन्नाशी उलटल्यावर मनुष्याच्या सर्व शक्ति श्रांत होऊन कोणताहि नवा उद्योग हातीं घ्यावयाला त्याला हुरूप रहात नाहीं. पण, त्या वयांत खाडिलकरांनीं 'नवा काळ' काढला; व दैनिकाची महाराष्ट्रांत बुडीत म्हणून गणली गेलेली खेती यशस्वी करून दाखविली. नाटककार या नात्यानें त्यांनीं मिळविलेलें यश तर अद्वितीयच म्हणावें लागेल. १९०४ सालीं त्यांची ' कांचनगडची मोहना ' ज्या वेळीं महाराष्ट्र नाटकमंडळीनें रंगभूमीवर आणली, त्या वेळीं कोल्हटकरांचें युग नाट्यसृष्टींत सुरू होतें; व त्यांच्या पाठोपाठ गडकरी आणि वरेरकर हे पुढें आले. पण, शुक्र, गुरु आणि व्याध हे आपल्या तेजाचा दिमाख नभोवितानांत मिरवीत असतांनाहि, चंद्रानें ज्याप्रमाणें आपल्या सुषमेनें स्थिरचर व्यापून टाकावें, त्याप्रमाणें आपला प्रभाव खाडिलकरांनीं मराठी रंगभूमीवर सतत दोन तपें गाजविला. त्यांच्या ' कीचकवध ' नाटकानें बुडूं घातलेल्या महाराष्ट्र नाटकमंडळीला तारलें; व त्यांच्या ' स्वयंवर ' नाटकानें नवीन निघालेल्या गंधर्व नाटकमंडळीचा संसार स्वतःच्या पायावर उभा केला. ' स्वयंवर ' नाटकानें दहा वर्षांच्या काळांत गंधर्वांना २ लाख ६७ हजार रुपये मिळवून दिले; व ज्या ' द्रौपदी ' नाटकानें स्वतः पडून गंधर्वांनाहि कर्जाच्या गर्तेत पाडलें अशी हाकाटी खाडिलकरांच्या निंदकांनीं केली होती, त्यानें गंधर्वांना १ लाख ३४ हजार रुपयांची प्राप्ति करून दिली !

अशा तऱ्हेचें लोकोत्तर यश ज्यानें नाट्यासारख्या लोकसुलभ व्यवसायांत मिळविलें, त्या थोर पुरुषाचें चरित्र, त्याच्या त्या यशाची पार्श्वभूमि समजावून घेण्याची उत्सुकता लोकांत कां असूं नये ? याचें कारण खाडिलकरांचें कठोर तत्त्वज्ञान. त्याची केवळ मूर्तीच उग्र आहे, असें नाहीं; तर त्यांच्या

नाटकांतून प्रकट झालेलें तत्त्वज्ञानहि उग्र आहे. तडजोडीला तयार न होणारें, संकटांशीं निधडेपणानें झुंजणारें आणि मोहांना लाथेनें झिडकारणारें असें त्यांचें तत्वज्ञान आहे. त्यांचा प्रतापराव, त्यांचा रामशास्त्री, त्यांचा हरिश्चंद्र किंवा त्यांचा राम--जणुं कांहीं निश्चयाचे सारे महामेरुच ! प्रेमध्वज, धैर्यधर आणि कच हे त्यांचे नायक त्यांतल्या त्यांत प्रेमी खरे. पण, प्रणयाच्या उन्मादानें मन उत्फुल्ल झालेलें असतांनाहि त्यांना कधीं कर्तव्याचा विसर पडत नाहीं, कधीं स्वाभिमानाची जाणीव सुटत नाहीं, कधीं तत्त्वनिष्ठेचा तोल ढळत नाहीं. देवयानीच्या प्रेमालापांत कितीहि गुंगला तरी कचाच्या मनांत आपल्या प्रतिज्ञेचें स्मरण तीव्रतेनें जागृत असतें; व स्वतः शुक्राचार्यांनीं पुढें केलेला देवयानीचा कुसुमकोमल हात तो प्रणयी तरुण वज्रप्राय निष्ठुरपणानें अव्हेरितो ! हें नैष्ठुर्य, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा हा अमानुषतेच्या थरावर जाणारा कठोरपणा, आपल्या त्यागानें वज्रालाहि वितळविणारा हा त्यांचा दिव्य ध्येयवाद मनाला मोहित करितो, विस्मित करितो, उद्दीपित करितो यांत शंका नाहीं. किंबहुना, त्यांच्या या ऊर्जस्वल तत्त्वज्ञानांत--त्यांतून उद्भूत झालेल्या ओजोगुणाच्या प्रकर्षांतच त्यांच्या यशाचें मर्म आहे. पण त्यांचें नाटक पाहून मनुष्य जो उठतो, तो मनावरील भार हलका होऊन नव्हे; तर उलट मन भाराक्रांत होऊन,--भावना उद्दीपित आणि बुद्धि उद्बोधित होऊन. अर्थात् अशा तऱ्हेचा नाटककार लोकांचीं मनें आपल्याकडे खेंचून घेतो, तो आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यामुळें, लालित्यामुळें नव्हे. आणि जिथें लालित्य नाहीं, तिथें लोकप्रियता कुठली ? खाडिलकरांविषयीं आदर कितीहि वाटला, तरी व्यक्तिविषयक अशी उत्कंठा जी वाटत नाहीं, ती याच कारणामुळें. लेसिंगनें म्हटलेलेंच नाहीं काय कीं, आदर ही भावनाशून्य ( Cold ) भावना आहे म्हणून ? त्या दृष्टीनें खाडिलकर हे खरोखरीच दुर्धर्ष वाटतात. पण, महाराष्ट्राला या पारतंत्र्याच्या काळांत असा प्रभावशाली नाटककार लाभला, हें त्याचें भाग्यच होय. अशा तेजस्वी ग्रंथकाराला येत्या संमेलनाचें अध्यक्षस्थान देऊन नागपूरनें गुणज्ञतेबरोबरच आपली कृतज्ञताहि व्यक्त केली, असें कां म्हणूं नये ?

महाराष्ट्र, नोव्हेंबर १९३३

# कविवर्य बोबडे

——:०:——

१९२४ सालच्या सप्टेंबरमध्यें मी नागपुरास आल्यानंतर एक महिन्याच्या आंतच कै. अण्णाजी बोबडे यांच्याशीं माझी ओळख होण्याचा योग आला. मी एक दिवस सायंकाळीं त्यांच्या घरीं गेलों होतों. प्रथम थोडें बोलणें झाल्यावर त्यांनीं आपल्या कवितेच्या वह्या व एक गद्य सुभाषितांचें टांचण मला दाखविलें. त्यांतलि बहुतेक कविता जुन्याच होत्या. म्हणून मी त्यांना सहज विचारलें, " अण्णाजी, तुम्ही वकिली सुरु केल्यापासून तुमचें कवितेकडचें लक्ष कमी झालेलें दिसतें ? " त्यावर ते हंसून म्हणाले, " कोर्टातल्या कामामुळें मला कविता लिहावयाला फुरसत होत नाहीं, पण माझें कवितेकडचें लक्ष मात्र कायमच आहे. " या पहिल्या भेटीनंतर मी त्यांच्याकडे फार तर सात आठ वेळांच गेलों असेन. कारण, आमची वृत्ति आणि व्यवसाय हीं दोन्हीं स्वभावतःच इतकीं भिन्न होतीं कीं, कवितेविषयींची अभिरुचि हा जरी एक आम्हां दोघांना सामान्य असा विषय होता, तरी आम्ही एका भूमिकेवर येऊं शकलों नाहीं.

तथापि त्यांच्या पहिल्या भेटींतच त्यांच्या वृत्तीचा एक विशेष माझ्या मनांत भरला; व त्यामुळें, आमचे संबंध जरी कधीं दृढ झाले नाहींत, तरी त्यांची कधीं काळीं पडणारी गांठ माझ्या विचारांना नेहमीं एक प्रकारची चालना देत असे. तो विशेष म्हणजे त्यांच्या वृत्तींत मुरलेलें आणि प्रत्येक हालचालींतून दिसून येणारें त्यांचें सुखवादित्व. ते खरेखुरे सुखवादी ( epicurean ) होते. सुखवादी मनुष्य हा अत्यंत बुद्धिप्रधान, अत्यंत रसिक असतो. पण त्याच्या बुद्धिवादाला काय किंवा रसिकतेला काय मर्यादा असतात. कोणतेंहि सुख घेतलें, तरी त्याच्या प्राप्तीसाठीं मनुष्याला श्रम करावे लागतात; व कोणताहि उपभोग म्हटला, तरी त्याच्या गोडीला कष्टाचा कडवटपणा थोडा तरी येतोच. अर्थात् जातिवंत सुखवादी असा जो मनुष्य असतो, तो कितीहि बुद्धिप्रधान आणि रसिक असला, तरी बुद्धिविलासासाठीं सुद्धां तो कोणताहि व्याप किंवा ताप आपल्या मागें लावून घेत नाहीं. त्याची भूमिका एका परीनें विरक्ताची असते. मात्र तो विराग त्यागी पुरुषाचा नसतो, तर भोगी पुरुषाचा असतो.

कै. अण्णाजी बोबडे हे भोगी पण विरागी ह्मणजे ‘ असक्तः सुखमन्वभूत् ’ या कोटींतील होते. त्यांच्यासारख्या सुखवाद्याची वृत्ति ही द्वंद्वातीत असते, असें ह्मणतां येईल. पाप आणि पुण्य, सुकृत आणि विकृत, लौकिक आणि दुर्लौकिक हीं सारीं द्वंद्वें, जोंपर्यंत त्यांचा विरोध त्याच्या सुखकल्पनेला बोंचत नाहीं तोंपर्यंत, त्याला सारखींच. सुखवाद्यांचा अग्रणी ग्रीक तत्वज्ञ एपिक्युरस यानें असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, “ सौंदर्य, सद्गुण किंवा तत्सदृश इतर गोष्टी जर सुखाला कारण होत असतील, तरच त्यांना किंमत; नाहीं तर आमचा त्यांना रामराम ! ( Beauty, virtue and the like are to be valued if they produce pleasure; if not, we must bid them farewell. )” आणि, ऑस्कर वाइल्डनें जें म्हटलें आहे कीं, ‘दु:खाच्या दरींतून किंवा दुराचाराच्या दलदलींतून जातांना जर मला नव्या अनुभूतीचा आनंद, नव्या संवेदनेचा सुखास्वाद लुटावयाला मिळण्याचा संभव असेल, तर मी लोक काय बोलतात याची दरकार न करितां बेलाशक त्यांतून प्रवास करीन, ” तें झालें तरी याच अर्थानें. सुखवादी मनुष्य सुकृत विकृत, कर्तव्य अकर्तव्य सुष्ट दुष्ट, नीति अनीति कांहीं जाणत नाहीं; तो फक्त सुख जाणतो.

कै. अण्णाजी बोबडे यांची वृत्ति या प्रकारची असावी, असें मला वाटतें. त्यांच्या तीव्र बुद्धीला कर्तृत्वाचें कोणतेंहि क्षेत्र किंवा कीर्तीचा कोणताहि प्रदेश दुर्गम नव्हता. पण, ते इतके आत्मसंतुष्ट आणि अल्पसंतुष्ट होते कीं, काययाच्या किंवा कवितेच्या प्रांतांत त्यांना परमोच्च यश संपादन करण्याची पात्रता असतांना, त्याच्याकडे पाठ फिरवून एक प्रकारच्या मनोविलासांत त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें. त्यांचें मरण जें इतरांना इतकें आकस्मिक आणि जवळ जवळ आत्मघातासारखें वाटलें, तें, या दृष्टीनें त्यांच्या जीवनक्रमाचा विचार केला असतां, अगदीं स्वाभाविक वाटतें. सुखवादी मनुष्याचें धैर्य आणि तत्वनिष्ठा ही दु:खाला तोंड देण्यांत, दैवाचे आघात सुहास्यानें सोसण्यांत दिसून येत असतात. कै. अण्णाजी बोबडे यांच्या मृत्यूंत त्यांच्या सुखवादी भूमिकेचें श्रेष्ठत्व व तिचा लोकोत्तरपणा प्रकट झाला.

आणि, तत्वनिष्ठेच्या अतिरेकांतून व्यक्त होणारें श्रेष्ठत्व ही अशी गोष्ट आहे कीं, त्या तत्वाच्या युक्तायुक्ततेविषयीं आपण कितीहि साशंक असलों, तरी त्यापुढें आपलें मस्तक आदरानें आपोआप नमतें.

वागीश्वरी, नोव्हेंबर १९३४

# श्रीधर–मनोरमा

"घड्याळकाका! घड्याळकाका!"

ल्हानग्या सुधेच्या तोंडचे हे शब्द आठवले, म्हणजे १९२२ सालीं पुण्यास गेल्यावर पाहिलेल्या रानडे दंपत्याच्या प्रेमळ संसाराचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहतें. माझ्या वडिलांनीं मला विसाव्या वाढदिवसाच्या वेळीं घेऊन दिलेलें सोन्याचें सुंदर घड्याळ तेव्हां माझ्या हातांत असे; व त्या घड्याळावरूनच सुधाताईनें, किंवा खरें बोलावयाचें तर प्रो. श्रीधरराव रानडे यांनीं, तें नांव मला दिलें होतें. त्या नांवाचा त्यांना अद्यापहि विसर पडलेला नाहीं. कारण, गेल्या जानेवारींत मी दादरला त्यांच्या घरीं गेलों असतां, त्यांनीं हंसत हंसत तें नांव उच्चारूनच माझी सुधा–कुंदांशीं गांठ घालून दिली.

रानडे दंपत्य हें त्या वेळीं नारायण पेठेंतील करंदीकरांच्या वाड्यांत रहात असे. त्या वाड्याच्या दर्शनी भागांत कै. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचें बिऱ्हाड होतें; व आंतल्या मुख्य इमारतींत रानडे मंडळी रहात असत. वाड्यांत प्रवेश करतांनाच उजव्या बाजूच्या माडींतील आरामखुर्चीवर रेलून गप्पा मारीत असलेली प्रो. पटवर्धन यांची जराग्रस्त मूर्ति दृष्टीस पडत असे. त्यांचे ते आवेशयुक्त हातवारे, डोळ्यांतील उपरोधाची चमक आणि त्याहिपेक्षां किंचित् विकट भासणारें हास्य यांचा विसर मला कधींहि पडणार नाहीं. एकाद्या जुनाट, वठून चाललेल्या वृक्षाच्या निष्पर्ण फांद्यांची हालचाल आणि त्याचें गांठियाळ खोड पाहून ज्या प्रकारचे उदास विचार मनांत येतात, तसेंच कांहीं तरी त्यांना बघून माझ्या मनाला वाटे. उलट. आंत गेल्यावर रानडे दंपत्याचा, फुलझाडांच्या ताटव्यासारखा, टुमदार संसार पाहिला म्हणजे मन कसें प्रसन्न होत असे!

रानडे दंपत्याविषयीं मनांत कुतूहल उत्पन्न करणाऱ्या किती तरी गोष्टी मी मुंबईस असतांना कै. अनंततनय, श्री. माधवराव काटदरे आणि श्री. प्र. के. अत्रे यांच्या तोंडून ऐकल्या होत्या. त्यांच्या कवितेपेक्षांहि त्यांचें काव्यमय प्रणय-

जीवन हा त्या वेळीं एक मोठाच कौतुकाचा विषय होऊन बसलेला होता. त्यामुळें रानडे दंपत्याचा संसार पहाण्याची आणि विशेषतः सौ. मनोरमाबाईंना भेटण्याची मला साहजिकच फार उत्कंठा लागली होती. प्रो. रानडे यांच्याशीं माझी ओळख अनंततनयांच्या घरीं झाली; व त्याच वेळीं, मला वाटतें, त्यांनीं मला आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण दिलें. त्या आमंत्रणानुसार मी, आषाढांतील एका सायं-काळीं, अनंततनयांच्या बरोबर त्यांच्या घरीं गेलें.

वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर रानडे मंडळीची बैठकीची जागा होती. ही जागा म्हणजे कलोपासक आणि वैज्ञानिक या प्रो. रानडे यांच्या दुहेरी भूमिकेचें एक छोटेखानी प्रदर्शनच होतें. निरनिराळ्या प्रकारचीं पुस्तकें, फोटो, चित्रें, पुतळे, वस्तु यांची किंचित् अव्यवस्थित पण मनोवेधक मांडणी त्या जागेंत केलेली असा-वयाची. रानडे हे काव्यकलेप्रमाणेंच मूर्तिकलेचेहि नादी आहेत; व अर्धवट तयार केलेला आपला एखादा ओला पुतळा घेऊन जेव्हां ते त्याचे रूपविशेष विशद करीत, तेव्हां त्या पुतळ्यापेक्षांहि त्यावर व्याख्यान देणाऱ्या त्या हौशी मूर्ति-काराच्या गंभीर आणि कल्पक मुद्रेवरच माझें लक्ष जास्त स्थिर होत असे. त्यांच्या लहानशा चेहऱ्यांत त्यांचे डोळेच विशाल आणि वैशिष्ट्यदर्शक आहेत; व जिज्ञासा, गांभीर्य आणि विनोद यांच्या ज्या छटा बोलतांना त्यांच्या डोळ्यांत एकामागून एक झरकन उमटत, त्यामुळे त्यांच्या संभाषणाइतकेंच त्यांचें व्यक्ति-त्वहि मला आकर्षक वाटे.

नानांच्या मानानें सौ. मनोरमाबाई या मला त्या पहिल्या भेटीच्या वेळीं तरी कमी आकर्षक वाटल्या. मुंबईस असतांना, एलिझाबेथ ब्राउनिंगचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून, त्यांच्याविषयीं ज्या काव्यमय कल्पना मी मनाशीं केल्या होत्या, त्या साऱ्या कल्पनांचा चुराडा त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर झाला. नानांच्या मानानें त्या किती तरी काळ्या होत्या; व इतर दृष्टींनींहि त्यांची गणना कुरूपांतच होण्या-सारखी होती. शिवाय त्या दिवशीं त्या बोलल्याहि नाहींत मुळींच. एक गोष्ट मात्र माझ्या त्याहि वेळीं लक्षांत आली. त्यांची कविता सुश्लिष्ट, संस्कृतप्रचुर आणि भावपूर्ण होती; व एलिझाबेथच्या सुनीतांतील भावनेची उद्दाम उत्कटता किंवा आर्तता जरी तींत नव्हती, तरी अंतर्गूढ प्रणयभावनेचा शालीन आणि मनोज्ञ असा आविष्कार त्यांच्या कवितांतून दृग्गोचर होत असे. त्या प्रणयभावनेची कोमल दीप्ति त्यांच्या

खोल पण सतेज डोळ्यांत दिसल्याशिवाय राहिली नाहीं; व त्या प्रणयी युगुलाचा निरोप घेऊन घरीं परत येत असतां,

नव्हती सुंदर इंदुसारखी
रूपाचा मी नव्हेच शोकी
ठरवो वेडा मजला लोकीं !
दिव्यत्वाची प्रतिभा मजला मोहवि, कळलें अतां पुरे !

या मनोरमाबाईच्या एका सुंदर भावकवितेंतील ओळी राहून राहून माझ्या मनांत घोळत होत्या.

त्या प्रणयभावनेमुळेंच रानडे दंपत्याच्या संसाराला एक प्रकारचें विलोभनीय माधुर्य आलें होतें. रानडे यांच्याशीं लग्न झाल्यावर स्वतःचा आणि माहेरचाहि ओढगस्तीचा संसार सांवरण्यासाठीं मनोरमाबाईनीं नोकरी करून कांहीं काळ कष्टाचें जीवन कसें आनंदानें काढलें, याचीं वर्णनें मीं बरींच ऐकलीं होतीं. त्यांच्या या कष्टाळू, प्रेमळ पण किंचित् तापट स्वभावाची प्रतीति रानडे मंडळीशीं निकट संबंध आल्यावर मला जास्त जास्त येत गेली. त्यांच्याइतकी गृहधर्मांत दक्ष असलेली सुशिक्षित गृहिणी मी अद्याप दुसरी पाहिलेली नाहीं. त्यांच्या प्रेमळपणाचा एक प्रसंग मला नेहमीं आठवतो. १९२३ च्या ऑागस्टमध्यें आम्हीं कांहीं स्नेही मंडळी बोरघाट पहाण्याला गेलों होतों. भर पावसाळ्याचे दिवस होते ते. दिवसभर पावसाचें सतत कोसळत असलेलें पाणी अंगावर घेत आम्ही घाटावर यथेच्छ हिंडलों; व रात्रीं नऊच्या सुमारास पुण्यास परत आलों. मनोरमाबाईनीं तेवढ्या रात्रीं आम्हांला गारठ्यामुळें वळूं लागलेले पाय शेकावयाला गरम पाणी दिलें; व उन्हउन्हीत, सुग्रास जेवणाची तयारी केली. त्यांची आतिथ्यपरता हा आमच्या रविकिरण मंडळाचा मोठाच आधार होता, असें मी म्हटल्यास तें खचित गैर होणार नाहीं. कारण, त्या वेळीं, डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ते स्वतः, यशवंतराव, द. ल. गोखले आणि मी असे मंडळाचे चार सभासद 'अनिकेत' (Homeless) होतों; व त्यामुळें मनोरमाबाईच्या सदासिद्ध सुग्रास 'थाळी'चें आम्हांला मोठेंच आकर्षण वाटे. आणि,

मंडळाच्या साप्ताहिक सभा जरी कांहीं एका क्रमानुसार निरनिराळ्या सदस्यांकडे भरत, तरी प्रात्याहिक अशा अनौपचारिक सभांची वर्दळ मात्र नानांच्या घरीं असे.

रानडे दंपत्याच्या कवितेपेक्षां त्यांचें जीवन जसें अधिक काव्यमय होतें, त्याचप्रमाणें त्यांच्या स्वतःच्या काव्यस्फूर्तीपेक्षां इतरांना काव्यस्फूर्ती देण्याची किंवा इतरांच्या काव्यस्फूर्तीला वळण लावण्याची त्यांची शक्तिहि अधिक मोठी होती. रविकिरण मंडळ स्थापन करण्याची कल्पना कोणाच्याहि मनांत उगम पावलेली असो. पण ही गोष्ट मात्र निस्संशय कीं, नानांची कल्पकता आणि जिजींची सहृदयता यांनींच त्या मंडळाची जोपासना प्रारंभीं केली. याहिपेक्षां त्या दंपत्याची जास्त महत्वाची कामगिरी म्हणजे यशवंतांच्या असंस्कृत प्रतिभेच्या विकासाला त्यांनीं केलेलें हळुवार साहाय्य. तो दऱ्याखोऱ्यातला कवि ज्या वेळीं चाफळहून पुण्यास आला, त्या वेळीं त्याची ऊर्जस्वल प्रतिभा खरोखरीच अगदीं रानवट होती. पण नाना आणि जिजी यांनीं त्यांच्या प्रत्येक कवितेवर गोड शब्दांनीं टीका करून, त्यांना नवीन कल्पना सुचवून आणि नव्या जगाशीं त्यांचा नाना परीनीं परिचय करून देऊन त्यांच्या कवितेला सुंदर वळण लाविलें. दोघांचेंहि यशवंतांवर बंधुतुल्य प्रेम होतें; व नाना पुण्यास असेपर्यंत त्यांचें घर हें यशवंतांच्या तप्त मनाला एक मोठाच विरंगुळा होता. सौ. मनोरमाबाईंना गृहकृत्यांत मदत करीत करीत, नानांनीं यशवंतरावांच्या काय, माधवरावांच्या काय किंवा शंकररावांच्या काय, कवितांवर केलेल्या मार्मिक टीकेचे किती तरी हृद्य प्रसंग मला आठवतात. मनोरमाबाई थोड्या स्पष्ट, तापट आणि मतप्रदर्शनाच्या बाबतींतसुद्धां एककल्ली असत. उलट नाना वस्ताद, मिस्किलपणानें हंसत हंसत दोष दाखविणारे आणि गोड शब्दानीं आपली कल्पना दुसऱ्याच्या गळीं उतरविणारे. नाट्यछटाकार दिवाकर, गिरीश, माधव ज्यूलियन द. ल. गोखले, अज्ञातवासीप्रभृति जी मंडळी त्यांच्याकडे नेहमीं येत, त्यांच्या लिखाणावर रानडे दंपत्याची सूक्ष्म टीका सारखी चालावयाची; व या ऋणानुबंधी लेखकांच्या वाङ्मयाला वळण लावण्याचें अज्ञात कार्य रानडे दंपत्यानें जसें त्यांना तसेंच स्वतःलाहि न कळत केलें आहे, असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें होणार नाहींत

नानांची दृष्टी जशी रसग्राही आणि मार्मिक तशीच शास्त्रीयही कशी आहे, याची एक मजेदार आठवण मीं कधींहि विसरणार नाहीं. रविकिरण मंडळानें जेव्हां

सुनीतरचनेच्या प्रश्नांत ईर्ष्येनें मन घातलें, तेव्हां मीही कांहीं सुनीतें लिहिलीं; व ती नाना आणि जिजी यांना फार आवडलींहि. त्यांपैकीं ' शुक्रतारा ' या सुनीतांतील

किंवा ज्यांतुनि इंदिरा प्रगटली तें दिव्य हेमांबुज
या गंभीर अथांग सिंधुवरती शून्याचिया शोभतें

या चरणांत शुक्राला दिलेली हेमांबुजाची उपमा विशेषतः डॉ. माधवराव पटवर्धन यांनीं चुकीची ठरविली. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, शुक्राची द्युति शुभ्र असल्यामुळें त्याला हेमांबुजाची उपमा देणें योग्य होणार नाहीं. यावर माझें उत्तर असें होतें कीं, शुक्र ज्या वेळीं क्षितिजावर उतरतो, त्या वेळीं त्याच्या कांतींतील शुभ्रता लोपून जाऊन तिला पिवळसरपणा येत असल्यामुळें त्याला हेमांबुजाची उपमा देण्यांत कांहींहि चूक नाहीं. नानांना माझें हें उत्तर शास्त्रीय दृष्टीनें अगदीं समर्पक वाटलें. पण हा वाद दृक्प्रत्ययानेंच तुटण्यासारखा होता. कर्मधर्मसंयोगानें त्या दिवशीं रात्रीं आम्हीं सारेच येरवड्याला यशवंतांकडे जेवावयाला गेलों; व तेथेंहि पुन्हा हा वाद खूपच रंगला. जेवणानंतर आम्ही जेव्हां बाहेर अंगणांत आलों, तेव्हां क्षितिजावर उतरलेला शुक्र भोंवतालच्या विद्युद्दीपांच्या रांगांत खपून जाईल इतका पिवळसर दिसत होता. त्याच्याकडे बोट दाखवून नाना उद्गारले, " अहो माधवराव, हा शुक्र पहा! गजाननरावांची उपमा अगदीं बरोबर आहे ! " मला केव्हां केव्हां असें वाटतें कीं, विज्ञानाच्या गाढ अभ्यासामुळेंच नानांची कवित्वशक्ति मंदावली आणि त्यांच्या वृत्तींत विलक्षण चोखंदळपणा आला. नाना आणि जिजी यांना एखाद्या नव्या कवितेवरून कवींची उलट तपासणी करितांना पहाणें ही एक मोठीच बौद्धिक करमणूक असे; व रविकिरणमंडळांतील कवींच्या लिहिण्यांत जो सर्वच प्रकारचा रेखीवपणा आढळतो, त्याचें श्रेय अंशतः तरी रानडे दंपत्याच्या मार्मिक टीकेला द्यावें लागेल.

रानडे दंपत्यानें प्रणयाच्या वासंतिक बहरांत काय कविता लिहिल्या असतील तेवढ्याच. नंतर कांहीं फारशा कविता लिहिल्या नाहींत. पण त्यांचें जीवन हेंच मुळीं एक मधुर काव्य होतें. साहित्यिकांच्या ठिकाणीं सामान्यतः आढळणारा क्षुद्र अहंभाव आणि तज्जन्य मत्सरबुद्धि यांनीं त्यांची रसिकता डागळलेली नव्हती; व त्यामुळें त्यांच्या सहवासांत अत्यंत विशुद्ध अशा उच्च बौद्धिक आनंदाचा लाभ घडत असे. स्वतःच्या कवितेविषयीं किंवा जीविताविषयीं त्या

उभयतांना आपण होऊन बोलतांना मी कधींहि ऐकलें नाहीं. वस्तुतः रानडे दंपत्य हें पराकाष्ठेचें आत्मपर होतें. कित्येकांची आत्मपरता अशी असते कीं, स्वतःच्या स्तुतीवरावर इतरांचा अधिक्षेप केल्या—ऐकल्याशिवाय त्यांना आपलें कोडकौतुक पुरें झाल्यासारखें वाटत नाहीं. रानडे यांची आत्मपरता तशा प्रकारची नव्हती. स्वतःच्या आंतर जीवनाविषयीं कधीं न बोलण्यांत जशी त्यांची अभिजात अहंता एका परीनें प्रकट होत असे, तशीच दुसऱ्या परीनें इतरांच्या कलाकृतींची बूज करून त्यांना मार्मिक प्रोत्साहन देण्यांतहि ती दिसून येत असे. आत्मपरतेचा खरा सात्त्विक आनंद हा स्वतःच्या विकासावरोबर इतरांच्या विकासाला हात-भार लावण्यांत असतो; केवळ परनिंदामिश्र अशा आत्मगौरवांत नव्हे. रानडे दंपत्याच्या या विशिष्ट आत्मपरतेमुळें त्यांचें घर हें पुण्यांतील कलाप्रेमी व्यक्तींचें संकेतस्थान होऊन बसलें होतें; व कमलाच्या गाभ्यांत जशी त्याच्या परिमलाचा परिपोष करणारी कर्णिका असते, तसें त्यांचें घर हें त्या वेळीं महाराष्ट्र शारदा-मंदिराच्या निरनिराळ्या चळवळींना प्रेरणा देणारें केंद्र होतें.

रानडे दंपत्याची ही आत्मपरता इतकी उत्कट होती कीं, त्यांना एकमेकां-पलीकडे दुसरें जग नव्हतें असें म्हटलें तरी शोभेल. त्यांच्या आतिथ्यशीलतेचें जें वर्णन मी केलें आहे, त्याच्याशीं हें विधान विसंगत वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः तसें नाहीं. मनुष्याची स्वार्थाची काय किंवा सुखाची काय कल्पना जितकी बौद्धिक आणि व्यापक असते, त्या मानानें त्याला इतरांच्या साहचर्याची आवश्यकता जाणवते; व त्यामुळें तो साहजिकच आतिथ्यशील आणि स्नेहसुलभ बनतो. रानडे दंपत्याची आतिथ्यशीलता याच प्रकारची होती. एरवीं त्या दोघांना आपला संसार आणि लग्नानंतर पुष्कळ वर्षांनीं झालेली आपली मुलगी सुधा यांच्यापलीकडे दुसऱ्या कशांतहि रस नव्हता. या त्यांच्या आत्मपरतेचें आल्हाददायक दृश्य मी अनेकदां पाहिलें आहे. नाना आणि जिजी हीं एकमे-कांशीं बोलत आणि विशेषतः सुधेशीं खेळत असलीं म्हणजे त्यांना इतरांच्या येण्याजाण्याचें फारसें भान नसे. ‘काव्यविचारा’च्या प्रकाशनानंतर गोविंदा-ग्रजांच्या कवितेविषयीं आम्ही सारे मोठमोठ्यानें बोलत असतां, सुधेला खेळवीत असलेल्या मनोरमाबाईंचें त्या बोलण्याकडे दुर्लक्ष असल्याचें बघून मी त्यांना सहज गंमतीनें म्हटलें, “मनोरमाबाई, तुम्हांला सुधा जवळ असली म्हणजे दुसरें

कांहीं सुचत नाहीं !" तेव्हां त्या हसून म्हणाल्या, "खरं आहे तुमचं म्हणणं ! आमची सुधा म्हणजे चालती बोलती कविता आहे !" आणि खरोखरीच सुधा ही त्यांच्या संसाराची मूर्तिमंत सफलता, त्यांच्या प्रणयजीवनांतील चालतें बोलतें काव्य नव्हतें काय ? स्वतः नानांनींच आपल्या 'ओढणी' या हृदयंगम कवितेंत म्हटलें आहे—

संध्येंतली रमणीयता, तारांतली चिरशांतता
उन्माद सौगंधांतला, गानांतली मधुखिन्नता
जमवून ही दुहितामिषें निज शैशवांतिल माधुरी
सुचवीत, आकर्षी मला प्रेमोत्सुका गृहिणी घरीं !

श्रीधर–मनोरमेच्या वात्सल्ययुक्त प्रणयजीवनाचें मर्म इतक्या सुंदर रीतीनें दुसर कोण विशद करूं शकेल ?

धनुर्धारी, ८ एप्रिल १९३८

# हरिभाऊ आपटे

———:०:———

'गड आला, पण सिंह गेला' ही छोटी कादंबरी आपल्यापैकीं बहुतेकांनीं वाचली असेल; व तिचे लेखक हरि नारायण आपटे यांचें नांवहि आपल्याला परिचित असलें पाहिजे. मी सुद्धां लहाणपणीं शाळेंत असतांनाच ही कादंबरी वाचली होती. ती वाचल्यावर माझ्या मनांत जर प्रथम कोणती कल्पना आली असेल, तर ती ही कीं, सिंहगड आणि हरिभाऊ हे दोन्हीहि प्रत्यक्ष डोळे भरून पहावे ! त्याप्रमाणें १९१६ सालीं मीं जेव्हां पुण्यास गेलों, तेव्हां तो इतिहासप्रसिद्ध किल्ला आणि त्यावर कादंबरी लिहिणारे हरिभाऊ या दोघांचेही दर्शन मोठ्या उत्सुकतेनें घेतले. आनंदाश्रमांत शिरल्याबरोबर तेथील कारंजाजवळ टेवलेल्या बाकावर बसलेली हरिभाऊंची ती सांवळी, प्रेमळ आणि स्मितवदन मूर्ति आजहि तुमच्याशीं बोलतांना मला डोळ्यांपुढें दिसते आहे. त्यांच्याशीं बोलण्याचें धैर्य अर्थातच मला झालें नाहीं. पण मी त्यांना पुनः पुन्हा जिज्ञासेनें बघितलें; व सिंहगड पाहिल्यावर त्याच्या भव्यपणाचा ठसा माझ्या मनावर जसा कायमचा उमटला, तसाच हरिभाऊंच्या वृत्तितील प्रसन्नतेनेंहि मी अगदीं मुग्ध होऊन गेलों.

हरिभाऊंच्या नंतर अनेक कादंबरीकार उदयास आले आहेत; व त्यापैकीं कांहींच्या कादंबऱ्या तर आज कदाचित् हरिभाऊंच्या कादंबऱ्यांपेक्षांहि जास्त हव्यासानें वाचल्या जात असतील. पण 'हरिभाऊ' या प्रेमळ घरगुती नांवानें सर्व महाराष्ट्रभर ओळखलें जाण्याचें अद्‌भुत यश मात्र त्या लोकप्रिय कादंबरीकारां· पैकीं एकालाहि लाभलेलें नाहीं. हरिभाऊंच्या या यशाला मी मुद्दामच 'अद्‌भुत' हें विशेषण लावलें आहे. आपल्याला पुष्कळ कादंबऱ्या आवडतात. पण, त्यांच्या लेखकांविषयीं आपल्याला जिव्हाळा आणि विश्वास वाटतोच, असें मात्र नाहीं. उलट हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचतांना आपल्या घरांत नेहमी घडणारे कांहीं प्रसंगच आपण पहात आहोंत असें वाटतें; आपल्या घरांत सदोदित चालणारी बोलणींच आपल्या कानांवर पडत आहेत असा भास होतो; व त्यामुळें आपल्या

कांहीं सुचत नाहीं !" तेव्हां त्या हसून म्हणाल्या, "खरं आहे तुमचं म्हणणं ! आमची सुधा म्हणजे चालती बोलती कविता आहे!" आणि खरोखरीच सुधा ही त्यांच्या संसाराची मूर्तिमंत सफलता, त्यांच्या प्रणयजीवनांतील चालतें बोलतें काव्य नव्हतें काय ? स्वतः नानांनींच आपल्या 'ओढणी' या हृदयंगम कवितेंत म्हटलें आहे—

संध्येंतली रमणीयता, तारांतली चिरशांतता
उन्माद सौगंधांतला, गानांतली मधुखिन्नता
जमवून ही दुहितामिषें निज शैशवांतिल माधुरी
सुचवीत, आकर्षी मला प्रेमोत्सुका गृहिणी घरीं !

श्रीधर–मनोरमेच्या वात्सल्ययुक्त प्रणयजीवनाचें मर्म इतक्या सुंदर रीतीनें दुसर कोण विशद करूं शकेल ?

धनुर्धारी, ८ एप्रिल १९३८

# हरिभाऊ आपटे

———:०:———

'गड आला, पण सिंह गेला' ही छोटी कादंबरी आपल्यापैकीं बहुतेकांनीं वाचली असेल; व तिचे लेखक हरि नारायण आपटे यांचें नांवहि आपल्याला परिचित असलें पाहिजे. मी सुद्धां लहाणपणीं शाळेंत असतांनाच ही कादंबरी वाचली होती. ती वाचल्यावर माझ्या मनांत जर प्रथम कोणती कल्पना आली असेल, तर ती ही कीं, सिंहगड आणि हरिभाऊ हे दोन्हीहि प्रत्यक्ष डोळे भरून पहावे ! त्याप्रमाणें १९१६ सालीं मीं जेव्हां पुण्यास गेलों, तेव्हां तो इतिहासप्रसिद्ध किल्ला आणि त्यावर कादंबरी लिहिणारे हरिभाऊ या दोघांचेही दर्शन मोठ्या उत्सुकतेनें घेतलें. आनंदाश्रमांत शिरल्याबरोबर तेथील कारंजाजवळ ठेवलेल्या बाकावर बसलेली हरिभाऊंची ती सांवळी, प्रेमळ आणि स्मितवदन मूर्ति आजहि तुमच्याशीं बोलतांना मला डोळ्यांपुढें दिसते आहे. त्यांच्याशीं बोलण्याचें धैर्य अर्थातच मला झालें नाहीं. पण मी त्यांना पुनः पुन्हा जिज्ञासेनें बघितलें; व सिंहगड पाहिल्यावर त्याच्या भव्यपणाचा ठसा माझ्या मनावर जसा कायमचा उमटला, तसाच हरिभाऊंच्या वृत्तितील प्रसन्नतेनेहि मी अगदीं मुग्ध होऊन गेलों.

हरिभाऊंच्या नंतर अनेक कादंबरीकार उदयास आले आहेत; व त्यापैकीं कांहींच्या कादंबऱ्या तर आज कदाचित् हरिभाऊंच्या कादंबऱ्यांपेक्षांहि जास्त हव्यासानें वाचल्या जात असतील. पण 'हरिभाऊ' या प्रेमळ घरगुती नांवानें सर्व महाराष्ट्रभर ओळखलें जाण्याचें अद्‌भुत यश मात्र त्या लोकप्रिय कादंबरीकारांपैकीं एकालाहि लाभलेलें नाहीं. हरिभाऊंच्या या यशाला मी मुद्दामच 'अद्‌भुत' हें विशेषण लावलें आहे. आपल्याला पुष्कळ कादंबऱ्या आवडतात. पण, त्यांच्या लेखकांविषयीं आपल्याला जिव्हाळा आणि विश्वास वाटतोच, असें मात्र नाहीं. उलट हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचतांना आपल्या घरांत नेहमी घडणारे कांहीं प्रसंगच आपण पहात आहोंत असें वाटतें; आपल्या घरांत सदोदित चालणारी बोलणींच आपल्या कानांवर पडत आहेत असा भास होतो; व त्यामुळें आपल्या

कौटुंबिक आणि सामाजिक जीवनांतील सारी गोडी पुन्हा आपल्या अनुभवाला आणून देणारा हा सहृदय कादंबरीकार आपल्या घरातल्या अगदीं जिव्हाळ्याच्या माणसासारखा आपल्याला वाटतो. इतर कादंबरीकार आपली करमणूक करतात, आपल्या भावनाकामनांना झुलवितात किंवा आपल्याशीं तात्त्विक चर्चेची हुजत घालतात. ते कलाकोविद असतील, जादूगार असतील किंवा तत्त्वज्ञानी असतील; पण त्यांना आपण आपले सुहृद् मात्र केव्हाहि म्हणणार नाहीं. उलट हरिभाऊ हे आपले सुहृद् आहेत; त्यांचें स्थान आपल्या हृदयांत आहे, आपल्या कुटुंबांत आहे.

ही अद्भुत लोकप्रियता हरिभाऊंना कोणत्या कारणांमुळें मिळाली? इतर कादंबरीकार आणि हरिभाऊ यांच्यामध्यें असा कोणता फरक आहे कीं, ज्यामुळें हरिभाऊ आपल्याला आपल्या घरांतल्या जिव्हाळ्याच्या माणसासारखे वाटावेत आणि इतरांपासून आपण फक्त करमणुकीची किंवा तत्त्वजिज्ञासेची अपेक्षा करावी? हा फरक असा कीं, इतर कादंबरीकार हे आपल्या भोंवतालच्या समाजाच्या चालचलणुकीशीं, सुखदुःखांशीं आणि आशाआकांक्षांशीं समरस न होतां कादंबऱ्या लिहितात; तर हरिभाऊंनीं महाराष्ट्रांतल्या पांढरपेशा वर्गाशीं तन्मय होऊन त्याच्या जीवनाचीं शब्दचित्रें अत्यंत सहृदयतेनें रेखाटलीं आहेत. पण त्यांच्या कादंबऱ्यांत नुसती तन्मयताच नाहीं, तर तळमळहि आहे. कारण हरिभाऊ प्रथम समाजसुधारक आणि नंतर कादंबरीकार होते. ते जर नुसतेच वास्तववादी असते, तर त्यांनीं आपल्यापुढें समाजाचीं सुखदुःखें आणि गुणावगुण हे जसेच्या तसेच चित्रित करून ठेवले असते. अशा प्रकारच्या नुसत्या यथादर्शनानेंहि वाचकाचे डोळे उघडतात, नाहीं असें नाहीं. पण डोळे उघडले, तरी त्यांना फक्त परिस्थितीचें यथार्थ ज्ञान होतें; तिच्यांतून मार्ग कसा काढावयाचा हें दिसत नाहीं. वास्तववादी वाङ्मयाचा प्रमुख दोष हा कीं, तें समाज खरोखरी जसा असेल तसें त्याचें चित्र दाखवून मोकळें होतें; त्याच्या उन्नतीचा मार्ग दाखवीत नाहीं. अशा तऱ्हेच्या मार्गदर्शनाला ध्येयदृष्टि अवश्य असते. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत वास्तववाद आणि ध्येयदृष्टि यांचा मिलाफ झालेला असल्यामुळेंच त्या जशा समाजस्थितीच्या निदर्शक तशाच समाजाला मार्गदर्शकहि झाल्या आहेत. आपल्या समाजाशीं तन्मय होण्याची वृत्ति आणि त्याची सुधारणा करण्याची तळमळ या दोन गुणांमुळें त्यांच्या कादंबऱ्यांत

अद्वितीय असा जिव्हाळा आणि जिवंतपणा उत्पन्न झाला असून, ते महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्गाचे विश्वस्त सुहृद् होऊन बसले आहेत.

हरिभाऊंच्या या वैशिष्ट्याची प्रतीति विशेषतः विद्यार्थिवर्गाला येण्यासाठीं 'मी' आणि 'यशवंतराव खरे' या दोन कादंबऱ्यांची थोडी चर्चा केली असतां पुरे होईल. कारण या दोन्ही कादंबऱ्यांत दोघां तरुणांचा जीवनवृत्तांत अगदीं बाळपणापासून दिलेला असून, त्यांच्या मानसिक आणि बौद्धिक विकासाचें उत्कृष्ट वर्णन आणि विश्लेषण केलेलें आहे. 'मी' मधील 'भाऊ' हा सामान्यतः बऱ्या स्थितींतील मुलगा, 'यशवंतराव' हा बोलून चालून माधुकरी. 'भाऊ'ला शिवराम-पंतांसारख्या सात्त्विक आणि उदार विचारांच्या पुरुषाचा सहवास लाभतो; व त्यांची सुशील पत्नी आणि सुंदर कन्या यांचें साहचर्य त्याच्या बुद्धिविकासाला पोषक होतें. त्यामुळें आपल्या आईच्या आणि बहिणीच्या संसाराचें मातेरें झालेलें डोळ्यांसमोर बघत असतांना सुद्धा त्याचें मन खचून किंवा पिचून जात नाहीं; व त्या घटनेपासून योग्य तो बोध घेऊन तो समाजोन्नतीच्या कार्याला आपलें जीवितसर्वस्व अर्पण करतो. उलट 'यशवंतरावा'ला श्रीधरपंतांसारखा कोत्या दृष्टीचा आणि कुत्सित मनाचा पुरुष मार्गदर्शक लाभतो; व त्याच्या कजाग पत्नीकडून त्या निराश्रित पोराची गांजणूक होऊन वैवाहिक जीवनाचें अत्यंत विपरीत दृश्य त्याला पहावयाला मिळतें. या दोनहि गोष्टींचा अतिशय विदारक परिणाम 'यशवंतरावा'च्या कोंवळ्या, अपरिपक्व मनावर होऊन त्याच्या हृदयांतील कोमल भावना वठून जातात; त्याचें मन खुनशी आणि बुद्धि अनुदार होते; व त्याच्या उत्कट देशाभिमानालाही एक प्रकारचें संकुचित आणि विकृत स्वरूप प्राप्त होतें. या दोन मुलांच्या आयुष्याला लागलेलें हें अगदीं भिन्न वळण वर्णन करतांना तत्कालीन कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थितीचें जें चित्र हरिभाऊंनीं रेखाटलें आहे, तें पाहून या बदललेल्या काळातहि आपल्यापैकीं बहुतेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरांतल्या किंवा शाळेंतल्या कांहीं प्रसंगांची आठवण खचित होईल. विशेषतः चिमुकल्या 'यशवंतरावा'ला दारिद्र्याचे जे चटके त्या काळांत थोरामोठ्यांच्या घरीं बसले, ते आजसुद्धां मधुकरी मागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला येत असतात; व त्यामुळें 'यशवंतराव खरे' याची हृदयस्पर्शी जीवनकथा वाचतांना महाराष्ट्रांतील प्रत्येक गरीब विद्यार्थ्याला स्वतःच्या कष्टमय जिण्याची थोडी ना थोडी प्रतीति तींत

झाल्याशिवाय राहणार नाहीं. यशवंतरावाचें कोमल पण मानी मन प्रसंगाप्रसंगानें कसकसें पिचत, विटत आणि खुनशी होत गेलें, याचें हरिभाऊंनीं त्या कादंबरींत केलेलें वर्णन मानसशास्त्राच्या दृष्टीनें खरोखरीच अप्रातम आहे.

वास्तववाद आणि ध्येयदृष्टि यांच्या दृष्टीनेहि या दोन कादंबऱ्या महत्वाच्या आहेत. ‘ यशवंतराव खरे ’ या कादंबरींत हरिभाऊंनीं कोणत्याहि प्रकारच्या ध्येय-वादाचा आविष्कार किंवा पुरस्कार प्रत्यक्ष असा केलेला नाहीं. फक्त एका अत्यंत गरीब स्थितींतील मुलाच्या कोंवळ्या मनावर निरनिराळ्या घटनांचे आणि अनु-भवांचे संस्कार कसे होत जातात, याचें वर्णन आणि विश्लेषण केलें आहे. तेंहि कमी बोधप्रद आहे असें नाहीं. कारण गरीब विद्यार्थ्यांना माणुसकीनें न वागवल्यास त्याचे परिणाम काय होतात, याची अप्रत्यक्ष पण मार्मिक कल्पना ती कादंबरी वाचून आपल्याला येते. तथापि या अप्रत्यक्ष बोधाहून किती तरी उज्ज्वल आणि हृदयंगम असा ध्येयवाद ‘मी’ या कादंबरींत भरलेला आहे. त्या कादंबरींत हरिभा-ऊंना ‘भाऊ’ चा नुसता मनोविकास दाखवावयाचा नव्हता; तर प्रतिकूल परिस्थितींतून वर आलेल्या त्या तरुणाचें जीवित उदात्त संस्कारांच्या प्रभावामुळे कसें सफल आणि समाजोपयोगी झालें, याचें मनोज्ञ दृश्य त्यांना समाजापुढे ठेवावयाचें होतें. पहिल्या कादंबरींत वास्तवाला विश्लेषणाची, तर दुसरींत त्याला ध्येयवादाची जोड मिळाली आहे; व त्यामुळे त्यांच्या वाचनाचा मनावर अगदीं भिन्न परिणाम होतो. ‘मी’ ही कादंबरी या दृष्टीनें ‘ यशवंतराव खरे ’ या कादंबरीपेक्षाच केवळ नव्हे, तर हरिभाऊंच्या इतरहि सामाजिक कादंबऱ्यांहून अगदी निराळी पडते. ‘भाऊ’चा अखेर ‘भावानंद’ झालेला ‘मी’ कादंबरीचा नायक हा हरिभाऊंच्या ध्येयवादाचा पूर्णावतार होय. इतर कादंबऱ्यांतून हरिभाऊंनी सुशील सुधारकांचा पुराणमतवादी समाजकंटकांकडून छळ करवून समाजसुधारणेचा पुरस्कार पर्यायानें केला आहे. तसें ‘मी’ कादंबरीचें नाहीं. तिच्यांतील मतप्रतिपादन हे उघड, आवेशयुक्त आणि पद्धतशीर आहे. बंकिमचंद्राच्या ‘आनंदमठ’ या कादंबरीला राजकीय दृष्टीनें जे महत्त्व, तेंच महत्त्व सामाजिक दृष्टीने हरिभाऊंच्या ‘मी’ या कादंबरीला देतां येईल; व ना. गोखले यांचा ‘ भारतसेवकसमाज, ’ प्रो. कर्वे यांचा ‘ निष्काम कर्ममठ ’ किंवा कै. देवधर यांचें ‘ सेवासदन ’ या नंतर अनेक वर्षांनीं स्थापन झालेल्या संस्था हरिभाऊंची ध्येयदृष्टि किती अचूक होती, याची

उत्कृष्ट साक्ष देतात. बंकिमचंद्रांना आपण फार तर राष्ट्रगीताचे द्रष्टे म्हणूं. पण, हरिभाऊंना, राष्ट्रसेवेचा जो नवधर्म पुढें गोखले प्रभृतींनी प्रसृत केला, त्याचे द्रष्टे म्हटल्यास खचित अतिशयोक्ति होणार नाहीं, 'यशवंतरावा'च्या मनोवृत्ती-सारखी घडण अनेक गरीब विद्यार्थ्यांच्या मनाची होत असेल. पण भावानंदा-सारखा विद्यार्थी मात्र लाखांतून एखादाच निर्माण व्हावयाचा.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांवर एक आक्षेप अलीकडे घेतला जातो; व तो बहुधा आपल्याहि कानावर आला असेल. हा आक्षेप असा की, हरिभाऊंच्या या सामाजिक कादंबऱ्यांचें क्षेत्र पांढरपेशा वर्गापुरतेंच मर्यादित असून, त्यांत विवेचिलेले समाजसुधारणेचे निरनिराळे प्रश्नहि त्या वर्गासंबंधाचेच आहेत. हाच आक्षेप डॉ. केतकर यांच्या फटकळ शब्दांत सांगावयाचा म्हणजे हरिभाऊ हे 'सदाशिव पेठी' कादंबरीकार होते. पण मला स्वतःला हरिभाऊंवर घेतला जाणारा हा आक्षेप दूषणास्पद वाटत नाहीं, तर भूषणास्पदच वाटतो. सर वॉल्टर स्कॉट किंवा थॉमस हार्डी या इंग्रजी कादंबरीकारांचीं नांवें बहुधा आपल्याला माहीत असतील. यांपैकीं स्कॉटनें आपल्या कादंबऱ्यांतील बहुतेक दृश्यें आणि प्रसंग हे आपल्या जन्मभूमींतून म्हणजे स्कॉटलंडांतील हायलँड्समधून उचललेले असून, हार्डीच्या कादंबऱ्यांचें स्वरूप तर इतकें कांहीं प्रादेशिक आहे कीं, त्यांना 'वेसेक्स नॉव्हेल्स' म्हणजे 'वेसेक्स भागासंबंधीच्या कादंबऱ्या' असें म्हटलें जातें. कारण आपल्या कादंबरींतील कथानकें काय, सृष्टिसौंदर्य काय किंवा वाक्प्रचार काय, साऱ्याच बाबतींत हार्डीनें आपली जन्मभूमि जी वेसेक्स तिच्यापलीकडे कधीं ढुंकूनहि पाहिलें नाहीं. हरिभाऊंनीं तरी यापेक्षा दुसरें काय केलें ? आणि जें केलें त्यांत अस्वाभाविक तरी काय आहे ? कादंबरीकार कितीहि प्रतिभाशाली असला, तरी त्याच्या अवलोकनाला काय किंवा अनुभवांना काय, परिस्थितीची मर्यादा ही पडणारच. शिवाय हरिभाऊंनी 'सदाशिव पेठी' कादंबऱ्या लिहिल्या असल्या, तरी त्यांतील कांहीं पात्रें आणि कांहीं प्रश्न हे विश्ववाङ्मयांत शोभून जातील अशा प्रकारचे आहेत; व येथेंच त्यांच्या प्रति-भेचें विशालत्व प्रतीत होतें. त्यांच्या प्रायः सर्वच कादंबऱ्यांतून निरनिराळ्या रीतींनीं मांडला गेलेला स्त्रियांच्या दास्यमोचनाचा प्रश्न हा सर्व मानवजातीला

सामान्य असाच नाहीं काय ? किंवा यशवंतरावाचें जें कष्टमय बाल्य त्यांनीं इतक्या सहृदयतेनें आणि समरसतेने चित्रित केलें आहे, तें जगांतील सर्वच दरिद्री विद्यार्थ्यांना लागू पडत नाही काय ? मानवी स्वभाव आणि त्यामुळें उद्भूत झालेले प्रश्न हे जगांत सर्वत्र सारखेच आहेत; व त्यांची चर्चा आणि चित्रण जो कादंबरीकार जिव्हाळ्यानें आणि जाणिवेनें करील, तो पुण्याचा असो, वेसेक्सचा असो किंवा स्कॉटलंडचा असो, त्याचें वाङ्मय सर्व मानवजातीच्या मनाला चटका लावील, याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

हरिभाऊंनीं जे सामाजिक प्रश्न आपल्या कादंबऱ्यांतून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने विवेचिलेले आहेत, त्यांचें स्वरूप लक्षांत घेतलें असतां, त्यांच्या कादंबऱ्यांतील निरीक्षणाचें क्षेत्र जरी कदाचित् मर्यादित असलें, तरी त्यांचा दृष्टिकोन किती व्यापक आणि विशाल होता, याची कल्पना येते. त्यांच्या सर्व सामाजिक कादंबऱ्यांचा पायाभूत विषय स्त्रीवर्गाची उन्नति हा आहे. धर्मशास्त्र, विवाहसंस्था आणि कुटुंबपद्धति यांच्या कचाट्यांत सांपडलेल्या हिंदु स्त्रीच्या व्यक्तित्वाचा आज सर्व बाजूंनी कसा कोंडमारा होत आहे, हें हरिभाऊंनी जितक्या निरनिराळ्या प्रकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून वर्णन केलें आहे, तितकें तें दुसऱ्या कोणत्याहि मराठी ललित लेखकाने दाखविलेलें आढळणार नाहीं. जणु कांहीं 'गणपतराव' या कादंबरींतिल त्यांच्या भावनाप्रधान नायकाप्रमाणें त्यांनीं स्वतःसुद्धा मिल्च्या 'स्त्रियांची गुलामगिरी' या पुस्तकावर हात ठेवून स्त्रीदास्यमोचनाच्या प्रश्नाला आपली लेखणी वाहण्याची शपथ कादंबरीलेखनाला प्रारंभ करतांना घेतली होती ! यमू, दुर्गी, ताई, पद्मा, कमला, राधाबाई, मथू इत्यादि त्यांच्या नायिका आणि उपनायिका म्हणजे हिंदु समाजांत होत असलेल्या स्त्री-जातीच्या पद्धतशीर पायमल्लीचीं निरनिराळी प्रतीकेंच म्हणतां येतील. हरिभाऊ विवाहसंस्थेच्याविरुद्ध होते कीं नाहीं, हें सांगणें कठिण आहे; व घटस्फोटाचाहि पुरस्कार त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून उघड रितीनें केलेला तरी आढळत नाहीं. पण दुर्गी, ताई आणि पद्मा या आपल्या तीन नायिकांच्या रूपानें सध्याच्या अविच्छेद्य विवाहपद्धतीमुळें होणाऱ्या स्त्रियांच्या अमानुष गांजणुकीचीं जीं अघोर दृश्यें त्यांनीं रेखाटली आहत, त्यांचें मर्म आणि त्या तीन नायिकांनीं वेळोवेळीं काढलेल्या उद्गारांतील ध्वनि लक्षांत घेतां, हीं पात्रें निर्माण करून हरि-

भाऊंनीं लग्नविच्छेदाची आवश्यकताच पर्यायानें प्रतिपादन केली आहे, असें म्हणावयाला हरकत वाटत नाहीं.

स्त्रियांच्या उन्नतीच्या खालोखाल जर हरिभाऊंनी दुसऱ्या कोणत्या विषयाचें विवेचन आपल्या कादंबऱ्यांतून जिव्हाळयानें आणि वारंवार केलें असेल; तर तें आपल्या समाजाच्या सध्याच्या रहाणीमुळें होणाऱ्या मुलांच्या कोंडमाऱ्याचें. 'पण लक्षांत कोण घेतो?' मधील यमू आणि तिचा दादा, 'मीं' मधील भाऊ आणि त्याची ताई, 'यशवंतराव खरे' मधील यशवंतराव आणि कृष्णाबापू या मुलांवर त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचे जे परिणाम झाल्याचें हरिभाऊंनीं दाखवलें आहे, त्यावरून आपली कुटुंबपद्धति मुलांच्या शारीरिक आणि बौद्धिक विकासाला कशी मारक आहे, याची उत्तम कल्पना येते. मुलगा दारिद्र्यांत जन्मलेला असेल, तर गरिबीमुळें त्याचा कोंडमारा होतो; व तो श्रीमंतींत जन्मलेला असेल, तर लाडांमुळें त्याच्या आयुष्याची नासाडी होते. एवंच गरिबी आणि श्रीमंती या दोनहि अवस्था मुलांना वाढविण्याच्या आपल्या चुकीच्या पद्धतीमुळें त्यांच्या अवनतीला कारण होतात. 'यशवंतराव खरे' मधील आडमुठयांच्या घरचीं मुलें हे संपन्न परिस्थितीमुळें बिघडलेल्या पोरांचे उत्कृष्ट नमुने आहेत ? तर स्वतः यशवंतराव हा दारिद्र्य आणि त्यापायीं पावलोपावलीं होणारी मानखंडना ह्यामुळें हळुहळू विकृत होत गेलेल्या मानवी मनोवृत्तीचें अत्यंत हृदयंगम उदाहरण आहे. याच्या उलट 'मी' मधील 'सुंदरी' आणि 'कर्मयोगां'तील 'चंद्री' यांच्या रूपानें सुविद्य आणि समजूतदार आईबापांच्या सान्निध्यांत बाल्य गेलें असतां मुलांच्या शरीराचा आणि बुद्धीचा कसा सुंदर विकास होतो, याचें आल्हाददायक चित्र हरिभाऊंनी रेखाटलें आहे. किंबहुना, 'मी' मधील 'भाऊ' आणि 'सुंदरी' या दोन मुलांच्या भोंवतालच्या कौटुंबिक परिस्थितींतील वैषम्य दाखवून हरिभाऊंनीं मुलांना वाढवण्याच्या आपल्या एकंदर पद्धतीचा मोठा मार्मिक आणि तुलनात्मक आविष्कार केला आहे; व 'सुंदरी', तिची आई आणि तिचे वडील यांचा सहवास लाभल्यामुळेंच 'भाऊ' पुढें निवळतो आणि त्याच्या आयुष्याला उदात्त वळण लागतें, ही त्या कादंबरींतील घटनाहि त्या दृष्टीनें अतिशय सूचक आहे. हिंदूंच्या विशिष्ट कौटुंबिक आणि सामाजिक कल्पनांमुळें आज स्त्रियांच्या खालोखाल जर कोणाचा कोंडमारा होत असेल, तर तो मुलांचा. ही गोष्ट लक्षांत घेऊन हरिभाऊंनीं स्त्रियांप्रमाणेंच मुलां-

च्याहि दुर्दशेचीं विदारक वर्णनें आपल्या कादंबऱ्यांतून जागोजाग केलीं आहेत; व 'यशवंतराव खरे' ही त्यांची कादंबरी मराठी वाङ्मयांत त्या दृष्टीनें अद्वितीय मानली जाईल यांत संशय नाहीं. हरिभाऊंच्या नंतर स्त्रीविषयक प्रश्नांवर अधिक आवेशानें लिहिणारे कादंबरीकार मराठींत पुष्कळ उत्पन्न झाले आहेत. पण आपल्या मुलांच्या परिस्थितीची तितक्याच सहृदयतेनें दाद घेणारा ललित लेखक मात्र अद्याप एकहि निघालेला नाहीं.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांकडून ऐतिहासिक कादंबऱ्यांकडे वळणें एका दृष्टीनें अधिक आल्हाददायक आहे. कारण एक तर, सामाजिक कादंबऱ्यांतील एकंदरींत विषादपूर्ण वातावरण ऐतिहासिक कादंबऱ्यांत दृष्टीस पडत नाहीं. दुसरें असें कीं, वैचित्र्य आणि अद्भुतता या दोन्ही दृष्टींनी ऐतिहासिक कादंबऱ्या सामाजिक कादंबऱ्यांपेक्षां अधिक चित्तवेधक ठरतील. माझा स्वतःचा लहानपणचा या बाबतींतील अनुभव मला अद्याप आठवतो. 'पण लक्षांत कोण घेतो?' ही कादंबरी मी अर्धी अधिक वाचल्यावर मला तिचा कंटाळा आला; व 'मी' ही कादंबरी तर मी तितकीहि वाचूं शकलों नाहीं. उलट 'उषःकाल' या कादंबरीचीं मीं किती पारायणें केलीं असतील हें सांगणें कठीण आहे! त्या कादंबरींतील तीं भुयारें, तो सावळ्या, ती कडकलक्ष्मी आणि तो बिब्बी झालेला खान—सारीं कशीं अगदीं चलच्चित्रांप्रमाणें माझ्या डोळ्यांपुढें दिसत आहेत. ही मजा हरि-भाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांत खास नाहीं. त्यांतल्या त्या मनाला पावलोपावलीं विचार करावयाला लावणाऱ्या गंभीर घटना कोणीकडे आणि यांतले हे अंगावर क्षणोक्षणीं रोमांच उभे करणारे विलक्षण प्रसंग कोणीकडे! तेव्हां त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या सामाजिक कादंबऱ्यांपेक्षां आपल्याला अधिक आवडाव्यात यांत आश्चर्य नाहीं; व विशेषतः आपणां सर्वांना अत्यंत प्रिय आणि आदरणीय असलेल्या श्रीशिवाजी महाराजांच्या चरित्रांतील धीरोदात्त प्रसंगांवर त्यांतलि कांहीं कादंबऱ्यांची उभारणी केलेली असल्यामुळें आपण त्या पुनः पुन्हा गोडीनें वाचून त्यांच्यापासून देशाभिमानाची स्फूर्ति घ्यावी, हेंहि अगदीं स्वाभा-विक आहे. तथापि 'उषःकाल,' 'सूर्योदय' आणि 'रूपनगरची राजकन्या' या कादंबऱ्या जरी अतिशयच चटकदार असल्या, तरी कलेच्या दृष्टीनें 'गड आला पण सिंह गेला,' 'वज्राघात' आणि 'चंद्रगुप्त' या कादंबऱ्या श्रेष्ठ

आहेत, असें मी म्हणेन. स्थल, काल आणि व्यक्ति यांचें चित्रण करण्यामध्यें जी सूक्ष्म आणि मार्मिक ऐतिहासिक दृष्टि त्या कादंबऱ्यांतून व्यक्त झाली आहे, ती तितक्या सूक्ष्मतेनें आणि सुंदरतेनें त्यांच्या इतर कादंबऱ्यांतून आढळून येत नाहीं. विशेषतः 'चंद्रगुप्त' आणि 'वज्राघात' या कादंबऱ्या मराठींतील ऐतिहासिक कथावाङ्मयांत सर्वच दृष्टींनीं अद्वितीय ठरतील. हरिभाऊंना स्कॉटची उपमा नेहमीं दिली जाते; व शिवकालावरील कादंबऱ्या किंवा 'रूपनगरची राजकन्या' या कादंबरीपुरताच जर विचार केला, तर ती उपमा अगदींच अस्थानीं नाहीं हें कबूल करावे लागेल. पण स्त्रीदाक्षिण्याच्या मोहनीनें ओतप्रोत भरलेल्या स्कॉटच्या कादंबऱ्यांतून जी एक प्रणयप्रचुर वातावरणाची रम्यता पसरलेली आहे ती हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत जवळ जवळ नाहींच. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील वातावरण करुण, गंभीर आणि ओज यांनीं परिपूर्ण व प्रणयापासून एकंदरींत अलिप्त असें आहे. स्कॉटचें सादृश्य हरिभाऊंपेक्षां नाथमाधवांशीं अधिक आढळून येईल, असें मला वाटतें.

हरिभाऊंविषयीं आणखी किती तरी गोष्टी मी आपल्याला सांगूं शकेन. पण माझ्यासमोर असलेल्या घड्याळाचा कांटा मला दर्शवित आहे कीं, माझा वेळ संपत आला. म्हणून मी आणखी फक्त एकच गोष्ट आपल्याला सांगतों. ती ही कीं, हरिभाऊंकडे आपण नर्मसाचिव, उपदेशक किंवा तत्वज्ञानी म्हणून पाहूं नका. तर ज़िवलग सुहृद म्हणून पहा. माझ्या भाषणाच्या आरंभींच मीं आपल्याला सांगितलें कीं, ते आपले सुहृद् आहेत; व हा जो शब्द मी त्यांच्याविषयीं वापरला आहे, त्याचे स्वारस्य आपण नीट लक्षांत घ्या. सुहृद् म्हणजे निष्कपट आणि प्रेमळ अंतःकरणाचा मित्र. हरिभाऊ हे अशा प्रकारचे आपल्या सर्वांचे मित्र आहेत. त्यांच्या भाषेंत, शैलींत, वर्णनांत, कथानकांत–सर्वत्र त्यांचें हें सौहार्द आपल्या दृष्टीस पडेल. हरिभाऊ हे वस्तुतः उत्कृष्ट भाषापंडित होते. पण त्यांच्या कादंबऱ्यांतील भाषा पांडित्याच्या कोणत्याहि प्रसाधनापासून अलिप्त आहे. मात्र ती अलंकारिक नसली, तरी अत्यंत हृदयंगम आहे. किंबहुना, हरिभाऊंच्या वृत्तींत जे एक विलक्षण मार्दव आहे, त्यांतील मृदुता त्यांच्या शब्दांतहि सांठविलेली असून, ते शब्द आपल्या हृदयाला विरघळून सोडतात. त्यांच्या भाषेप्रमाणेंच त्यांच्या शैलींत किंवा कथानकांत कोणत्याहि प्रकारचा शृंगार, कोणत्याहि प्रकारची

कृत्रिम सजावट आपल्याला दिसणार नाहीं. इतर कादंबरीकारांच्या कृति या उद्यानासारख्या असतात. त्यांत रेखीव ताटवे, सुंदर कारंजीं आणि मनोहर लताकुंज आपल्या दृष्टीस पडतील. तसल्या त्या उद्यानांतून फिरतांना आपल्याला कितीहि मजा वाटली, तरी एखाद्या विशाल आणि निबिड अरण्यांतून हिंडतांना मनावर जे गंभीर आणि उदात्त परिणाम होतात, ते त्या बगीचांत होण्याची कधीं आशा नाहीं. हरिभाऊंच्या सैल, पाल्हाळिक पण मानवी जीवनाच्या विविध ऊर्मींनीं तुडुंब भरलेल्या कादंबऱ्या त्या अरण्यासारख्या आहेत. त्यांचें महत्व सजावटींत नाहीं, तर माणुसकींत आहे; सौंदर्यांत नाहीं, तर विशालतेंत आहे; आणि कलेंत नाहीं, तर सहृदयतेंत आहे. आपल्या समाजाच्या सर्वांगीण सुधारणेची चिंता अहर्निश वाहणारा व त्या दृष्टीनें त्याच्या साऱ्या हालचालींचें निरिक्षण आणि विश्लेषण करणारा असा निर्मळ अंतःकरणाचा आणि प्रेमळ वाणीचा कादंबरीकार महाराष्ट्रांत हरिभाऊंच्या पूर्वीं किंवा नंतर दुसरा झाला नाहीं. महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्ग चाळीस वर्षांपूर्वीं ज्या मनःस्थितींत आणि परिस्थितींत होता, तसा तो आपल्याला त्यांच्या कादंबऱ्यांत पहावयाला मिळतो; व महाराष्ट्रांत ज्या विचारांच्या आणि कार्यांच्या प्रणाली आणि परंपरा आज अस्तित्वांत आहेत, त्यांचीं त्यांनीं आपल्या दिव्य प्रतिभादृष्टीनें पाहिलेलीं उज्ज्वल स्वप्नेंहि आपल्याला त्यांत चित्रित केलेलीं आढळतील.

तो समाज आणि तीं चित्रें आपण न्याहाळून पाहा. म्हणजे महाराष्ट्राच्या उन्नतीसाठीं सतत तीन तपें अहर्निश लेखणी झिजविणाऱ्या त्या आपल्या जिवलग सुहृदाविषयींच्या कृतज्ञतेनें आपलें अंतःकरण उचंबळून येईल. ×

सह्याद्रि, मार्च १९३९

---

× ऑल इंडिया रेडियोतर्फे ता. १५ जानेवारी १९३९ रोजीं मुंबई येथें विद्यार्थ्यांसाठीं दिलेलें व्याख्यान.

# प्रो. वामन मल्हार जोशी

हरिभाऊंकडून वामनरावांकडे वळणें म्हणजे प्रेमळ कुटुंबीयांनी गजबजलेल्या माजघरांतून उठून एखाद्या तत्त्वज्ञान्याच्या पर्णकुटिकेंत प्रवेश करण्यासारखेंच आहे. माझें हें विधान ऐकून मी वामनरावजींची थट्टा करीत आहें, असा कदाचित् तुमचा ग्रह होईल. पण तसें नाहीं. महाराष्ट्रांतील ज्या थोड्या साहित्यिकांविषयीं मला नितांत आदर वाटतो, त्यापैकी ते एक आहेत. त्यांचा प्रेमळ पाहुणचार आणि त्यांचें मार्मिक संभाषण या दोहोंचाहि आनंद मी अनेकदां लुटला आहे. त्यांची ती विचारी मुद्रा, तें आंठ्या पडलेलें कपाळ, ते टपोरे शोधक डोळे आणि ती थबकत थबकत बोलण्याची पद्धत पाहून पहिल्या सपाट्याला कदाचित् तुम्हांला त्यांच्याविषयीं आकर्षण वाटणार नाहीं. पण, लक्षांत ठेवा, त्यांच्याशीं बोलावयाला सुरुवात करतांच तुमच्या प्रत्येक विधानावर शंका काढून आणि त्याची दुसरी बाजू खुबीनें दाखवून ते तुमच्या विवेकबुद्धीला चालना देतील. विद्वत्ता आणि ललित वाङ्मय यांचें फारसें सूत नाहीं; व नीतिशास्त्र हे तर, गवयांना आपला दरबार मना करणाऱ्या औरंगजेबाप्रमाणें, ललित कलांना छचोर समजतें. पण वामनरावजी हे नीतिशास्त्राचे विवेचक असूनहि त्यांनी ललित लेखन मोठ्या हौसेनें केलें आहे.

गेल्याच रविवारीं (ता. १५ जानेवारी १९३९) सायंकाळीं आम्ही सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या येथील निवासांत त्यांच्याशीं गप्पा मारीत बसलों होतों. त्या संभाषणांत त्यांच्या स्वभावाचे जे दोन विशेष प्रकट झाले, ते जर मी तुम्हांला सांगितले, तर, मला वाटतें, त्यांच्या भूमिकेची तुम्हांला चटकन ओळख पटेल. माझ्या एका प्रकाशक मित्राच्या वतीने मी त्यांना नवीन कादंबरी लिहावयाला घेण्याचा आग्रह केला. तेव्हां ते मला म्हणाले, " अहो, कादंबरी लिहायची, म्हणजे कांहीं तरी विषय आणि कथानक डोक्यांत घोळत असलें पाहिजे ना? —सध्या माझ्या डोळ्यांपुढें कांहीं विषय नाहीं.

मग लिहिणार कशावर ? " या त्यांच्या उत्तरावरून ही गोष्ट तुम्हाला कळून येईल की, ते धंदेवाईक कादंबरीकार किंवा लेखक नाहींत. त्यांचे ललित लेखन हें सुद्धां कांही एका नैतिक भावनेने प्रेरित आणि नियमित झालेलें आहे. आपल्या जवळ कांहीं सांगावयाला आहे किंवा नाहीं या शंकेने ज्याची लेखणी घोटाळते, तो लेखक भराभर किंवा भाराभर कादंबऱ्या कशा लिहिणार ? मी त्यांच्या या उत्तरावर त्यांना म्हटलें, "हा तुम्ही टोमणा दिला आहे आम्हां झपाझप कादंबऱ्या लिहिणाऱ्या अलिकडल्या लेखकांना !" त्यावर ते म्हणाले, "नाहीं हो ! मला तुम्हां नवीन मंडळीप्रमाणें विषय न् कथानकें सुचत नाहीत लवकर !"

पण या त्यांच्या उद्गारांत सत्यापेक्षा शालीनतेचाच भाग खरोखरी अधिक होता. कारण, त्यानंतर थोड्या वेळाने 'केसरी'च्या संपादकमंडळांत ते असतांना टिळकांनी उच्चारलेलें जें एक बोधवाक्य त्यांनी आम्हांला सांगितलें, तें त्यांच्या भूमिकेवर उत्कृष्ट प्रकाश टाकतें. टिळक नेहमीं आपल्या हाताखालच्या संपादकांना म्हणत असत, " तुम्ही आपली योग्यता सर्व बाजूंनी इतकी वाढविली पाहिजे की, लोकांना प्रत्येक विषयावरील तुमचा अभिप्राय विचारण्यासाठीं तुमच्याकडे येण्याची आवश्यकता वाटावी ! " टिळकांच्या या उपदेशाचा आपल्यावर काय परिणाम झाला, हें वामनरावजींनी अर्थातच स्पष्ट सांगितलें नाहीं. पण ज्या संमतिदर्शक आवाजांत त्यांनी टिळकांचें तें वाक्य आम्हांला उच्चारून दाखविलें, त्यावरून माझी तरी अशी समजूत झाली की, वामनरावजींच्या मनावर आणि लेखनावरहि टिळकांच्या त्या उद्गारांचा बराच परिणाम झाला असावा. नीतिशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि साहित्यशास्त्र या शास्त्रांचें त्यांचें परिशीलन इतकें मार्मिक आहे कीं, त्या विषयांवरील त्यांचा अधिकार कोणीहि मान्य करील. राजकीय चळवळींत तर कादंबरीलेखनाला प्रारंभ करीपर्यंत त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतलेला आहे; व राजकीय तत्त्वज्ञानांतील नवीन विचारप्रणालींची माहिती करून घ्यावयालाहि ते चुकलेले नाहींत. तेव्हा अशा बहुश्रुत पंडिताने नवीन विषय आणि कथानकें आपल्याला सुचत नाहीत असें म्हणावें, यांत त्याच्या विनयाप्रमाणेंच लेखकाच्या नैतिक जबाबदारीची त्याला असलेली तीव्र जाणीवहि व्यक्त झालेली नाही काय ?

या त्यांच्या भूमिकेचा परिणाम असा झाला आहे की, त्यांच्या ललित लेखनांत लालित्यापेक्षा नैतिक कल्पनांचें पृथक्करण आणि तात्त्विक चर्चेचा

पसाराच अधिक आढळतो. 'रागिणी,' ' आश्रमहरिणी ' किंवा ' सुशीलेचा देव ' यापैकी त्यांची कोणतीहि कादंबरी घ्या. तींत सौंदर्यापेक्षा वावदूकपणा आणि भावाविष्कारापेक्षा तत्त्वचिकित्साच आपल्या जास्त दृष्टीस पडेल. ' रागिणी ' ला तर त्यांनी ' काव्यशास्त्रविनोद ' असेंच मुळी दुसरें नांव दिलें आहे; व तें अगदीं समर्पक वाटतें. ' रागिणी ' तील तात्त्विक चर्चेच्या बैठकींना बटाटेपोह्यांची खमंग जोड किंवा कटोहाच्या अद्भुत कथेची कलाटणी दिलेली असल्यामुळेंच सामान्य वाचकाला त्यांचा पाल्हाळ सहन करवतो. या तात्त्विक वादविवादांचा वामनरावजींना असा कांहीं विलक्षण सोस आहे की, हिमालयांतील रानटी जातींच्या तावडींत सापडल्यावर सुद्धा 'रागिणी'तील पोक्त पात्रें ' आनंदं ब्रह्मणो विद्वान्नबिभेति कदाचन ' या गंभीर तत्त्वाची विनोदी चर्चा करितात; व त्या अप्रासंगिक विनोदाचें अनौचित्य आपलें आपल्यालाच पटल्यामुळे की काय, ' भलत्याच वेळीं कसला विनोद नि वादविवाद ? ' अशी टीका खुद्द कादंबरींतलि एका पात्राकडूनच त्या वावदूकांवर त्यांनीं करविली आहे. ' सुशीलेचा देव ' ही कादंबरी तर ' रागिणी ' पेक्षाहि अधिक चर्चाप्रचुर आहे. फरक इतकाच कीं, ' रागिणी 'त तात्त्विक चर्चेच्या स्वतंत्र बैठकी भरविलेल्या आहेत; तर ' सुशीलेचा देव ' मध्यें साऱ्या कथानकाचीच बैठक मुळी तात्त्विक आहे. आणखीहि एक महत्त्वाचा फरक या दोन कादंबऱ्यांत आढळतो. ' रागिणी'त तत्त्वविचारांचें वैभव दृष्टीस पडतें; तर ' सुशीलेच्या देवां'त सारे प्रसंग आणि साऱ्या कल्पना एक प्रकारें उपरोधबुद्धीनें पिंजल्यासारख्या वाटतात. त्या कादंबरींत कौशल्य असलें, तरी तें पिंजाऱ्याचें आहे; चिताऱ्याचें नव्हे; व '...त्याच्या व्याख्यानपर्जन्याला प्रश्नात्मक वायूची प्रेरणा देऊं लागले, ' अशा प्रकारचें तिच्यांतील रूपकात्मक वाक्य ' आश्रमहरिणी ' आणि ' रागिणी ' यांच्यांतील भाषासौष्ठवहि तिच्यांत नाही, याची साक्ष देतें.

तरी सुद्धा 'सुशीलेचा देव' ही त्यांची कादंबरी तुम्ही पुनः पुन्हा वाचावी, असें मी तुम्हांला म्हणेन. कारण, ' रागिणी'त काव्यशास्त्रविनोद असला, तरी वामनरावजी ज्याला ' मनोगाहन ' म्हणतात तें मात्र नाहीं. आणि मनोगाहनाइतकें मनाला रिझवणारें किंवा चाळविणारें दुसरें काय असूं शकेल ? आकाश आणि समुद्र यांच्यापेक्षाहि अथांग आणि अजब चीज जर जगांत कोणती

असेल, तर ती मनुष्याचें मन ही होय; व आकाशाचे बदलते रंग आणि समुद्राच्या उसळत्या लाटा पाहतांना जितका आनंद आपल्याला होतो, त्यापेक्षां कितीतरी अधिक आणि अनिर्वचनीय आनंद मनाच्या विविध व्यापारांचें विश्लेषण बघतांना होतो. आकाशांतील तारकांपेक्षा मनांतील सद्भावना या अधिक विलोभनीय असतात; व समुद्रांतील तुफानापेक्षां मनांतील वादळ हें अधिक भयानक असतें. अर्थात् एखाद्या घटनेच्या निव्वळ वर्णनापेक्षां त्या घटनेच्या मनावर होणाऱ्या परिणामांचें विश्लेषण हें जास्त आकर्षक वाटणार नाहीं काय ? 'सुशीलेचा देव' ही कादंबरी याच दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. एका स्त्रीच्या मनाचा बाळपणापासून कसकसा विकास होत गेला, आणि विशेषत: तिच्या आध्यात्मिक कल्पनांत कसकशी उक्रांति होत गेली, याचें सूक्ष्म पण विनोदयुक्त चित्रण त्या कादंबरींत केलेलें तुमच्या दृष्टीस पडेल. 'यशवंतराव खरे' ही हरिभाऊंची कादंबरी जितकी मनोविश्लेषणाच्या दृष्टीने उत्कृष्ट आहे, तितकीच 'सुशीलेचा देव' हि ठरेल. फरक इतकाच की, हरिभाऊंनी केलेलें यशवंतरावाच्या मनोविकासाचें वर्णन सर्वांगपूर्ण आहे; तर वामनरावजींनी सुशी-लेच्या देवविषयक कल्पनांत होत गेलेल्या स्थित्यंतरावरच जास्त भर दिलेला आढळतो. पण धार्मिक श्रद्धेचा किंबहुना आस्तिक्यबुद्धीचा सुद्धा जो अभाव आज सुशिक्षित वर्गांत वाढत्या प्रमाणावर दिसत आहे, त्याची सारीं सामाजिक आणि तात्त्विक कारणें आपल्याला ही कादंबरी वाचल्यावर कळतात. रानडे-भांडारकरांनी प्रार्थनासमाज कां काढला, दयानंद मूर्तिपूजेचे विरोधक कां झाले, पंडिता रमाबाई ख्रिस्ती धर्मांत कां गेल्या आणि गोपाळराव आगरकर नास्तिक कसे झाले—या सर्व प्रश्नांचीं थोडथोडीं उत्तरें तुम्हांला 'सुशीलेचा देव' देईल.

वामनरावांच्या कादंबऱ्यांचे आणखीहि दोन विशेष लक्षांत घेण्यासारखे आहेत. हरिभाऊंप्रमाणें त्यांनी देखील वैवाहिक जीवनाशीं संबद्ध असलेल्या निरनिराळ्या प्रश्नांवर आपल्या कादंबऱ्यांतून विदारक प्रकाश टाकला आहे. पति हें हिंदु स्त्रीचें दैवत मानलें जातें; व त्यामुळेंच हिंदु धर्मशास्त्रांत लग्नबंधन हें अविच्छेद्य होऊन बसलें आहे. 'रागिणी,' 'आश्रमहरिणी,' 'सुशीलेचा देव' व 'इंदु काळे आणि सरला भोळे' या

चारी कादंबऱ्यांत वामनरावांनीं लग्नबंधन अविच्छेद्य असल्यामुळें होणारी स्त्रियांची गांजणूक प्रत्यक्षाप्रत्यक्ष चित्रित केली आहे. पण एवढेंच करून ते थांबलेले नाहींत. पतीकडे पाहाण्याच्या स्त्रियांच्या दृष्टिकोनांत शिक्षणामुळें जो फरक दिवसेंदिवस पडत आहे, त्याचेहि परिणाम त्यांनीं मोठ्या सहृदयतेनें दिग्दर्शित केले आहेत. आज पति हें स्त्रीचें दैवत उरलेलें नाहीं; तर तो तिचा सहचर झालेला आहे; व त्याला जर स्त्रीपासून निष्ठेची अपेक्षा असेल, तर त्यानें आपल्या वासनांचें किंवा आकांक्षांचें स्तोम माजवून तिच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा करतां कामा नये. पति बेपत्ता झाल्यावरहि त्याच्या चिंतनांत सुख मानण्याचा प्रयत्न करणारी सात्त्विक स्वभावाची 'रागिणी' आणि पति चांगला प्रेमळ असतांहि कलासक्तीमुळें गायनशिक्षकाबरोबर पळून जाणारी राजस स्वभावाची 'सरला' या त्यांच्या नायिका गेल्या दोन तपांत स्त्रियांच्या पतिविषयक दृष्टिकोनांत झालेला फरक दर्शवितात. 'सुशीला' ही तर त्या दृष्टीने नमुनेदार आहे तिच्या देवविषयक कल्पनांतील उत्क्रांति वामनरावजींनीं जितक्या मार्मिकतेने रेखाटली आहे, तितक्याच नाजूकपणाने तिच्या पतिविषयक भावनांचे पापुद्रे त्यांनी उलगडून दाखविले आहेत. आधुनिक पातिव्रत्याचा नमुना या दृष्टीनें 'इंदु भोळे' ही अप्रतिम ठरेल. हरिभाऊ आणि वामनराव यांच्या स्त्रीविषयक चित्रणांत मुख्य फरक हा आहे कीं, हरिभाऊंनी स्त्रीची सामाजिक परिस्थितिमुळे होणारी गांजणूक वर्णन केली आहे, तर वामनरावजींनीं मानसिक स्थित्यंतरामुळें होणारी तिची कुचंबणा सूचित केली आहे; व सध्या आपल्या समाजांत जी विचारक्रांति झपाट्याने घडून येत आहे, तिचाच तो एक प्रकार वाटतो. विवाह-विषयक कोणत्याच जुन्या-कल्पनांवर विश्वास न ठेवणारी समाजवादी नायिका जर यापुढे वामनरावांनी निर्माण केली, तर त्यांच्या नायिकांच्या या परंपरेला उत्क्रांतीच्या दृष्टीनें पूर्णता येईल.

वामनरावांच्या कादंबऱ्यांचा दुसरा स्पृहणीय विशेष म्हणजे गेल्या चाळीस वर्षांतील राजकीय कल्पनांच्या उत्क्रांतीचें आणि संघर्षाचें त्यांत पडलेलें प्रतिबिंब होय. 'नलिनी,' 'सुशीलेचा देव' व 'इंदु भोळे आणि सरला काळे' या तीन कादंबऱ्यांतून टिळक व गोखले यांचे पक्ष, सावरकर-बापटांचा क्रांतिवाद आणि गांधीवाद यांचें चित्रण आणि चर्चा आलेली आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून दुर्धारक-सुधारकांच्या लढ्याला जितकें महत्व मिळालें आहे, तितकें राजकीय पक्षांच्या झटा-

पटींना मिळालेलें नाहीं. किंबहुना ' कर्मयोग ' सोडल्यास त्यांच्या इतर कादंबऱ्या या राजकीय पक्षभेदांपासून अलिप्त आहेत म्हटलें तरी शोभेल. उलट वामनरावांच्या सामाजिक कादंबऱ्यांतून राजकारणाचा अंतःप्रवाह गंभीरतेनं वाहतांना दृष्टीस पडतो. राष्ट्रीय ध्येयवादाचे जे निरनिराळे प्रकार गेल्या अर्ध शतकांत महाराष्ट्रामध्यें उत्पन्न झाले, त्यांचे नमुने त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून मोठ्या मार्मिकपणानें चित्रित केले आहेत; व ' इंदु भोळे आणि सरला काळे ' ही त्यांची कादंबरी तर बव्हंशीं राजकीय आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील या राजकारणाचा एक नाजूक विशेष दाखविणें जरूर वाटतें. ' नलिनी ' आणि सुशीलेचा देव ' या कादंबऱ्यांतून ज्या जिव्हाळयानें त्यांनीं क्रांतिवादी व्यक्तींच्या मनोवृत्तीचा आविष्कार केला आहे, त्यावरून क्रांतिवादावरील त्यांचा विश्वास जरी आतां उडाला असला, तरी एका काळीं त्यांना स्वतःलाहि त्याच्याविषयी आत्मीयता वाटत होती, अशी कल्पना केल्यास ती चुकीची ठरेल काय? महाराष्ट्रांतील क्रांतिवाद्यांच्या विफल जीविताच्या ओझरत्या हृदयंगम छटा त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मराठी कादंबरीकाराने रेखाटलेल्या नाहीत. त्या छटांचें रंगभरण सौम्य असेल. पण त्यांत प्रत्यक्षानुभूतीची मनाला हलवून सोडणारी चमक खास आहे; व ' सुशीलेच्या देवां 'तील ' सुनंदा 'चा वृत्तांत वाचून सें. बापट यांची त्यागगंभीर मूर्ति आपल्या डोळ्यांपुढें उभी राहाते. हृचि हृदयंगमता त्यांच्या ' विनायकराव भोळे ' या पात्राच्या चित्रणांतहि प्रतीत होते. विनायकराव भोळे म्हणजे या व्यावहारिक जगांत अपेशी होणाऱ्या सात्त्विक आणि प्रामाणिक ध्येयवादाची केवळ मूर्ति होय. राजकीय चळवळींत जे सेनानी आघाडीला झळकत असतात, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि स्वार्थत्यागाचा बोलबाला होतो. पण, ज्या नैष्ठिक कार्यकर्त्यांच्या मुक्या आणि चिकाटीच्या प्रयत्नांनी त्या चळवळींचा जोर खरोखरी सतत कायम टिकतो, त्यांच्या सेवेची आणि त्यागाची जाणीव लोकांना होत नाही. अशा ध्येयवाद्यांचें त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने सफल पण लौकिक दृष्ट्या सर्वथैव विफल आयुष्य ' विनायकराव भोळे ' यांच्या रूपाने वामनरावांनीं आपल्यापुढे ठेविलें आहे. कदाचित् त्यांच्या स्वतःच्याहि ध्येयार्पित जीवनाच्या कांहीं छटा ' विनायकरावां 'च्या चरित्रांत मिसळलेल्या नसतील ना?

या निरनिराळ्या प्रकारच्या ध्येयवादाची मनोज्ञता त्यांच्या कादंबऱ्यांत भरलेली असल्यामुळेंच त्यांत तात्त्विक चर्चेचा अतिरेक झालेला असूनहि त्यांना

अवीट अशी सरसता आली आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतलि निरीक्षणाची सूक्ष्मता, भावनांची उत्कटता किंवा पात्रांची विविधता त्यांच्या कादंबऱ्यांत नाही. त्यांचें ललित लेखन ऋजु, सौम्य आणि प्रसन्न आहे. पण हरिभाऊंपेक्षा त्यांनी इतक्या गंभीर आणि इतक्या कमी कादंबऱ्या लिहिलेल्या असतांनाहि हरिभाऊंच्या बरोबरीचें स्थान त्यांना जें आज मराठी वाङ्मयांत दिलें जातें, त्याचें कारण काय ? त्याचें कारण मनोगाहन आणि तात्त्विक चर्चा यांच्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना प्राप्त झालेलें अनन्य वैशिष्ट्य. हरिभाऊंचा वर्णनावर भर फार. 'यशवंतराव खरे' ही त्यांची एकच कादंबरी अशी आहे कीं, जींत वर्णनाइतकेंच महत्व मनोगाहनाला दिलेलें दृष्टीस पडतें. पण त्यांच्या कादंबऱ्यांचें स्वरूप एकंदरींत कथनात्मक आहे, चिंतनात्मक किंवा चर्चात्मक नाहीं. हरिभाऊ हे चौरस्त्यावर बसून समाजाचें जीवित चौकसपणानें न्याहाळणारे प्रापंचिक होते; तर वामनराव हे मननाच्या गुहेंत बसून तत्त्वजिज्ञासा करणारे विरागी आहेत. त्यामुळेच हरिभाऊंपेक्षा त्यांनीं इतकें कमी ललित वाङ्मय निर्माण केलें; व जें निर्माण केलें त्यांतहि चिंतन आणि चर्चा यांना जास्त प्राधान्य मिळालें आहे. पण हें त्यांचें वैशिष्ट्यच त्यांना मराठी कादंबरीकारांत स्वतंत्र आणि श्रेष्ठ स्थान मिळवून द्यावयाला कारण झालें. 'रागिणी'चें नावीन्य तिच्यांतील काव्यशास्त्रविनोदांत आणि 'सुशीलेच्या देवा'चें मनोगाहनांत आहे. मनोगाहन हा शब्द त्यांचा स्वतःचा आहे; व मला तो अत्यंत समर्पक वाटत असल्यामुळेच मी पुनः पुन्हा वापरीत आहें. वामनराव मनाचें नुसतें गाहन करतात, त्याचा ठाव घेतात, त्याचें अंतरंग विशद करतात; त्याचें विदारक विश्लेषण म्हणजे ओंगळ चिरफाड करीत नाहीत. गाहनांत सहृदयता आणि समरसता आहे; उलट विश्लेषण हें तटस्थ आणि निष्ठुर असतें. 'रागिणी,' 'उत्तरा,' 'सुशीला,' 'इंदु भोळे,' 'सरळा काळे' प्रभृति आपल्या नायिकांच्या भावनांची गुंतागुंत त्यांनी इतक्या हळुवारपणानें उलगडून दाखविली आहे कीं, त्यांच्या त्या चतुर आणि नाजूक कृतीला विश्लेषण या नांवानें संबोधणें कसेंसेंच वाटतें. 'रागिणीं'तील काव्यशास्त्रविनोदानें महाराष्ट्रांतील सुविद्य वाचकवर्गाला आल्हाद देऊन त्याचें लक्ष वामनरावांकडे वेधलें; व 'सुशीलेच्या देवा'नें मनोविकास पायरीपायरीनें वर्णन करण्याची त्यांची अप्रतिम हातोटी लोकांच्या निदर्शनाला

आणली. वामनरावांच्या लोकप्रियतेचें बीज त्यांच्या या दोन अनन्यसामान्य विशेषांत आहे.

त्यांच्या ललित लेखनाचा आणखी एक व सर्वांत मोहक विशेष म्हणजे त्यांची काव्यात्मता. 'आश्रमहरिणी' ही त्यांची छोटी कादंबरी म्हणजे एक नितान्तमधुर असें खंडकाव्यच आहे. त्यांच्या भाषेची आणि विचारांची अव्याज-मुग्धता त्या कादंबरींत उत्कृष्ट रीतीनें प्रत्ययाला येते. 'रागिणी'त 'आश्रमहरिणी'-ची मुग्धता नाही; तर गांभीर्य आणि विद्वत्ता आहे. 'आश्रमहरिणी'त झऱ्याचें विलोल नर्तन आहे; तर 'रागिणी'त गंगौघाची भव्यता प्रतीत होते. पण त्या कादंबरींत तात्विक वादविवादांचा पसारा जरी कंटाळवाणा होण्याइतका असला, तरी 'रागिणी' आणि 'उत्तरा' या तिच्यांतील नायिकांचें व्यक्तित्व इतकें कांही मनोज्ञ आहे की, हिवाळ्यांतील रात्रीं दाट धुकें पडलें असतांहि चंद्र आणि शुक्र यांच्या रमणीय द्युतीने जसें आकाश उजळून जावें तशी त्यांच्या व्यक्तित्वाची चारुता आपल्या मनांत सदैव घोळत रहाते. 'सुशीला' आणि 'इंदु काळे' यांच्या व्यक्तित्वांत त्या मानानें चारुता कमी आणि बौद्धिकता जास्त आहे. पण चिंतनशील मनाला त्यामुळें त्यांचें आकर्षण कदाचित् अधिकच वाटेल. वामन-रावांच्या नायिकांच्या या काव्यात्मतेमुळें त्यांच्या कादंबऱ्यांना एक प्रकारचें निरागस सौंदर्य आलें आहे. त्यांच्या नायिकांविषयीं एक आक्षेप केव्हां केव्हां घेतला जातो. तो असा की, 'रागिणी' सोडली, तर 'उत्तरा' 'सुशीला' वगैरे त्यांच्या नायिकांत स्त्रीत्वापेक्षां पौरुषाची झाक अधिक दिसते. पण हा त्यांच्या बौद्धिकतेचा तर परिणाम नसेल? पुरुषांशीं हुजत घालणाऱ्या आणि प्रसंगीं आपल्या प्रियकराचा किंवा पतीचा त्याग करणाऱ्या आणि स्वतःच्या व्यक्तित्वाची चाड असलेल्या स्त्रिया आपल्याला पाहण्याची सवय नसल्यामुळेंहि कदाचित् वामन-रावांच्या नायिकांवर हा आक्षेप घेतला जात असावा; व आधुनिक शिक्षणपद्धती-मुळें स्त्रियांचें पुंसीकरण होत असल्याची जी एक तक्रार नेहमी कानावर आदळते, तिचाच हा एक पर्याय समजावयाला हरकत नाहीं. जुन्या समाजरचनेमुळें स्त्री आणि पुरुष यांच्यांत उत्पन्न केलेली विषमता ज्या प्रमाणांत कमी होईल त्या

प्रमाणांत स्त्रियांमध्यें पौरुषाची झांक जास्त दिसूं लागल्याचा भास होणें अगदीं स्वाभाविक आहे.

हरिभाऊ हे आपल्याला आपले जिवलग सुहृद् वाटतात, तर वामनराव हे आपले तत्त्वज्ञानी आहेत. 'तत्त्वज्ञानी' या शब्दाला आपण बिचकून जाऊं नका. तत्त्वज्ञानी हा जेव्हां ललित लेखकाच्या भूमिकेवर आरूढ होतो, तेव्हा त्याच्या तत्त्वसूक्तींना वीणेच्या कोमल झंकाराचें माधुर्य प्राप्त होतें. 'घरचा वैद्य' हा शब्दप्रयोग तुम्ही पुष्कळदां ऐकला असेल. त्याप्रमाणें वामनराव हे आपले 'घरचे तत्त्वज्ञानी' ( Family Philosopher ) आहेत. मी हें थट्टेनें म्हणत नाहीं. नैतिक किंवा शास्त्रीय प्रमेयांची चर्चा जो आपल्या सुबोध वाणीनें ललित लिखाणांत ग्रथित करून सामान्य वाचकांच्या आटोक्यांत आणून सोडतो, त्याला जर मी 'घरचा तत्त्वज्ञानी' म्हटलें, तर तें समर्पक होणार नाहीं काय? क्लिष्टांतला क्लिष्ट विषय सोपा आणि सुरस करून सांगण्याची जर कोणती किमया असेल, तर ती ललित लेखन ही होय, इंग्रजी कादंबरीकार एच्. जी. वेल्स याने याच पद्धतीनें विज्ञान सोपें करून वाचकांना सांगितलें; व इंग्रजी नाटककार बर्नार्ड शॉ यानेहि याच पद्धतीनें नैतिक तत्त्वांची चर्चा वाचकांच्या गळी उतरविली. याच अर्थानें मी वामनरावांना 'घरचे तत्वज्ञानी' म्हणतो. "मी गोष्टी सांगून लोकांना शिकवितों" हे खिस्ताचे उद्गार कांहीं खोटे नाहीत. ज्याला हंसत खेळत लोकांना कांहीं शिकवावयाचें आणि सांगावयाचें असेल, त्याला गोष्टीइतकें दुसरें सुलभ साधन नाहीं. हरिभाऊ आणि वामनराव यांनी गोष्टी सांगून मराठी वाचकांचीं मनें रिझविलीं आणि त्यांना अगदीं न कळत किती तरी नवीन कल्पना त्यांच्या मनावर बिंबविल्या. त्यांची गोष्ट सांगण्याची पद्धत आणि गोष्टींचे विषयहि भिन्न होते. म्हणून त्यांपैकीं एकाला आपला 'जिवलग सुहृद्' म्हणावयाचें आणि दुसऱ्याला 'घरचा तत्वज्ञानी' म्हणावयाचें. पण दोघांचीहि आंतरिक इच्छा लोकांना शिकवावयाची आणि तेंहि गोष्टी सांगून. म्हणूनच वामनराव गेल्या रविवारीं मला म्हणाले, "माझ्या डोक्यांत सध्या विषय नाहीं; तर मी कादंबरी लिहूं कशावर?"

माझ्या भाषणाच्या सुरवातीला मी आपल्याला म्हटलें कीं, वामनरावांच्या कादंबऱ्यांकडे वळणें म्हणजे पर्णकुटिकेंत शिरण्यासारखें आहे. मात्र ही त्यांची पर्णकुटिका रुक्ष नाहीं. हा कण्वाश्रम आहे. त्यांत आपल्याला शकुंतला आढळेल, कण्वमुनि आपल्या दृष्टीस पडतील आणि दुष्यंताशींहि आपली गांठ पडेल.×

---

×ता. २३ जानेवारी रोजीं ऑल इंडिया रेडिओतर्फे मुंबई येथे विद्यार्थ्यांसाठीं दिलेलें व्याख्यान. ऑल इंडिया रेडिओच्या कृपेनें.

# प्रो. फडके आणि श्री. खांडेकर

—— : ⁘ : ——

प्रो. फडके आणि श्री. खांडेकर यांच्याविषयीं मी आपल्याला कांहीं सांगण्याची गरज आहे काय ? मला वाटतें, आपल्यापैकीं बहुतेकांनीं त्यांच्या कादंबऱ्या वाचल्या असतील व कांहींचीं तर पारायणेंहि केलीं असतील. शिवाय, त्यांना प्रत्यक्ष पहाण्याची संधीहि आपण सर्वांनी साधली असेल व कांहींनी तर त्यांचे ऑटोग्राफ्सहि मिळविले असतील. तेव्हां आपल्याला अत्यंत प्रिय आणि थोडेबहुत परिचितहि असलेल्या आपल्या या दोघां आवडत्या कादंबरीकारांविषयीं मी आपल्याला नवीन काय सांगणार ? प्रो. फडके यांनीं तर स्वतःची लेखन-शैली आणि कादंबऱ्या यांचीहि माहिती वाचकांना विश्वासांत घेऊन दिलेली आहे. तिच्यांत मी भर काय घालूं शकेन ? त्या दोघांविषयीं बोलतांना आणखीहि एक अडचण मला जाणवते. दोघेहि माझे जुने स्नेही आहेत; व त्यांच्याशीं जरी कांहीं बाबतींत माझे मतभेद असले, तरी त्यांच्या माझ्या स्नेहभावांत त्यामुळें अंतर पडलेलें नाहीं. हरिभाऊंविषयीं ज्या वेळीं मी तुमच्याशीं बोललों, त्या वेळीं माझें मन निःशंक होतें. कारण तुम्ही जसे त्यांना त्यांच्या पुस्तकांवरून ओळखतां, तसाच मीहि ओळखतों. वामनरावांविषयी बोलतांना नाहीं म्हटलें तरी मला थोडासा संकोच वाटलाच. आणि आज फडके—खांडेकरांविषयी बोलणें तर अतिशयच अवघड वाटत आहे. मी कांहीहि बोललों, तरी तुम्हांला तें केव्हां पक्षपाताचें तर केव्हां पूर्वग्रहाचें वाटेल. पण मी त्यांच्याविषयीं बोलण्याचें ठरविलें आहे. कारण आपल्या समकालीन ऋणानुबंधी लेखकांविषयीं बोलण्यांत कांहीं गैरसोई असतात, तर कांहीं सोईही असतात.

प्रो. फडके आणि श्री. खांडेकर हे दोघे स्वतःला ललित वाङ्मयांतील ‘ दोन ध्रुव’ समजतात. तुम्ही वर्तमानपत्रें आणि मासिकें वाचतां ना ? मग तुम्हाला माहितच असेल की, वाङ्मय कलावादी असावें कीं जीवनवादी असावें, या

प्रश्नावर गेलीं पांच वर्षें या दोघां कादंबरीकारांच्या सारख्या चकमकी झडत आहेत. पण, तुम्ही जर त्यांच्या कादंबऱ्यांविषयीं थोडा विचार कराल, तर 'वादाकरितां वाद' या तत्त्वानुसार त्यांचा हा सारा वावदूकपणा सुरू आहे, हें तुम्हांला कळून येईल. कलावादी प्रो. फडके यांची नवी 'समरभूमि' किंवा जुनी 'दौलत' कादंबरी घ्या. पहिल्या कादंबरींत प्रेम आणि कर्तव्य यांच्या झगड्याचें, तर दुसरींत संपत्ति आणि प्रेम यांच्या झगडयाचें सुंदर चित्र त्यांनीं रेखाटलें आहे. त्या झगडयाचीं तीं हृदयंगम शब्द-चित्रें वाचल्यावर कोणाच्या अंत:करणांत विचारांचें काहूर उठल्याशिवाय राहील? तरी सुद्धां फडके स्वतः अट्टाहासानें सांगणार कीं, "मी कादंबऱ्या लिहितों, त्या केवळ कलेसाठीं कला म्हणून!" हीच गत खांडेकरांची. 'हिरवा चाफा' आणि 'दोन मनें' या त्यांच्या अलीकडल्या कादंबऱ्या तुम्ही वाचल्या आहेत ना? त्यांत घातलेलीं कोल्हटकरी पद्धतीचीं कळसूत्री जन्मरहस्यें आणि त्यांच्या भोंवतीं उडविलेलीं करुण भावनांचीं हजारो कारंजीं!—त्यांना कलेची कारागिरी म्हणूं नये, तर दुसरें काय नांव द्यावें? पण खांडेकर मात्र आग्रहानें तुम्हांला सांगतील कीं, "मी कलेला जीवनाची बटीक समजून माझ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत!" आपल्या जुन्या संतकवींत हरिहरांचा वाद होता ना? तसा या नव्या ललित लेखकांत कला-जीवनाचा वाद माजलेला दिसतो!

मला स्वत:ला हा वाद अगदीं निरर्थक वाटतो आणि फडके-खांडेकरांनीं तो माजवावा हें तर हास्यास्पद वाटतें. कला-जीवनामध्यें जणुं कांहीं मूलतः आणि तोहि अगदीं अहिनकुलासारखा विरोध आहे, अशा ईर्ष्येनें अस्तन्या सारून त्यांनीं हा वाद उपस्थित केला आहे. वस्तुतः दोघेहि कलेच्या आत्यंतिक जाणिवेने कादंबऱ्या लिहि-णारे व दोघेहि मध्यमवर्गाचे कादंबरीकार. युरोपांतलि वाङ्मयांत कथालेखनाचे जितके म्हणून नवीन नवीन सांचे आढळले, तितके तितके स्वत:ला जीवनवादी म्हणविणाऱ्या खांडेकरांनीं मोठ्या हौसेनें आणि हव्यासानें हाताळले आहेत; व पुण्यामुंबईच्या बाजूला जरा कांहीं कोठे कामगारांचा संप किंवा किसानांचा मोर्चा निघण्याची हूल उठली, म्हणजे स्वत:ला कलावादी म्हणविणारे प्रो. फडके त्याची प्रत्यक्षानुभूति घेण्यासाठीं कोल्हापुराहून धावत इकडे येतात! म्हणून मला हा त्यांच्यांतलि वाद कृत्रिम आणि हास्यास्पद वाटतो. त्यांच्या दृष्टिकोनांत आणि

लेखनशैलींत फरक आहे, नाहीं असें नाहीं. पण त्या फरकाचें कारण कला आणि जीवन यांतील मानीव विरोध हें मात्र नव्हे; तर जीवनाकडे पहाण्याची दोघांची भिन्न दृष्टि हेंच होय. श्री. खांडेकर हे जीवनाकडे अनुकंपेनें ओथंबलेल्या डोळयांनीं पहातात. ते भूतदयावादी ( Humanitarian ) आहेत; उलट जीवनाकडे पहाण्याची फडके यांची दृष्टि रसलेलुप भ्रमराची आहे. ते एखादा संप किंवा मोर्चा पहातील, तो सुद्धां मानवी प्रक्षोभाचें तें विराट् स्वरूप कसें दिसतें, हें जाणण्याच्या कुतूहलानें. उलट भावनाप्रधान, भूतदयावादी खांडेकर हे त्या प्रक्षोभाचें मर्म न समजतांहि एखादे वेळीं अचानक त्यांत उडी घ्यावयाचे ! शिरोडे येथील मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळीं तसा प्रसंग आलाच होता, म्हणतात. प्रो. फडके यांची ही जीवनाकडे पहाण्याची रसग्राही दृष्टि लक्षांत घेऊन मीं जर त्यांना विलासवादी ( Hedonist ) म्हटलें, तर तें खचित गैर होणार नाहीं.

जीवनाकडे पाहाण्याच्या त्या दोघांच्या या विशिष्ट दृष्टिकोनामुळें त्यांच्या कादंबऱ्यांच्या स्वरूपांत विलक्षण फरक पडला आहे. दोघेहि मध्यम वर्गाचे कादंबरीकार हें तर खरेंच. पण मध्यमवर्गाच्या जीवनांतलि वर्ण्य प्रसंग खांडेकरांनीं अनुकंपेनें तर फडक्यांनीं रसिकतेनें निवडले आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, फडके यांच्या कादंबऱ्यांत आपल्याला मेघदूतांतील अलकेचें मादक सौंदुर्य दृष्टीस पडतें; तर खांडेकरांच्या कादंबऱ्यांत भाबडया ध्येयवादाच्या आहारीं जाऊन स्वत:च्या आयुष्याची नासाडी करून घेणाऱ्या दुबळयांचें आक्रंदन कानावर येतें. फडके यांची ‘ समरभूमि ’ आणि खांडेकरांची ‘ दोन मनें ’ या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या तुम्ही वाचल्याच असतील. त्यांचें पर्यवसान तुम्ही लक्षांत घ्या. म्हणजे जीवनाकडे बघण्याच्या त्या दोघांच्या दृष्टिकोनांतील जो फरक मी वर्णन केला आहे, त्याची तुम्हांला प्रतीति येईल. ‘ समरभूमी ’च्या देशोधडीला लागलेल्या नायकाचें शेवटीं त्याच्या प्रणयिनीशीं मधुर मीलन होऊन त्याच्या रम्य संधिप्रकाशांत ती कादंबरी संपते. ‘ दोन मनें ’ या कादंबरींतहि नायक आणि नायिका यांचें अखेर मीलन होतें. पण तें नायकाचें अर्धांग लाठीमारानें विकल झाल्यावर अश्रूंच्या वर्षावांत ! हा फरक या दोघां कादंबरीकारांच्या मनोवृत्तीचा निदर्शक आहे, असें मीं म्हटलें तर तें चूक होईल काय ? मध्यम वर्ग तोच. पण त्याच्या जीविताच्या दोन अगदीं भिन्न बाजू दोघांच्या कादंबऱ्यां-

तून दाखविल्या गेल्या आहेत. फडके स्वतःला कलावादी म्हणवितात, तें एका अर्थानें मला बरोबर वाटतें. कारण, त्यांचे बहुतेक सारे नायक हे स्वतः कलावंत किंवा कलासक्त आहेत; व कलेच्या मदिर वातावरणांत त्यांच्या प्रणयाचा काय किंवा पराक्रमाचा काय परिपोष होतो. तसेंच खांडेकर स्वतःला जीवनवादी म्हणवितात, त्यांतहि एक प्रकारचें तथ्य आहे. कारण त्यांचे सारे नायक आणि नायिका ही जीवनाला पूर्णता आणण्यासाठीं आत्मार्पण करावयाला उद्युक्त होतात. त्यांचा हा ध्येयवाद कदाचित् भावडा आणि चुकीचाहि असेल. "Idealism, which is only a flattering name for Romance in politics and morals, is as obnoxious to me as Romance in ethics or religion–" या बर्नार्ड शॉच्या विदारक उद्गारांचें मर्म कदाचित् त्यांना कळलें नसेल. पण भावडया आणि चुकीच्या ध्येयवादासाठीं कां होईना त्यांच्या कादंबऱ्यांतलि माणसें आपलें सर्वस्व गमवावयाला तयार होतात, हें विसरून चालणार नाहीं.

त्या दोघांच्या जीवनाकडे पाहाण्याच्या दृष्टिकोनांत जसा हा भेद आहे, तसाच शैलींतहि आहे; व त्यांच्या कादंबऱ्यांच्या स्वरूपांत जें विलक्षण अंतर पडलें आहे, त्याला त्यामुळें कांहीं कमी मदत झाली आहे, असें नाहीं. फडके यांच्या शैलीचा आत्मा लालित्य हा आहे, तर खांडेकरांच्या शैलीचा आत्मा कल्पकता हा आहे, असें म्हणतां येईल. कोटया, श्लेष, उपमा, सुभाषितें, अर्थांतरन्यास ही सारी कल्पकतेची करामत खांडेकराच्या कादंबऱ्यांतून पानोपानीं पाहावी. कल्पकतेचा याहीपेक्षां कौतुकास्पद पण अलीकडे मागे पडलेला एक पुराणा प्रकार सुद्धां खांडेकरांच्या कादंबऱ्यांत आढळतो. तो म्हणजे रहस्याच्या कळसूत्रांवर कथानकाची उभारणी करणें. अलीकडलि पाश्चात्य कादंबरीकर आपल्या कादंबऱ्यांतून असली रहस्यें घालणें गौण मानतात; व हरिभाऊंच्या किंवा वामनरावांच्या सामाजिक कादंबऱ्यांतून अशा प्रकारच्या कोल्हटकरी रहस्यांचा आढळ खचित होणार नाहीं. प्रो. फडके यांनीं 'अटकेपार' पर्यंत अशा तऱ्हेची रहस्यें आपल्या कादंबऱ्यांतून घातलीं. पण त्यानंतर 'उद्धार' पासून त्यांच्या कादंबऱ्यांना जें नवें राजकीय वळण हलुहळू लागत चाललें, त्याचा परिणाम म्हणून म्हणा किंवा सामान्य वाचकाला रिझविणाऱ्या कृत्रिम कथानकांचा कंटाळा आल्यामुळें म्हणा

त्यांनीं अलीकडे रहस्यमय कथनपद्धतीचा त्याग केलेला दिसतो. पण त्यांत नवल नाहीं. महाराष्ट्रांतील उदयोन्मुख ललित लेखकांना प्रो. फडके यांच्यापासून ज्या अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत, त्यांपैकीं एक ही कीं, ज्या क्षेत्रांतील आपलें प्रावीण्य आणि प्रभुत्व कायम ठेवण्याची त्यांना आकांक्षा असते, त्या क्षेत्रांतील अगदी अद्यावत् प्रगतीला ते अनुसरत असतात. रहस्यमय कथनपद्धति ही पाश्चात्य राष्ट्रांतून आतां फक्त रेल्वे स्टॉलवर खपणाऱ्या कादंबऱ्यांपुरतीच शिल्लक राहिलली दिसते. रोमेन रोलँडने ' जाँ ख्रिस्ताफ ' च्या प्रस्तावनेंत जीवनाला नदीची उपमा दिली आहे; व कादंबरी ही खरोखरीच जीवनानुगामी रहावयाला हवी असेल, तर तिच्यांत तांत्रिक रहस्यें असतां कामा नयेत, हें ओघालाच आलें. यावर असें म्हणतां येईल कीं, नदींत जर डोह, भोवरे आणि धबधबे असतात, तर कादंबरींत कळसूत्री रहस्यें कां असूं नयेत ? याला उत्तर असें कीं, जीवन हें सामान्यतः रहस्यमय नसल्याकारणाने कलेला त्याचें प्रतिबिंब मानणाऱ्या लेखकांनीं तरी रहस्याचा आश्रय घेऊं नये. त्यामुळे ट्रॅन्सफर सीन दाखवून वाचकवर्गाच्या मनाला धक्के देतां येत असतील. पण त्या धक्क्यांचा वेग कमी झाल्यावर, असलीं तांत्रिक रहस्यें असलेली कादंबरी जीवनापासून फार दूर आहे, हें तोहि ओळखूं शकतो. शिवाय डोह आणि भोवरे हे नदीच्या पात्राची खोली आणि विशालता दाखवितात. तसें कळसूत्री रहस्यांविषयीं म्हणतां येईल काय ?

खांडेकर यांच्या कल्पकतेप्रमाणेंच फडके यांच्या लेखनांतील लालित्य हें त्यांच्या कादंबऱ्यांत कृत्रिमता उत्पन्न करावयाला कारण झालें आहे. या लालित्याच्या लालसेनें नायक, नायिका आणि कथानकें यांचाच केवळ नव्हे, तर हावभाव आणि स्थळें यांचासुद्धां एक सांचाच त्यांनीं निर्माण केलेला दिसतो. त्यांच्या कादंबरींचें पहिलें प्रकरण वाचतांच त्यांत भेटणाऱ्या युवयुवतींचें पुढें लग्न होणार अशी खूणगांठ ज्याप्रमाणें वाचक मनाशीं बांधतो, त्याचप्रमाणें त्यांच्या लग्नाला म्हणजे अर्थातच प्रणयपरिपोषाला कारण होणाऱ्या घटनाहि एका ठरीव अनुक्रमानें घडणार अशी त्याची अपेक्षा असते; व ' अटकेपार ' आणि ' प्रवासी ' या दोन कादंबऱ्या सोडल्यास प्रो. फडके यांनीं त्याचा अपेक्षाभंग सहसा होऊं दिलेला नाहीं. महाराष्ट्रांतील मध्यमवर्गाच्या जीवनाची जर पुढे पांचशें वर्षांनी एखाद्या संशोधकानें प्रोफेसरसाहेबांच्या कादंबऱ्यांवरून कल्पना केली, तर पारतंत्र्याचें जूं मानेवर

असतांनासुद्धां महाराष्ट्रांतले वरच्या दर्जाचे पांढरपेशे लोक हे कलाविलासांत आणि प्रणयचेष्टांत दंग होते, असा त्याचा समज व्हावा, इतकें प्रो. फडके यांच्या कादंबऱ्यांतील विलासी जग महाराष्ट्रांतील निरनिराळ्या आंदोलनांपासून परवा परवापर्यंत अलिप्त होतें. गेल्या चार वर्षांत त्यांच्या प्रतिभेचा मोर्चा राजकारणाकडे वळला आहे; व कादंबरींतील मध्यवर्ति प्रणयकथेला राजकीय चळवळींचे कालखंड चिकटवून त्यांनीं राजकीय कादंबऱ्या तयार करण्याचाहि एक सांचा उत्पन्न केला आहे. पण राजकीय चळवळीच्या ऐन कहरामध्यें नायकिणीच्या माडीचा जिना चढणारा ' प्रवासीं 'तील नायक किंवा प्रणयमधूचा आस्वाद भरपूर घेतां यावा म्हणून राजकारणाला रामराम ठोकणारा ' समरभूमीं ' तील नायक हे जर कोणती गोष्ट सिद्ध करीत असतील, तर ती हीच कीं, प्रो. फडके यांचे नायक जरी अधून मधून राजकारणांत रंगल्यासारखे दिसले, तरी ते स्वभावतः विलासी आणि प्रणयलंपट आहेत. राजकारण हा त्यांच्या जीवनाचा फार तर कांहीं काळ एक भाग होऊं शकतो; जीवनाच्या अणुरेणूंना व्यापणारा धर्म होऊं शकत नाहीं. ' प्रवासीं 'तील ' राजाभाऊ ' हा प्रो. फडके यांच्या जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टीचा अपरूप नमुना आहे. गॉर्की हा कादंबरीकार नव्हे आणि ' मदर ' ही कादंबरी नव्हे अशा आशयाचे जे उद्गार प्रो. फडके यांनी काढले आहेत, ते त्यांच्या स्वतःच्या मनोवृत्तीच्या दृष्टीनें मला तरी अगदीं समर्पक वाटतात. सांचेबंद कादंबऱ्यांचें नाजूक ओतकाम करणाऱ्या त्यांच्यासारख्या ललित वाङ्मयांतील हुन्नरबाज कारागिरानें गॉर्कीच्या अवाढव्य शब्दसृष्टींतील मानव्याचें आणि जीवनाचें विराट् पण अस्ताव्यस्त स्वरूप पाहून भयसंमिश्र आश्चर्यानें डोळे मिटावे आणि ' ही कला नव्हे ' ' ही कला नव्हे ' म्हणून ओरडत सुटावें, हें किती स्वाभाविक आहे ? लालित्य ही जीवनाची कलाकुसर आहे, त्याचें सर्वस्व नव्हे. पण हें सत्य ज्याला पटत किंवा पचत नाहीं, त्या कलावादी लेखकानें लालित्याच्या भलत्याच कल्पनांच्या आहारीं जाऊन मेणाच्या पुतळ्यांचें, दिवाणखान्यांतील शोभिवंत बिलोरी कपाटांत मांडून ठेवावयाला अगदीं योग्य असें, आरसपानी, चिमणें जग निर्माण करण्यांत धन्यता मानावी, यांत नवल काय ?

प्रो. फडके आणि श्री. खांडेकर यांच्या दोषांची चर्चा जी इतक्या स्पष्टपणानें मी आपल्यापुढें करीत आहे, तिचें कारण एवढेंच कीं, आपल्यापैकीं ज्या

विद्यार्थ्यांना ललित लेखनाविषयीं अभिरुची किंवा हौस असेल, त्यांनीं आपल्या या आवडत्या कादंबरीकारांचें आंधळें अनुकरण करूं नये. कल्पकता आणि लालित्य हे दोन गुण इतके प्रभावशाली आहेत कीं, त्यांचा दूषणास्पद अतिरेकसुद्धां तरुण, भावनावश मनाला मोहक वाटतो. पण एकाच्या अतिरेकामुळें कृत्रिमता आणि दुसऱ्याच्या अतिरेकामुळे निष्प्राणता उत्पन्न होते, हें विसरून चालणार नाहीं. आधुनिक इंग्रजी कादंबऱ्याविषयीं लिहितांना विख्यात इंग्रजी कादंबरी-लेखिका व्हर्जिनिया वुल्फ हिनें असे उद्गार काढले आहेत कीं, " ......ठराविक पद्धतीनें फुगत जाणारी ही आधुनिक कादंबऱ्यांची पृष्ठसंख्या पाहून पुष्कळदां आपल्या मनांत शंका येते,—आपले मन या ठराविकाची चाड येऊन बंड करावयाला उठतें—जीवन खरोखरीच असें आहे का ? कादंबऱ्या अशाच असल्या पाहिजेत का ? आपण थोडें अंतर्मुख होऊन पहा आणि आपल्याला कळून येईल की, जीवन अशा प्रकारचें मुळींच नाहीं. ( But sometimes, more and more often as time goes by, we suspect a momentary doubt, a spasm of rebellion, as the pages fill themselves in the customary way. Is life like this ? Must novels be like this ? Look within and life, it seems, is very far from like this. ) प्रो. फडके आणि श्री. खांडेकर यांच्या कादंबऱ्यांविषयीं आपण थोडा शांतपणानें विचार करून पाहा. म्हणजे व्हर्जिनिया वुल्फने विचारलेले हे प्रश्न तुम्हांलाहि आपल्या मनाला विचारावेसे वाटतील. हरिभाऊ आपटे आणि वामनराव जोशी यांनीहि महाराष्ट्रांतलि मध्यम वर्गाचेंच जीवन आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटलें आहे. पण त्या कादंबऱ्यांत जो जिव्हाळा आहे, तो फडके आणि खांडेकर यांच्या कादंबऱ्यांतून आपल्याला कितीसा आढळतो ? त्यांचें जग हरिभाऊंच्या आणि वामनरावांच्या कादंबऱ्यांतील जगापेक्षां अधिक रमणीय, अधिक रोमांचकारी असेल. पण तें खरें जग आहे का ? दैन्य आणि प्रक्षोभ यांनीं व्यापलेल्या ज्या जगांत आपण आज वावरतों आहोंत, त्या आपल्या खऱ्याखुऱ्या जगाशीं त्यांच्या जगाचा कांहीं संबंध आहे का ? व्हर्जिनिया वुल्फच्या उद्गारांचा पुन्हा एकदां अनुवाद करून मी म्हणतों कीं, " आपल्या लोकोत्तर प्रतिभेचे उत्कृष्ट कॅमेरे घेऊन हे दोघे कादंबरीकार

जीवनाचें छायाचित्र घ्यावयाला उभे राहिले, पण कॅमेऱ्याचा फोकस एक दोन इंचांनीं चुकला आणि जीवन निसटलें. आणि जीवनाशिवाय जगांत दुसऱ्या कशाची मातब्बरी आहे ? ( ......Life escapes, and perhaps without life nothing else is worthwhile )" आपण म्हणाल, तुमच्या कादंबऱ्यांत सुद्धां अशाच प्रकारचे दोष आहेत. कबूल ! पण म्हणून कांहीं माझ्या या अग्रेसरांचे दोष समर्थनीय आणि अनुकरणीय ठरत नाहींत.

आतां त्यांच्या दोषांकडून आपण गुणांकडे वळूं या. मी प्रथमच सांगून टाकतों की, त्यांचे दोष जसे मोठे तसे गुणहि मोठे आहेत. फडके यांच्या कादंबऱ्यांतील लालित्याची मोहनी किंवा खांडेकर यांच्या कादंबऱ्यांतील कल्पकतेचें वैभव हें आधुनिक कथावाङ्मयांत खरोखरी अतुलच म्हणावें लागेल. त्याचप्रमाणें कथानकाचा पद्धतशीर आणि सुस्पष्ट विकास करून प्रमुख पात्रांचीं स्वभावचित्रें उठावानें रेखाटण्याची फडके यांची हातोटी अप्रतिम असून, पाल्हाळ किंवा गुंतागुंत या वैगुण्यांपासून त्यांच्या कादंबऱ्या एकंदरींत अलिप्त आहेत. श्री. खांडेकर यांच्या लिहिण्यांत हा रेखीवपणा अर्थातच नाहीं. पण जिवंतपणा, मला वाटतें, किती तरी जास्त आहे. त्यांचा प्रतिभा ही भूतदयेनें द्रवणारी असल्यामुळें कल्पकतेच्या विलोल नर्तनाइतकेच भावनेचे सरस उद्रेकहि त्यांच्या कादंबऱ्यांत समप्रमाण आढळतात. श्री. खांडेकर यांचा दुसरा महत्त्वाचा विशेष हा कीं, प्रो. फडके यांच्या कादंबऱ्यांप्रमाणें त्यांच्या कादंबऱ्यांतून सारख्या तोंडवळ्याचीं पात्रें वारंवार भेटत नाहींत. ' हृदयाच्या हांके ' पासून ' दोन मनां ' पर्यंत त्यांच्या कादंबऱ्यांत विविधतेच्या दृष्टीनें प्रगति आहे. इतकेंच नव्हे, तर कोल्हटकरांच्या रहस्यमय रचना-पद्धतीची पकड जरी त्यांच्या प्रतिभेवर घट्ट बसलेली असली, तरी त्यांचा दृष्टिकोन दिवसेंदिवस रुंद होत आहे. ' उल्का, ' ' दोन ध्रुव, ' ' हिरवा चांफा' आणि 'दोन मनें' या त्यांच्या कादंबऱ्या त्यांच्या पात्रांची विविधता आणि दृष्टीचा विकास यांची चांगली साक्ष देतात. प्रो. फडके यांचा दृष्टिकोनहि अलीकडे झपाट्यानें बदलत असल्याचें दिसतें; व बदलता काळ ओळखण्याचें आणि त्याच्याशीं समरस होण्याचें त्यांचें चातुर्य लक्षांत घेतां हा विलासवादी कादंबरीकार जर कांहीं दिवसांनीं समाजवाद्यांच्या घोळक्यांत दिसला, तर मला नवल वाटणार नाहीं. 'उद्धारा' पासून 'समरभूमी' पर्यंतचा त्यांचा प्रवास

या दृष्टीनें मोठा सूचक वाटतो. श्री. खांडेकर यांच्यापेक्षां फडके यांचा स्पृहणीय विशेष हा की, त्यांचें मन आणि म्हणून लेखनहि आधुनिक आहे. खांडेकरांच्या कादंबऱ्या वाचतांना कोल्हटकरांच्या काळांतच आपण अद्याप वावरत आहोंत की काय, असा भास पुष्कळदा आपल्याला होतो. प्रो. फडके हे सुदैवानें मराठी वाङ्मयांतील कोणत्याहि पूर्व परंपरेशीं निगडित नाहीत; व पाश्चात्य मध्यमवर्गाच्या वाङ्मयाचा व्यासंग करून त्याच्या जीवनाशीं समरस होण्याचा प्रयत्न ते बुद्धिपुरःसर करीत असल्यामुळे सुखवस्तु जीवनाची ठरीव आणि चटकदार शब्दचित्रें रेखाटणाऱ्या आधुनिक पाश्चात्य कादंबरीकारांच्या रचनेंतील मनोरमता त्यांच्या कादंबऱ्यांत पुष्कळच आढळते. श्री. खांडेकर हे रचना आणि विचार या दोन्ही बाबतींत त्या मानानें कमी आधुनिक वाटतात.

प्रो. फडके आणि श्री. खांडेकर यांच्या कोणत्या नायिका तुम्हाला आवडतात असा प्रश्न जर आपण मला केला, तर मी 'उमा' आणि 'उल्का' या दोन नायिकांचीं नांवें घेईन. हीं नांवें मी केवळ अनुप्रासाच्या मोहानें घेतलीं आहेत, असें आपण समजूं नका. 'प्रवासी' तील परित्यक्त 'उमे' च्या पूर्वीं प्रो. फडके यांनीं ज्या नायिका निर्माण केल्या, त्या इतक्या कांहीं लालित्यपूर्ण किंवा स्पष्ट बोलावयाचें म्हणजे लिबलिबीत आहेत की, त्यांच्या चारित्र्याचा चिरकालिक असा ठसा कोणत्याच प्रकारें आपल्या मनावर उमटत नाहीं. त्यांचे ते विभ्रम आणि तीं प्रणयचेष्टितें यांचें प्रो. फडके यांनी लोलंगतेने केलेलें वर्णन वाचतांना आपल्याला मजा वाटते, हें खरें. पण मनाला ओढ लावणारे किंवा हलवून सोडणारे कोणतेंच प्रभावी गुण त्यांच्या चारित्र्यांत नसल्यामुळें, पुस्तक मिटल्या बरोबरच त्यांना आपण विसरून जातों. श्री. खांडेकर यांच्या कादंबऱ्यांना 'उल्के' पर्यंत मुळी नायिकाच नव्हत्या. माझें हें विधान ऐकून आपल्याला आश्चर्य वाटेल. पण, नायिका नव्हत्या या विधानाचा अर्थ असा की, त्यांच्या पूर्वीच्या कादंबऱ्या नायकप्रधान होत्या, फडके यांच्याप्रमाणें नायिकाप्रधान नव्हे. तथापि, त्यांनीं उत्पन्न केलेली पहिलीच नायिका 'उल्का' हिचें कारुण्य आणि ओज यांच्या मिलाफानें घडलेले व्यक्तित्व इतके कांहीं हृदयंगम आहे की, खांडेकरांची ही मानसकन्या आपल्या पित्याच्या हृदयांतील सारी ऋजुता, सारी : आणि अन्यायाविषयींची चीड यांची मूर्तीच असावी, असें वाटतें. प्रो. फडके यांची

' उमा ' ही 'उल्के'प्रमाणेच कोमलता आणि कणखरपणा यांची मूर्ति आहे. त्या दोघींचे दलित जीवन आणि असफल प्रेम, त्यांचें निर्मल चारित्र्य आणि लोकोत्तर स्वार्थत्याग !—त्या अभागिनींचा विसर आपल्याला कधीं तरी पडणें शक्य आहे काय ? फडके आणि खांडेकर यांच्या इतर सुंदर नायिका आपण विसरूं शकूं—नव्हे विसरतोंच. पण त्यांच्याप्रमाणें सुंदर नसलेल्या त्या दोघांच्या या दुर्दैवी मानसकन्यांनी आपल्या हृदयांत कायमचें वास्तव्य करावें ही घटना किती उपरोधिक आहे ?

पण एवढ्यावरच हा उपरोध संपलेला नाहीं. फडके आणि खांडेकर हे स्वतःला ललित वाङ्मयांतील दोन ' ध्रुव ' खुशाल समजोत. पण त्यांच्या या दोन मानसकन्यांचें व्यक्तित्व मात्र ही गोष्ट स्पष्ट दर्शवितें की, कला आणि जीवन यांच्या नांवावर वेगळे आखाडे थाटून एकमेकांना आव्हानें देण्यांत भूषण मानणाऱ्या या दोघां कादंबरीकारांच्या मनोधर्मांत कुठे तरी विलक्षण साधर्म्य आहे ! *

—सह्याद्रि, जून ११३९

* ता. ३० जानेवारी रोजीं ऑल इंडिया रेडिओतर्फे मुंबई येथें विद्यार्थ्यांसाठीं दिलेले व्याख्यान. ऑल इंडिया रेडिओच्या कृपेनें.

# कवि माधवानुज

माधवानुजांची कविता वाचण्याचा प्रसंग मजवर शाळेंत असतांनाच आला. मराठी चवथ्या इयत्तेच्या क्रमिक पुस्तकांत त्यांची 'जाईची फुलें' ही कविता आहे. त्या पुस्तकांतील इतर कवितांच्या मानानें ती अन्वयार्थाला अधिक सोपी असल्यामुळें मला विशेष आवडे. त्यांतहि त्या कवितेंतील

इतुकें बोलुनी थकलीं, सुकलीं मुकलीं स्वकीय तेजातें

हा चरण तर माझ्या मनांत फारच भरला. कवितेची गोडी केवळ कानांनीं अनुभविण्याचें तें वय होतें. शिवाय, 'सूं सणणण' किंवा 'गुं गुं गुं चालूं दे' अशा प्रकारच्या कवितेच्या ओळीं नादमधुर म्हणून जर प्रौढ आणि प्रगल्भ अभिरुचीच्या रसिकांनाहि आवडतात, तर माधवानुजांचा हा चरण मला त्या वेळीं आवडला असल्यास, त्यांत नवल काय ? अजूनहि माधवानुजांचें नांव कानांवर पडतांच मला त्या कवितेची हटकून आठवण होते; व त्या वेळीं त्यांच्याविषयीं जी सहानुभूति न कळत उत्पन्न झाली, ती यथार्थ होती असें वाटून समाधान झाल्याशिवाय रहात नाहीं. लहानपणीं स्मृतिपटावर उमटलेल्या इतर अनेक गोष्टींचे ठसे आतां अस्पष्ट होऊन अगर अजिबात उडून गेले आहेत. पण माधवानुजांची हीं 'जाईची फुलें' आज फिरून हुंगलीं असतांहि त्यांच्या सुवासाचा ताजेपणा तसाच टिकलेला पाहून मन हरखतें आणि बाळपणच्या इतर आठवणीं-प्रमाणें निदान या कवितेच्या बाबतींत तरी,

The things which I have seen
I now can see no more

असें उद्वेगानें म्हणण्याची पाळी आली नाहीं, याबद्दल आनंद वाटतो. लहानपणीं जी कविता आवडली तीच मोठेपणींहि आवडावी, हें मी त्या कवितेच्या चांगुलपणाचेंच एक लक्षण समजतों. शुचिता आणि साध्रेपणा हे माधवानुजांच्या काव्याचे प्रमुख गुण या छोट्या कवितेंत प्रतिबिंबित झाले आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या काव्यांत जी अव्याज उदासीनतेची गोडी भरून

राहिली आहे, तिचीहि छटा या कवेतेंत आढळते. आणि त्यामुळें ती केव्हांहि वाचलें असतां मनाला चटका लागतो.

माधवानुजांच्या कवितेप्रमाणें त्यांचें चरित्रहि अगदीं साधें आहे. वीर आणि कवि यांचीं चरित्रें नेहमींच बहुधा अद्भुत असतात. युद्धाच्या कथांमुळें वीरचरिताला रम्यपणा येतो. उलट कविचरित्रांत तोफांचा गडगडाट कानांवर पडण्याचा संभव कमी. डांटे, बायरन किंवा डानंझिओ यांच्यासारखे लढाईंत प्रत्यक्ष भाग घेतलेले कवि किती सांपडतील? तथापि कवि हा एका अर्थानें वीरच असतो; व ज्या मानानें त्याच्या ठिकाणीं वीरवृत्ति उत्कट असेल, त्या मानानें त्याचें चरित्रहि रमणीय होतें. 'रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग' हे उद्गार तुकोबांनीं जरी कदाचित् निव्वळ संतांना अनुलक्षून काढले असले, तरी ते कवींनांहि तितकेच लागू पडतात. कारण, वीराचा पराक्रम हा जसा व्यावहारिक उलाढालींत व्यक्त होतो, तसें कवीचें कर्तृत्व मनःसृष्टींतील घडामोडींत दिसून येतें. वीराची कीर्ति ही प्रायः जयस्तंभांवर अधिष्ठित झालेली असते. पण कवीला यश मिळो वा न मिळो, त्यानें भोगलेल्या आपदांनींच त्याच्या चरित्राला अद्भुतपणा आणि कवित्वाला अलौकिकपणा येतो; व म्हणून, कवीचा गौरव जरी वीराप्रमाणें त्याच्या हयातींत झाला नाहीं, तरी शरीरापेक्षां श्रेष्ठ जें मन किंवा व्यवहारापेक्षां विशाल जें वाङ्मय त्याच्या क्षेत्रांत कर्तबगारी गाजविणाऱ्या या शूराचा सन्मान भावी काळांत भरपूर होतो. तुफान संकटांत, यत्किंचितहि धीर ढळूं न देतां, देशाचें स्मरण करीत देह ठेवणारा विजयी नेलसन हा तर वंदनीय खराच; पण उतार वयांत, दृष्टि गेल्यावर दुःखानें मुळींच न गांगरतां,—

Thou, celestial light
Shine in wards, and the mind through all her powers
Irradiate-there plant eyes; all mist from thence
Purge and disperse, that I may see and tell
Of things invisible to mortal sight

असे उद्गार धैर्यानें काढणारा मिल्टनहि तितकाच धन्य आहे, असें कुणाला वाटणार नाहीं?

कौपरच्या चरित्राविषयीं लिहितांना ऑगस्टाईन विरेल यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, जिवंतपणीं कवींची एकंदरींत दुर्दशाच असते. त्यांच्याविषयीं उत्कंठा उत्पन्न होते, ती ते मेल्यावर! या त्यांच्या विधानांत अतिशयोक्ति आहे, असें कोण म्हणेल? कोणत्याही देशांतील कवींचीं चरित्रें धुंडाळून पाहिलीं, तर त्यांत दैन्य आणि दारिद्र्य यांशिवाय दुसरें काय आढळतें? मेल्यावर जें जग या कवींना डोक्यावर घेऊन नाचतें, तें जिवंतपणीं त्यांच्याकडे बहुधा ढुंकूनहि बघत नाहीं. इटॅलियन कवी टॅसो याला रात्रीच्या वेळीं लिहिण्याकरितां मेणबत्ती विकत घेण्याचीहि ऐपत नव्हती; व म्हणून त्यानें आपल्या लाडक्या मांजराला उद्देशून, 'तुझ्या डोळ्यांच्या चमकेच्या प्रकाशांत तरी मला लिहूं दे,' अशा अर्थाचें एक हृदयंगम सुनीत लिहिलें आहे. तें वाचून आज सारें जग हळहळतें. पण, जिवंत असेपर्यंत उसनवारीशिवाय टॅसाच्या दृष्टीला अन्न पडत नसे, याची वाट काय? इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धा मिल्टनला सगळा जन्म अज्ञातवासांत कंठावा लागला; ड्रायडनची उपासमार झाली आणि गोल्डस्मिथ कर्जांत बुडून मेला. खुद्द महाराष्ट्रांतील जुन्या कवींचीं चरित्रें कुणी काळजीपूर्वक लिहून ठेवलीं नाहींत. पण महिपतीच्या वर्णनांवरून जर कल्पना केली, तर त्यांचाहि जन्म बहुतेक विपत्तींत गेला, असेंच म्हणावें लागतें. शिवाय, कवित्वाला संतपणाची जोड मिळाल्यामुळें, त्यांच्या दुःखांना दैवी चमत्कारांचें स्वरूप येऊन, तो एक कौतुकाचाच विषय होऊन बसला; व भाविक चरित्रकारांनीं, जळलें तें कश्मल आणि उरलें तें कांचन, अशी त्यांच्या दुर्दैवाची उपपत्ती लावली! अलिकडील कवींपैकीं विनायक, गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर यांचें आयुष्य किती आपत्तींत गेलें, हें प्रसिद्धच आहे. फुलाचा वास वाऱ्याच्या झुळकेबरोबर अंगावर येतांच तो हुंगून मोकळे होणारे लोकच फार. त्याच्या सुवासावर लोभावून, तें फूल खालीं जमिनीवर कांट्यांत लोळत पडलें आहे कीं झाडाच्या फांदीवर डौलानें डुलतें आहे, हें मुद्दाम जाऊन पाहाणारे लोक किती निघतील? सुखाचा उपभोग सहज घडला, तर तो घेऊन बेपर्वाईनें पुढें झटकणें, हा मनुष्याचा स्वभावच आहे; व म्हणूनच गुणी जनांची जिवंतपणीं बहुधा दुर्दशा झालेली दृष्टीस पडते. त्यांतहि समाजाच्या लहरी अभिरुचीवरच ज्यांचा उत्कर्ष अवलंबून असतो, त्या कवींची स्थिति वाऱ्याचे तडाखे खात लाटेबरोबर वर खालीं होणाऱ्या होडीसारखी बेभरंवशाची असल्यास नवल काय?

परंतु माधवानुजांच्या चरित्रांत असा कोणतांच अद्भुतपणा अगर अपूर्वाई नाहीं. जुन्या बाळबोध वळणाच्या सामान्य संसारी मनुष्याचें चरित्र जसें असतें, तसेंच त्यांचेंहि चरित्र आहे. संकटें आली असलीं, तरी तींहि नित्य प्रापंचिक माणसांवर येतात त्या प्रकारचीं. त्यांतहि हृदयाला पाझर फोडील किंवा बुद्धीला स्तिमित करील, असें कांहीं नाहीं. वाऱ्यानें हेलकावणाऱ्या पानाची हालचाल पाहून ज्याप्रमाणें कवीच्या मनांत खळबळ उडून जाते, त्याचप्रमाणें प्रेमभंगासारख्या सामान्यतः क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगानेंहि त्याच्या चरित्रांत क्रांती घडून येते. आणि, असल्या क्रांतिमुळें जगांतलि अनेक महाकवींच्या कृतींना रमणीयता आली असून, त्यांचीं चरित्रें वाचूं लागलें कीं, तीं कादंबरीइतकींच चटकदार वाटतात. डांटे, गटे, शेले आणि रोझेटी यांच्या चरित्रांतून प्रेमविषय काढून टाकला, तर त्यांत वर्णनीय किंवा वाचनीय असें काय शिल्लक राहील? पण माधवानुजांना या प्रेमाच्या पिशाचानेंहि कधीं झपाटलें नाहीं. कोणत्याहि विकारानें किंवा विचारानें वेडावून जावयाला जा उत्कटपणा स्वभावांत असावा लागतो, तो त्यांच्या ठिकाणीं नव्हता. शारीरिक व्याधींनी त्यांची पाठ सतत पुरविली. जिवाला नेहमीं चैन नसल्याकारणानें संसारांत त्यांचें चित्त फारसें रमलें नाहीं. तें प्रसन्नमुख होते, असें म्हणतात. तथापि त्यांच्या कवितेच्या तोंडावर मात्र कनवाळुपणाची उदास कळा दृष्टीस पडते; व आनंदाची झांक त्यावर क्वचित् दिसली, तरी ती क्षितिजावर ओथंबलेल्या काळ्या भोर मेघावर नुकत्याच बुडालेल्या सूर्याचें किरण परावर्तित होऊन पडले असतां, त्यांच्या छटा जशा दिसतात तशा तऱ्हेची. उत्कटता आणि उच्छृंखलपणा तर त्यांच्या काव्यांत नाहींच; पण सामान्यतः वरिवृत्तींना आवाहन करील, असेंहि कांहीं त्यांत नाहीं. दुःख पाहतांच मन द्रवावें व नश्वरतेची साक्ष पटून उदास विचार मनांत घोळावे, अशी त्यांची वृत्ति होती. त्यांच्या कवितेंत तेजस्विता आणि कल्पकता हे गुण अगदीं कमी. किंबहुना, माधवानुज हे शोकी कवि होते, असेंहि म्हटलें तरी चालेल. कविता हा त्यांचा केवळ दुय्यम व्यवसाय होता. म्हणजे, तिची आवड जरी त्यांना अगदीं उपजत होती, तरी जातिवंत कवीप्रमाणें सर्व व्यवसायांवर पाणी सोडून, तिचेंच एक वेड त्यांनीं घेतलें नाहीं. कवितेची गोडी ज्यांना अतिशय असते, ते अनुकरणाच्या सहजप्रवृत्तीनें स्वतःहि शोकाखातर कविता रचतात; व त्यांची

रचना जर चांगली साधली, तर कालांतरानें ते कवींत मोडूं लागून, कीर्तीचाहि लाभ त्यांना थोडाबहुत होतो. अशा हौशी कवींत माधवानुजांची गणना करावयाला काय हरकत आहे ? निदान–

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्या कला
तुझ्यास्तव न तीं पदें, उपपदें मिळालीं मला
तुझ्यास्तव न लोभतां विभवमार्ग मी टाळले
तुझ्यास्तव सखे ! मला स्वजन तेहि कंटाळले

असें म्हणत तीन वर्षांत कविता लिहिली नाहीं म्हणून तळमळणाऱ्या नादी कवींपैकीं तरी माधवानुज खचित नव्हत.

नवीन संस्कृतीशीं संबंध आल्यामुळें जी विचारक्रांती घडून येते, तिचा पुरस्कार जरी प्रतिभाशाली विभूतींनीं केला, तरी ते विचार निरनिराळ्या रीतींनीं वारंवार व्यक्त करून, एकंदर समाजांत त्यांचा प्रसार करण्याचा उद्योग इतर अनुयायी व्यक्तींकडून घडतो. कित्येक वेळां असेंहि होतें कीं, मुख्य गवयाची सांथ करणारे त्याचे हे जोडीदारहि आपल्या उस्तादाइतकेच उंच आणि सुरेल आलाप घेऊं शकतात; व टेननें म्हटल्याप्रमाणें, प्रतिभागुण हा जरी त्यांच्याठिकाणीं कमी असला, तरी विचारक्रांति यशस्वी व्हावयाला त्यांची मदत पुष्कळच होते. केशवसुत हे आधुनिक कवितेचे प्रवर्तक खरे. पण टिळक, विनायक, गोविंदाग्रजप्रभृति कवींनीं जर त्यांची परंपरा उचलून धरली नसती, तर कुंटे यांच्याप्रमाणें केशवसुतांचेंहि प्रयत्न निष्फळ झाले असते. त्या दृष्टीनें माधवानुजांच्या कवितेचें महत्त्व विशेष आहे. ते जुन्या कवितेचे भोक्ते; व नवीनाविषयीं त्यांना जरी केवळ अनादरच नसला, तरी त्याकडे त्यांचा ओढा एकंदरीत कमी. तथापि, केशवसुतांच्या कवितविषयीं त्या वेळीं इतका तीव्र मतभेद असतांहि, तिच्या नावीन्याचें मर्म ओळखून, माधवानुजांनीं त्यांचें अनुकरण केलें. टिळक आणि विनायक यांच्याहून माधवानुजांच्या अनुकरणाचें महत्त्व अधिक आहे. विनायकांनीं केशवसुतांचें अनुकरण केलें असलें, तरी तें फक्त अगदींच जुन्या पद्धतीनें कविता न लिहिण्यापुरतें. नवीन विचारांची स्फूर्ति जरी

त्यांच्या कवितेंत असली, तरी जुन्या पिढींतील सुधारकांप्रमाणें, विचार नवे पण रहाणी जुनी, असें तिचें स्वरूप आहे. टिळकांच्या ठिकाणीं जुनें वळण शिल्लक रहाण्याचें कांहींच कारण नव्हते; व वर वर पहाणाराला त्यांची कविता अगदीं आधुनिक धर्तीची आहे, असेंच वाटतें. तथापि, झाडाचें हिरवेंगार पान सूर्यप्रकाशांत धरलें असतां त्याचें अंतरंग जसें स्पष्ट दिसतें, तशीच चिकित्सक बुद्धीनें बघणाराला त्यांच्या कवितेच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटल्याशिवाय रहात नाहीं. त्यांच्या कवितेचा वेष नवीन असला, तरी, जुनच विचार नव्या पद्धतीनें प्रतिपादन करणाऱ्या थिऑसॉफिस्टाप्रमाणें, तिचें वळण मात्र जुनें आहे. केशवसुतांच्या बरोबरीनें त्यांनीं भावगीतें लिहिलीं. पण, एलिझाबेथ ब्राउनिंगच्या सुनीतांचें भाषांतर करण्याचा प्रसंग आला असतां, त्यांनीं केशवसुतांचें अनुकरण न करतां, त्या सुनीतांची खुशाल बेचव भावगीतें बनविलीं. हिंदु असतांना ज्याप्रमाणें ते शास्त्रीमंडळींत मोडत असत, त्याप्रमाणें ख्रिस्ती झाल्यावरहि त्यांचा त्याच वर्गांत समावेश झाला. आणि, स्वतःला बाट्या किंवा बंडखोर म्हणवून घेण्यांत जरी त्यांना मोठें भूषण वाटे, तरी शास्त्रांच्या मर्यादांतच त्यांची प्रतिभा सदैव घोटाळत राहिली. माधवानुज हे जातीचेच बंडखोर नव्हते; व टिळकांप्रमाणें बंडखोरीचा लटका आवेशहि त्यांनीं कधीं अंगावर आणला नाहीं. पण, केशवसुतांनीं उभारलेल्या बंडाच्या झेंड्याखालीं जे कवि उत्साहानें जाऊन उभे राहिले, त्यांत माधवानुजांचा मान पहिला आहे, असें म्हटलें तरी चालेल. 'सुनीत' मराठीमध्यें प्रचलित व्हावें म्हणून केशवसुतांनीं जे प्रयोग केले, त्यांत त्यांना माधवानुज आणि तांबे या दोनच प्रमुख कवींकडून प्रोत्साहन मिळालें. केशवसुतांप्रमाणें माधवानुजांनींहि निरनिराळ्या प्रकारचीं 'सुनीतें' लिहिलीं. 'भगवद्गीता', काल, कीर्ति आणि विस्मृति' व 'जादूचा प्रभाव' हीं त्यांचीं सुनीतें, हृदयंगम आहेत.

माधवानुजांना प्रतिभेचें देणें जरी फारसें लाभले नव्हतें, तरी कवित्वाला उदात्तरंग आणणारी कळकळ त्यांच्या ठिकाणीं उपजतच होती. स्वतःच्या मनाला जें जाणवलें, तें कळकळीनें बोलून दाखविल्यामुळें, त्यांच्या कवितेला पुष्कळ नवीनपणा आला आहे. त्यांची कविता केळीच्या कोवळ्या पानांवर देवपूजेकरतां ठेवलेल्या कुंदाच्या ओंजळभर फुलांसारखी आहे. रंग साधा पण शुभ्र,

मुत्रासहि बेताचा; शुचिता हेंच काय तें त्यांचें गुणसर्वस्व. कल्पनेचे चमत्कार जरी त्यांच्या कवितेंत नसले, तरी कळवळा आणि कळकळ हे गुण केव्हां केव्हां इतके असतात कीं, ती वाचून मन अगदीं विरघळून जातें. त्यांचीं दुष्काळावरील गाणीं आणि 'स्मृतिचित्र' 'विसरलेलें गाणें', 'माझ्या लहानपणची बाग' 'स्मशानगीत' या कविता मनाला चटका लावतात. कांहीं दृश्यें अशीं असतात कीं, तीं वर्णन करितांना कलाकुसर न योजणेंच इष्ट. अशीं दृश्यें माधवानुजांनी सहजरम्य रेखाटलीं आहेत. कारण स्वभावोक्ति हाच अलंकार त्यांना विशेष साधे. त्यांची बहुतेक कविता प्रासंगिक स्फूर्तीची आहे. पण ती त्रुटित असली, तरी तेजस्विता किंवा तरलता हे गुण तिच्यांत अगदीं कमी; व भावत्तेचाहि जिव्हाळा असावा तितका नसतो. त्यांच्या गीतांना भावगीतें म्हणणें कठीण वाटतें. तत्वशोधनाची आवड त्यांना बेसुमार होती. त्यामुळें त्यांच्या बऱ्याच कवितांची दशा इसापनीतींतील गोष्टींसारखी झाली. त्यांची भावना इतकी कोमल असे कीं, तत्वविचारांच्या उन्हाचा कवडसा पडतांच ती कोमेजून जाई, वर्ड्स्वर्थ किंवा टेनिसन् यांची कविता तत्वविचाराच्या उन्हानें भाजून न निघतां उलट अधिक तेजदार झालेली दृष्टीस पडते. पण माधवानुजांची मनोभूमि कोंकणच्या जमिनीसारखी होती. फार काळ पोटांत पाणी धरून भरदार पीक देणें, हा तिचा स्वभावच नव्हे. आणि जें पीक येतें, तेंहि कसाला इतकें कमी असावयाचें कीं, चांदणें स्वच्छ पडल्यानेंहि सुकून जावें. त्यांची कविता आधीं तोटकी; त्यांतच तत्वचिंतनाच्या व्यथेमुळें तिची असलेली वाढहि खुरटते. 'पारिजातकाचें फूल' हीं त्यांची कविता या दृष्टीनें वाचण्यासारखी आहे. झाडावरून प्राजक्ताचें फूल खालीं पडतांना पाहून—

क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति

या गीतेंतील कल्पनेची कवीला आठवण झाली. हा आरंभ खरोखरीच सुंदर आहे. पण पुढें प्रवचन सुरू झाल्यामुळें त्याचे सगळें स्वारस्य फुकट जातें. कृष्णाकोयनांच्या प्रीतिसंगमावर जें गोड गाणें त्यांनी लिहिलें आहे, त्यांतहि बोध करण्याची संधी वायां दवडलेली नाहीं. त्यांची भावनात्मक कविता वाचतांना अकालींच पोक्तपणा येऊन गांभीर्याचें ठाणें तोंडावर बसलेल्या पोरक्या मुलींची आठवण होते. भावगीतांत जीवनकला खेळती हवी. पण तत्त्वविचारांच्या गार-

त्यानें माधवानुजांच्या कवितेंत ती गोठून गेलेली दिसते. वर्डस्वर्थलाहि तत्वज्ञान सांगण्याचा जबर सोस होता. परंतु त्याच्या वाणींत तडफ फार असल्यामुळें 'ओड टु ड्यूटी' सारखीं त्याचीं प्रवचनें वाचतांनाहि कंटाळा येत नाहीं.

माधवानुजांनींहि तत्त्वशोधनाची स्फूर्ति वर्डस्वर्थपासूनच घेतली. पण नंदादीपावर नीरांजन लावण्यासारखाच हा प्रकार झाला. वर्डस्वर्थचें अंतःकरण जितकें संस्कारक्षम होतें, तितकीच ग्रहण केलेले संस्कार, स्वातीच्या जलबिंदूप्रमाणें मनाच्या शिंपल्यांत सांद्र होऊन त्याला मोत्याचा आकार येईपर्यंत, सांठवून ठेवण्याची त्याची शक्तीहि मोठी विलक्षण होती. किंबहुना, मनाच्या भिंगावर पडलेल्या प्रतिबिंबाचें झटपट चित्र होणें, हें त्याला संमतच नव्हतें. त्या प्रतिबिंबाला चांगला आकार येऊन, तें पूर्ण होईपर्यंत मनाच्या बंदिस्त कपाटांत पडून रहाणेंच त्याला इष्ट वाटे. शिवाय, त्याचें मनहि इतकें नाजूक होतें कीं, हवेंतील सूक्ष्म फरक दाखविणाऱ्या यंत्राप्रमाणें, यत्किंचित् गोष्टीचाहि त्यावर फार परिणाम होई; वं झालेला परिणाम पुष्कळ काळ टिकताहि असे.

To me the meanest flower that blows can give
Thoughts that do often lie too deep for tears

हें त्यानें स्वतःच आपल्या मनःस्थितीचें केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. तत्त्वचिंतनानें त्याच्या स्फूर्तीला विशेषच तेज चढे. क्वचित् असेंहि होई कीं, कवितेंतील मूळ मध्यवर्ती कल्पना पहावी, तर ती धूमकेतूच्या ताऱ्याच्या टिकली एवढी लहान; व तात्त्विक प्रवचनाचा पिसारा मात्र ऐसपैस पसरलेला असावयाचा. माधवानुजांकडून वर्डस्वर्थच्या या दोषांचेंच अनुकरण अधिक घडलें. बर्फानें आच्छादलेलीं नगराजाचीं रजतशुभ्र शिखरें पाहून मनाला आल्हाद होतो, हें खरें. पण हरघडी पायांखालीं जर बर्फच तुडवावें लागलें, तर मनाला उल्हास कसा वाटावा ? केशवसुतांच्याहि कवितेंत तत्वविचार पुष्कळ आढळतात. तथापि ते स्वतःच उकलून सांगण्याची तसदी त्यांनीं कधींच घेतली नाहीं. उलट, माधवानुजांना तात्पर्य सांगितल्याशिवाय कविता पूर्ण झाली, असें वाटतच नसे. तरीहि त्यांच्या कांहीं तात्विक कविता वाचून मनाला आनंद होतो. वर्डस्वर्थच्या विचारांच्या छटा या कवितांत उमटलेल्या असून, त्यांतील कांहीं रूपांतरित असाव्यात, अशीहि शंका येते. 'संध्याकाळची सहल' ही कविता

वर्डस्वर्थच्या ' टेबल्स टर्नड् ' या चुटक्याचें रूपांतर असून, ' चितूर ' ही कविता त्याच्या ' टु ए बटरफ्लाय ' या चुटक्यावरून सुचलेली दिसते. well I remember how you smiled या लँडोरच्या चुटक्यावरून ' नामलेख ' ही कविता लिहिलेली असावी. पण याच चुटक्याचें रेंदाळकरांनीं केलेलें ' नामलेखन ' हें भाषांतर अधिक सुटसुटीत व सरस आहे. ' समाधि आणि जाईची वेल ' व ' जीवाचें अमरत्व ' या कविताहि स्वतंत्र नसाव्यात, असा भास होतो. परंतु, अशा रीतीनें सगळ्याच चांगल्या कवितांबद्दल शंका घेत बसण्यापेक्षां, बिचाऱ्या कवीला संशयाचा फायदा दिलेला काय वाईट ? शिवाय, भाषांतर सुंदर झालेलें असलें, म्हणजे वाचणारालाहि तें भाषांतर आहे कीं नाहीं याची चिकित्सा करीत बसण्याचें भान रहात नाहीं; व परभाषेंतून पूर्वीं वाचलेली रमणीय कल्पना स्वभाषेंत पुन्हा वाचावयाला मिळाल्याबद्दल समाधानच होतें.

माधवानुजांची निखालस भाषांतरित कविताहि बरीच आहे. मधुसूदन दत्त आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या उत्कृष्ट काव्यांची रूपांतरें करून त्यांना मराठी वाङ्मयांत चांगली भर घातली. मधुसूदनांच्या काव्यांना मराठी पेहराव चढविण्याची स्फूर्ती माधवानुज आणि रेंदाळकर या दोनच कवींना झालेली दिसते; व या कामीं माधवानुजांहून रेंदाळकरांनीं अधिक यश मिळविलें, असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं. भाषांतर करण्याची कला खरोखरीच मोठी अवघड आहे. भाषांतरकार हा स्वतः समानशील आणि सहानुभवी नसेल, तर मूळ कृतीचें स्वारस्य भाषांतरांत उतरणें शक्य नाहीं. ज्या भावनेनें प्रेरित होऊन मूळ लेखक आपली कृति निर्माण करितो, तिचा कांहींच संस्कार जर भाषांतरकारावर घडलेला नसेल, तर त्या भावनेचें रहस्य त्याला स्वतःच्या शब्दांत कसें विशद करून सांगतां येईल ? उत्तम लेखक हा उत्तम भाषांतरकार असतोच असें नाहीं. मोती स्वतः कितीहि तेजस्वी असलें, तरी त्यावर सूर्यकिरण पडून काय उपयोग ? तो स्फटिकावर पडला तरच त्याचें परावर्तन होतें; व त्यांतहि पैलू पाडलेल्या हिऱ्यावर पडल्यानें त्याच्या तेजाची जी खुलावट दिसते, ती तर कांहीं वेगळीच. एडवर्ड फिट्जेरल्ड हा कांहीं प्रतिभाशाली लेखक नव्हे. पण, ज्या संशयाच्या आवर्तात सांपडून उमर खय्यामनें कलंदराचीं उन्मादक गीतें गाइलीं, त्या संशयानें फिट्जेरल्डलाहि घेरलें असल्यामुळें, त्याला ' रुबायत'चें इतकें सरस

रूपांतर करितां आलें. कालिदासाचा रंगेलपणा जर थोरल्या शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं नसता, तर मेघदूताचें मराठी रूपांतर इतकें मोहक झालें असतें, असें कोण म्हणेल ? माधवानुज कुशल कवी असूनहि मधुसूदनांच्या प्रणयपत्रिकांची भाषांतरें करणें त्यांना स्वभावतःच शक्य नव्हतें. या पत्रिकांची कल्पनाच मुळीं रमणीय आहे. पण माधवानुजांची भाषांतरें वाचून तिचा प्रत्यय येत नाहीं. रेंदाळकर उत्कट मनोवृत्तीचे कवी असल्यामुळें त्यांचें शूर्पणखेच्या पत्रिकेचें भाषांतर हृदयंगम झालें आहे. तें मुळाशीं कदाचित् कमी जुळतें असेल. परंतु फिट्जेरल्डचें रुबायत व शास्त्रीबुवांचा मेघदूत हीं काव्यें जर मूळाशीं ताडून पाहिलीं, तर किती निराळेपणा आढळतो ? तथापि, मूळ कृतींचें सौंदर्य त्यांत अनुभवाला येत असल्यामुळें, निव्वळ शब्दांकरितां कोणीहि घासाघीस घालीत बसत नाहीं. नुसतें शब्दाला शब्द ठेवण्याचें काम सोपें आहे; व डिक्शनरी धुंडाळून भाषेचा वेजबाबदार तज्ज्ञहि तें किती चोख पार पाडतो, हें मराठी बायबल चाळण्यानें सहज समजेल. आणि शब्दशः भाषांतर करण्याच्या फंदांत पडल्यामुळें चांगल्या पटाईत लेखकाचीहि कशी दुर्दशा उडते, हें पंडिता रमाबाईंच्या बायबलांत पाहावयाला मिळतें.

त्या मानानें मधुसूदनांच्या 'मेघनादवध' या महाकाव्याचें भाषांतर पुष्कळच चांगलें आहे. हें काव्य मूळ अभित्राक्षरच्छंदांत म्हणजे निर्यमक लिहिलेलें असूनहि त्याचें मराठी भाषांतर मात्र माधवानुजांनीं सयमक केलें आहे. त्यांच्या स्फुट कवितेंतील रचनेचा साधेपणा या काव्यांत आढळत नाहीं. या काव्याचें आर्यावृत्त मोरोपंती घाटाचें आहे. पहिल्याच सर्गांतील

तैं नैकषेय बोले, 'तुजसम वा अन्य बोलका नाहीं' १

ही आर्या वाचतांच पंतांच्या भारतांतील,

चुंबुनि शंभु म्हणे, "वा ! तुजसम आम्नाय बोलका नाहीं."

या नमनाच्या तिसऱ्या आर्येची आठवण सहजच होते. माधवानुजांच्या तर्फेनें फार तर इतकेंच म्हणतां येईल कीं, पंतांप्रमाणें त्यांची सर्वच यमकें क्लिष्ट किंवा कर्णकटु नाहींत. पण त्याबरोबरच, पंतांचें अर्थगौरव आणि भाषावैभव यांचा आढळ माधवानुजांच्या काव्यांत होत नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. पंतांच्या शब्दलाघवाचा जरी अतिरेक झाला असला, तरी ज्याच्या भात्यांत अक्षय्य बाण भरले आहेत, अशा भारतीय वीरांच्या शर-

संधानाप्रमाणें तें ेक्षणीय वाटतें. त्यांच्यासारखी भाषेची आतषबाजी करणें माधव ानुजांना अशक्यच होतें. पण अलीकडील; आर्यापति मोगरे यांच्या ा आर्येइतकी त्यांची आर्या सुबोध नाहीं; व अर्थाची ओढाताण जरी तींत सहसा झालेली नसली, तरी चंद्रशेखर आणि विनायक यांच्या आर्येतील नादमाधुर्यहि तिच्यांत नाहीं. तथापि या काव्याच्या तिसऱ्या व चवथ्या सर्गांची रचना सुश्लिष्ट असून, त्यांतील वर्णनेंहि रसाळ आहेत. या भाषांतराहूनहि 'गी तांजली' तील कांहीं कवितांचा त्यांनीं केलेला अनुवाद अधिक सरस आहे. शां रस हा त्यांना स्वभावतःच प्रिय होता. तेव्हां विरागी भक्तीचा 'गीतांजली-' ती ल गंभीर प्रेमळपणा या अनुवादांत उतरला असल्यास, त्यांत नवल काय? ठकीच्या गाण्यांत पुष्कळ वेळां असा प्रकार घडतो कीं, गवयाला त्याचा आवडता राग म्हणावयाला सांगितला, म्हणजे तबल्याच्या ठेक्याकरतां एरवीं घोटाळणाऱ्या गाण्याला तेव्हांच रंग चढतो. तसेंच या प्रसंगीं माधवानुजांचें झालें. गीतांजलीच्या या भाषांतराला अनुवाद म्हणणेंच उचित होय. कारण, हृदयांत प्रस्फुरित झालेले जे भक्तीचे बोल स्वतः माधवानुजांना इतक्या सुंदर रितीनें कदाचित् व्यक्त करतां आले नसते, ते या भाषांतराच्या मिषानें प्रकट करण्याची संधि त्यांना अभावितपणें लाभली. आणि हीं भाषांतरित गीतें स्वतःशीं गुणगुणतांना खुद्द त्यांनींहि आपलें तळमळणारें हृदय त्यांत रितें केल्याचा आनंद खचित अनुभविला असेल.

माधवानुजांना हा अनुवाद इतका उत्तम साधला, याला आणखीहि कारण संभवतें. कोणताहि विचार सरळ सांगण्यापेक्षां तो लक्षणेनें सांगणें, त्यांना फार आवडे. दगडावर दगड रचले म्हणजे इमारत उभी रहाते. पण तें शिल्प नव्हे. मनुष्य जर निव्वळ उपयुक्ततावादीच असता, तर ताजमहालासारखें अप्रतिम शिल्प उभारण्यांत त्यानें श्रम किंवा संपत्ति यांचा अपव्यय खचित केला नसता. पण मन आणि बुद्धि या सूक्ष्मतम इंद्रियांचें समाधान नुसती स्थूल उपयुक्तता पाहून होत नाहीं. तीं जितकीं उन्नत आणि विशाल, तितकी त्यांची उपयुक्ततेची कल्पनाहि उदात्त आणि व्यापक. म्हणूनच सौंदर्य हें मानवी जीवितांचें सर्वस्व समजतात. विचार जर सरळ शब्दांनीं सांगितला तर तो कळत नाहीं, असें नव्हे. किंबहुना तो कळावयाला अधिक सोपा जातो. पण विचार नुसता नमूद करण्यांत काव्य नाहीं. तो लक्षणेनें खुलवून सूचित करणें, यांतच कला आहे. विशेषतः तत्वशोधनाला तर लक्षणेशिवाय सौंदर्य येतच नाहीं. त्यामुळें रवींद्रांसारखे

रूपांतर करितां आलें. कालिदासाचा रंगेलपणा जर थोरल्या शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं नसता, तर मेघदूताचें मराठी रूपांतर इतकें मोहक झालें असतें, असें कोण म्हणेल ? माधवानुज कुशल कवी असूनहि मधुसूदनांच्या प्रणयपत्रिकांची भाषांतरें करणें त्यांना स्वभावतःच शक्य नव्हतें. या पत्रिकांची कल्पनाच मुळीं रमणीय आहे. पण माधवानुजांची भाषांतरें वाचून तिचा प्रत्यय येत नाहीं. रेंदाळकर उत्कट मनोवृत्तीचे कवी असल्यामुळें त्यांचें शूर्पणखेच्या पत्रिकेचें भाषांतर हृदयंगम झालें आहे. तें मुळाशीं कदाचित् कमी जुळतें असेल. परंतु फिट्जेरल्डचें रुबायत व शास्त्रीबुवांचा मेघदूत हीं काव्यें जर मूळाशीं ताडून पाहिलीं, तर किती निराळेपणा आढळतो ? तथापि, मूळ कृतीचें सौंदर्य त्यांत अनुभवाला येत असल्यामुळें, निव्वळ शब्दांकरितां कोणीहि घासाघीस घालीत बसत नाहीं. नुसतें शब्दाला शब्द ठेवण्याचें काम सोपें आहे; व डिक्शनरी धुंडाळून भाषेचा बेजबाबदार तज्ज्ञहि तें किती चोख पार पाडतो, हें मराठी बायबल चाळण्यानें सहज समजेल. आणि शब्दशः भाषांतर करण्याच्या फंदांत पडल्यामुळें चांगल्या पटाईत लेखकाचीहि कशी दुर्दशा उडते, हें पंडिता रमाबाईंच्या बायबलांत पाहावयाला मिळतें.

त्या मानानें मधुसूदनांच्या 'मेघनादवध' या महाकाव्याचें भाषांतर पुष्कळच चांगलें आहे. हें काव्य मूळ अभित्राक्षरच्छंदांत म्हणजे निर्यमक लिहिलेलें असूनहि त्याचें मराठी भाषांतर मात्र माधवानुजांनीं सयमक केलें आहे. त्यांच्या स्फुट कवितेंतील रचनेचा साधेपणा या काव्यांत आढळत नाहीं. या काव्याचें आर्यावृत्त मोरोपंती घाटाचें आहे. पहिल्याच सर्गातील

**तैं नैकपेय बोले, 'तुजसम वा अन्य बोलका नाहीं' १**

हीं आर्या वाचतांच पंतांच्या भारतांतील,

**चुंबुनि शंभु म्हणे, "वा ! तुजसम आम्नाय बोलका नाहीं."**

या नमनाच्या तिसऱ्या आर्येची आठवण सहजच होते. माधवानुजांच्या तर्फेनें फार तर इतकेंच म्हणतां येईल कीं, पंतांप्रमाणें त्यांची सर्वच यमकें क्लिष्ट किंवा कर्णकटु नाहींत. पण त्याबरोबरच, पंतांचें अर्थगौरव आणि भाषावैभव यांचा आढळ माधवानुजांच्या काव्यांत होत नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. पंतांच्या शब्दलाघवाचा जरी अतिरेक झाला असला, तरी ज्याच्या भात्यांत अक्षय्य बाण भरले आहेत, अशा भारतीय वीरांच्या शर-

संधानाप्रमाणें ...ुं प्रेक्षणीय वाटतें. त्यांच्यासारखी भाषेची आतषबाजी करणें माधवानुजांना अशक्यच होतें. पण अलीकडील; आर्यापति मोगरे यांच्या आर्येइतकी त्यांची आर्या सुबोध नाहीं; व अर्थाची ओढाताण जरी तींत ... सहसा झालेली नसली, तरी चंद्रशेखर आणि विनायक यांच्या आर्येतील नादमाधुर्यहि तिच्यांत नाहीं. तथापि या काव्याच्या तिसऱ्या व चवथ्या सर्गांतील रचना सुश्लिष्ट असून, त्यांतील वर्णनेंहि रसाळ आहेत. या भाषांतराहूनहि 'गीतांजली' तील कांहीं कवितांचा त्यांनीं केलेला अनुवाद अधिक सरस आहे. शांतरस हा त्यांना स्वभावतःच प्रिय होता. तेव्हां विरागी भक्तीचा 'गीतांजली-' तील गंभीर प्रेमळपणा या अनुवादांत उतरला असल्यास, त्यांत नवल काय? बैठकीच्या गाण्यांत पुष्कळ वेळां असा प्रकार घडतो कीं, गवयाला त्याचा आवडता राग म्हणावयाला सांगितला, म्हणजे तबल्याच्या ठेक्याकरतां एरवीं घोटाळणाऱ्या गाण्याला तेव्हांच रंग चढतो. तसेंच या प्रसंगीं माधवानुजांचें झालें. गीतांजलीच्या या भाषांतराला अनुवाद म्हणणेंच उचित होय. कारण, हृदयांत प्रस्फुरित झालेले जे भक्तीचे बोल स्वतः माधवानुजांना इतक्या सुंदर रितीनें कदाचित् व्यक्त करतां आले नसते, ते या भाषांतराच्या मिषानें प्रकट करण्याची संधि त्यांना अभावितपणें लाभली. आणि हीं भाषांतरित गीतें स्वतःशीं गुणगुणतांना खुद्द त्यांनींहि आपलें तळमळणारें हृदय त्यांत रितें केल्याचा आनंद खचित अनुभविला असेल.

माधवानुजांना हा अनुवाद इतका उत्तम साधला, याला आणखीहि कारण संभवतें. कोणताहि विचार सरळ सांगण्यापेक्षां तो लक्षणेनें सांगणें, त्यांना फार आवडे. दगडावर दगड रचले म्हणजे इमारत उभी रहाते. पण तें शिल्प नव्हे. मनुष्य जर निव्वळ उपयुक्ततावादीच असता, तर ताजमहालासारखें अप्रतिम शिल्प उभारण्यांत त्यानें श्रम किंवा संपत्ति यांचा अपव्यय खचित केला नसता. पण मन आणि बुद्धि या सूक्ष्मतम इंद्रियांचें समाधान नुसती स्थूल उपयुक्तता पाहून होत नाहीं. तीं जितकीं उन्नत आणि विशाल, तितकी त्यांची उपयुक्ततेची कल्पनाहि उदात्त आणि व्यापक. म्हणूनच सौंदर्य हें मानवी जीविताचें सर्वस्व समजतात. विचार जर सरळ शब्दांनीं सांगितला तर तो कळत नाहीं, असें नव्हे. किंबहुना तो कळावयाला अधिक सोपा जातो. पण विचार नुसता नमूद करण्यांत काव्य नाहीं. तो लक्षणेनें खुलवून सूचित करणें, यांतच कला आहे. विशेषतः तत्वशोधनाला तर लक्षणेशिवाय सौंदर्य येतच नाहीं. त्यामुळें रवींद्रांसारखे

तत्वज्ञ कविहि लक्षणेनेंच आप[illegible] र प्रकट करितात; व 'गीतांजली'त ह अलंकार अनेक ठिकाणीं यो[illegible] त्याचा परिणाम क्वचित् असा होतो कीं, या लक्षणेच्या लाघवांत क[illegible] दताचा मागमूसहि लागत ना[illegible]हीं; व केव्हां केव्हां तर, आपण काय सांगणार होतों, हें त्याचें त्यालाहि [illegible]नासें होतें; फुलांच्या राशींत गौर बेपत्ता व्हावी, त्यांतलाच [illegible] [illegible]शोधन अशा रीतीनें निष्फळ झाल्यावर त्याला शून्यशोधन म्हणावयाला कांहींच [illegible]त नाहीं. आणि मग तें भ्रमराच्या गुंजनाप्रमाणें निरर्थकहि होतें. लक्षणा अति गूढ असणें जितकें अनिष्ट, तितकेंच ती अगदीं उघड असणेंहि अनुचित. आणि, कवी स्वतःच ती उकलून सांगूं लागला कीं, तिला हरदासी दृष्टांताचें स्वरूप येतें. जादुगारानें आपल्या विद्येचें मर्म स्वतःच फोडून सांगितल्यावर, मग कौतुकाला जागा कुठें उरली? पण नुसती लक्षणा सांगूनच कवि थांबला कीं, तें सुंदर, सूचक काव्य होतें. गीतांजलींत लक्षणेचें पूर्ण सौंदर्य दृष्टीस पडतें. पण माधवानुजांच्या कवितेंत मात्र तिचे बरेवाईट दोन्हीहि प्रकार आढळतात. 'मूर्तिकार' ही त्यांची कविता लक्षणेच्या वाईट प्रकारांत मोडेल. पण 'दीपविसर्जन' ही कविता मात्र रमणीय असून, तिच्यांतील लक्षणेनें सुचवून अपुराच सोडलेला तत्वार्थहि, अर्ध-वट गुंफून तशाच टाकलेल्या हाराप्रमाणें, मनाला हुरहूर लावतो. लाक्षणिक कविता लिहिण्याची प्रवृत्ति आधुनिक मराठी कवींत एकंदरींत कमीच आहे. त्या दृष्टीनें माधवानुजांचा हा एक स्पृहणीय विशेष म्हणून सांगता येईल. कल्पनेचें इंद्रजाल आणि बुद्धीचें ऐश्वर्य जरी त्यांच्या कवितेंत नसलें, तरी बिगारींत बस-लेल्या अल्लड मुलापासून तों चिंतेचें काहूर वाहून वाकलेल्या विरक्त वृद्धापर्यंत सर्वांना उपयुक्त आणि उद्बोधक अशी त्यांची कविता आहे. दिवसभर काम करून थकल्यावर सायंकाळच्या उदास वेळीं—

धरीं रे ध्यानीं! जग अळवावरलें पाणी

ही त्यांची गोड ओळ गुणगुणणें कुणाला आवडणार नाहीं? आणि म्हणूनच सुवास थोडा कमी असला तरी सहज हुंगलीं असतां मनाला आनंद देणारीं

.........फुलें असलीं फेंकील कोण हो हातें?

हा प्रश्न माधवानुजांप्रमाणें मलाहि विचारावासा वाटतो.

—काव्यचर्चा, आक्टोबर १९२७

REFBK-0005875